सश्लोकमेघ

—डॉ. रा. चिं. श्रीखंडे

श्री

' तुका म्हणे मेघ नाचवी मयूरें । लपवितां खरें येत नाहीं ॥ '

— श्रीतुकाराम

सुश्लोकमेघ

महाकवि श्रीकालिदासकृत मेघदूताचा मराठी काव्यानुवाद

मूळ संस्कृत मेघदूत

विवेचक प्रस्तावनाप्रबंध (अवतरणिका)

परिशिष्टें, टीपा इत्यादिसह

— लेखक —

डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे, एम्. बी.; बी. एस्.

' वाङ्मय-श्री-खण्ड ', ' सुश्लोकगोविंद ', ' सुश्लोककुमार ',

' कुन्दमाला ', ' सुश्लोकमानस ' इ.

ग्रंथांचे संपादक, लेखक व काव्यकर्ते

— प्रथमावृत्ति —

प्रकाशन— वर्षप्रतिपदा गुढीपाडवा शके **१८७२**

सन १९५० मार्च ता. १९

मूल्य चार रुपये

प्रकाशक:—
डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे,
एम्. बी,; बी. एस्.
मंगळवार, कोल्हापूर.

प्रति कोल्हापूर येथें वरील पत्त्यावर ग्रंथकाराकडे मिळतील.
— पुण्याचे प्रमुख विक्रेते —
पं. महादेवशास्त्री जोशी,
ज्ञानराज प्रकाशन. ४२१ शनिवार पुणें २.

मुद्रक
बा. ना. ठकार
श्रीसिद्धेश्वर प्रेस,
कोल्हापूर.



☆ अर्पणपत्रिका ☆

सुदैवेंकरून कांहीं कालच्याच टरलेल्या जिच्या विरहांत ही
काव्यकृति उगम पावली ती तिलाच अर्पण करणें
उचित होय, म्हणून हा

सुश्लोकमेघ

माझी सहधर्मचारिणी प्रियतमा पत्नी

श्री. सौ. सीतादेवी

इजला

' रागा ' नें किंवा अनुरागानें, अर्पण करीत आहें.

रामचंद्र चिंतामण श्रीखंडे



☆ ☆

" मोगरी, बकुल, शेवति, चांफा
तो गुलाब, मधुमालति वांफा ।
कोण हें फुलवितो वन माळी ?
वाटतो मजसि कीं वनमाळी ! ॥ "

— रा. चिं. श्रीखंडे

' विरहांत वसन्तागम ' कविता श्लोक ६
वाङ्मय–श्री–खण्ड पद्यविभाग पृ. ६६

— अनुक्रमणिका —

[एकूण पृष्ठसंख्या १९२]

अवतरणिकेची विषयानुक्रमणी....

श्रीकृष्णकविकृत कालिदासस्तुति— कालिदासाचे ग्रंथ व थोरवी (१). कालिदासाचें कवित्व–काव्यगुण, वैशिष्ट्यें (२). मेघसंदेश व कालिदास यांची पूर्णसरस्वतीकृत स्तुति (३). – पाश्चात्य पंडितांचे कालिदासविषयक धन्योद्गार—महाकविबाणकृत स्तुतिसुभाषित (४). मेघदूतसंविधानक (५)—(९). मेघदूतासंबंधीं ' लेखका 'चें एक संस्कृत श्लोकपत्र (१०). पाश्चात्य विद्वानांचे मेघदूतानुवाद, डॉ. विल्सनकृत " Kalidasa's Cloud--Messenger" नमुना व विवेचन (१०) ते (१३). इतर अनुवादांचे उल्लेख. मि. रुक् यांचा मेघदूतानुवाद; कविवर्य रवीन्द्रनाथकृत कालिदासप्रशस्तीचा रा. चिं. श्रीखंडेकृत श्लोकानुवाद.- मि. रुक् यांच्या मेघदूतानुवादाचा नमुना (१४). संस्कृत कवींच्या मेघदूतानुसारी कृति. वत्सभट्टिश्लोक (१५). जिनसेनकृत पार्श्वाभ्युदय व विक्रमकृत नेमिदूत हीं ' परिवेष्टितमेघदूत ' अशीं समस्यापूरण काव्यें (१६)–(१७).— दूतकाव्यें वा संदेशकाव्यें (१७). मेघदूतावरून विडम्बनकाव्यें. भामहाचें दूतयोजनेविषयीं मत (१८). महाकविभवभूतिकृत मेघदूतानुकरण. श्रीमद्भागवत, श्रीमन्महाभारत यांतील संदेशकल्पना (१९). मेघदूतांतील कल्पनांचें वैशिष्ट्य. आक्षेपनिरसन. मेघदूताचे देशी भाषांतील अनुवाद. अनुवादकाचे हेतु (२१). हिंदींतील मेघदूतानुवाद राजा लक्ष्मणसिंहकृत अनुवाद व त्याचा नमुना (२१–२२). श्रीकेशवप्रसादकृत अनुवाद व त्याचा नमुना. (२२) श्री अनिरुद्धकृत ' अभिनवमेघ ' व इतर हिंदी अनुवादकांचे नामनिर्देश. ' अभिनवमेघा 'चा नमुना (२३). व विवेचन (२४). गुजराती मेघदूतानुवाद. स्व. कीलाभाई घनश्यामकृत मेघदूतानुवाद. गुजरातींतील इतर कांहीं मेघदूतानुवादकांचे निर्देश. श्री. कीलाभाईच्या अनुवादाचा नमुना (२४). श्री. त्रि. गौ. व्यासकृत मेघदूतानुवाद व त्याचा नमुना. बंगालींतील मेघदूतानुवादकांचे कांहीं निर्देश (२५). मराठींतील मेघदूतानुवाद, मेघदूताची मोहकता, सत्काव्याविषयीं आनन्दवर्धनाचा श्लोक. सौंदर्याची अवर्णनीयता (२६). कै. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचा मेघदूतानुवाद. विवेचन व नमुने. श्री. वा. ना. देशपांडे

यांच्या मार्मिक पत्राचा उतारा. पृ. (२६) ते (३०). कै. कविवर्य सुमंतकृत मेघदूतानुवाद व त्यास कै. विद्यावाचस्पति राशिवडेकरशास्त्री यांनीं लिहिलेला संस्कृत श्लोकात्मक उपोद्‌घात व त्याचा सारांश. (३१) सुमन्तांच्या गुह्यकसंदेशाचे नमुने (३२). शब्दालंकार व अर्थालंकार या दृष्टींनीं मेघदूताची शलाकापरीक्षा व विवेचन. आर्याभारताच्या शलाकापरीक्षेचा उल्लेख (३४). श्री. भा. शं. देवस्थळीकृत समश्लोकी मेघदूतानुवाद–विवेचन व नमुना (३५). कै. डॉ. गं. गो. दामलेकृत समश्लोकी मेघदूतानुवाद नमुना व विवेचन (३६). श्री. वा. ल. अंतरकर यांचा समश्लोकी मेघदूतानुवाद, नमुना व विवेचन (३७). कै. प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांचा मेघदूतानुवाद विवेचन व नमुने. मंदाक्रांतावृत्तचर्चा. वृत्तयोजनेविषयीं क्षेमेन्द्राचें मत–'सुवृत्ततिलक', विवेचन व निष्कर्ष (४०) ते (४२). रस--भावदृष्ट्या मेघदूतश्लोकांचें पृथक्करण व अनुवादास वृत्तयोजना (४२) व (४३). श्री. शां. आ. सबनीसकृत मेघदूतानुवाद विवेचन व नमुना (४३). सर चिं. द्वा. देशमुख यांचा मेघदूतानुवाद विवेचन व नमुना (४४) व (४५). श्री. ग. नी. कात्रे यांचा मेघदूतानुवाद. विवेचन व नमुना (४५) व (४६). प्रस्तुत 'सुश्लोकमेघ'-कर्त्यांच्या स्वभूमिकाकथनांत आलेले विषय पृ. (४६) ते (५५):—
कालिदासकाव्याची आवड व अभ्यासाचे प्रयत्न, काव्यरचना, ग्रंथनिर्मिति (४७) व (४८). मेघदूतानुवादास प्रेरक एका रसिकाचें पत्र. मेघदूतानुवाद-लेखनापूर्वी लेखकाचे विविध प्रवास व सृष्टिदर्शन; गंगायमुनासंगमाचें कालिदासकृत वर्णन व त्याचा श्लोकानुवाद; कालिदासाच्या रम्य वर्णनांची स्मृति करून देणाऱ्या प्रवासांतील विविध अनुभूति; नर्मदा, उज्जयिनी, गंगोत्री, जम्नोत्री, हिमालय, हरिद्वार, दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेर इ. स्थलांचें दर्शन, केरळ्याकडे प्रवास, तिकडील सृष्टिवर्णन, प्रवासांतील अनुभव, दक्षिणेंतील त्रिचनापल्ली, श्रीरंगम्, श्रीक्षेत्र रामेश्वरपर्यंत प्रवासाची संधि. लाहोर व तेथून गोहत्ती, मणिपूर, कोमिल्ला, चितागांग, कलकत्ता इ. कडे प्रवास; त्रिमुलगिरी, सिकंदाबाद, दक्षिण हैद्राबाद; विमानप्रवासाचा एक अनुभव. 'सुश्लोकमेघ'रचना इ. (५५)

मेघदूतावरील संस्कृत टीका–पूर्णसरस्वतीची ‘ विद्युल्लता ’— विशेष वर्णन; मेघदूताभ्यासापासून लाभ कोणते ? परमेश्वरकृत ‘ सुमनोरमणी ’ टीका उल्लेख. पृ. (५५) ते (५८)

मेघदूतांतील स्थलनिर्देश व स्थूल मानानें निर्णय. भारतीय सृष्टिसौंदर्याचीं वर्णनें कालिदासानें गाइलेलीं जणूं राष्ट्रगीतेंच ! (६०)

मेघदूत व श्रीमद्वाल्मीकिरामायण यांतील कांहीं साम्यस्थळें (६०) ते (६८) व तुलना. रामदूत हनुमान् व यक्षदूत मेघ यांची तुलना व वैशिष्ट्यें (६९). मेघदूत व श्रीमद्भागवत, योगवासिष्ठ, श्रीतुलसीरामायण व ज्ञानेश्वरी यांतील कांहीं कल्पनासादृश्यें. (७१) ते (७२). मेघदूतांत कालिदासानें मेघावर केलेल्या कित्येक सरस व उत्तुंग कल्पना (७३).

मेघदूतावर उगाच अपप्रचारी वा प्रचारी थाटानें आक्षेप घेणाऱ्या आक्षेपकांचे मुद्दे व त्यांचें खंडन (७४) ते (७८). मेघदूताविषयीं विद्वद्रसिकांचीं सर्वोत्कृष्ट मतें. श्री. कृष्णमाचारियर यांचा अभिप्राय. मेघदूतांतील मंदाक्रांतावृत्ताचें वैशिष्ट्य– प्रो. रायडर यांचे मेघदूत व कालिदासाची अलौकिक प्रतिभा यांविषयीं विचार (७८) ते (८१), काव्याच्या कांहीं व्याख्या, जगन्नाथपंडितकृत, कोलरिज्कृत (८१) मेघदूतांतील व शाकुंतलांतील चित्रलेखन व त्यांची तुलना, (८२).

मेघदूतविषयक कांहीं आधुनिक रसिक पंडित व कवि यांचे विचार. रवीन्द्रनाथ यांची कालिदासविषयक एक सुंदर कविता जी ‘ से काल ’, तिचा मराठींत कवि विरागी यांनीं केलेला रम्य पद्यानुवाद,(८३)ते(८५).

मेघदूताविषयीं आणखी कांहीं विशेष विचार. आरंभीं मंगल उल्लेख व उपसंहारश्लोकांतील वैशिष्ट्यें (८६). खंडकाव्य व काव्यखंड. संस्कृतमधील ‘ संघात ’ नामक एकवृत्तात्मक काव्यप्रकाराचें रम्यतम उदाहरण म्हणजे ‘ मेघदूत ’ (८७). ‘ सुश्लोकमेघ ’ रचनेंतील विशेष (८७) ते (८९). अवतरणिकासमारोप, कन्नडमधील अनुवादांचा ओझरता उल्लेख, कवि ‘ कुसुमाग्रज ’ कृत मेघदूतानुवाद, विवेचन, नमुना (८९) व (९०). आभारप्रदर्शन. कवि गिरिधर पंडितकृत ‘ सुश्लोक-

मेघ 'प्रशस्ति. रसिकांस विज्ञप्ति. काव्याच्या भाषांतरांतील कलादृष्टि- उत्तम काव्यभाषांतर, कांहीं वैशिष्ट्यें, भाषांतराचे विविध प्रकार, वामन-पंडितांची समश्लोकी गीता. 'गोपीगीत' व त्याचीं वैशिष्ट्यें; गोपीगीताचे अनुवाद, वामनपंडित व मोरोपंत. भाषांतराचें ध्येय व त्याची पूर्ति पृ. (९३) तें (१०१)

— दोन प्रास्ताविक शब्द —

प्रस्तुत लेखकाचे मेघदूतविषयक विचार 'अवतरणिकें'त यथामति सविस्तर देण्यांत आलेच आहेत. ग्राह्याग्राह्यविचारणा रसिकहंस ठरवितीलच!

मेघदूत व कालिदास या विषयांवरील अनेक ग्रंथकारांचा मी ऋणी आहें. विशेषतः मराठी व इंग्रजी भाषांतील श्री. बोरवणकर, इस्लामपूरकर, नंदर्गीकर, काळे, परांजपे, नेरूरकर, नवरे, टोपे व देशपांडेप्रभृति, तसेंच गुजराती, हिंदी इ. भाषांतील लेखक, संस्कृत टीकाकार व 'अवतरणिकें'त उल्लेखिलेले अनेक कवि व ग्रंथकार यांच्या कृतींचा मी कृतज्ञतेनें उल्लेख करतों. तसेंच, कांहीं ग्रंथ मला पुरविल्याबद्दल प्रो. रा. कृ. लागू, सर देशमुख, डॉ. देसाई, प्रो. हुपरीकर, पं. खुपेरकर इ. अनेक सुहृदांचा मी ऋणी आहें. 'यशवंत' मासिकाचे संपादक माझे मित्र श्री. गो. वा. पाध्ये यांच्या प्रेरणेनेंच काव्यभाषांतरांवरील लेख लिहिला गेला त्यांचाहि मी साभार उल्लेख करतों. 'युगवाणी'चे सहृदय संपादक श्री. वामन नारायण देशपांडे यांनीं 'सुश्लोकमेघ' काव्यांतील कांहीं श्लोकांचा उतारा आग्रहानें मजकडून मागवून घेऊन उत्तमपणें 'युगवाणीं'त [नोव्हें.४८] प्रसिद्ध केला व अनेकपरींनीं प्रोत्साहन दिलें. याबद्दल अत्यंत आभार वाटतात.

मेघदूतविषयक दोन व्याख्यानें विद्वज्जनांसमोर देण्याचेहि सुप्रसंग आले. एक संस्कृतमध्यें पुण्याचे ' गीर्वाणवाग्वर्धिनी 'सभेंत (२५-८-४६) व दुसरें श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि औंधचे राजेसाहेब यांचे समोर औंधमध्यें.(ता.१६-९-४८) श्रीमंतांचें हार्दिक प्रोत्साहन मला नेहमींच श्रीकृपेनें लाभलें त्याबद्दल आभार मानण्यास मजजवळ पुरेशी शब्दसंपत्तिहि नाहीं ! मी त्यांस केवळ नम्र अभिवंदन करतों. 'सुश्लोक-मेघा'सहि त्यांच्या कृपेचा अनुकूल समीरण व आशीर्वाद आहेच.

पुस्तकांतील नकाशांत ' आम्रकूट ' कीं ' अमरकंटक ' याविषयीं थोडा मतभेद असल्यानें मेघमार्ग रामगिरीहून ईशान्येस अमरकंटककडे दाखविण्यांत आला आहे. रामगिरीच्या बरोबर उत्तरेस तो आम्रकूट असल्यास तो मार्ग तसा दाखवावा लागेल व वाचक तशी दुरुस्ती करून घेतील अशी आशा आहे.

माझे एक मार्मिक पंडित स्नेही श्री. माधव व्यंकटेश घाटगे, उपनिषत्काव्यकर्ते हे आज नाहींत याबद्दल खेद होतो. त्यांनी माझी ही सर्व कृति हस्तलिखितांत आस्थापूर्वक वाचून अतिशय धन्योद्गार काढले होते. असेंच हार्दिक प्रोत्साहन आमचे बंधुवर्य ती. शंकर आबाजी ऊर्फ भाऊसाहेब हुजुरबाजार (श्रीखण्डे) व आप्तवर्य ती.शंकर नरहर सरदेसाई, फलटण, तसेंच ह. भ. प. श्रीयुत गणपतराव विठ्ठल करंदीकर, रि. पोस्ट मास्तर, अनगोळ, यांजकडूनहि वारंवार लाभून आनंद झाला. नकाशाचा आलेख पाहून तयार करण्यांत व इतरहि अनेकपरींनीं चि. यशवंत याचें पुष्कळच साहाय्य झालें. प्रो. कुंदनगार कन्नडतज्ज्ञ यांचाहि मी ऋणी आहें.

दहा वर्षांपूर्वी माझ्या 'सुश्लोककुमार' चें हर्षभरानें कौतुक करतांना मुंबईचे रसज्ञ कवि मराठी इलिअड्कर्ते श्री. ग. रा. हवलदार यांनीं अतिशय प्रेमानें एक रौप्य लेखणी (quill) मला भेट पाठविली होती व लिहिलें होतें [पत्र ता. ७–६–४० चें.]:—

"या अभिप्रायासोबत एक लहानसें पार्सल येईल त्यांत एक लहानसें पेन आहे. तें आपण माझी खूण म्हणून आपलेजवळ ठेवण्याची मेहेरबानी करावी. तें पाहून आपल्याला वाल्मीकींच्या आश्रमांत वाल्मीकिकृत रामायण प्रथमच लव व कुश यांच्या तोंडून ऐकल्यावर ऋषिगणांनीं उठून कोणीं काव्यगायनांच्या आनंदाच्या भरांत त्या कुमारांना काषायवस्त्र दिलें, कोणीं कमण्डलु दिला, कोणीं द्यावयास कांहीं नाहीं म्हणून ' साधु साधु ' म्हणून आशीर्वाद दिला. त्याची आपणास आठवण होईल. मीहि त्या भोळ्याभाबड्या मुनींचा अनुकार करीत आहें ! सरस्वतीनें कालिदासाच्या मुखानें कुमार संस्कृतांत वदविला, तो श्रेष्ठ संस्कृत पंडितांकरितां व आतां आपल्या मुखानें ' सुश्लोककुमार ' वदविला

तो आम्हांसारख्या प्राकृत भाषा बोलणाऱ्यांकरितां होय. संस्कृत कुमार वाचून जेवढा आनंद होतो तितकाच आपला प्राकृत कुमार वाचून मला होत आहे. जास्त लिहिण्याचें कारण नाहीं. पण विनंति अशी आहे कीं आपण '**सुश्लोक माघ**' अथवा 'राजाराम' लिहाल तेव्हां त्यांचा श्रीकार माझ्या पेनानें काढावा."!! असल्या सहृदयोत्तंसांच्या प्रेमळ धन्योद्गारांनीं कोणत्या कवीचें अंतःकरण सद्गदित होणार नाहीं? व त्यांच्या प्रेमार्द्र सूचनेचा साभार स्वीकार मी कां करणार नाहीं? अर्थात्च श्री. हवलदार यांच्यासारख्या अनन्यसामान्य रसिकांच्या आशीर्वादांचींच फळें हा 'सुश्लोकमेघ' व माझ्या इतर कृति होत.

असो. अनेक अडचणींतून उत्तीर्ण होऊन आतां हा **'सुश्लोकमेघ'** संचारार्थ 'सन्नद्ध' झाला आहे व तो रसिकांतःकरणांतील सुरम्य अलकेस, हलकेंच पोंचून कवियक्षाच्या अंतरंगप्रीतीचा अमृतमधुर संदेश सुकुमार रसिकवृत्तीस निःसंशय पोंचवून सर्वत्र समाधानाचें सिंचन ईशकृपेनें यथाकाल करीत राहील अशी खात्री बाळगितों. बा मेघा! शुभास्ते पंथानस्सन्तु! चिरं जीव!!

कोल्हापूर, वर्षप्रतिपदा
शके १८७२

रा. चिं. श्रीखंडे

— महत्त्वाचें शुद्धिपत्रक —

पृष्ठ	ओळ	शुद्ध
(३)	१३	मेघदूतांतील
(१२)	७	different
,,	८	precise transfusion
(१६)	४	तस्थिवान्
(२०)	२	तसेंच
(२१)	२६	पर्यंत
(२५)	१८	दरतिमिर॰
(२६)	१७	॰वयवातिरिक्तं
(२९)	२६	लिहिलेलें

पृष्ठ	ओळ	शुद्ध
(३०)	१९	०निर्वाप०
(४१)	३	वाक्प्रभु०
(४७)	७	१९१७
(५१)	३; ८	मङ्गे ; नदीचें
(५२)	२७,२८	सिंधु, -विशालता, -पुढें, -मैदाना०, -केस्याच्या
(५३)	२७	नसल्या०
(५४)	११,१३	तापाचें; मार्गें
(५५)	२३; २५	पुढील०; प्रयुक्तं
(५६)	२	रहितेव
(५७)	१८	कीर्ति
	२४	तीर्थें
(६१)	२०	शिखि०
(६२)	२७	जीविताला
(७२)	२१	केलें
(७३)	४	त्याची
(७६)	१	०लोलुप
(८७)	२६	तीन तीन

१४ सु. मे. श्लो. १४१	न कामतापाविण अन्यताप
२२ ,, ,, ,, २१७	शोकाश्रुपूर्णामधि अश्रुपूर्ण
२४ ,, ,, ,, २३३	डोळे मिटूनी उगिं घालवीं तूं.
२९ मे. ,, २१	सारङ्गास्ते
३३ ,, ,, ४३	व्योम०
३५ ,, ,, ५७	०यशोवर्त्म
३६ ,, ,, ६३	०ग्रथितमलकं
३७ ,, ,, ६६	०तमोवृत्ति०
३९ ,, ,, ८०	०चलकिसलयः ; दोहदच्छ०
४२ ,, ,, ९४	विरहदिवसे

❋ अवतरणिका ❋

श्रीः

अवतरणिका

अस्पृष्टदोषा नलिनीव दृष्टा हारावलीव ग्रथिता गुणौघैः।
प्रियाङ्कपालीव विमर्दहृद्या न कालिदासादपरस्य वाणी ॥ १ ॥

[अर्थः- " जिला दोषांचा (पक्षीं-रात्रींचा) संपर्क झालेला नाहीं, अशी जणूं नलिनीच (सूर्यकमलिनीच), जी गुणांच्या (पक्षीं-हारांतल्या सरांच्या) समुदायांनीं गुंफलेली अशी जणूं हारावलीच, जी मर्दन (पक्षीं-अर्थचर्चा) करतांना आनंददायक अशी जणूं प्रियेची मांडीच अशी वाणी कालिदासाव्यतिरिक्त अन्य कोणाचीहि नाहीं! " असें कालिदासवाणीचें वर्णन श्लिष्ट शब्दांनीं, श्रीकृष्णकवि मनोहरतेनें करतो.]

महाकविचूडामणि श्रीकालिदास याचें मेघदूत हें खंडकाव्य सुरसतेनें, अर्थगौरवानें, व शब्दमाधुर्यानें केवळ " सृष्टिराद्यैव धातुः " अशा त्याच्याच शब्दांनीं वर्णन करण्यास सर्वथा योग्य आहे यांत तिळमात्र संशय नाहीं. किंबहुना असें म्हणायला मुळींच प्रत्यवाय नाहीं, कीं केवळ मेघदूत हें एकच काव्य घेतलें तरी तेवढ्यानें कालिदास हा चिरंतन कीर्तीचा श्रेष्ठकवि म्हणून विश्ववंद्य झालाच असता. मेघदूताखेरीज इतर ग्रंथहि जे कालिदासानें रचले व आपणांस उपलब्ध आहेत ते म्हणजे मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय, अभिज्ञानशाकुंतल, हीं तीन एकाहून एक सरस अशीं नाटकें, ऋतुसंहार हें छोटें ऋतुवर्णनात्मक काव्य, आणि रघुवंश व कुमारसंभव (१ ते ८ सर्ग) हीं २ उत्कृष्ट महाकाव्यें, हे होत. गेलीं २००० वर्षें या ग्रंथांनीं रसिकांस अलोट आनंद दिलेला आहे. इतका कीं, इतर ग्रंथकारांस

व साहित्यशास्त्रज्ञांस कालिदासीय ग्रंथ वाङ्मयाच्या त्या त्या प्रकारांत आदर्श व अनुकरणीय असे वाटत आल्यावांचून राहिलेले नाहींत. कालिदासाची थोर प्रतिभा, केवळ आम्हां पौरस्त्यांसच वंदनीय वाटते असें नव्हे तर त्याच्या कलाकृतींचा मुळांत व भाषांतरमार्गें आस्वाद घेऊन पाश्चात्य पंडितांनींहि कालिदासाचें श्रेष्ठत्व आनंदानें मान्य केलेलें आहे. हेंच त्याचें विश्वकवित्व होय. कालिदासाच्या ग्रंथांतील अनन्यसाधारण, सूक्ष्म व मार्मिक वर्णनें, मानवी स्वभावाचीं व अंतःकरणाचीं त्यानें अद्वितीय कलात्मकतेनें रंगविलेलीं शब्दचित्रें, त्यानें वर्णिलेले थोर व उदात्त आदर्श, त्यानें चातुर्यानें शब्दचित्रित केलेल्या शृंगाररसाच्या भावच्छटा, विरहभावना, कारुण्यदृश्यें, व विनोद इ. व हीं सर्व वर्णितांना त्यानें योजलेली ललितमधुर, प्रसादगुणयुक्त संयमशील भाषा, हीं कालिदासाचीं वैशिष्ट्यें केवळ अनुपमेय आहेत. वाल्मीकि, व्यास हेच त्याचे आदर्श होत. फक्त त्यांच्या प्रचंड प्रतिभेंतून निर्माण झालेल्या रामायण व महाभारत या ग्रंथांची प्रचंडता कालिदासीय ग्रंथांत आढळत नाहीं. तथापि ललित काव्यप्रकारास सौंदर्यपोषक होणारी कलापूर्ण प्रसादमाधुर्यादिगुणयुक्त भाषासरणि व उदात्त वर्णनपद्धति, वेचक उपमादि अलंकार योजून मार्मिकतेनें मांडलेला वर्ण्यविषय, अंतःकरणास आनंद देणारे व वारंवार रसिकास कंठगत करावेसे वाटायला लावणारे अर्थांतरन्यास, व इतर अनेक रसपरिपोषक गुण [श्लेषः प्रसादः समता समाधिर्माधुर्यमोजः पदसौकुमार्यम् । अर्थस्य च व्यक्तिरुदारता च कान्तिश्च काव्यस्य गुणा दशैते] हे कालिदासाच्या प्रतिभेचे मनोरम विशेष होत.

कालिदासाचीं सर्व आल्हादजनक वैशिष्ट्यें मेघदूतकाव्यांत इतक्या वैपुल्यानें अनुभवास येतात कीं, या काव्याची गणना तें लहान असूनहि, महाकाव्यांत करण्याचा परिपाट कांहीं श्रेष्ठ शास्त्रज्ञांनीं अवलंबिलेला आहे; (मेघसंदेशप्रस्ताव पहा) व तो मुळींच अस्थानीं वाटत नाहीं. कारण, मेघदूताची भावमधुर नितान्तसुंदर हृदयस्पर्शी श्लोकरत्नमाला, अर्थगांभीर्यानें व व्यङ्ग्यार्थप्रकाशानें इतकी देदीप्यमान आहे कीं तिच्या सौंदर्याचें यथार्थ वर्णन वा मूल्यमापन करणें कोणाच्याही आंवाक्याबाहेरचें आहे. ' मेघसंदेश '

(मेघदूताचें अपरनाम) काव्याचा एक पंडिताग्रणि रसिक टीकाकार कालिदासाच्या वाणीचें–मेघसंदेशाचें–पुढील श्लोकांत यथार्थतेनें वर्णन करीत आहे.—

निधौ रसानां निलये गुणानामलंकृतीनामुदधावशेषे।
काव्ये कवीन्द्रस्य नवार्थतीर्थे या व्याचिकीर्षा मम तां नतोऽस्मि॥

" रसांचा जणुं काय सांठा, गुणांचें मंदिर, व अलंकृतींचा जसा काय सागर अशा या कविश्रेष्ठाच्या निर्दोष काव्यांत, जीं नवीन अर्थांचीं पवित्र तीर्थें आहेत त्या सर्वांची चिकित्सा करण्याची जी माझी आकांक्षा, तिला मी नमस्कार करतों. "

तसेंच ' मेघा ' चें (मेघदूत काव्याचें) त्यानें ' मेघस्य विष्वग्रस-वर्षुकस्य ' म्हणजे ' सर्वत्र रसवर्षाव करणाऱ्या मेघाचें ' असें वर्णन करून त्याचें गौरव ' विद्युल्लता 'कार जो पूर्णसरस्वती त्यानें गाइलेलें आहे. मेघदूतांतील एकेक श्लोक म्हणजे खरोखरच एकेक बिनमोल असा, अनेक रंगांच्या सुंदर अर्थच्छटा दाखविणारा तेजस्वी हिराच आहे असें वाटल्या-वांचून रहात नाहीं ! म्हणूनच या मेघदूताची मोहनी आजपर्यंत, बुद्धिमान् रसिकवर्गांच्या अंतःकरणास अंकित करीत आली आहे यांत आश्चर्य नाहीं. मग तो जर्मन पंडित कविराज गटेसारखा विदेशीय असो वा आमचे कविश्रेष्ठ टागोर यांच्यासारखा भारतवर्षभूषण असो. प्राचीन काळचे असंख्य मर्मज्ञ साहित्यपंडित असोत, वा आधुनिक सहृदय टीकाकार असोत. मेघदूताच्या तोडीचें काव्य पाश्चात्य वा पौरस्त्य कोणत्याहि भाषेंत आज-पर्यंत निर्माण झालेलें नाहीं. एक जर्मन ग्रंथकार पुढील आशयाचे उद्गार काढतोः—

" **There is nothing so perfect in the elegiac literature of Europe as the** मेघदूत **of** कालिदास**."– Mon. Fauche.** "युरोपीय विरहवाङ्मयांत कालिदासकवीच्या मेघदूताप्रमाणें सर्वांगसुंदर कांहींही नाहीं. " – फॉशे.

दुसरा एक म्हणतोः—

"There exist, for instance, in our European literature few pieces to be compared with the मेघदूत in sentiment and beauty." [मेघदूत गुजराती भाषांतर किलाभाई घनश्यामकृत प्रस्तावना]

" आपल्या युरोपखंडाच्या वाङ्मयांत भावना व सौंदर्य या बाबतींत मेघदूताशीं तुलतां येतील अशीं काव्यें फारच क्वचित्, जवळ जवळ नाहींतच म्हणायला पाहिजेत. "

आपल्या शास्त्रीपंडितांच्या तोंडीं ' माघे मेघे गतं वयः ' माघकाव्य व कालिदासकृत मेघदूत इत्यादि रसभरित काव्यांच्या सेवनांत आयुष्य गेलें असें म्हणण्याचा प्रघात आहेच, (हा पूर्ण श्लोक काय आहे हें अद्याप मला समजलेलें नाहीं.) कालिदासाच्या ' मधुरसार्द्र मंजरीं 'प्रमाणें असणाऱ्या सूक्तिकवितापंक्ति हातीं लागतांच त्यांवर कोणत्या रसिकाची मनोवृत्ति प्रीतीनें भरून लुब्ध होणार नाहीं ? असा प्रश्नपूर्वक सुंदर अभिप्राय महाकवि बाण,–जो कविताकामिनीचा जणुं काय पंचबाणच आहे,–त्यानें प्रकट केलेला संस्कृतवाङ्मयरसिकांस अपरिचित नाहीं.

" निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु ।
प्रीतिर्मधुरसार्द्रासु मञ्जरीष्विव जायते ॥ "

उपर्युक्त मधुरसार्द्र सूक्तिपूर्ण सुरम्य काव्याचा नमुनाच भासणारा सुवर्णकलश म्हणजेच ' मेघदूत ' होय ! महाकवित्वाच्या बाबतींत कलिदासाची बरोबरी करणारा कवि अद्याप झालेला नाहीं; म्हणून ' अनामिका ' अजूनहि सार्थवतीच आहे, असें सुभाषित प्रसिद्धच आहे:—

पुरा कवीनां गणनाप्रसङ्गे कनिष्ठिकाधिष्ठितकालिदासा ॥
अद्यापि तत्तुल्यकवेरभावादनामिका सार्थवती बभूव ॥ १ ॥

याचा अर्थ पुढील पद्यांत गोंवीत आहे —

पूर्वी कवींच्या गणनाप्रसंगीं ' कनिष्ठिका ' व्यापिलि कालिदासें
अद्यापि तत्तुल्य कवी न होतां, ' अनामिका ' अंगुलि सार्थ भासे !

मेघदूताचें संविधानक अगदीं साधें पण अत्यंत काव्यात्म असें आहे. बहुधा कालिदासाला यांतील संदेश पाठविण्याची कल्पना महर्षि वाल्मीकिप्रणीत रामायणावरून सुचली असावी. श्रीरामचंद्र (वर्षाकालींच) हनुमंताबरोबर जानकीस कुशल कळवून आश्वासन देतात व आपलाच दूत हा आहे याची सीतेस शंका येऊं नये म्हणून आपलें अंगुलीयक हनुमंताबरोबर रामांनीं दिलेलें असतें, व त्या योगानें तसेंच इतरही पटणाऱ्या वर्णनांनीं जानकीस, दूत खरा असल्याची आनंददायक खात्री पटते. जवळ जवळ असाच प्रकार मेघदूतांत वर्णन केलेला आहे. कर्तव्यांत चुकलेल्या एका यक्षास, यक्षराज अलकापति कुबेर यानें रागानें एक संवत्सर मुदतीचा शाप दिला असून, त्या शापामुळें त्या यक्षाचा अलौकिक प्रभाव नष्ट होऊन त्यास अलकेपासून दूर निर्वासित व्हावें लागतें व विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, त्याच्या सुंदर प्रेममूर्ति पत्नीचाहि त्यास विरह सहन करीत, मोठ्या कष्टानें शापकाल कंठावयाचा असतो. तो हा काल रामगिरीवर (नागपूरजवळील रामटेक ह्या ठिकाणीं) राहून काढीत आहे. शापावधीचे आठ महिने झालेले असतात, व वर्षाकालाच्या प्रारंभाचे दिवस येतात. यक्षास आपल्या कांतेविषयींच्या विरहोत्कंठेनें कृशता आलेली असते व आपल्या पत्नीचीहि वियोगस्थिति तिला किती असह्य झाली असेल व आपल्याप्रमाणेंच तिलाही हा विरहकाल किती दुःखानें कंठावा लागत असेल, याचे विचार त्याच्या हृदयास अगदीं पिळवटून काढतात. आपलें कुशल तरी पत्नीला कसें कळवावें ? कोण कळवील ? असा मोठ्या आर्ततेनें तो विचार करीत असतां त्यास एक अलौकिक कल्पना सुचते ! त्यास वाटतें कीं, समोर जो हा पर्वतशिखरावर मेघराज दिसत आहे तो उत्तरेकडे म्हणजे कैलासाचे परिसरांतच जाणार आहे. त्यानें जर मनावर घेतलें तर, माझें कुशल कैलासावरील अलकानगरींतल्या आमच्या वाड्यांत असलेल्या माझ्या प्रियतमेस हा लोकबांधव मेघ कां नाहीं सांगणार ? असा करुणार्द्र दूत मला कोण बरें येथें दुसरा भेटणार ? त्यालाच आपण विनवूं व कुठें कसेंकसें जायचें व गेल्यावर माझ्या कांतेस काय काय सांगायचें, तें सर्व

सांगून टाकूं. तो ' नाहीं ' म्हणणारच नाहीं ! विरहाची भावना किती असह्य असते हें काय त्याला टाऊक नाहीं ? आपली ' विद्युल्लता ' प्रिया तर तो नेहमींच बरोबर घेऊन संचारार्थ निघतो ! म्हणूनच कदाचित् तो अतिशय समाधानांत व लीलेंत सर्व व्यवहार करतो ! त्याला माझें कार्य करणें मुळींच अवघड नाहीं. चातकांनाच काय, परन्तु सर्वच सृष्टीला हा जीवन देऊन प्रफुल्लित व सौख्यमय करतो. अनेक सौंदर्यस्थळें पाहात पाहात त्यासहि प्रवासानंद उत्कटतेनें कसा उपभोगतां येईल याची परिपूर्ण कल्पना येईल असा रमणीय मार्ग मी याला कथन करीन. कदाचित् कांहीं सौंदर्यस्थळें पाहण्यांत रमण्यानें त्यास अलकेकडे माझे संदेश घेऊन जाण्याचें विस्मरणसुद्धां व्हावयाचें ! पण माझें अंगीकारलेलें मित्रकार्य तो दक्षतेनें निःसंशय पार पाडील. त्याचा स्वभावच तसा आहे. असें म्हणून त्यानें खरोखरच त्या मेघास पाचारण केलें; ओंजळीनें त्यास फुलें वाहिलीं; व त्यानें कसें कसें जायचें, कुठें नवपर्जन्याचें सिंचन करावयाचें, कोठें गिरिविभागांत विश्रांति घ्यायची, पुनः कोठल्या नदीचें रसपान करून पुढें चलायचें, मार्गांत सृष्टिशोभा कशी कशी दिसेल, कोणत्या नद्या त्याची वाट पहात असलेल्या आढळतील, कोणते पर्वत त्याला मस्तकीं आनंदानें धारण करून आपले जे त्यानें वणवे विझविले त्याबद्दल कृतज्ञता कशी व्यक्त करतील; मार्गांत कांहीं पवित्र देवमंदिरें, व लक्ष्मीनें आणि विलासानें भरलेलीं (उज्जयिनीसारखीं) नगरें, उद्यानें, नृत्यांगना विलासिनी इ. कशीं आढळतील व त्यांच्यांतील विशिष्ट मनोहरता कोणती त्यानें सेवन करावी, क्षेत्रें कोणतीं लागतील, यमुना, गंगा, हिमालय, इत्यादींचें सौंदर्य त्यानें कसें सेवन करावें व कैलासपर्वतावरील अलका ओळखून काढून (उंच उंच हर्म्य असलेली ती अलका ओळखणें त्याच्यासारख्या नेहमीं विश्वसंचार करणाऱ्यास मुळींच कठीण नाहीं !) तेथें नागरिक विलासांत कसे दंग असतात, तें पहात माझा वाडा त्यानें शोधून काढावा. त्यावर शंख व पद्म हीं चित्रें द्वाराचें बाह्य बाजूस उत्कृष्टतेनें

रंगविलेलेलीं असतील, जवळ इन्द्रनीलखचित अशीं शिखरें असलेला आमचा एक क्रीडापर्वत आहे त्यावर त्यानें थोडा काल विश्रांति घेत थांबावें; तो तेथें पोंचेल तेव्हां कदाचित् माझी पत्नी झोपली असेल तर तिला लगेच गर्जनांनीं त्यानें जागी करूं नये. न जाणों, माझ्या भेटीचें तिला स्वप्न पडलें असेल तर तिनें मला स्वप्नांत मारलेली गाढ मिठी व्यर्थ सुटायची ! कदाचित् माझी पत्नी भक्तिभावानें देवतांचें पूजन करण्यांत दंग झाली असेल, कदाचित् वीणा घेऊन माझ्यावर स्वत:च रचलेलीं गोड गाणीं आळवीत असेल, माझी वारंवार आठवण होऊन तिची वीणा भिजून ओलीचिंब होत असेल व पुनः पुन: पुसून ती वाजवूं लागत असेल, तर दुःखार्ततेनें, स्वतः रचलेल्या मूर्च्छनाही ती वारंवार विसरत असेल ! कदाचित् उंबरठ्यावर पुष्पपुंज मांडून व ते मोजून माझ्या विरहाचे दिवस अजून किती कंठावयाचे आहेत, ते मोजत असेल ! न जाणों कदाचित् पिंजऱ्यांतल्या सारिकेशीं ती प्रेमानें बोलतहि असेल, व विचारतहि असावी कीं ' रसिके, तुला धन्याची–त्यांची–आठवण किती बरें होत असेल ! किती तूं त्यांची लाडकी होतीस !' माझी प्रिया विरहशय्येवर झोंपलेली असतांना, उदयाचलावर टेकलेल्या चंद्रकलेप्रमाणें भासेल. तिला आपल्या शीतल तुषारवातांनीं जुईच्या कलिकेबरोबरच मेघानें तजेली आणावी. मग ती त्याजकडे स्तिमित नयनांनीं पाहील. तेव्हां त्यानें आपल्या प्रेमळ गंभीर गर्जनांनीं तिला सांगावें कीं " हे जीवद्वल्लभे ! तुझा पति रामगिरीवर असून तुझें क्षेम विचारीत आहे. तुझें कुशल असो. मी त्याचा मित्र मेघ असून त्यानें दिलेले सुखदसंदेश तुला देण्यासाटीं हृत्संपुटांत सांठवून घेऊन आलों आहें, " हें त्यानें बोलतांच, ती मोठ्या औत्सुक्यानें त्याला बघेल. कारण कीं, मित्राकरवीं आलेलें पतीचें क्षेमवृत्त म्हणजे तशा साध्वी स्त्रियांना जवळ जवळ प्रत्यक्ष पतिभेटीइतकाच आनंद देतें ! इत्यादि बोलून यक्ष पुढें म्हणाला " मेघा, तूं तिला माझी सर्व विरहावस्था सांग व माझी स्थिति कितीहि कठोर असली तरी ती मी मोठ्या धैर्यानें सहन करीत आहे हें तिला विदित कर. तिला

माझा निरोप सांग कीं, "तुझा कान्त तुझ्या भेटीसाठीं अत्यंत उत्कंठित झालेला आहे. तुझीं त्याला स्वप्नें पडतात व त्यांत तो तुला गाढ आलिंगनें देऊं पहातो. पण त्याची तशी असहाय स्थिति पाहून वनदेवतांच्या नेत्रांतून अश्रुबिंदु टपापा तरुकिसलयांवर पडतात ! केव्हां केव्हां शिलातलांवर तुझें चित्र मी रंगीत मृत्तिकेच्या खड्यांनीं रंगवितों. जणुं काय, तूं कृतककोपानें रुसली आहेस व पुढें, मी तुझ्या पायीं नमन करून समजावून तुला संतुष्ट करीत आहें असें, मला चितारावयाचें असतें. पण इतक्यांत अश्रूंनीं डोळे भरून येतात व चित्र अपुरेंच रहातें ! वाटतें कीं क्रूर दैवाला चित्रांतही आमचा संगम रुचत नाहीं ! केव्हां केव्हां मी कल्पनेनें कांहीं लतांमध्यें तुझ्या तनुलतेचीं दृश्यें पहातों, हरिणींच्या नेत्रांत तुझे कटाक्षहि मला क्वचित् भासतात, तुझ्या भ्रूविलासांचा आठव मला नद्यांचे वीचिविलास करवितात. असें कुठें कांहीं, कुठें कांहीं, मला विरंगुळा पाडण्यासाठीं मी तर्कानें मानतों; परंतु तुझें समग्र सादृश्य यांत मला कुठेंही कधीं तरी सांपडेल काय ? तुझ्या प्रत्यक्ष संगमाचा परमानंद इतर कशानेंहि शक्य नाहीं ! असो, मला पुष्कळ सांगावेंसें वाटतें; पण सर्वांचें सार हेंच, कीं, हे प्रिये ! आतां शापावधि संपायला अवघे चारच महिने राहिले आहेत, तेवढे सहन कर; त्यानंतर आपण शरच्चंद्रिकांच्या शर्वरींत यथेच्छ सुखोपभोग अवश्य घेऊं! श्रीकृपेनें तुला तेवढा विरहकाल सह्य होवो ! हे दुःखाचे दिवस खात्रीनें जातील व चक्रनेमिक्रमानें आपण पुनः सुखसागरांत यथेष्ट डुंबूं ! तूं असें समजूं नकोस कीं, विरहामुळें माझें तुझ्यावरील प्रेम लेशहि कमी झालें असेल ! छे ! छे ! माझी तर निःसंशय खात्री आहे, कीं विरहांत खऱ्या प्रेमाची वृद्धिच होते व प्रेमाच्या उत्तुंग राशीच बनतात !" तिची खात्री पटावी म्हणून एक खूणहि तुला सांगतों ती तिला सांग. म्हणावेंस— " एकदां तूं माझ्या बाहुपाशांत गाढ निजली असतांना एकदम दचकून मोठ्यानें आक्रंदत उठलीस, मी तुला खोदून खोदून कारण विचारलें, तेव्हां हास्यपूर्वक म्हणालीस, कीं 'हे धूर्ता ! तूं मला स्वप्नांत कोणा दुसरीबरोबर रममाण झालेला दिसलास ! तें स्वप्नच होतें. खरी गोष्ट नाहीं ही केवढ्या

आनंदाची गोष्ट आहे बरं !'' ही आठवणीची खूण तिला सांग व हे मेघा ! तिच्याकडूनहि अशीच पटणारी खूण घेऊन येऊन सत्वर मला सांग व प्रातःकालच्या कुंदपुष्पांप्रमाणें शिथिलित झालेल्या माझ्या प्राणांना आधार दे ! मेघराजा ! ही माझी प्रार्थना तूं अंगीकारलीसच असें मी समजतों. तूं शब्दांनीं उत्तर द्यायलाच नकोस ! तुझा स्वभाव असा कीं न बोलतांच तूं चातकांनीं मागितलेलें जल त्यांना देऊन त्यांची तृषा हरतोस ! प्रार्थिलेलें करणें हेंच चांगल्यांचें याचकांना प्रत्युत्तर असतें. माझें हें काम केल्यानंतर तूं वर्षश्रीनें सदैव नटलेला असा होत्साता यथेष्ट विश्व-संचार कर ! माझ्याप्रमाणें तुझ्यावर विद्युल्लतेचा क्षणभरहि वियोग सहन करायची ईशकृपेनें पाळी न येवो ! ''

मूळ काव्यांतील माधुर्याची पूर्णांशानें अनुभूति वाचकानें मुळांतूनच घेतली पाहिजे. सृष्टींतील निरनिराळ्या दृश्यांत कोठें कांहीं, कोठें कांहीं पाहून समग्र दयितासौंदर्य एकत्र कोठेंच न आढळल्यानें हळहळणारा यक्ष 'हन्तैकस्मिन्क्वचिदपि न ते चण्डि सादृश्यमस्ति।' असे उद्गार काढतो. जवळ जवळ त्याच अर्थाचे उद्गार वाचकास मेघदूताच्या कुणीहि सांगितलेल्या संविधानकास, अगर दिलेल्या भाषावेषास पाहून, उद्गारावेसे वाटले तर आश्चर्य नाहीं. 'गगनं गगनाकारं'— तसें मेघदूत कालिदासाच्या लेखणींतून उतरलेलें तेंच खरें ! त्याच्या कोणत्याहि प्रतिकृतींत कांहीं, ना कांहीं न्यून हें 'प्रतिकृति' या मुळाहून भिन्नतावाचक शब्दानेंच व्यक्त होतें. मेघदूताच्या ज्या प्रतिकृति दुसऱ्या भाषांत झालेल्या आहेत त्या अर्थ, वृत्त, माधुर्य, शब्दसौष्ठव व मुळांतील कालिदासीय सर्व वैशिष्ट्यें या सर्वच्या सर्व बाबतींत तंतोतंत तशाच असणें केवळ अशक्य आहे. *

---

* मी माझ्या पुतण्यास (चि. मोरेश्वर शंकर श्रीखंडे हुजूरबाजार यास) माझा अनुवाद प्रथम पहावयास पाठविला तेव्हां त्यासह सविस्तर संस्कृत श्लोकपत्र लिहिलें त्यांत मेघदूतासंबंधीं माझा आशय पुढील पद्यांत व्यक्त केला आहे.— (टीप पुढील पृष्ठावर चालू)

तथापि अशाहि परिस्थितींत कमीअधिक सुयश अनुवादकर्त्यास लाभलेलें आढळून येईल. अनुवादकर्त्यांची बुद्धिमत्ता व काव्यगुणविषयक गुणवत्ता त्याच्या कृतींत उतरल्यावांचून राहाणार नाहींत. मुळांशीं तादात्म्य पावून सुंदर कलाकृति निर्मिण्याचा आनंद प्रतिभावान् अनुवादकास लाभेल. निरनिराळ्या अनेक भाषांत मेघदूताचें अनुवादांत रूपांतर अनेक रसिकांनीं केलेलें आढळतें. सर्व अनुवादांचा अभ्यास करणें मौजेचें असलें तरी सर्व अनुवाद उपलब्ध करून घेऊन तुलनेनें वाचणें परिश्रमाचें आहे. या दृष्टीनें परिश्रम करून पहातां मला मिळालेले अनुवाद व त्यांतील कांहींचे त्रोटक तरी नमुने येथें दिल्यास अस्थानीं होणार नाहींत.

मेघदूताच्या पाश्चात्य अनुवादकांचे पुढील अनुवाद उल्लेखनीय व संस्मरणीय आहेत.

डॉ. होरेस हेमन् विल्सन् (Horace Hayman Wilson) कृत Kalidasa's 'Cloud Messenger'. इ. स. १८१३ त कालिदासाच्या

श्रीकालिदासकवितास्वतिरम्यतायास्स्थानं नितान्तमधुरं ननु मेघदूतम्।
रम्यैव काव्यसरणिर्जलदो दयार्द्रो यक्षश्च तस्य दयिता च मनोज्ञयुग्मम् ॥ १ ॥

दैवाद्वियुक्तं विरहाभितप्तं परस्परप्रेममयं युगं तत् ।
मेघेन संयोजयता पुनस्तौ व्यक्तः कवीन्द्रेण धियो विलासः ॥ २ ॥

यद्यपि बहुभिः कविभिः कृतोऽनुवादो रसार्द्रमेघस्य ।
घनगंभीरं ध्वनितं विद्युद्दंभे कुतो भवति साध्यम् ॥ ३ ॥

मेघश्यामस्य कृपया यक्षराट्सखसेवया ।
मयापि यतितं कर्तुं मेघं प्राकृतभाषिणम् ॥ ४ ॥

अचिरादेव तं तुभ्यं प्रेषयिष्येऽवलोकितुम् ।
प्रसिद्धं किमपि प्रेम स्रष्टौ मेघमयूरयोः ॥ ५ ॥

इति शम् ।

पुण्यपत्तनतः
१४।६।४६

भवदीयो
रा. चिं. श्रीखंडे

मेघदूतानें भारतवर्षांच्या सीमा ओलांडून पाश्चात्य राष्ट्रांत संचार करण्यास आरंभ केला. डॉ. विल्सन् हा विद्वान् व रसिक डॉक्टर ईस्ट इंडिया कंपनीमध्यें असिस्टंट सर्जनच्या हुद्यावर असतांनाच एशियाटिक सोसायटीचा सेक्रेटरीहि होता. त्यानें मूळ मेघदूत व त्याचा इंग्रजींत कविताबद्ध सविस्तर अनुवाद (Paraphrase) त्या सालीं प्रसिद्ध केला. हा अनुवाद फार रोचक वाटण्यासारखा साधला असून, त्यासोबत त्यानें विपुल टीपा व माहिती दिली आहे. तीवरून डॉ. विल्सनचें व्यापक वाचन व विविध विषयांवरील आस्थापूर्वक माहिती मिळविण्याची त्याची थोर जिज्ञासा, हीं दृष्टोत्पत्तीस येतात.

डॉ. विल्सन् प्रस्तावनेंत म्हणतो कीं, भारतवर्षीयांच्या अंतःकरणांत रामायण व महाभारत आणि पुराणें यांच्या विषयीं सौंदर्यदृष्टीपेक्षां भक्तिभाव अधिक असतो. त्यामुळें कालिदासाच्या मेघदूतापेक्षां रामायण भाविकतेनें अधिक वाचलें जातें. तथापि पंडित मंडळींत असे फारच थोडे आढळतील कीं, ज्यांना रामायणापेक्षांहि मेघदूत अधिक वाचावेंसें वाटणार नाहीं. त्यांच्या दृष्टीनें वाल्मीकीपेक्षांहि कालिदास हाच काव्यगुणाचे बाबतींत अधिक उच्च आहे. विल्सनचें हें मत विचारणीय असलें तरी कालिदासाचे गुरुस्थानीं महर्षि वाल्मीकि, व्यास हेच आहेत यांत शंका वाटत नाहीं. मेघदूतांतील कित्येक कल्पना, उपमा व भावनाविष्कार यांस रामायणांतले कोणकोणते श्लोक आधार वाटतात हें मी पुढें दाखवणारच आहें. असो. विल्सन्च्या अनुवादाचा एक नमुना;—

[‘ भर्तुर्मित्रं प्रियमविधवे विद्धि मामम्बुवाहं ’ इ. मेघदूत १०१ श्लोकाचा]

“ O wife adored ! whose lord still lives for thee;
Behold his friend and messenger in me;
Who now approach thy beauteous treasure fraught,
With many a tender, and consoling thought,
Such tasks are mine; when absent lovers stay,
I speed the wanderer lightly on his way;

And with my thunder teach his lagging mind,
New hopes the braid of absence, to unbind. "

वरील भाषांतर करतांना कोणती दृष्टि आपण ठेवली या विषयीं डॉ. विल्सन् म्हणतो,: —" In the conversion of the मेघदूत into English, the translator has in general endeavoured to avoid being licentious, without attempting to be literal the idioms of the language are too dfferent to admit of a very pecise transfuion, of one into the other, and it has been more the object of the following translation to render thoughts than words. "

[मेघदूतास इंग्रजी वेष देतांना भाषांतरकर्त्यानें सामान्यपणें असा प्रयत्न केला आहे कीं, शब्दास शब्द ठेवण्याच्या पद्धतीचा अवलंब तर न व्हावा, व निर्मर्याद स्वातंत्र्यहि न घेतलें जावें. संस्कृत व इंग्रजी या भाषा संप्रदायपद्धतिदृष्ट्या इतक्या परस्परभिन्न आहेत कीं एकीचे दुसरींत अगदीं कांटेकोरपणें वेषांतर करणें अशक्य; आणि म्हणून प्रस्तुत भाषांतरांत हेतु हा ठेवला आहे कीं,केवळ शब्द दुसऱ्या भाषेंत आणण्यापेक्षां कवीचा खरा अभिप्रेत आशय व विचार भाषांतरांत उतरावा.]

कालिदासाचें शाकुंतल व जयदेवाचें गीतगोविंद यांना प्रथमतःच आंग्लभाषावेष लाभल्यानें पाश्चिमात्य वाचकांस त्यांचा परिचय झाल्यापासून संस्कृत काव्यवाङ्मयाची अभिरुचि (कल्पना) पाश्चात्यांस उत्पन्न झाली. काव्याचें अंगभूत सौंदर्य मूळभाषेंतील अभिजात रचनेवर किती अंशानें अवलंबून असतें हें ज्यांना परिचित आहे त्यांना हें सांगण्याचीहि आवश्यकता नाहीं कीं या ग्रंथांचीं गद्यांत भाषांतरें करतांना पुष्कळच सौंदर्यहानि झालेली आहे. मग तीं भाषांतरें सर विल्यम जोन्स यासारख्याच्याहि रसिक लेखणींतून उतरलेलीं असोत. तथापि अशा परिस्थितींत देखील या भाषांतरांची युरोपच्या विद्वान् पंडितांकडून मुक्त कंठानें प्रशंसा होऊन संस्कृत काव्यवाङ्मयाची थोरवी व सौंदर्य युरोपियन् रसिकांना कळून आलें. कारण अशा रूपवेषभूषेंतहि संस्कृत काव्यांत किती सुंदर कल्पनासृष्टि अपरंपार पसरली

असून शिवाय स्वाभाविक मानवी हृदयाचा आविष्कार ओतप्रोत भरला आहे व केवळ कांहीं प्राचीन पौराणिक कथासंदर्भ वगळल्यास त्यांत कोणत्याहि चिकित्सक अभिरुचीस न आवडणारें वा धक्का देणारें यत्किंचित्हि नाहीं, हें कळून येणें अपरिहार्य आहे, असे यथार्थ उद्गार डॉ. विल्सनूनीं ग्रंथास जी प्रस्तावना लिहिली आहे तींत काढले आहेत.

शिलरच्या ' मराया स्टुअर्ट ' नाटकाचा (अंक ३ रा, प्रवेश १ ला) यांत कालिदासाच्या मेघदूताच्या संविधानकाची आठवण व्हावी असा एक सुविख्यात भाग आहे, व त्यावरून मेघदूताची उसनवारी करण्यापेक्षां तें संविधानक शिलरला किती मनोरम वाटलें असावें याची चांगली कल्पना येते, असे उद्गार प्रो. मॅक्डोनेलनीं आपल्या संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांत काढले आहेत.

स्टेंझलर (ब्रेसलॉ १८७४), प्रो. हिलेब्रँट् (ब्रेसलॉ युनिव्हार्सिटी) यांनीं आपल्या ग्रंथांत मेघदूतावर एक टीका लिहिल्याचें समजतें. या माझ्या अवलोकनांत आलेल्या नाहींत, व भाषानभिज्ञतेमुळें मला त्यांचा उपयोग होणें शक्य नाहीं.

या व्यतिरिक्त १९०७ मध्यें डॉ. बेक (Bech) यांनीं जर्मन् भाषांतर करून मेघदूतावृत्ति काढली. इतरहि असेच कांहीं प्रयत्न झाल्याची माहिती स्व. किलाभाई घनश्याम यांनी केलेल्या गुजराती समश्लोकी भाषांतराच्या विस्तृत प्रस्तावनेंत सांपडते.

अलीकडील (१९३५) इंग्रजी पद्यानुवादाचा एक प्रयत्न उल्लेखनीय आहे. तो म्हणजे ओरिअल कॉलेज ऑक्सफोर्ड्चे मि. जी. एच्. रुक् (G. H. Rooke) यांनीं स्वत: इंग्रजींत मेघदूताचा पद्यानुवाद चांगला केलेला आहे. त्यांत मेघाच्या मार्गाचा नकाशाहि एक जोडला आहे, व कविवर्य रवीन्द्रांची एक कविता त्यांनींच स्वत:च्या मूळ बंगालीवरून इंग्रजींत अनुवादिलेली आहे. तींत कालिदासच मेघदूताचा नायक कल्पून या

रवीन्द्रांनीं त्या कवीन्द्रास जे उद्गार संबोधले आहेत, त्यांस मी येथें माझा ' मराठाचि बोल ' कौतुकानें पांघरवून प्रकट करीत आहें:—

" साम्राज्यसिंहासनिं यौवनाच्या, तूं कालिदासा ! बसलास जेव्हां,
दिव्यांगना प्रेममयी प्रियाही होती रतीशी तुजपाशिं तेव्हां;—१
भूदेवता आस्तरणें तुम्हांला पायांतळीं पांचुसमान घाली !
तुम्हांवरी हो धरिलें नभानें वितान कीं कांचन-कांतिशाली !—२
ऋतू तुम्हांभोंवतिं नर्तले तैं घेऊनि नानापरिंचे विलास,—
पेले सुरेचे जणुं तत्करींचे, मोहावया लोलुप मानसास !—३
एकान्तहर्षां उपभोगतांना झालें तुम्हां विश्वहि साह्यकारी;
न लेश दुःखार्ति कुठें तुम्हांतें ज तूं प्रियामंदिरिं सौख्यपूरीं !—४

* * *

आघात वज्रापरि ईशशाप लोटी अकस्मात् विरहांत तुम्हां ! !
अहंकृती लोपुनि यौवनाची, ताटातुटी झालि, जिला न सीमा ! !—५
क्षणांत साचिव्य सरे ऋतूंचें जाई रतीचा पडदा तुटोनी !
आणी, जिथें अश्रु नभीं सबाष्प, आषाढिं ये वर्षविभा नटोनी ! !—६
हृत्स्पंदनें शोकविलापपूर्ण तुझीं प्रियेच्या विरहस्मृतीचीं
सुदूर इष्टस्थलिं मेघमार्गें स्वप्नीं जणों वाहुनि नेलिं साचीं ! !—७ "

मि. रुक् यांच्या इंग्रजी नियमक, सरल, प्रसादपूर्ण कवितांचा एक नमुना येथें देऊं. ' कश्चित्कान्ता ' या प्रथम श्लोकाचा अनुवाद असा आहे—

A certain Yaksha, heedless of his trust,
With dignity downcast unto its setting,
His master's curse had doomed,
So cruelly it tore him from his mate,
To rue on Ramgiri, a livelong hermityear,
'Neath its wedded woodland shade,
Beside those waters blessed,
In the bathing of Janaka's daughter.

मूळचा एक श्लोक येथें आठ ओळींत अनुवादला आहे, व याच पद्धतीनें सर्व अनुवाद संपूर्ण केलेला आहे.

एवढ्यावरून पाश्चात्य पंडित कवींना मेघदूताची थोरवी किती उत्कटतेनें वाटत आली आहे, याची आमच्या वाचकांस थोडी तरी कल्पना येईल. आमच्या देशांतील प्राचीन काळच्या कित्येक पंडित रसिक कवींनीं मेघदूतावरील आपला हार्दिक आदर अनेक प्रकारची ग्रंथनिर्मिति करून व्यक्त केलेला आहे. कोणी मेघदूतांतील रचनेसारखी रचना करून, वा त्यांतील कांहीं मार्मिक शब्द वा कल्पना आपल्या श्लोकरचनेंत घालून, तर कोणी मेघदूतांतील प्रत्येक श्लोकाचा प्रत्येक पाद आपल्या मन्दाक्रान्ता वृत्तांत रचलेल्या काव्याच्या श्लोकांत समस्यापूर्तीनें विशेष अर्थहानि वा ओढाताण न होऊं देता कौशल्यानें गुंफून, कालिदासाच्या कृतीविषयीं आपला उच्चतम आदर प्रकट केलेला आहे कोणी अशाच पद्धतीनें मेघदूतांतील श्लोकांचे शेवटील चरणच तेवढे आपल्या एकेका श्लोकांत चातुर्यानें गुंफून काव्यरचना केली आहे. या काव्यांच्या रचनांवरून मेघदूताची तत्कालीन लोकप्रियता जशी व्यक्त होते तशीच मेघदूताची पाठ्यप्रत त्यांच्या कालीं (८ वें शतक) कशी असावी याची कल्पना येते.

उदाहरणार्थ, मंदसोर येथील इ. स. ४७३ च्या एका शिलालेखांत कुमारगुप्ताचे कारकीर्दींत जीर्णोद्धार केलेल्या एका सूर्यमंदिराविषयीं वर्णन वत्सभट्टिनामक कवीनें केलें आहे त्यांतील कल्पना उत्तरमेघांतील पहिला श्लोक (विद्युत्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः) यांतील कल्पनेसारखी स्पष्ट दिसतेः--

चलत्पताकान्यबलासनाथान्यत्यर्थशुक्लान्यधिकोन्नतानि ।
तडिल्लताचित्रसिताभ्रकूटतुल्योपमानानि गृहाणि यत्र ॥--वत्सभट्टि.

उत्तुंग गृहांची व मेघाचीं एकाच प्रकारची तुलना या व विद्युत्वन्तं या श्लोकांत केलेली दिसते. ('कालिदास'-प्रि. वा. वि. मिराशी)

' पार्श्वाभ्युदय ' या जिनसेनकृत काव्यांत मेघदूताचे चरण कसे घेतले आहेत तें पहाः--

श्रीमन्मूर्त्या मरकतमयस्तंभलक्ष्मीं वहन्त्या
योगैकाग्र्यस्तिमिततरया तस्थिवान्सन्निदध्यौ ॥
पार्श्वं दैत्यो नभसि विहरन् बद्धवैरेण दग्धः
कश्चित्कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात्प्रमत्तः ॥ १ ॥
तन्माहात्म्यात्स्थितवति सति स्वे विमाने समानः
प्रेक्षांचक्रे भृकुटिविषमं लब्धसंज्ञो विभागात् ।
ज्यायान्भ्रातुर्वियुतपतिना प्राक्कलत्रेण योऽभू-
च्छापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येण भर्तुः ॥ २ ॥

क्वचित् जिनसेनानें आपल्या एका श्लोकांत कालिदासाच्या श्लोकाचें चरणद्वयहि घेतलें आहेः—

तत्र व्यक्तं दृषदि चरणन्यासमर्धेन्दुमौले-
रर्च्यं भर्तुस्त्रिभुवनगुरोरर्हतः सत्सपर्यैः ॥
शश्वत्सिद्धैरुपचितबलिं भक्तिनम्रः परीयाः
पापापाये प्रथममुदितं कारणं भक्तिरेव ॥ ६५ ॥

अशा प्रकारचें हें ' मेघदूतपरिवेष्टित ' पार्श्वाभ्युदय काव्य चार सर्गांत समाप्त करण्यांत आलें आहे. प्रतिश्लोकाचा अंतिमचरणच तेवढा मेघदूताच्या श्लोकाचा अंतिमचरण ठेवून केलेल्या समस्यापूर्तीचा दुसरा सुंदर प्रयोग म्हणजे ' नेमिदूत ' होय. हें सांगणाचा पुत्र विक्रमकवि यानें रचलेलें आहे. * त्याचा एक नमुनाः—

* तद्दुःखार्थं प्रवरकवितुः कालिदासस्य काव्या-
दन्त्यं पादं सुपदरचितान्मेघदूताद्गृहीत्वा ।
श्रीमन्नेमेश्चरितविशदं सांगणास्यांगजन्मा
चक्रे काव्यं बुधजनमनःप्रीतये विक्रमाख्यः १२६ नेमिदूतम् ॥

प्राणित्राणप्रवणहृदयो बन्धुवर्गं समग्रं
हित्वा भोगान् सह परिजनैरुग्रसेनात्मजां च
श्रीमन्नेमिर्विषयविमुखो मोक्षकामश्चकार
स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु ॥ १ ॥

मेघदूताची अनुपम व लोकोत्तर गुणसंपदा इतरहि त्याच धर्तीवर रचण्यांत आलेल्या असंख्य दूतकाव्यांना वा संदेशकाव्यांना जन्म देण्यास प्रेरक झालेली आहे. अनेक संस्कृत प्राकृत कवींनीं अशा प्रकारचीं काव्यें करून कालिदासाचें अनुकरण केलेलें आहे. त्यांतलीं कांहीं काव्यें खरोखरच हृद्यहि झालेलीं आहेत. परन्तु मेघदूताची बरोबरी तीं नावीन्य व सुरसता या गुणांत कधींच करूं शकलीं नाहींत व शकणारहि नाहींत. हे कवि कालिदासाशीं स्पर्धा करतात असें न मानतां, त्याचे गुण आवडीनें आपापल्या प्रतिभाशक्तीप्रमाणें अनुकारतात, एवढेंच म्हटलें पाहिजे. अशा दूतकाव्यांत पुढील काव्यें उल्लेखनीय आहेतः--

१ मयूरसंदेश - वृत्त प्राय: मंदाक्रान्ता; कर्ता कवि उदय केरळप्रांतीय; काल इ. स. १४ वें शतक, वास्को दि गामा हिंदुस्थानांत येण्यापूर्वी सुमारें एक शतक आधीं. संविधानक–प्रियेस संदेश; मार्ग त्रिवेन्द्रम ते अणकर; तत्कालीन स्थितिद्योतन हें महत्त्व. काव्य सुरस आहे.

२ शुकसंदेश –कर्ता लक्ष्मीदास १४ वें शतक. ३ विप्रसंदेश. ४ उण्णुनिलि संदेश – (मल्याळी). ५ मयूरसंदेश (मल्याळी)– केरळवर्मा कवि (१९ वें शतक उत्तरार्ध). ६ उद्दंडकविकृत कोकिलसंदेश. ८ भ्रमरसंदेश. ९ गरुडसंदेश. १० विष्णुत्रातकृत कोकसंदेश. ११ पवनदूत–धोयीकविकृत (१२ वें शतक); संविधानक–कुवलयवती नामक एक गंधर्वकन्या मलयपर्वतावरून, बंगालचा राजा लक्ष्मणसेन यास वसंतारंभीं वायु हा दूत कल्पून, त्याकरवीं आपली प्रीति कळविते. हा धोयीकवि व सुप्रसिद्ध गीतगोविन्दकार श्रीजयदेवकवि समकालीन होत. १२ वादिचन्द्रकृत पवनदूत. १३ कृष्णसार्वभौमकृत पदाङ्कदूत. १४ विनयविजयगुणिकृत इन्दुदूत. १५ तैलङ्गव्रजनाथकृत मनोदूत. १६ हंससंदेश. कर्ता 'विद्युलता-' कार पूर्णसरस्वती; दूत–नायिकेकडून नायकास; प्रवास–कांची, चोल, पांड्य,

केरल, तेथून उत्तरेस कालिन्दी, वृन्दावनप्रदक्षिणा. १७ वेदान्तदेशिकाचार्यकृत हंससंदेश. मनोवृत्तिरूपी नायिकेचें श्रीकृष्णप्रेम गाइलें आहे. १८ हंससंदेश——हंसरूपी ज्ञानमार्गानें मनोवृत्तिरूपी नायिकेनें ईशप्राप्ति करून घ्यावी हें संदेशयुक्त संविधानक. १९ वासुदेवकृत भृंगसंदेश २० उध्दवदूत. माधवकवीन्द्रभट्टाचार्यकृत.

यांशिवाय मेघदूतांवरून 'वेडावणीं' वा विडंबनकाव्येंहि कांहीं झालेलीं, आहेत (उदा. काकदूत, बल्लवदूत, इ.) मात्र हीं सर्व आधुनिक आहेत. संदेशकाव्यें सुमारें ३५ वर आहेत असें श्री. चक्रवर्ती संपादित 'पवनदूत'—च्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. 'दूत' वा 'संदेश' काव्यें प्रायः मंदाक्रांतांत असलीं तरी कांहींत इतरहि वृत्तें कोठें कोठें आहेत. सर्वांत कालिदासशैलीचें लीलानुकरण आहे. त्यांतील वेचक अर्थान्तरन्यासांचा गुच्छ मनोहर होईल. (पुढें परिशिष्ट पहा.)

दूतयोजनेच्या युक्तायुक्तेतविषयीं भामह या प्राचीन साहित्यज्ञाचें मत असें दिसतें (काव्यालंकार, परिच्छेद १)

अयुक्तिमद्यथा दूता जलभृन्मारुतेन्दवः ।
तथा भ्रमरहारीतचक्रवाकशुकादयः ॥ ४२ ॥

दौत्य करण्यास मेघ, पवन, चन्द्र, तसेंच भृंग, हारीत, चक्रवाकशुकादि विहंग योजणें हा 'अयुक्तिमत्' नामक दोष होय !

अवाचोऽव्यक्तवाचश्च दूरदेशविचारिणः ।
कथं दूत्यं प्रपद्येरन्निति युक्त्या न युज्यते ॥ ४३ ॥

मूक अथवा प्रकटवाणीचे हे दूत दूरदेशांत जाऊन दौत्यकर्म कसें करणार ! म्हणून हें युक्तीला पटत नाहीं !

यदि चोत्कण्ठया यत्तदुन्मत्त इव भाषते ।
तथा भवतु भूम्नेदं सुमेधोभिः प्रयुज्यते ॥ ४४ ॥

जर उन्मादावस्थेंत असल्यामुळें उत्कंठेनें ते दौत्यास तशी योजना करतात असें असेल तर मात्र तें तसें असो! पुष्कळदा बुद्धिमंत कवींनीं अशी योजना केलेली आढळून येते.

भामहानें अशाप्रकारें उत्तम बुद्धिप्रतिभावान् कवींचा जो उल्लेख

केला त्यांत अर्थात्‌च मेघदूतकाराचा समावेश तो बुद्धया करीत आहे हें स्पष्टच दिसतें. मेघदूताखेरीज आणखींहि अनेक दूतकांव्यें त्याचे कालीं प्रसिद्ध असावींत.

महाकवि भवभूति यानेंहि आपल्या मालतीमाधव नाटकांत अंक ९ श्लो. २५ व २६, हे दोन श्लोक मन्दाक्रांता वृत्तांत मेघदूतांतील अर्थ व रचना ध्यानीं धरूनच केले असावेत हें स्पष्टच दिसतें; पहा:—

" कच्चित्सौम्य प्रियसहचरी विद्युदालिङ्गति त्वा-
माविर्भूतप्रणयसुमुखाश्चातका वा भजन्ते ।
पौरस्त्यो वा सुखयति मरुत्साधुसंवाहनाभि-
र्विष्वग्विभ्रत्सुरपतिधनुर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति ॥ २५ ॥ "
" दैवात्पश्येर्जगति विचरन्निच्छया मत्प्रियां चे-
दाश्वास्यादौ तदनु कथयेर्माधवीयामवस्थाम् ।
आशातन्तुर्न च कथयतात्यंतमुच्छेदनीयः
प्राणत्राणं कथमपि करोत्यायताक्ष्याः स एकः ॥ २६ ॥ "

श्रीमद्भागवतांतहि संदेशकल्पना चांगल्याप्रकारें आलेली आहे. दशमस्कन्धांत [अध्याय ४६] उद्धवाकरवीं संदेश पाठवून श्रीकृष्णानें व्रजवासी नंदादिकांचें सांत्वन केलें असा प्रसंग वर्णिला आहे. श्रीरुक्मिणीनें सुंदर वसंततिलकाग्रथित आपला प्रणय-संदेश आप्तब्राह्मणाकरवीं भगवान् यदुकलतिलकास-श्रीकृष्णास-पोंचविलेला आहे (अ. ५२-५४) व त्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं येऊन रुक्मिणीहरण केलेलें आहे. तसेंच, विरही गोपिकांना आपलें हृदयप्रेम (अ. ४७) प्रियकर श्रीकृष्ण आर्ततेनें उद्धवाकरवीं अत्यंत काव्यात्मकतेनें कळवीत असल्याचें सुंदर वर्णन केलेलें आहे. श्रीमन्महाभारतांत (वनपर्व अ. ५३, ५४, ५५) हंसाकरवीं नलदमयन्तींनीं आपआपलें हृत्प्रेम परस्परांस कळविलेलें आहे. तर स्वतः नलराजानें इन्द्रादि दिक्पालांचें दौत्य पत्करून दमयन्तीस त्यांच्या प्रणयेच्छा कळविल्या आहेत. (नलं मां विद्धि कल्याणि देवदूतमिहागतम् । वन. अ. ५५ श्लो. २२) हीं सर्व दूतकर्में आपापल्यापरिं चमत्कृतिजनक व कौतुकास्पद अशीं असलीं, तरी मेघाकरवीं विरहसंदेश पाठविण्याची

कल्पना सयुक्तिकपणें सर्सेच नावीन्यपूर्ण नवलाईनें प्रतिभाबलानें निर्मिल्या-बद्दल कालिदासाचें असामान्यत्व आनंदानें मान्य करावेंच लागतें. मेघ-दूतांत भौगोलिक ज्ञानावांचून दुसरें काय आहे असें म्हणणारेहि कांहीं 'अरसिककंद' अगदींच नाहींत असें नाहीं; परन्तु, अशांच्या बाबतींत आम्ही एवढेंच उद्गार काढतों कीं,

" विलोकुनि विलासिनीजन पुनःपुन्हां कामुका
करी वश; नव्हे बुळा विवश घेइना कां मुका ! "

—केकावलि

मेघदूताची मूळ काव्यमय कल्पनाच काय, त्यांतील स्थलें, नद्या, पर्वत, देवालयें, नगरें यांचें अद्वितीय कलात्मकतेनें केलेलें औचित्यपूर्ण वर्णन व हिमालय, कैलास, अलका, यक्षमंदिर, यक्षाची पत्नी व तिला कथावयाचा संदेश व वर्णिलेली कथनपद्धति, त्यांतील वृत्त, शब्द यांची रचना, इ. इ. सर्वच बाबतींत इतकीं मनोहर वैशिष्ट्यें भरलेलीं आहेत कीं वाटतें, हा मेघ केवळ अमृताचा सांठा असून त्या अमृताचेंच सर्वत्र सिंचन करीत सर्व रसिकांस लोकोत्तर समाधान व आनंद देत आहे! यांत उगाच दोष काढणारे केवळ आपल्या बालिश विद्वत्तेचें प्रदर्शन करण्याचें साहस करतात व आपलें हंसें मात्र करून घेतात! त्यांच्या प्रयत्नांनीं कालिदासाची कीर्ति यत्किंचित्‌हि ढळणारी तर नाहींच, उलट —

'के वा न स्युः परिभवपदं निष्फलारंभयत्नाः' (मेघ. श्लो. ५४) यांत कालिदासाच्या यक्षानें वर्णन केलेल्या फजित झालेल्या पशूंच्या मालिकेंतच ते अधिक्षेपक मात्र आपलें स्थान पक्कें करून घेत आहेत, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं !

असो. मेघदूताचे कित्येक अनुवाद आपल्या देशांतील भाषांतहि अनेकांनीं रसिकतेनें व आवडीनें केलेले आहेत. हे अनुवाद गेल्या शंभर वर्षांतीलच आहेत. प्राचीनतर अनुवाद कोठें असल्यास अद्याप मला ते उपलब्ध झालेले नाहींत. युरोपीय विद्वानांनीं इकडील सुरस काव्यांचे अनुवाद आपआपल्या भाषेंत केले, तसे इकडील भाषांत त्यावेळचे अनुवाद मेघदूत काव्याचे झालेले दिसत नाहींत. जे आहेत, ते सापेक्षतः अलिकडचे

आहेत असें म्हणावें लागतें. रामायण, महाभारत, भागवत या धर्मग्रंथांचे अनेक प्रकारें लहानमोठे अनुवाद मोठ्या आवडीनें काव्यवाणीनें रचले गेले, पण तसा प्रकार मेघदूतासारख्या काव्याच्या बाबतींत घडलेला दिसत नाहीं. मेघदूतावर अर्थद्योतक रसविवरण करणाऱ्या संस्कृत टीका पुष्कळ झालेल्या आहेत, व त्यांवरून या काव्याची थोरवी व पंडितमंडळींत प्रसिद्धि स्पष्ट दिसून येत असली तरी प्राकृत कवींनीं या काव्याचा अर्थ आपापल्या मगदुराप्रमाणें कवनबद्ध करून निरनिराळ्या भाषांत कां ठेवलेला नाहीं कळत नाहीं. कदाचित् हें न्यून अलिकडील मंडळींना आढळून येऊनच कीं काय, काव्यानुवादाचे अनेक प्रयत्न त्यांचे हातून निरनिराळ्या भाषांत झाले आहेत असें वाटतें. अनुवादकर्ता अनुवाद करण्यास कां प्रवृत्त होतो? मला वाटतें, त्याचीं कारणें पुढीलप्रमाणें असूं शकतीलः—

१ परभाषेंतील सुंदर काव्य आपल्या भाषेंत आणणें व ती समृद्ध करणें.

२ इतरांनीं केलेले अनुवाद अपर्याप्त वाटून, स्वतःस समाधान वाटण्यासारखा अनुवाद करून स्वभाषेची सेवा करणें.

३ मूळ कवीचा आदर करावा असें वाटून त्याची कृति आपल्या शक्तीप्रमाणें स्वभाषेंत आणून आपलें सामर्थ्य सत्कारणीं लावणें.

४ मूळ काव्यानें आपणांस जो आनंद झाला त्या आनंदाचा शक्य तितका यथामति लाभ इतरांसहि उपलब्ध करून देणें.

आतांपर्यंत मला ज्या भारतीय भाषांतल्या अनुवादांची थोडीबहुत माहिती संपादन करतां आली त्यांचा येथें निर्देश पुढीलप्रमाणें करतां येईलः—

हिंदींतील अनुवाद

१ राजा लक्ष्मणसिंह (१८२६ ते १८९६) यांचा मेघदूतानुवाद पूर्वभाग १८८२ त व उत्तरभाग १८८४ त प्रसिद्ध होऊन १८९२ पयत या अनुवादाच्या तीनदां आवृत्ति निघाल्या. लक्ष्मणसिंह हे डेप्युटी कलेक्टरच्या हुद्यावर चढले होते व १८७७ मध्यें त्यांना ‘ राजा ’ हा किताब दिल्लीदरबारमध्यें मिळाला. यांनीं १८८६ त शाकुंतलाचा गद्य

हिंदी अनुवाद केला व १८८९ त श्लोकांचे ठिकाणीं पद्यें घालून नवीन आवृत्ति प्रसिद्ध केली. हा अनुवाद उत्कृष्ट आहे असें म्हटलें जातें. १८७८ मध्यें यांनीं रघुवंशाचाही गद्य हिंदी अनुवाद केला आहे.

यांचा मेघदूतानुवाद हिंदी अनेकविध वृत्तांत केलेला आहे. सवाया, घनाक्षरी, दोहा, सोरठा, चौपाई, शिखरिणी, छप्पै (षट् चरणी) या चालींत त्यांची रचना आहे. एक नमुना (श्यामास्वङ्ग या १०६ व्या श्लोकाचा अनुवाद):—

" मिले भामा तेरो सुभग तन श्यामा लतन में
मुखाभा चंदा में चकित हरिणी में दृग मिलें।
चलोर्मी में भौंहे चिकुर बरही की पुछन में
न पै हाँ काहू में मुहि सकल तो आकृति मिले " (१०३ पृ. ८३) पुस्तक अलाहाबाद इंडिअन् प्रेसनें प्रकाशित केलें असून यक्ष व यक्षपत्नी यांचीं रंगित दोन चित्रें पुस्तकांत छापलीं आहेत.

(२) दुसरा अनुवाद हिंदु विश्वविद्यालयांतील अध्यापक श्री. केशवप्रसाद मिश्र यांनीं १९२४ त रचलेला आहे. दुसरी आवृत्ति इ. स. १९३६ ची आहे. पुस्तकांत आर्टपेपरवरलीं हिंदी पद्धतीचीं अनेकरंगीं १२ चित्रेंहि घालून आवृत्ति मोठ्या कलाकुसरीनें छापण्यांत आली आहे. आकार डबल क्राउनचा आहे. पुस्तक ' काशी नागरी प्रचारिणी सभे '–तर्फें प्रकाशित करण्यांत आलेलें आहे. मला या पुस्तकाची माहिती व प्रत माझे विद्वान् मित्र पं. गणेशशास्त्री जोशी, अध्यापक भारतीय विद्या-भवन मुंबई यांजकडून मिळाली.

श्री. केशवप्रसाद यांच्या अनुवादाचा मासला:— (मेघदूत श्लोक ३६ पश्चादुच्चैः इ. चा अनुवाद)

अभिनव जपाकुसुम की लाली धारण करना सायंकाल,
शिवके उच्च बाहुतरुवन पर अपना मंडल देना डाल।
जिससे वे न नाच में लेना चाहे गज की गीली खाल,
और शान्त हो शिवा एकटक लखें भक्ति तेरी तत्काल॥

सर्व अनुवाद याच चालींत असून श्लोकास ४ ओळी असाच प्रकार आहे.

प्रस्तावनेंत मेघदूताची थोरवी व अनन्यसाधारण गुणाढ्यता विशद केली आहे. 'वल्मीकाग्रात्प्रभवति धनुःखण्डमाखण्डलस्य' यांत वल्मीक म्हणजे वारुळ असें नसून 'वल्मीकः सातपो मेघः' असा एक आधार दिलेला आहे. हा चरण कोणत्या कोशांतला आहे तें नीट समजत नाहीं. तथापि उन्ह वर पडलेला मेघ' म्हणजे वल्मीक हा अर्थ घेतल्यास इन्द्रधनुष्य पडण्याची जी प्रक्रिया 'सूर्यप्रकाशाचें मेघांतून पडणाऱ्या जलबिंदूंतून प्रेक्षकाचे नयनापर्यंत येणारें परावर्तन' ही या अर्थानें योग्य प्रकारें लागते हें खरें; तथापि, अद्याप आम्हास या अर्थाबद्दलहि साशंकता वाटते हें लिहलें पाहिजे. या अर्थास दुसरा आक्षेप हा कीं वल्मीकाग्र – उन्ह असलेल्या मेघाचा अग्र – म्हणजे वरली कड तेथें इन्द्रधनुष्य पडणें असंभवनीय वाटतें. इन्द्रधनुष्य ढगाच्या पृष्ठभागावर दिसतें. ढगाच्या कडेपासून तें वर कसें दिसेल! म्हणून वल्मीक म्हणजे वारूळ हाच अर्थ योग्य वाटतो.

(३) तिसरा अनुवाद 'अभिनवमेघ' हा श्री. अनिरुद्ध एम्. ए., साहित्यशास्त्री (काशी); रिसर्च स्कॉलर, मुंबई विश्वविद्यालय— यांनीं १९४१ मध्यें केलेला आहे. पुस्तकास हिंदी कवि श्री. बच्चन यांनीं भूमिका लिहिली आहे. या भूमिकेंत इतरही कित्येक हिंदी अनुवादांच्या कर्त्यांच्या नामनिर्देश केलेला आहे. त्यावरून हिंदींत वर उल्लखिलेल्या ३ अनुवादांखेरीज पुढील अनुवादक दिसून येतात–श्री. १ लाला सीताराम, २ राय देवीप्रसादपूर्ण, ३ कन्हैयालाल पोद्दार, ४ ठाकुर जगमोहन सिंह, ५ लक्ष्मीधर वाजपेयी, ६ महावीरप्रसाद द्विवेदी, ७ हृषीकेश चतुर्वेदी, ८ रामचरित उपाध्याय. अभिनव मेघपैकीं एक श्लोकानुवादः—(गत्वा सद्यः कलभतनुतां [मे. श्लो. ८३] याचा)

शीघ्र—गमन—हित गज—शिशुसे बन, हे बहु रूपप्रवीण !
पूर्वकथित—क्रीडागिरिके फिर होकर शिखरासीन;
उस प्यारे – घर के भीतर,
बहु जुगनू-छविसी सुन्दर,
करना चपला–चमक- दृष्टि, जो हो अति दमक विहीन।

सर्व अनुवाद याच चालींत व अशाच प्रकारचा, एक श्लोकास एक कडवें

असा आहे. या छोट्या पुस्तकांत मेघमार्गाचा नकाशा, तसेंच उज्जयिनी, तेथील महाकालमंदिर, दशपुर (मन्दसौर) मधील यशोधर्मन्चा प्रसिद्ध स्तम्भ, विदिशेंतील ' नीचैः ' गिरींतील गुहा इ. चेहि हल्लींच्या स्थितींतले फोटो आहेत. भूमिकालेखक श्री. बचन यांनीं मेघदूताची उत्कट प्रशंसा केली आहे. तथापि वांकडा मार्ग करून मेघास उज्जयिनी नगरादिक पहाण्यास सांगणें यक्षाच्या आतुर भूमिकेस पटत नाहीं असा त्यांनीं आपला एक मतभेदहि मांडला आहे.

गुजराती अनुवाद

गुजरातींतही मेघदूतानुवाद बऱ्याच कवींनीं केलेले आहेत. पैकीं मजजवळ पुढील दोन अनुवाद संग्रहीं आहेत:—

१ स्व० किलाभाई घनश्याम (१८६९-१९१३) यांचा. यास अनुवादकर्त्यांनें मोठी माहितीपूर्ण प्रस्तावनाहि गुजरातींत लिहिली आहे. तींत मेघदूताचे आणखी अनुवाद पुढीलप्रमाणें दिलेले आहेत:--

रा. नवलराम यांचा - मेघछंद चालींत.
रा. भीमराव भोलानाथ— मंदाक्रांता वृत्तांत
रा. हरिलाल हर्षदराय ध्रुव—मंदाक्रांता वृत्तांत पूर्वमेघाचा
कवि शिवलाल धनेश्वर पूर्वमेघाचा पृथ्वीवृत्तांत, उत्तर-मेघाचा स्रग्धरा वृत्तांत.
रा. ललित - मंदाक्रांता वृत्तांत
रा. हरिकृष्ण बळदेव भट्ट—हरिगीतिका वृत्तांत
रा. नानालाल दलपतराम – मंदाक्रांता वृत्तांत.

हे अनुवाद माझे पाहण्यांत आलेले नाहींत. स्व. श्री. कीलाभाईचा अनुवाद मंदाक्रांता वृत्तांत असून त्याचा नमुना असा– (वासश्चित्रं मधु नयनयोः इ.) [श्लो. ७६ उत्तर मेघ]

नानां वस्त्रो, मधुनयनने आपनारुं विलास,
ताजीं पुष्पो, किसलय रुडां, भूषणो भातभात; ।
ताजो रातो सरस अळतो रंगवा पादपद्म
आपे छे ज्यां सकळ अबलाभूषणो कल्पवृक्ष ॥

गुजरातींत फक्त स्वरान्तच यमक चालूं शकतें. तसेंच एका श्लोकाचा अनुवाद ६ अगर क्वचित् ८ चरणांतहि केला आहे. प्रख्यात चित्रकार कै. माळी यांचीं कित्येक चित्रें या अनुवादांत घातलेलीं आहेत.

आणखी एक अनुवाद श्री. त्रिभुवन गौरीशंकर व्यास यांनीं केलेला मला उपलब्ध झाला आहे. पुस्तक १९३७ मध्यें प्रसिद्ध झालें आहे. आर्ट पेपरवरील यक्ष व यक्षपत्नी यांच्या दोन रंगीत चित्रांनीं (चित्रकार रा. जमु संपत) पुस्तकाच्या सौंदर्याची चांगली भर पडलेली आहे. त्यांचा अनुवाद पुढील प्रकारचा आहे:— [गत्युत्कम्पादलकपतितैर्यत्र. मे. ७४ च्या श्लोकाचा]

त्वरित गतिथी शिरे थथरता अलकथी
खरि पड्यां पुष्प मंदारनां ज्यां
कर्णथी कनकनां कमलनी खरि पडी —
पांखडीना पड्या खंड ज्यां त्यां,
सरि पड्यां मोति ज्या स्तन परे हिंडळता
हारनी मोतिसर तूटि जातां,
एह ऐं धाणिए कामिनीना दिसे
रात्रिपथ भानुनो उदय थातां—

ही चाल ' वदसि यदि किंचिदपि दंतरुचिकौमुदी हरति दर तिमिरमति घोरम् ' या गीतगोविंदांतल्या अष्टपदीसारखी आहे. मूळच्या प्रत्येक श्लोकाबद्दल अशा चार ओळी किंवा वर छापल्याप्रमाणें ८ ओळी आहेत.

याप्रकारें इतरहि भाषांतील अनुवादांची चिकित्सा करणें उद्बोधक होऊं शकेल. या सर्व अनुवादांची पूर्ण माहिती भाषाभिज्ञांनीं मिळविली पाहिजे. बंगालींतल्या केवळ दोन अनुवादांची माहिती मिळाली; ते म्हणजे
१ बाबु नरेन्द्रचन्द्र देवकृत (सचित्र) प्र. गुरुदास चतर्जी अँन्ड सन्स कलकत्ता.

२ पशुपति बोस कृत—शांतिनिकेतन

या शिवाय आणखी ३ मेघदूतानुवाद हिंदींत आहेत असें कळतें.

असो. आतां मेघदूताच्या **मराठी अनुवादांकडे** वळूं. आमच्या

महाराष्ट्रिय वाचकांस हीच माहिती अधिक अभिप्रेत असणार. मेघदूताच्या अनुवादाचे प्रयत्न किती मोठ्या प्रमाणावर आजपर्यंत झाले आहेत व या काव्यावर रसिकांचें किती अलोट प्रेम आहे हेंच या सर्व प्रयत्नांवरून प्रामुख्यानें दिसून येतें. अनुवादकांना ' मेघदूत ' म्हणजे जणुं काय--

" ...कृतकतनयः कान्तया वर्धितो मे
हस्तप्राप्यस्तबकनमितो बालमंदारवृक्षः । "

कालिदासप्रतिभारूपी यक्षांगनेनें पुत्रवत् संवर्धिलेला श्लोकरूपी गुच्छांचा कल्पवृक्ष असाच वाटत असावासें वाटतें. त्या बालमंदारवृक्षाचे-लहान कल्पवृक्षतुल्य खंडकाव्याचे- गुच्छ आपल्या बुद्धीच्या हातास अगदीं सहज व विनाश्रम यावेत, किंवा येऊं शकतील असेंच जणुं अनुवादकांस वाटत असावें ! हें ' हस्तप्राप्यत्व ' त्या गुच्छांत नसतें व हे कल्पवृक्ष फार मोठे असते तर ते अनुवादांत संपादन करणें फार कष्टाचें वाटल्यावांचून राहिलें नसतें, हें खचित. या मंदारवृक्षकाच्या गुच्छांची मोहकता, रसाढ्यता, आनंद-प्रदता, शीतलता व अभिनवसुकुमारता खरोखरीच अलौकिक आहे आम्हांस ती वर्णनहि करतां येत नाहीं. आनंदवर्धनानें म्हटल्याप्रमाणें:—

प्रतीयमानं पुनरन्यदेव वस्त्वस्ति वाणीषु महाकवीनाम् ।
यत्तत्प्रसिद्धावयवातिरिक्तं विभाति लावण्यमिवांगनासु ॥

(ध्वन्यालोक, उद्योत १--४ श्लोक)

सुंदरींचें सौंदर्य त्यांच्यांत साकल्यानेंच प्रतीत होतें, अमुक एका प्रसिद्ध अवयवांतच तेवढें तें असतें असें नव्हे--तसें महाकवींच्या वाणींत असेंच एक सौंदर्यतत्त्व असतें कीं, जें अलौकिक आनंद देऊन हृदयासच प्रतीत होतें. मेघदूताचें निःसंशय अगदीं तसेंच आहे. त्याचे श्लोक हृदयांत गुणगुणले जातांना जो आल्हादवर्षाव करतात तो अनुभवलाच पाहिजे ! त्याचें वर्णन प्रत्यक्ष सरस्वती तरी करूं शकेल काय ? त्याच आनंदास अनिर्वचनीय ब्रह्मानंदसहोदर अशा शब्दांनीं व्यक्तविण्याचा तज्ज्ञ प्रयत्न करीत आले आहेत. आमची लेखणी तरी बिचारी याहून दुसरें काय कारणार ?

मेघदूताचा मराठींत प्रथम झालेला अनुवाद कै. कृष्णशास्त्री

चिपळूणकरांचा म्हणजे थोरल्या शास्त्रीबोवांचा होय. हा साकी वृत्तांत असून सन १८६५ त प्रसिद्ध झाला आहे. शास्त्रीबोवांनीं जीं कित्येक संस्कृत श्लोकांचीं भाषांतरें पद्यरत्नावलीरूपानें प्रसिद्ध केलीं, त्यांत २८४ साक्यांचें ' मेघदूतनामक काव्य ' हें प्रामुख्यानें अंतर्भूत केलें आहे. हें भाषांतर फार रसाळ उतरलें आहे. मुळांतील सर्व अवघड अर्थ मात्र यांत आलाच आहे असें नाहीं. किंबहुना, तसें ताडून पाहिल्यास पुष्कळच मूलार्थ सुटलेलाहि आढळेल. तथापि एकंदर सरळ प्रसादयुक्त रचना वाचतांच मेघदूताची उत्कृष्ट कल्पना येते व आनंद होतो यांत शंका नाहीं. मेघदूताचा हा मराठींतील पहिलाच अनुवादप्रयत्न अतिशय यशस्वी झाला आहे.

किंबहुना कांहीं विद्वान् रसिक टीकाकारांच्या मतें मराठींत झालेल्या अनुवाद—वाङ्मयांत हाच श्रेष्ठतम आहे.* एका श्लोकास बहुधा २, केव्हां ३, तर केव्हां ४ साक्या त्यांनीं रचलेल्या आहेत. शब्दालंकाराकडे वा यमक चांगलें साधण्याकडे शास्त्रिबोवांचें लक्ष्य दिसत नाहीं. यमक आहे, पण क्वचित्, चे चे, ला ला, नें-नें यासारखे विभक्ति–प्रत्ययान्त इ. आहे. मूलार्थ काटेकोरपणें शब्दशः घेतलेला नाहीं. क्वचित् महत्त्वाचे अर्थहि सोडले आहेत. तर कोठें कोठें भरहि घातलेली आहे. आपलें धोरण त्यांनीं प्रस्तावनेंत मांडलें आहे. त्यांच्या साक्यांच्या नमुन्यासाठीं ' श्यामास्वङ्गं चकितहरिणीप्रेक्षणे दृष्टिपातम् ' इ. मे १०६ व्या श्लोकाचा अनुवाद पहा—

" कोमल वेलीमधें भासतें अंग तुझें सुकुमार;
तसा पिसाऱ्यामधें शिखींच्या दिसे तुझा कचभार; २६४

* जयदेवकृत गीतगोविंद काव्याच्या मीं केलेल्या अनुवादाचें पुस्तक ' सुश्लोकगोविंद ' वाचून सहृदय टीकाकार श्री. वा. ना. देशपांडे यांनीं आपला अभिप्राय मला सुंदर सविस्तर पत्ररूपानें कळविला (ता. १०-३-४०) त्यांत पुढील मजकूर आहे. "......आपलें हें भाषांतर सरसतेच्या दृष्टीनें पाहिल्यास अगदीं ' A 1 ' झालें आहे, हें कळविण्यास मला फार फार आनंद होतो. कोणतेंहि पान उघडलें तरी सहज व प्रसन्न रचना आढळून येते. मराठींत संस्कृतांतील सर्वोत्तम भाषांतरें कोणतीं

(टीप पुढें चालू)

हरिणबालकांजवळ उमगती चंचल डोळे काळे,
मंद नदीच्या लहरीमाजीं तव भृकुटींचे चाळे २६५
लावण्य तसें तुझ्या मुखाचें अढळे पूर्ण शशांकीं;
मत्त मतंगीं मंदगतीही तूझी दिसते लोकीं २६६
यापरि सखये, दृष्टीं पडतें कोठें कोठें कांहीं;
परंतु तुलना पूर्ण तुझी ज्या, ऐसें एकहि नाहीं. २६७ "

त्यांतील भर व तूट कोणती तें रसिक चिकित्सकांनीं जरूर पहावें. श्यामा म्ह. प्रियंगु लता, नुसती लता म्हणण्यानें तो अर्थ सुटला आहे. चकित-हरिणीबद्दल 'हरिण बालकें' आलेलीं आहेत ! दृष्टिपात-'काळे' डोळे, 'मत्त मतंगी' इ. चरण नवीनच कल्पनेनें घातला आहे. 'हन्त' हा उद्गार व 'चण्डि' हें संबोधन यांना अभावानेंच शास्त्रीबोवांनीं स्थान दिलेलें आहे ! असें असूनही रचना प्रसादपूर्ण व प्रौढ शब्दांची आहे, व गोडवा उत्तम आलेला आहे. 'रम्याणां विकृतिरपि श्रियं तनोति' अशी जर परिस्थिति असूं शकते तर 'रम्याणां सदलंकृति' किती शोभादायक होईल बरें ! व त्याचाच प्रत्यय शास्त्रीबोवांच्या अनुवादांत आढळून आल्याचा आपणांस भास होतो !

आणखी एक उदाहरण घेऊं —

आश्वास्यैवं प्रथमविरहोदग्रशोकां सखीं ते
शैलादाशु त्रिनयनवृषोत्खातकूटान्निवृत्तः ।

आहेत असा जर मला कुणी प्रश्न विचारला, तर थोरल्या चिपळूणकरांचें 'मेघदूत', विनोबा भाव्यांची 'गीताई'— यानंतर मी आपल्या 'सुश्लोकगोविंदा'चाच नामनिर्देश करीन. सरस श्लोकांचीं उदाहरणें देतों म्हटलें, तर सबंध पुस्तकच उतरून घ्यावें लागेल ! तथापि त्यांतल्या त्यांत

'सये ! मुकुंदवल्लभे! मनोरमे ! स्मितानने !'

या पृष्ठ ५१ वरील श्लोक ३ ते १० यांचा विशेष उल्लेख केल्यावांचून मला राहवत नाहीं. कमी अधिक प्रमाणांत हाच थाट सर्वभर आढळतो. सौष्ठवगुणांत वामनपंडितादि प्राचीन कवींच्या तोडीचे आपले श्लोक आहेत, असें बिनदिक्कतपणें म्हणतां येतें." (टीप पुढें चालू)

साभिज्ञानप्रहितकुशलैस्तद्वचोभिर्ममापि
प्रातःकुन्दप्रसवशिथिलं जीवितं धारयेथाः ॥ ११५ ॥
—उत्तरमेघ

याचा ' पद्यरत्नावलीं ' तील अनुवाद पहा:—

" प्रथम वियोगें पीडित सखिला यापरि आश्वासोनी
तिच्या पासुनी निरोप आणी खूणहि त्या घेवोनी
परत झडकरी यावें तिकडुनि मजला सुखित कराया
वाट तुझी मी पहात बसतों येथेंची घनराया "

यांत ' त्रिनयनवृषोत्खातकूटान्निवृत्तः ' हे महत्त्वाचे वर्णनात्मक शब्द मुळींच गाळण्यांत आले आहेत. हें कैलासाचें वर्णन आहे. कैलास कसा ? तर शंकराच्या नंदीनें ज्याचीं शिखरें आपल्या शृंगांनीं उखडलीं—इ. आतां, हे विशेष शब्द मूळ कालिदासानें कोणत्या अभिप्रायानें योजले असावेत ? टीकाकारांनीं या संबंधीं कोठें रसिकतेनें लिहिलेलें दिसत नाहीं—तथापि माझ्या मतें, कैलासाचें हें वर्णन करण्याचें कारण मेघाला कैलासशृंगें पाहून तेथें नंदीप्रमाणें आपणहि वप्रक्रीडा (तटाला ढुसण्या देण्याची लीला) करावी असा कदाचित् मोह होणें अशक्य नाहीं! पण यक्ष ध्वन्यर्थानें तसें न करण्याबद्दल मुद्दाम या शब्दांनीं सुचवीत आहे, व लवकर परत येण्यास प्रार्थीत आहे! ' प्रातःकुन्दप्रसवशिथिलं ' या मनोहर समर्पक वर्णनाचाहि अनुवाद शास्त्रिबोवांना कां करावासा वाटला नसावा तें कळत नाहीं. आणखी एकादी साकी घालायला मुळींच

" ..पा. ३६ वरील, (१) ' मजसि कां यम कायम नेत ना ', (२) ' मम मतं रमते हरिसंगतीं '—या सारखी रचना रघुवंशांतील ९ व्या सर्गांतील श्लोकांची आठवण करून देते. अशी रचना सफाईनें करणाऱ्या आपल्या लेखणीची खरोखरच धन्य होय! ... आ.

वा. ना. देशपांडे "

मलाहि उपर्युक्त मजकुराचें सहृदयतेनें लिहिलें सुंदर पत्र वाचून धन्यता वाटली! ' मार्मिकः को मरन्दानामन्तरेण मधुव्रतम्! ' मरन्दांचा मर्मज्ञ मधुव्रतावांचून कोण आहे ?

प्रत्यवाय नव्हता ! अर्थहानि मुळींहि न व्हावी असेंच धोरण साक्षेपी अनुवादक कवींचें असलें पाहिजे व अधिक परिश्रमानें शास्त्रिबोवांना हें मुळींच अशक्य नव्हतें. चवथी पंक्ति अनभिप्रेत आहे. असो. शास्त्रिबोवांच्या अनुवादाची खरी खरी कल्पना येण्यासाठींच ही थोडी चिकित्सा येथें करण्यांत आलेली आहे. यांत दोषदिग्दर्शनाचा माझा मुळिंच हेतु नाहीं. शास्त्रीबोवांचा मेघदूतानुवाद हा मराठी भाषेचा खरोखरच अलंकार आहे !

दुसरा असाच एक रसाळ अनुवाद आमचे कै. मित्र कविवर्य सुमंत (१८८४ — १९३९) यांनीं १९०८ मध्यें केलेला मला नुकताच माझे सुहृद्वर्य प्रा. ग. श्री. हुपरीकर M. A., B. T. यांचेकडून पहावयास लाभला. तो अद्याप अप्रकाशित आहे. तथापि पुढें मागें लवकरच प्रसिद्ध व्हावा अशाच योग्यतेचा तो आहे. या अनुवादाच्या हस्तलिखितास कै. विद्यावाचस्पति पं. राशिवडेकर शास्त्री, या विद्वान् रसिक कवीनें ७ श्लोकांची संस्कृतांत प्रस्तावना लिहिली आहे. तिच्यांतील मेघसंदेश व कालिदास यांच्या वर्णनाचे, तसेंच अनुवादक कवीच्या गुणवर्णनाचे श्लोक प्रथम येथें देऊन नंतर अनुवादाचा मासला रसिकांस सादर करूं: --

कै. अप्पाशास्त्री म्हणतातः --

आसारः सद्रसानां निरवधिविभवः संभवः संमदानां
लीलागारो गुणानां रसिकजनपरीतापनिर्वापमेघः ।
शीर्षे विद्योतमानो मणिरखिलमहाकाव्यवृन्दस्य दीप्रः
स्फूर्जन्नाभाति सोऽयं जगति वरकवेर्मेघसंदेश एकः ॥ १ ॥

काव्यानि सन्ति विपुलानि जगत्यनेकैर्दत्तोदयानि कविभिर्न हि तत्र शङ्का ।
नो मेघदूतसदृशं परमत्र किञ्चिन्मूर्धन्यमन्यदिति किन्तु मतिर्मदीया ॥ २ ॥

सद्वस्तु किञ्चिदपि सद्गुणजालशालि संवर्ण्यतां किल मितंपचवाग्विलासैः ।
यत्किंचिदेव कलयन्पुनरेतदन्यः कः कालिदासकवितो मदयेन्मनांसि ॥ ३ ॥

मेघदूतमिदं श्रीमान् सुमन्तकविकुञ्जरः ।
महाराष्ट्रगिरा चारु मतिमानन्ववादयत् ॥ ४ ॥

गिरां गुंफः सोऽयं नवनवरसोल्लासमधुरः

समायातः श्रोत्रं किमपि हृदयं नर्तयति नः ।
दिनाधीशादाप्तप्रभव इव राकाहिमकरः
करव्रातध्वस्ताखिलभुवनसंतापविसरः ॥ ५ ॥
सन्त्यज्येव पुरातनं वपुरसावुद्वेगसारं पुन–
र्माहाराष्ट्रगिरा चमत्कृतिमयं भेजे शरीरं नवम् ।
इत्थं तर्क इहानुवादमधुना संवीक्षमाणस्य मे
चेतस्यभ्युदितः सुमन्तकविनोल्लासात्समुद्भावितम् ॥ ६ ॥
रञ्जयन्रसिकस्वान्तान्ययमाचंद्रतारकम्
अलङ्करोतु भुवनं श्रीशिवस्यानुकम्पया ॥ ७ ॥

—इत्याशास्ते श्रीअप्पाशर्मा विद्यावाचस्पतिः ।

हे श्लोक सोपेच आहेत तथापि थोडक्यांत सारांश द्यावासा वाटतो. १. सर्व महाकाव्यवृंदाचे मस्तकावर तेजस्वी हिऱ्याप्रमाणें शोभणारें असें हें कविश्रेष्ठाचें मेघदूतकाव्य रसाचा वर्षाव करणारें, अमर्याद वैभवाचें, हर्षांचें उत्पत्तिस्थान व गुणांचें क्रीडामंदिर असून रसिकजनांना ताप वारून शीतलता देणारा मेघच असें जगांत शोभत आहे ! २. जगांत अनेकांचीं काव्यें आहेत, यांत संशय नाहीं. परंतु सर्वांच्या मस्तकावर शोभणारें मेघदूताप्रमाणें दुसरें कोणतेंहि काव्य आहे असें मला वाटत नाहीं. ३. कोणताहि चांगला विषय घेऊन थोडक्या वाग्विलासांत तो वर्णन करावा हें खरें. परंतु साधाच विषय वाग्विलासांनीं अप्रतिमपणें नटवून रसिकांचे चित्त आनन्दित करणारा कालिदासाव्यतिरिक्त अन्य कोण आहे ? ४. कविकुञ्जर मतिमान् श्री. सुमंत यानीं मराठींत सुंदर प्रकारें हें मेघदूत अनुवादिलें आहे. ५. नवनवरसांनीं अतिशय मधुर असा हा वाणीचा गोंफ कानीं पडतांच, आमचें हृदय अनिर्वचनीयपणें नाचवीत आहे ! सूर्यापासून प्रकाश संपादन करून पौर्णिमाचंद्र आपल्या किरणांनीं अखिल भुवनांचा संताप जसा नाहींसा करतो तसाच हा आहे. ६. आपलें पुरातन शरीर टाकून मराठी भाषेंत चमत्कृतिपूर्ण, उत्कृष्ट, गतिमान्, नवीन असें वपु त्या मेघानें धारण केलें आहे कीं काय असा तर्क हा सुमन्तकृत अनुवाद पाहून माझे मनांत येत आहे ! ७. रसिकांचीं मनें रंजवीत हा

अनुवाद श्रीशिवकृपेनें आचंद्रतारक जगाला अलंकृत करो! अशी विद्या-वाचस्पति अप्पाशास्त्री आशा करतात.

सुमन्तांविषयीं अकारण गैरसमज पसरवणाऱ्यांच्या हृदयास या उक्ति कदाचित् स्पर्श करतील असें वाटल्यावरून हा इतका विस्तार आम्हांस येथें करावा लागला. असो; सुमन्तांच्या अनुवादाच्या कांहीं कांहीं पंक्ति येथें देत आहें. त्यांनीं एका श्लोकाचा अर्थ चार ओळींतच आणला असून चाल--गीतगोविंदांतील ' समुदितमदने रमणीवदने ' इ. सारखी किंवा भूपाळीसारखी आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. भाषा किंचित् संस्कृतप्रचुर आहे पण उचित माधुर्य व योग्य अर्थ तींत चांगलाच आला आहे.

' मामाकाशप्रणिहितभुजं ' इ. श्लोकाचा मराठी अनुवाद व त्याचप्रमाणें त्याचेपुढील ' भित्वा सद्यः ' इ. (मे. १०८ व १०९) या श्लोकांचा मराठी नवावतार पहा—(गुह्यकसंदेश, उत्तरभाग)

" महत्प्रयासें स्वप्नीं झाली भेट तुझी जाणुनी
दृढ कवळाया बाहु पसरिले मीं गगनीं ताणुनी ।
पाहुनिया हें वृक्षकिसलयीं वनदेवी टाकिती
मुक्तास्थूलस्वाश्रुबिन्दु ते खचित टपटपा किती ! ॥
भेदुनियां क्षणिं देवदारुतरुकोमलपल्लवपुटें
तत्क्षीरस्रुति सुरभि दक्षिणाभिमुख जो प्रजव सुटे ।
त्या कैलासाचलपवना मी आलिंगीं, गुणवति !
गणुनि मुळीं हा स्पर्शुनि आला खास तव तनुप्रती ॥ "

किंवा,

" असिताक्षि ! दिल्या खुणेवरुनि या मत्क्षेमा जाणुनी
अविश्वासिनी न हो लव मनीं जनवार्ता आणुनी ।
जरी बोलती ' स्नेह वियोगीं नाश पावतो ' असें
इष्टाभोगें वाढुनि रुचि तो प्रेमराशि होतसे ॥ "

हा, श्लोक ' एतस्मान् ' मां इ. (मेघ. ११४) चा अनुवाद खरोखरच वाचनीय आहे. कै. सुमन्तांनीं प्रत्यक्ष छापावयाचें योजिलें असतें तर कांहीं अधिक सफाई देणारे अनुकूल फेरफार या अनुवादांत

अवश्य केले असते व त्यांच्या कीर्तींत या सुंदर अनुवादानें त्यांच्या हयातींतच आनंदाची भर पडली असती, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं! हा अनुवाद आहे तसाच, पण लवकर, प्रकाशित होवो अशीच रसिक इच्छा करतील, अशी आमचें मन ग्वाही देत आहे. या अनुवादाचें हस्तलिखित अगदीं वेळेवर आम्हांस सुमंतपुत्राकडून संपादन करून दिल्याबद्दल प्रा. हुपरीकर यांचा मी अतिशय ऋणी आहें. सुमंतांनीं आपल्या अनुवादाचा पुढील पद्यांनीं उपसंहार केला आहे --

" श्रेष्ठा जी कृति कालिदासकविची भू-खंडकाव्यांमधीं
कंठीं संतत मेघदूत धरिती सारज्ञ लक्षावधी ।
अंशें ती अजि संस्कृतांतुनि अशी म्यां आणिली प्राकृतीं
क्षीराची रुचि तक्र दे न; परि ही केली वृथा वा धृती ! ॥ १ ॥
क्षीरा नाम क्षीरचि शोभे तक्राहि तक्र होतां तें; ।
' गुह्यकसंदेश ' दिलें तरि त्या अभिधान ' मेघदूता ' तें ॥ २ ॥

ता. १५-१२-१९०८ --सुमन्त "

यावरून सुमंतांची थोरवी व विनय हे दोनी उत्तम कळून येतात, हें कोण सहृदय अमान्य करील? उपान्त्यस्वरासहच सफाईनें यमकरचना करण्याची कुशलता या अनुवादकर्त्याच्या भाषाप्रभुत्वाची साक्ष चांगलीच देते. त्यांतच काय तें काव्य असतें असें कोण म्हणतो? पण शब्दालंकार व अर्थालंकार हें दोनी सरस्वतीच्या डाव्या उजव्या कानांतील शोभादायक कुंडलेंच होत. एकच कुंडलानें शोभाहानिच होईल असें अलंकारमहोदधि-कारांनीं म्हटलें आहे तेंच योग्य वाटतें. [शब्दालंकृतिभिः कामं सरस्वत्येककुंडला । द्वितीयकुण्डलार्थे तद् ब्रूमोऽर्थालंकृतीरिमाः ॥ अलंकार-महोदधि.] सूक्ष्मपणानें मेघदूताचे श्लोक अवलोकन केले तर त्यांत शब्दालंकारहि अकृत्रिमपणें इतस्ततः किती विखुरले आहेत तें पाहून आश्चर्य वाटतें! अथवा आश्चर्य कसलें? कविसम्राटाच्या वाग्वैभवाची प्रचीति त्याच्या वाणीच्या प्रत्येक पदविन्यासांत दिसल्यावांचून कशी राहील? आम्ही उदाहरणादाखल, अगदीं सहज, मेघदूत उघडून पुढील श्लोक जो आला त्याची शब्दालंकारदृष्ट्या थोडी न्याहाळणी करूं:--

वापी चास्मिन्मरकतशिलाबद्धसोपानमार्गा
हैमैश्छन्ना विकचकमलैः स्निग्धवैदूर्यनालैः ।
यस्यास्तोये कृतवसतयो मानसं संनिकृष्टं
नाध्यास्यन्ते व्यपगतशुचस्त्वामपि प्रेक्ष्य हंसाः ॥ ७८ ॥

मरकत – मार्ग, हैम – कम, विक – चक, दीर्घ – दूर्य, मलैः – नालैः, तोये–तयो, कृत–सत, नसं–सं–ध्यास्यन्ते, व्यप–गत–शुच (दोन दोन वर्णांचे शब्द) प्रेक्ष्य–हंसाः

ही सहज अकृत्रिम कौशल्यानें झालेली शब्दांची गुंफण कालिदासीय असामान्यता दर्शविते. [अशाच प्रकारचें अधिक विवेचन वाचकांनीं आमच्या 'सुश्लोककुमार' प्रस्तावनेंत पहावें.] कालिदासीय कविता उपमेनें वर्णन करावयाची झाल्यास तिला या अलकेंतल्या यक्षमंदिराशेजारच्या वापीचीच जणु उपमा द्यावी असें वाटतें. या वापीस जसें मरकतशिलांनीं उत्कृष्ट घाट बांधले आहेत. तसेंच मरकतरत्नासारख्या दिव्यवर्णी शब्दांची कौशल्यातिशयाची पदपद्धति या कवितावापीस शोभत आहे—वैडूर्यनालाच्या प्रफुल्ल सुवर्ण कमलांनीं तिला जशी अलौकिक शोभा आलेली आहे, तशीच कालिदासकवितेलाही रसपरिपूर्ण व खोल अर्थांच्या अशा अनेक अलंकारांनीं दिव्य माधुरी चढलेली आहे! त्या वापीच्या संतत निर्मल जलावर अमर्याद संतुष्ट असलेले हंस जवळच असलेल्या प्रत्यक्ष मानससरोवरासहि जाऊं इच्छीत नाहींत—तसेंच काव्यरसाचे त्रिकित्सक सारासारज्ञ हंसासारखेच रसिकहि कालिदासकवितारसच चाखून तृप्त होऊन तशी गोडी इतरत्र संनिकृष्ट कविमानसांत (निकृष्ट काव्यांत) कोठेंहि आढळणार नाहीं अशा निश्चित अनुभवानेंच, तिच्यांतच रममाण होऊन राहतात! असा खरोखरच रमणीय अर्थ ध्वन्यर्थानें कालिदासीय कवितेस कसा लागत आहे हें पाहून मति चकित झाल्यावांचून रहात नाहीं! मोरोपंतांच्या आर्याभारताची शलाकापरीक्षा श्रीकाशीक्षेत्रांतल्या पंडितांनीं केल्याचें सांगतात. तेव्हां पुढील सुंदर आर्याद्वय विराटपर्वोपसंहाराचें उघडलें गेलें असें वर्णन आहे—

" वदवि मयूराकरवीं श्रीराम ' विराटपर्व ' चवथें, बा ! ।
अल्प म्हणोनि न सोडी अमृताची शक्ति सर्व चव, थेंबा. ॥
रामघन सत्प्रसादामृत जों जों बहु वळूनि वर्षतसे ।
तों तों भक्तमयूर स्वार्याकेका करूनि हर्षतसे ! ॥ "

त्यांतील शब्दमाधुर्य, अर्थगौरव व रसमयता अवलोकन करून ते रसिक पंडित चकित व आनंदभरित झाले म्हणतात, तशीच स्थिति, प्रस्तुत सहजगत्या हाताशीं आलेल्या श्लोकांतलें, या दिव्य यक्षाच्या वापीचें वर्णन कालिदासाच्या रसवापी कवितेस लागत आहे हें पाहून रसिकहंसांची झाल्यावांचून खास राहणार नाहीं ! विस्तारभयास्तव हें रसमज्जन आवरतें घेऊन आपणांस आतां पुढें बरेंच मार्गक्रमण करावयाचें आहे, हें अनुसंधान सोडून कसें चालेल ? रामगिरीहून अलकेपर्यंतच्या मार्गांत रम्यस्थळीं मेघानें रसास्वाद वारंवार घ्यावा, पण संदेशवाहनाच्या अंगीकृत कार्यास विलंब होण्याइतका तो दीर्घ नको, असें विरही यक्षानें मेघास सांगितलेलें आम्हींहि लक्षांत वागवावें हें बरें !

कै. सुमंत व कै. कृष्णशास्त्री यांच्या कृतींच्या उल्लेखानंतर श्री. भालचंद्र शंकर देवस्थळी यांच्या अनुवादाचा मासला पाहूं. हा १९०१ मध्यें छापलेला असून मंदाक्रान्ता वृत्तांतच आहे. एका श्लोकास एक श्लोक अशी ही समश्लोकी आहे. पुस्तक आतां दुर्मिळ झालें आहे पण मला प्रत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांत वाचायला मिळाली. प्रस्तावनेंत देवस्थळींनीं पुढील विनयोक्ति आर्येनें व्यक्त केली आहे—

" कविकुलगुरुकृति कोठें ? कोठें जडमति मदीय असमर्थ ? ।
औद्धत्य हें क्षमूनी बोलोत न ' यत्न हा ' बुध ' किमर्थ ? ' " ॥

नमुन्यादाखल मेघदूत श्लोक २६ ' विश्रान्तः सन्व्रज वननदीतीरजातानि सिञ्चन् ' इ. चें देवस्थळीकृत भाषांतर असें:—

" जा तेथोनी पुढतिं मग तूं सिंचुनीया नदींचे
तीरोद्यानीं नवजलकणीं ताटवे मागधींचे (जाईचे)
यत्कर्णाब्जें सुकति पुसतां वक्त्रिचे घर्मबिंदू
ते छायेनें सुखवुनिहि जा पुष्पलावीमुखेंदु २६ "

' पुष्पलावी ' या अवघड शब्दाबद्दल ' माळिणींचे मुखेंदू ' करायला हरकत

नव्हती. ' विश्रान्तः सन् ' याचा आशय भाषांतरांत उतरला नाहीं. ' छायादानात् क्षणपरिचितः ' इत्यादींतील, छाया देऊन क्षण तरी त्यांच्या, मुखांची ओळख करून घ्यावीस इतकीं तीं सुंदर असतात हा आशय, अथवा क्षणाहून अधिक काल तेथें सौंदर्यास्वाद घेण्यांत रमूं नकोस अशा प्रकारचा अर्थ या अनुवादांत उतरलेला दिसत नाहीं. भाषांतर साधें पण अपुरें आहे. वृत्ताचें बंधन असो, वा साधारण गोषवारा आला तरी चालेल, अशी किंचित् शिथिलता असो, त्यायोगें रसहानि घडली हें निश्चित. ज्यांनीं मूळांतून गोडी चाखलेली नाहीं अशा वाचकांस या उणीवा कळणें कठिण आहे. प्रा. श्रीधर विष्णु परांजपेकृत केकावलीटीकेंत देवस्थळींच्या भाषांतराचे उतारे उद्धृत केलेले आहेत. ते वाचून मेघदूत हें काय आहे इ. समजून घेण्याची जिज्ञासा वाचकांस होते हें खरें. या दृष्टीनें हें अनुवाद अतिशय उपकारक होत. प्रसाद व गोडवा या अनुवादांत आहे यांत शंका नाहीं.

कै. डॉ. गंगाधर गोविंद दामले, L. M. & S. यांनीं १९०६ त मेघदूताचा एक अनुवाद ' मेघाचें अलकेस प्रयाण ' या नांवानें केला आहे. तोही समवृत्त समश्लोकी स्वरूपाचा आहे. नमुन्यासाठीं डॉ. दामले यांच्या अनुवादापैकीं पुढील श्लोक देऊं:— (मूळ–' धूमज्योतिस्सलिल ' इ. मेघदूत श्लोक ५ वा.)

" धूमज्योतिःसलिलमरुतीं निर्मिला मेघ कोठें ?
शक्य प्राण्याकरविं असले प्रेष्य संदेश कोठें ? ।
औत्सुक्यें हें न गणुनि तयें प्रार्थिलें अंबुदातें
जो कामी तो सहज न गणी चेतनाचेतनातें ॥ ५ ॥ "

हा अनुवाद साधा व सरळ आहे. मूळांतील सर्व शब्दांचा अर्थ क्वचित् मूळचे सामासिक शब्द तसेच ठेवून आणण्याचा यत्न आहे; तर कोठें तो सोडूनहि देण्यांत आलेला दिसतो. ' पटुकरणैः ' याचा अर्थ प्रस्तुत अनुवादांत आलेला नाहीं. गं. गो. दामले यांनीं या अनुवादाबरोबर आपल्या इतरही कांहीं स्फुटकविता छापल्या आहेत. त्यांच्या पुस्तकाची

प्रत हल्लीं दुर्मिळ झाली आहे. मला आमचे मित्र प्रा. रा. श्री.जोग M. A. यांचेकडून कृपेनें मिळाली व नकलून घेण्यास उपयोगीं पडली.

श्री. बाळकृष्ण लक्ष्मण अंतरकर यांची 'मेघदूतच्छाया' ही अनुवादकृतिहि समवृत्त समश्लोकी स्वरूपाची आहे. १९०५ व १९३९ अशा दोन वेळां हा अनुवाद छापला गेला आहे. 'वक्रः पन्था यदपि' इ. मे. श्लोक २७ याचा अनुवाद नमुन्यादाखल पहा:--

"जातां थोडा पथ जरि तुला वांकडा उत्तरेला
गच्च्या रम्या त्यजुन नच जा उज्जनीच्या विशाला.
तेथें विद्युत्स्फुरणचकितीं लोल कांताकटाक्षीं
रंगेल्या रे! जर न रमसी, फोल होतील अक्षी २७"

शब्दसौष्ठव व अर्थव्यक्ति हे सद्गुण जेथें कोणत्याही काव्यास अत्यंत आवश्यक होत तेथें ते कालिदासासारख्याच्या अद्वितीय कृतीच्या अनुवादास किती आवश्यक असायला पाहिजेत हें सांगायला नकोच! अर्थात्च या गुणांच्या अभावीं वाचकास तितका आनंदलाभ शक्य नाहीं. प्रस्तुत श्लोकांतील 'रंगेल्या रे!' 'गच्च्या' इ. शब्द अशा दृष्टीनें माधुर्यहानि करणारे झाले आहेत असें वाटतें. श्री. अंतरकर यांनीं कालिदासाच्या शाकुंतलाचेंहि 'सरूप शाकुंतल' नांवें तुल्यवृत्त भाषांतर केलें आहे. तें माझ्या अवलोकनांत अद्याप आलेलें नाहीं. संस्कृतच्या तुल्यवृत्त भाषांतरांत मुळचा समग्र अर्थ अगदीं न सुटतां आणणें व तो माधुर्यहानि न होतां आणणें हें फारच दुर्घट आहे. त्यामुळें साधेल तितक्याहि यशस्वितेबद्दल अनुवादकास धन्यवादच दिले पाहिजेत.

कै. प्रो. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले यांनींही 'मेघदूताचें समवृत्त मराठी भाषांतर' १८९३ त केलें व १९०१ मध्यें तें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें. लक्ष्मणशास्त्री यांनीं मुळच्या एका एका श्लोकास १ मंदाक्रांता वा कुठें कुठें १॥ तर कोठें २ तर क्वचित् २॥ वा ३ मंदाक्रांता रचलेल्या आहेत. १॥ वा २॥ मंदाक्रांता आपणांस अपूर्ण व कशाशाच वाटतात. वृत्त म्हणजे समग्र चतुष्पाद रचना असतांना त्यांत अशी पादहानि आपणांस अद्याप सौष्ठवपूर्ण वाटत नाहीं! अलीकडे सुनीत रचना-पद्धति, चौदा ओळींची

म्हणजे ३॥ श्लोकीं रूढ झाली आहे हें खरें; पण ती रचनाच इंग्रजीच्या "जो हुकुम" अनुकरणात्मक आहे. शिवाय यमकाच्या दृष्टीनें सुनीतांत कांहीं विशिष्ट क्रमपद्धति रूढ आहे. परंतु संस्कृतानुसारी मराठी रचना-पद्धतींत श्लोक 'अपूर्णांकां' त रचणें हें न्यूनत्वद्योतकच रसिकांस वाटल्यास तो रसिकांचा दोष नव्हे !

"विद्युत्वन्तं" इ. उत्तरमेघांतील आरंभींचा श्लोक लेलेशास्त्री यांनीं पुढील तीन श्लोकांत अनुवादिलेला आहे.—

"मोठीं मोठीं सुभग नवही मंदिरें ज्या पुरीचीं
सौंदर्यानें तुजसम मला वाटतीं जाण साचीं ।
मेघा, राहे जवळि तुझिया वीज ती फार कांत
क्रीडारंगीं ललित वनिता दंग होती तयांत ॥ १ ॥
शोभा येते परम तुजला इन्द्रचापच्छटांनीं
चित्रांनीं तीं विविध अपुल्या फार जातीं खुलोनी
कर्णा लागे ध्वनि बहु तुझा गोड गंभीर साचा
गानासंगें ध्वनि मृदु तिथें तो मृदंगादिकांचा ॥ २ ॥
आहे पाहें तव जलमयी आकृति श्यामकान्ति
तद्भूमीही मणिमय तुझी श्यामशोभा वरीती ।
लीलेनें तूं विहरशि सख्या सर्वदा अंबरांत
त्यांचींही तीं रुचिर शिखरें अंबरा चुंबितात ॥ ३ ॥"

प्रस्तुत श्लोकांत कालिदासानें अलकेंतले मेघ व प्रासाद यांचें अनेक विशिष्ट गोष्टींत कसें सुंदर साम्य आहे तें मोठ्या कौशल्यानें दर्शविलें आहे. लेलेशास्त्री यांच्या भाषांतरांत 'मंदिरें' या नपुंसकलिंगी शब्दाऐवजीं 'प्रासाद' किंवा 'सौध' अगर 'वाडे' किंवा 'हर्म्य' यापैकीं पुल्लिंगी शब्द मेघाशीं साम्य दाखविण्याकरितां निवडायला हवा होता. शिवाय 'नवही' 'क्रीडारंगी' इत्यादि अनभिप्रेत वर्णन, 'तुंग' या एका शब्दाबद्दल 'लीलेनें तूं विहरशि सख्या सर्वदा अंबरांत' इत्यादि समग्र पंक्ति, इ. इ. शैथिल्यदर्शक रचना, मुळच्या श्लोकाच्या बांधेसूद सौंदर्याशीं तुलूं जातां, मेघ आणि अलकेंतले प्रासाद योग्य तऱ्हेनें उत्कृष्टपणें एकमेकांशीं सौंदर्यांत

स्पर्धा करीत असले तरी मेघदूतांतला ' विद्युत्वन्तं ' हा मूळचा श्लोक व हे तीन अनुवादश्लोक यांची केव्हांही काव्यगुणांनीं बरोबरी होऊं शकत नाहीं असें आम्हांस वाटतें. मूलार्थ अधिक विशद केला आहे म्हणावें तर तेंहि सौष्ठवानें साधलेलें नाहीं. असो; दीडश्लोकी अनुवादाचें एक उदाहरण पाहूं. [' धूमज्योतिस्सलिल. ' इ. मेघदूत ५ व्या श्लोकाचा अनुवाद]

" धूमज्योतिःसलिलमरुतांपासुनी जन्म ज्याचा
न्यावा, ऐशा जडजलधरें, केविं संदेश साचा ?।
होता उत्कंठित निज मनीं तेधवां यक्ष फार
त्या योगानें मुळिं न सुचला त्याजला हा विचार ॥
कामार्तांच्या अणुहि न मनीं राहतोसे विवेक
त्यां लागोनी जड अजडही वाटती तुल्य देख ! ॥

' पटुकरणैः, ' याचा आशय यांत आला नाहीं. ' उत्कंठित ' यामध्यें कर्णकटु यतिभंग झाला आहे. उत्कंठित यांत ' उत्क ' हा शब्द नसून 'उत्कंठ' हा शब्द मुळांत आहे. म्हणून यतिस्थल ' उत्कं ' नंतर अगदीं अनुचित झालें आहे. ' गुह्यकस्तं ययाचे ' याचाही आशय या षट्पंक्ती भाषांतरांत आगला गेलेला नाहीं. लेलेशास्त्री यांचा मंदाक्रान्ता वृत्तांतला अनुवाद हा कृष्णशास्त्र्यांच्या साकीवृत्तांतल्या अनुवादानंतर प्रथमच समवृत्त अनुवाद करण्याचा मराठी प्रयत्न होय. लेलेशास्त्री आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात, " तेंच वृत्त भाषांतरांत योजून तें कसें काय साधतें हें पाहण्याच्या इच्छेनें प्रस्तुत भाषांतर तयार केलें आहे. यांत वृत्तचमत्काराशिवाय हें भाषांतर करण्याचा दुसरा कोणताही हेतु नाहीं. " शास्त्रीबोवांचा हा हेतु कितपत साध्य झाला हें रसिकांनीं ठरवावयाचें आहे. आमच्या मतें त्यांच्या मंदाक्रान्ता वृत्तांना सौष्ठवपूर्ण मंदाक्रान्ता म्हणणें अवघड आहे व चमत्कार वाटायला लावणारा त्यांत कोणता भाग आहे कळत नाहीं. त्यांच्या प्रयत्नांनीं असमाधान पावूनच बहुधा पुढें कित्येक समश्लोकी अनुवादाचे प्रयत्न झाले असावेत. अनुवादक हाही मूळचा उत्तम कवि असला तरच त्याचा अनुवाद उत्तम काव्य आहे असें वाटण्याजोगा वठेल, एरवीं नाहीं. उत्तम मंदाक्रान्ता वृत्तांत ज्यास रचना करतां येतें त्याच्याच हातास या बाबतींत

यश येईल. उत्तम मंदाक्रान्ता एका संस्कृत कवीनें पुढील मनोज्ञ शब्दांत वर्णिली आहे. [वृत्तरत्नाकर, टीप पृ. ९७]

" नानाश्लेषप्रकरणचणा चारुवर्णोज्ज्वलाङ्गी
नानाभावाकलितरसिकश्रेणिकान्तान्तरङ्गा ।
मुग्धस्निग्धैर्मृदुमृदुपदैः क्रीडमाना पुरस्ता-
न्मन्दाक्रान्ता भवति कविताकामिनी कौतुकाय ॥ "

उत्कृष्ट श्लिष्ट वर्णनांनीं चतुर असणारी-अनेक आश्लेष म्हणजे आलिंगनें देण्यांत चतुर अशीं अंगें धारण करणारी, सुंदर वर्णांनीं उज्ज्वल रूप धारण करणारी, आपल्या अनेकविध मधुर भावांनीं, अनेक रसिकांचे अंतरंग व्यापून टाकणारी, नितांत मनोहर मृदु मृदु पदविन्यासांनीं आपल्या समोर विहरणारी अशी मंदाक्रान्ता-मंद गतीनें चालणारी (हळुं हळुं आपण आक्रान्त केलेली) कविता कामिनीप्रमाणेंच आनंदप्रद होते!

क्षेमेन्द्रानें आपल्या ' सुवृत्ततिलका ' त वृत्तासंबंधीं वर्णन करतांना मंदाक्रान्तेसंबंधीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. प्रथमतः " प्रावृट्प्रवासव्यसने मन्दाक्रान्ता विराजते । " वर्षाकाल, प्रवास व संकटस्थिति यांच्या वर्णनास मंदाक्रान्ता वृत्त शोभतें असें सांगितल्यानंतर पुढें कालिदासास मंदाक्रान्ता वृत्त विशेषच साधलें आहे हें सांगतांना क्षेमेंद्र म्हणतोः--[सुवृत्ततिलक तृतीयविन्यास श्लो. ३४]

' सुवशा कालिदासस्य मन्दाक्रान्ता प्रवल्गति ।
सदश्वदमकस्येव काम्बोजतुरगाङ्गना ॥

कालिदासाची मंदाक्रान्ता त्यास अत्यंत वश असून ती फारच शोभते पटाईत घोडेस्वारास काम्बोजांतील (सिंधुतीरप्रदेश) तुरगी ज्याप्रमाणें वश होऊन वळते त्याप्रमाणें.

तसें पाहिलें तर कालिदास हा इतका उत्कृष्ट काव्यरचनाकार आहे कीं त्यानें जीं जीं निरनिराळीं वृत्तें आपल्या कवितेस वापरलीं तीं तीं त्या त्या ठिकाणीं अगदीं औचित्यपूर्ण वाटतात, इतकेंच नव्हे तर त्याच्या रचनाप्रभुत्वाचीही उत्तम साक्ष देतात. अनुष्टुभ् काय, उपजाति काय, किंवा वंशस्थ, वसंततिलका, मालिनी, शिखरिणी, मंदाक्रान्ता, शार्दूलविक्रीडित,

स्रग्धरा, द्रुतविलंबित, पुष्पिताग्रा, रथोद्धता, माल्यभारा, आर्या, शालिनी, वियोगिनी हीं जीं जीं म्हणून त्यानें वृत्तें उपयोगांत आणलीं तीं तीं त्याच्या वाक्प्रभुतेचींच द्योतक आहेत. कालिदासादिकांनीं हीं भिन्नभिन्न वृत्तें निरनिराळ्या भावनांना, रसांना वापरल्यानंतरच क्षेमेंद्रानें कोणत्या ठिकाणीं कोणतें वृत्त शोभतें त्याचें कांहीं ठोकताळे बांधलेले दिसतात. ते अगदीं निरपवाद आहेत असें मुळींच नाहीं. क्षेमेंद्रच म्हणतो कीं, मीं हा जो मार्ग सांगितला तो अशांच्याकरितां कीं, जे वश्यवाक् आहेत व वाटेल तें वृत्त जे प्रभुत्वानें वापरूं शकतात. ज्या इतर कवींना एकाद्याच वा फार तर दोनतीन वृत्तांतच कांहीं रचना करतां येते त्यांना हे नियम अगदीं अयोग्य होत ! अमुक पद्धतीचा रेशमी, जरी, लोकरी इ. इ. पोषाख अमुक अमुक प्रसंगीं करावा असें दरिद्र्यांना सांगून काय उपयोग ?

ज्यांस ज्या एकाद दुसऱ्याच वृत्ताचा चांगला अभ्यास आहे त्यानें आपला काव्यविषय त्याच सरावलेल्या वृत्तांत रचावा. एक तर प्राचीन कवींमध्यें सुद्धां एकच वृत्तांत रचना करण्याचा प्रघात दिसून येतो. त्यांतच त्यांस चमत्कारपूर्ण लिहितां येतें अथवा ज्या वृत्तांत काव्य-विषयास आरंभ केला त्याच वृत्तांत तो संपवूनही टाकणें अशक्य नसतें. कोणीं कांहीं, कोणीं कांहीं अशीं विशिष्ट वृत्तें वापरलीं आहेत. त्यांना इतर वृत्तें येत नव्हतीं असें नव्हे ! म्हणून कोणच्या प्रसंगीं कोणतें वृत्त वापरावें या विषयीं जरी, क्षेमेंद्र म्हणतो, हा मार्ग कथन केला आहे, तरी त्याचा अवलंब 'कृतज्ञ' कवींनीं करावा. परंतु ज्यांचें वाणीवर प्रभुत्व नाहीं त्यांच्यासाठीं हा नियम नव्हे.

यावरून मथितार्थ घेतां येईल तो असा कीं, मेघदूताच्या रचनेस कालिदासासारख्यानें मंदाक्रान्ता वृत्त वापरलें म्हणून अनुवादकानेंही तेंच वापरावें असें नाहीं. अनुवादकाचें ज्या वृत्तावर प्रभुत्व असेल त्यांतच त्यानें अनुवाद करण्याचा प्रयत्न करावा. चिपळूणकर, सुमंत यांनीं केलेले साकी इ. चालींचे अनुवाद किती मधुर झाले आहेत हें आपण पाहिलें आहे. यशस्विता ही कोणतें वृत्त वापरलें आहे यावर मुळिंच नसून जें वापरलें आहे तें किती सुंदरपणें हाताळलें आहे किंवा त्यांत किती सुंदर अर्थ

समर्पक शब्दांनीं लालित्यानें भरला आहे, यावरच सर्वस्वीं अवलंबून आहे.

अमुक एक भावना व्यक्त करण्यास अमुक एक विशिष्टच वृत्त असावें इत्यादि नियम किंवा संकेत कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंतच योग्य आहेत. क्षेमेंद्रानें हे कांहीं कांहीं नियम सांगतां सांगतांच फार मोठे महाकवींचें अपवादही दिग्दर्शित केलेले आहेत. तसें पाहिलें तर मेघदूतांतील पूर्व भागांत मेघास जो मार्ग सांगितला आहे त्यांतले कितीसे श्लोक खऱ्या विरहभावनेचे आहेत? बहुसंख्य श्लोक सुंदर सृष्टिवर्णनाचे व करुणेतर रसवर्णनाचे आहेत. सर्व मेघदूतांत विरहभावना दाखविणारे पंचेचाळीस श्लोक आहेत. तर बाकीचे ७२ श्लोक सौंदर्य व आनंद प्रगट करणारे आहेत. [पुढील पृथक्करण स्थूलमानानें केलें आहे. एकाददुसऱ्या श्लोकाबद्दल मतभेदास जागा असेलही. पंडितांचें लक्ष्य या पद्धतीकडे अधिक वेधावें व सत्यान्वेषण उत्तम व्हावें यासाठींच हा प्रयत्न येथें दिग्दर्शित केला आहे.]

विरहभावना स्पष्ट असणारे श्लोक एकूण ४५. (श्लोकक्रमांक या पुस्तकांतल्या मूळाप्रमाणें)

१ ते ३, ५ ते ८, ११, १२, २९ ३९, ८२, ८५ ते ११७

निर्मळ आनंद वा सृष्टिवर्णनात्मक श्लोक एकूण ७२

४, ९-१०, १३ ते २८, ३० ते ३८, ४० ते ८१, ८३-८४

यावरून कळून येईल कीं मेघदूताची भूमिका विरहाची असली तरी बहुसंख्य श्लोक फारच हर्षमय व सौंदर्यानंदमय वा दुःखभावशून्य वा अक्लेशवाचक आहेत व ज्या अर्थी हीं वर्णनें सरसकट एकजात केवळ मंदाक्रान्ता वृत्तांतच आहेत, * त्या अर्थीं मंदाक्रांता वृत्त दुःख व आनंद या दोन्ही भावना उत्कृष्टपणें व्यक्त करण्यास उत्तम उपादान आहे असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं व वाङ्मयांत अशा उत्कृष्ट मंदाक्रांता वृत्तांतल्या रचना आनंदप्रद वर्णनासाठींहि पुष्कळ वेळां उपयोजिलेल्या

* गणदृष्ट्या १७ अक्षरांच्या ' मंदाक्रान्ता ' वृत्तांत म, भ, न, त, त, गग, असें असून ४ व १० अक्षरांनंतर यतिस्थानें असतात. [गुरु ᴗ लघु–] ᴗᴗᴗᴗ। – – – – – –ᴗ। ᴗ – ᴗ ᴗ – ᴗ ᴗ ᴗ

आहेत (सुश्लोककुमार, सर्ग ७ यांत मंदाक्रांतांत उमाविवाहवर्णन आहे तें पहावें.) उत्तम कवीस कोणत्याहि वृत्तांत आपली अभिप्रेत करुण वा आनंदाची भावना वा इतरहि रसांच्या भावना उत्कृष्टपणें वर्णन करतां येतात. आर्याभारतांत केवळ आर्यांतच सर्व रसात्मक वर्णन त्या त्या प्रसंगीं कविसमूहचूडामणि मयूरकवीनें रचलेलें आपण पहात नाहीं काय ? रामायणांत अनुष्टुभ्, उपजाति, वंशस्थ, मालिनी इ. वृत्तांत सर्व रचना विविध रसांची झाली आहे. वश्यवाक् कवींना जें जें वृत्त मनीं स्फुरेल तें तें वाहन आनंदानें घेऊनच जणूं त्यांची सरस्वती विलासानें विहारसंचार करत असते व तें तें वाहन त्या सरस्वतीच्या दिव्य सौंदर्यामुळें शोभूनच दिसतें. व नंतर साहित्यचर्चा करणारे शास्त्री, या रसांस हें चांगलें दिसतें व त्या रसांस तें बरें दिसतें अशांसारखे कांहीं बांधीव सिद्धांत वाचकांच्या पदरांत बांधूं पहातात ! परंतु जें जें शोभतें, तें तें प्रतिभेमुळेंच शोभून दिसतें हेंच मुख्य तत्त्व आपण लक्षांत वागवलें पाहिजे. प्रतिभा शकुंतलेप्रमाणेंच मधुर असेल, तर तिला सर्वच मंडनात्मक होऊन शोभूं लागतें !

मराठी अनुवादांपैकीं ज्यांचा उल्लेख अद्याप करायचा राहिला आहे त्यांकडे वळूं. मुंबईचे सॉलिसिटर श्री. शांताराम आत्माराम सबनीस, बी. ए., एल्. एल्. बी, यांनीं "महाराष्ट्र मेघदूत" नामक एक समश्लोकी अनुवाद १९३८ त प्रकाशित करून तोच पुनः सुधारून १९४४ त पुरवणीरूपानें प्रसिद्ध केला आहे. ग्रंथास कै. तात्यासाहेब केळकर यांचा पत्ररूपी पुरस्कार आहे. या पुस्तकाचें अल्पसें समालोचन मीं 'यशवंत' मासिकांत (सप्टें. १९३८) केलें होतें. सौष्टवाच्या दृष्टीनें (अनुवादांत) पुष्कळच सुधारणा व्हायला हवी, अशी मीं तेव्हां अपेक्षा केली होती. असो. एक नमुना (मूळश्लोक '--भर्तुः कण्ठच्छवि.' इ.......पूर्वमेघ ३३)

"स्वामीकंठद्युति गण तुझी आदरें जों पहाती
जाई तेथें त्रिभुवननुता ईशमूर्ती असे ती ।
पद्मस्पर्शें मुदित वनितामज्जनें, वात नित्य
गंधोद्गारी, उपवन जिथें डोलवी, गांधवत्य ॥

यांत अवघडपणामुळें अर्थव्यक्ति झालेली दिसत नाहीं. शिवाय

'स्वामीकंठ' हा अशुद्ध समास आहे. 'स्वामिग्रीवाद्युति' अशासारखी रचना हवी होती. म्हणजे पुढील जोडाक्षरामुळें, 'मि' ऱ्हस्व ठेवतां आली असती. एकाद्याच श्लोकाच्या समालोचनानें सर्व अनुवादाविषयीं मत स्थापणें केव्हां केव्हां चूक वाटण्याचा संभव आहे; तथापि शितावरून भाताची परीक्षा बहुधा अचूकपणें नित्य करतातच ना! तेंच धोरण येथें स्थलसंकोचास्तव अवलंबलें आहे. व अनुवाद करणें हा एक सदभ्यास आहे असें मानून सुधारणा व्हावी याच दृष्टीनें येथें कांहीं न्यूनाधिक्य जें लिहिलें, त्याबद्दल कोणाचा रोष होऊं नये अशी प्रार्थना आहे.

सर चिंतामण द्वारकानाथ देशमुख, C. I. E., रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर यांचा संस्कृतचा अभ्यास दांडगा आहे. तसेंच त्यांची मराठी व संस्कृत काव्यशक्तिहि चमकदार आहे. त्यांच्या परिचयसान्निध्याचा जो कांहीं लाभ माझ्या एका सहृदय स्नेह्याचे कृपेनें मला घडला, त्यावरून त्यांच्या व्यासंगाची, अभिरुचीची, सौंदर्यदृष्टीची व बुद्धिमत्तेची कांहींशीं ओळख प्रस्तुत लेखकास झाली व नवलपूर्ण आनंद वाटला. सर चिंतामण यांनीं मेघदूताचा एक समवृत्त समश्लोकी अनुवाद १९४२ त केवळ खासगी प्रसारार्थ प्रसिद्ध केला व पुन्हां थोडें त्यांत परिष्करण करून १९४४ त दुसरी आवृत्ति काढली. पुस्तक त्यांनीं भक्तिभावानें, आपले गुरुवर्य प्रो. रा. कृ. लागू यांस अर्पण केलें आहे. पुस्तकास कोणतीहि प्रस्तावना लिहिलेली नाहीं. मेघदूताचा काटेकोरपणें अर्थ एकेकाच श्लोकांत आणण्याचा श्री. देशमुख यांनीं चांगला प्रयत्न केला आहे. लालित्याच्या दृष्टीनें कोणी कांहीं सुधारणा सुचवीलहि. तथापि एकंदर प्रयत्न त्यांची बुद्धिमत्ता निःसंशय दाखवितो. एक तरी नमुना, त्या "खासगी प्रसारार्थ" रचलेल्या अनुवादाचा, येथें उतरून घेण्याचा मोह मला अनावर वाटतो! त्याची अनुवादक कवि थोर मनानें क्षमा करतीलच. '**शुक पञ्जरबन्धस्ते मधुराणां गिरां फलम्**'!

'वीचिक्षोभस्तनित०' इ. मेघदूत—श्लोक २८ चा अनुवाद श्री. देशमुख असा करतात.—

"जीची चंचल्लहरिमुखरा मेखला पक्षिराजि
जाणों नाभि स्खलितगतिनें दाविते भोंवरा जी ।
ती निर्विंध्या पथिं जंव मिळे, सेविं तीच्या रसास
स्त्रीची कांताजवळिं पहिली प्रेमभाषा विलास ॥ "

शेवटच्या पंक्तींतील अर्थांतरन्यास मुळांतल्या अनेकवचनीं ऐवजीं एकवचनीं घालूनहि अनुवादकानें विशेष रसहानि होऊं दिलेली नाहीं. व सुटसुटीतपणा चांगला राखला आहे. माझा प्रस्तुत उपजातिवृत्तांतला अनुवाद 'सुश्लोकमेव' तयार होत असतां मी कांहीं महिने मुंबईत होतों. त्यावेळीं सरसाहेबांच्या बरोबर त्याचें वाचन व चर्चा करण्याची संधि केव्हां केव्हां लाभली याचा मला साभार उल्लेख करावासा वाटतो *

आणखी एक अनुवाद माझे बालमित्र श्री. गणेश नीलकंठ कात्रे, बी. ए. (ऑ.) एल्‌एल्. एम्. हल्लीं डिस्ट्रिक्ट जज्ज यांनीं रचलेला माझे वाचनांत आला आहे, पण तो अद्याप प्रकाशित झालेला नाहीं. श्री. गणपतराव यांचाहि संस्कृत–व इतर वाङ्मय–व्यासंग थोर आहे. आमच्या त्यांच्या बुद्धिबळाच्या डावांतील 'वप्रक्रीडा' लहानपणापासून होत आल्या आहेत. कोर्टांतील किचकट कार्यांचा व्याप अमर्यादित असतांनाहि केवळ आवडीमुळेंच गणपतरावांनींहि समवृत्त समश्लोकी अनुवादरचना केली आहे. व त्यांतले कांहीं श्लोक सफाईदारहि झाले आहेत. अद्याप त्यांची परिष्कृत अनुवादप्रत मजला पहायला मिळाली नाहीं. तथापि एक श्लोक येथें आपण उतरून घेऊं:—

---

*श्री. देशमुख हे रिझर्व्ह बॅंकेचे गव्हर्नरपदीं नियुक्त झाले तेव्हां त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं झालेल्या एका खासगी समारंभास मी व आमचे स्नेही डॉ. ग. वि. देसाई गेलों होतों. (२९–९–१९४३) समारंभांत मीं त्यांचे अभिनंदनपर चार पद्यें रचलेलीं सर्वांस वाचून दाखविलीं. त्यांत एका मंदाक्रांतेनें त्यांच्या मेघदूतानुवादाचाहि मीं उल्लेख केला होता. तो सर्वांस फारच आवडला. (हीं व इतर पद्यें परिशिष्टांत पहा.)

(मूळ श्लोकः —' वासश्चित्रं मधु नयनयोः ' इ. मेघ. श्लो ७१)

" वस्त्रें नानाविध, कुशल तें मद्य डोळे खुलाया,
कोळ्या पानांसहितहि कळ्या केशभूषा कराया ।
सौंदर्याच्या विविधरचना, पादभूषेस लाक्षा,
नारींना हीं सकल मिळतीं चिंतितां कल्पवृक्षा ॥ "

यांत ' आदेशदक्ष ' चा योग्य अर्थ आलेला दिसत नाहीं. व ' यस्यां '-चाहि राहिला आहे. तथापि एकंदरींत हा श्लोकानुवाद कसा चांगला वठला आहे याची कल्पना वाचकांला यायला हरकत नाहीं.

असो. आणखीहि कांहीं रसिक विद्वानांनीं मेघदूताचे मराठी अनुवाद केलेले ऐकले आहेत, असतीलहि व पुढेंहि कित्येक होतील. बहुधा हे प्रयत्न मराठी काव्यरचना करण्याच्या अभ्यासाच्या हेतूनेंच प्रथमतः प्रवृत्त होत, असावेत. मेघदूताच्या श्लोकांची थोडकी संख्या हीहि अशा प्रयत्नांस प्रारंभ करण्यास अनुवादक कवींना अनुकूल वाटत असल्यास नवल नाहीं. याच दृष्टीनें या अप्रतिम खंडकाव्यास " हस्तप्राप्यस्तबक नमितो बालमन्दारवृक्षः " असें मौजेनें मीं जें मागें (पृ. २६) वर्णिलें तें वाचकांस यथायोग्यच वाटेल !

मला मेघदूत व रघुवंश यांतील श्लोकांचा अभ्यास १९१५–१७ च्या सुमारास करण्याची विशेष आवड उत्पन्न झाली. त्यावेळीं सुटीच्या दिवसांत आमच्या शेळोली या खेडेगावीं आमचे मावसबंधु श्री. विश्वनाथशास्त्री कात्रे यांचे सह, मी, त्यांचे वडील कै. ती. शंकर रामचंद्र कात्रे उर्फ अप्पा यांचेकडे या काव्याचा कांहीं भाग वाचून त्यांत, कुतूहलानें प्रवेश केला. कालिदासाच्या सुंदर काव्यांची विलक्षण मोहिनी तेव्हांपासूनच माझे अंतःकरणावर बसली. मंदाक्रांता वृत्त व इतरहि अशींच वृत्तें यांचा अभ्यास करण्याचीहि आवड त्याच सुमारास जडली. एक मेघदूताचें पुस्तक मीं श्री. विश्वनाथ यांना सप्रेम भेट दिलें व तें देतांना त्यावर पुढील मंदाक्रांता रचून लिहिली:—

" विद्यास्वेतामविहतगतिं वाचने चाभिलाषं
गुर्वीं भक्तिं गुरुजनपदे मय्यतिभ्रातृभावम् ।

मोदे दृष्ट्वा सुगुणनिवहं हृष्टचेताश्च तुभ्यं
दास्याम्येतत् प्रिय मम सुहृद् गृह्यतां विश्वनाथ ॥ १ ॥ ”

कालिदासीय उपजाति वृत्तांतल्या श्लोकांची धाटणीहि अत्यंत हृदय-मोहक वाटून त्या उपजातीप्रमाणेंच ‘ अनुवेदगङ्गम् ’ नामक एक १८ श्लोकांची कविता आमच्या शेळोली(शैलालि)निकटची वेदगंगा नदी व आसमंतात् भागांतली सृष्टिशोभा वर्णन करण्यासाठीं रचिली; ती आमच्या राजाराम कॉलेजच्या नियतकालिकांत १९१८ त लगेच प्रसिद्ध झाली. माझी प्रसिद्ध झालेली हीच प्रथम कविता होय. (परिशिष्ट पहा) ती रसिकांस अतिशय आवडली. इतरहि संस्कृत व मराठी कविता करण्याचा उपक्रम आमचे रसिक मित्रमंडळ व माझे सहृदय बंधुवर्य कै. डॉ. शंकरराव (ती. दादा) यांचे प्रोत्साहनानें व प्रेरणेनें बराच घडला. यांत अनेकदा मंदाक्रांता वृत्तांतहि रचना झालेली आहे. १९१८–२३ च्या मध्यंतरांत जयदेवकृत गीत-गोविंदाचा मीं मराठी श्लोकानुवाद रचून पूर्ण केला. तो अत्यंत हृद्य झाल्याचें अनेक रसिकांनीं वाचून कळविलें. १९३२ त बहुतेक मराठी व संस्कृत स्फुटरचना समाविष्ट करूनच ‘ वाङ्मय–श्री–खण्ड ’ हा ग्रंथ मीं माझे कै. ती. डॉ. दादा यांचे स्मृतीसाठीं प्रसिद्ध केला. त्यांत आमच्या बंधुभगि-नींच्या, तसेंच विश्वनाथशास्त्री कात्रे यांच्या व पुतणी चि. सौ. सुमतिदेवी नारळीकर एम्. ए. (त्यावेळीं चि. कु. कृष्णाताई श्रीखंडे हुजुरबाजार) यांच्या कविता व कै. ती. दादांचे लेख, कविता इ. संग्रहित केले आहेत. त्यांचेहि महाराष्ट्रीय विद्वान् रसिकांनीं अतिशय कौतुकोद्गारपूर्वक स्वागत केलें. त्या ग्रंथास विद्वद्वर्य कै. प्रि. अश्वत्थामाचार्य बाळाचार्य गजेंद्रगडकर, एम्. ए. यांची सुंदर प्रस्तावना लाभली. १९३४ मध्यें गीतगोविंदानुवाद मीं ‘ सुश्लोकगोविंद ’ या अभिधानानें प्रसिद्ध केला. ग्रंथास विवेचक प्रस्तावना मींच लिहिली. तसेंच पुस्तकांस श्रीमत बाळासाहेब पंतप्रतिनिधि बी. ए., राजेसाहेब औंध संस्थान, यांचे कृपेनें प्राचीन कांग्राव्हॅली पद्धतीचीं राधाकृष्ण व अभिसारिका अशीं ५ अतिशय मनोहर रंगीत चित्रें घालतां आलीं. त्यांमुळें ग्रंथास अनन्यसाधारण शोभा प्राप्त झाली. सुश्लोकगोविंदा-

चें रसिकांनीं विलक्षण रसिकतेनें कोडकौतुक केलें व मला कृतार्थता मिळवून दिली. १९३५ त दिङ्नागकृत कुंदमाला या उत्तररामचरितविषयक संस्कृत नाटकास मराठी वेष, गद्यास कै. प्रा. रंगाचार्य रड्डीशास्त्री यांनीं व पद्यांस मराठी पद्यरूपानें मीं, या दोघांनीं देऊन, तें नाटक प्रसिद्ध केलें. त्यास प्रा. द. के. केळकर, 'काव्यालोचन' कार यांनीं विवेचक उपोद्घात लिहिला आहे. १९४० मध्यें कालिदासकृत कुमारसंभव (अष्टसर्गात्मक) महाकाव्यास मराठी श्लोकवेष देऊन मीं 'सुश्लोककुमार' नामें प्रसिद्ध केला. याहि ग्रंथांतील श्लोक महाराष्ट्रीय 'सारज्ञ असूयोज्झित' विद्वानांस अत्यंत रोचक वाटले! व त्यांनीं 'सुश्लोकगोविंद', 'सुश्लोककुमार' या उभयहि ग्रंथांची मुक्तकंठानें प्रशंसा केली. यांच्या प्रस्तावनेंत माझें अनुवादाचें धोरण मीं स्पष्टपणें मांडलें आहे. अनुवादपद्धतीचें विवेचन 'सुश्लोकगोविंद' व 'सुश्लोककुमार' या दोन्ही ग्रंथांच्या प्रस्तावनेंत करण्यांत आलें आहे. समासप्रचुर अशा संस्कृत श्लोकांच्या मराठी अनुवादास प्रायः जरा अधिक विस्तृतता अर्थवाहकतेच्या दृष्टीनें आवश्यक आहे. व तशा ध्येयानें उचित वृत्तयोजना करायची म्हणजे एक तर दीर्घतर वृत्त घेतलें पाहिजे किंवा लहान वृत्त स्वीकारायचें असल्यास श्लोकांची संख्या तरी सर्वार्थास धक्का न बसेल इतकी वाढविली पाहिजे, हें खरें असलें तरी अनुवादाचें अंतिम यश अनुवादकाच्या कवित्वशक्तीवरच सर्वस्वीं अवलंबून असतें, हेंच माझें मत मीं प्रस्तावनेंत व इतर लेखांतहि सोदाहरण विशद केलें आहे. तें रसिक अभ्यासकांस निःसंशय प्रेरक वाटेल.

मेघदूताचाहि आपण अनुवाद करावा असे विचार माझे मनांत बराच काल वसत होतेच. त्यांतच एका रसिक अभ्यासकाचे—श्री. भा. श्री. परांजपे एम्. ए. हनुमानगड वर्धा—यांचें पुढील प्रेरक पत्र मला आलें. त्यावेळीं मी युद्धनोकरीवर बलुचिस्तानमध्यें क्वेट्टा या ठिकाणीं होतों. श्री. परांजपे यांचें पत्र असें:—

"हनुमानगड, वर्धा.
२५–९–४२.

सप्रेम नमस्कार वि. वि.

कांहीं वर्षांपूर्वीं आपण ती. वडिलांच्याकडे पाठवलेलें वाङ्मयश्रीखंड व

सुश्लोकगोविंद हीं दोन पुस्तकें मी पाहिलीं होतीं, आणि त्यांतल्या त्यांत गीतगोविंद माझ्या आवडीचें असल्यानें व कॉलेजांत त्याचवेळीं ऐच्छिक विषयाच्या निमित्तानें संस्कृतचें इतर वाचन करीत असतां निरनिराळ्या संस्कृत काव्यांचा रसास्वाद घेत असल्यामुळें मी आपलें हें काव्य औत्सुक्यानें वाचून पाहिलें व आनंदाची गोष्ट ही कीं तें मला फार आवडलें. मूळांतली गोडी शक्य तितकी भाषांतरांत उतरविण्याची हातोटी आपणांला चांगली साधली आहे. व चांगल्या रसदार संस्कृत काव्यांचा परिचय असल्यामुळें कीं काय, आपलीं भाषांतरेंहि मूळाइतकींच मला तरी हृद्य वाटलीं. सुश्लोककुमार हें पुस्तक प्रसिद्ध झाल्याचें कळतांच मुद्दाम लायब्ररींतून आणून वाचलें. तेव्हां आपलीं सारीं पुस्तकें वाचून काढण्याचा मीं संकल्प केला आहे.

या खेपेला मी वर्धेला कांहीं दिवसापासून आजारी असल्यामुळें घरीं आलों आहें. या सुटींत मीं मेघदूत वाचायला घेतलें व त्यासाठीं साऱ्या प्रती गोळा केल्या. पण त्यांत आपली प्रत आढळली नाहीं आपण अद्याप मेघदूतावरील आपली कृति प्रसिद्ध केली नाहीं काय ? केली नसल्यास जरूर करावी. ' सुश्लोकगोविंदा ' च्या वाचनानें माझी खात्री झाली आहे कीं संस्कृतांतील शृंगार सभ्य व समुचित अशा मराठी वेषांत आपणच चांगल्या तऱ्हेनें आणूं शकाल. आणि म्हणून मुद्दाम ही विनंति केली आहे. त्या विनंतीकडे आपण लक्ष द्याल अशी आशा करतों. ' वसंताच्या खुणा ' हें माझें पुस्तक सोबत आपल्या भेटीसाठीं पाठवीत आहें त्याचा स्वीकार व्हावा.

आपला— **भा. श्री. परांजपे "**

एका अपरिचित मार्मिकाचें वरील प्रशंसापर अकल्पित पत्र व त्यांतील सूचना यांचें विस्मरण मला कधींच झालें नाहीं. मेघदूतानुवाद करण्याचा निश्चय व प्रत्यक्ष कृति करण्यास प्रारंभ २५ ऑगस्ट १९४४ पर्यंत होऊं शकला नाहीं व तेव्हां आरंभलेला अनुवाद २९–७–४५ ला श्रीकृपें

संपूर्ण झाला. व पुनः पुन्हां अनेकदां वाचून त्यांत यथामति सौष्ठवातिशयाचे दृष्टीनें कमीजास्त फेरफार व संस्करण आजवर केलें. प्रस्तावनेच्या दृष्टीनें शक्य ती माहिती रॉयल एशिआटिक सोसायटी व मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, व तशींच इतर ग्रंथालयें यांतून मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणें अनेक विद्वान् रसिक मंडळींशीं चर्चाहि केली.

मेघदूतानुवाद लिहिण्यापूर्वी, लिहीत असतां व नंतरहि मला जणूं काय मेघाप्रमाणेंच बराच संचार करण्याची संधि लाभली! नोव्हेंबर १९३६ मधें अलाहाबादच्या गंगायमुनांचा नितांतमनोहर संगम तीर्थप्रयाग, ज्याचा उल्लेख कालिदासानें मेघदूतांत (श्लोक ५१) ‘ स्यादस्थानोपगतयमुनासंगमेवाभिरामा ’ असा केला आहे व त्याचप्रमाणें रघुवंशांतील १३ व्या सर्गांत

“ क्वचित्प्रभालेपिभिरिन्द्रनीलैर्मुक्तामयी यष्टिरिवानुविद्धा ।
अन्यत्र माला सितपङ्कजानामिन्दीवरैरुत्खचितान्तरेव ॥ ५४
क्वचित्खगानां प्रियमानसानां कादम्बसंसर्गवतीव पङ्क्तिः ।
अन्यत्र कालागरुदत्तपत्रा भक्तिर्भुवश्चन्दनकल्पितेव ॥ ५५
क्वचित्प्रभा चान्द्रमसी तमोभिश्छायाविलीनैः शबलीकृतेव ।
अन्यत्र शुभ्रा शरदभ्रलेखा रन्ध्रेष्विवालक्ष्यनभःप्रदेशा ॥ ५६
क्वचिच्च कृष्णोरगभूषणेव भस्माङ्गरागा तनुरीश्वरस्य ।
पश्यानवद्याङ्गि विभाति गङ्गा भिन्नप्रवाहा यमुनातरङ्गैः ॥ ५७ ”

[यांचा अर्थ पुढील पद्यांत मी अनुवादितों:—

“ कुठें महानीलमणिद्युतींनीं संमिश्र मुक्तामय यष्टिशीच ! ।
कोठें जणों माळ सिताम्बुजांची इंदीवरें गुंफिलिं जींत साच ! ५४ ॥
कुठें जशी श्वेत मरालराजी जियेंत कादंबविहंगसंग ! ।
भूची कुठें चंदनचित्रभा कीं जियेंत कालागरुपत्ररंग ! ॥ ५५ ॥
कोठें जणों भासत चंद्रिका ती जी मिश्रिता सावलिच्या तमांनीं ! ।
शुभ्रा कुठें शारद अभ्रलेखा रंध्रीं सजे अंबरिं नीलवर्णी ॥ ५६ ॥
आणी, कुठें नीलभुजंगभूषा भस्माढ्य कीं शंभुतनू सितांगी !
पहा शुभे ! ही प्रविभक्तरंगा गंगा विराजे यमुनातरंगीं ! ॥५७॥”]

याप्रमाणें फार बहारीनें वर्णिला आहे, तो पहावयाची संधि मला लाभली!

तसेंच त्यावळीं श्रीक्षेत्र काशी पाहून नंतर परत येतांना जबलपूर व तेथील " रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विंध्यपादे विशीर्णां भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्ग गजस्य " इ. श्लोकांत वर्णिलेली नर्मदा नदी पाहिली. तत्पूर्वी १९३५ च्या नाताळांत साहित्यसंमेलननिमित्तानें इंदूर व तेथून उज्जयिनी, महाकालेश्वर हीं मेघदूतांत वर्णिलेलीं स्थळें मीं औत्सुक्यानें अवलोकन केलीं व येतांना ओंकारमान्धाता हें क्षेत्र व तेथील गंभीरप्रवाही नर्मदा नदीही अवलोकन केली होती. १९३६ मध्यें जबलपूरचें संगमरवरी खडक व नर्मदा नदीच चिंचोळें स्वरूप व तेथें नजिक असलेले तिचे रम्य प्रपात हें पाहून झाल्यावर मीं ग्वाल्हेर पाहिलें. तसेंच तेथें कै. कविवर्य भास्करराव तांबे यांच्याकडे जाऊन त्यांच्या सहृदय भेटीच्या लाभाचा अनुपम आनंद सेवन केला. ग्वाल्हेरहून आग्रा, फत्तेपूर व नंतर दिल्ली पाहून हा प्रवास संपविला. १९४१ च्या मे महिन्यांत श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि राजेसाहेब औंध संस्थान यांचे समवेत इतर कांहीं विद्वानांसह मी व मावसबंधु कवि श्री. कात्रेशास्त्री यांनीं हिमालयांतील कांहीं सृष्टिशोभा व जम्नोत्री, गंगोत्री हीं पावनतीर्थें १ महिना हिमालयांत प्रवास करून अल्पकाल कां होईना पण प्रत्यक्ष निरीक्षण केलीं. गंगेचें हरिद्वाराचें रम्य स्वरूप, तसेंच हिमालयांतील " तस्योत्संगे प्रणयिन इव स्रस्तगंगादुकूलां "(मे. ६३) इत्यादि वर्णनाची आठवण करून देणारीं नयनमनोहर दृश्यें पाहण्याचा योग अशा प्रकारें लाभून अतिशय आनंद वाटला ! ' कैलास ', ' मानस ' व ' अलका- ' नगरी हीं वाचनांत व कल्पनेंतच आनंद देत होतीं. तथापि हिमालयाचे जे प्रदेश आम्हीं अवलोकन केले त्यांवरून त्यांच्या अनिर्वचनीय सौंदर्याची कल्पना अधिकच प्रत्ययास आली. देवदारु व सरल वृक्षांचीं वनें पाहतांना होणारा आनंदलाभ वर्णनातीत होता. मेघदूतांत ' सरलस्कन्धसंघट्टजन्मा ' असें वणव्याचें वर्णन केलें आहे. खरोखरच हिमालयांत अनेक प्रकारें असे वणवे लागत असतात. मेघाला, त्यांवर धारांचा वर्षाव करून तो अग्नि तूं शमवावा असें करुणार्द्र विवेकी यक्षानें म्हटलें आहे, तें किती योग्य आहे याची तेव्हां खात्री पटते. हिमालयांत देवदारुवृक्ष दिसले, म्हणजे रघुवंशांतला ' अमुं पुरः पश्यसि देवदारुं पुत्रीकृतोऽसौ वृषभध्वजेन ' इ. (सर्ग २)

व त्यांचीं पानें कुस्करून सुगंध घेतांना ' भित्वा सद्यः किसलय० ' इ. श्लोकांचें स्वर व शब्द कंठांत व जिव्हेवर विहार करीत विलक्षण आनंद देत! कालिदासानें हें प्रदेश केव्हां तरी पाहिले असावेत. व तेच मी आज सुदैवानें पाहात आहें व त्याच्याशीं माझें अशाप्रकारें एक समसंस्काराचें नातें जुळतें आहे ही कल्पना येऊन माझ्या मतीस एक मोठें समाधान वाटल्यास नवल नाहीं! कालिदासाच्या कुमारांत, रघूंत व मेघदूतांत उल्लेखिलेलीं तीं तीं दृश्यें आजहि मी कांहीं कल्पनेनें व कांहीं प्रत्यक्षच पाहूं शकत आहें, याची धन्यता मजसारख्यास कां बरें वाटणार नाहीं? ह्या प्रवासांतून परत येतांना हरिद्वाराहून मी व कात्रेशास्त्री यांनीं दिल्ली, आग्रा, मथुरा, ग्वाल्हेर हींहि ओझरतीं अवलोकन कलीं. माझी या बहुतेक स्थलांना ही दुसरी भेट होती. ग्वाल्हेर येथें मीं कविवर्य तांबे यांची भावोत्कटतेनें भेट घेऊन त्यांस अत्यादारानें मोगऱ्यांचा एक हार अर्पण केला. त्यांनाहि अत्यंत आनंद झाला. ते आपल्या बद्धमूल शेवटच्या दुखण्याशीं झगडून अतिशय क्षीण झाले होते. तथापि १-२ तास आम्ही सहृदय कथालाप केले व निरोप घेतांना कंठ सद्गदून उभयतांचेहि डोळे अश्रुक्लिन्न झाले!

" काले काले भवति भवतो यस्य संयोगमेत्य
स्नेहव्यक्तिश्चिरविरहजं मुञ्चतो बाष्पमुष्णम् " (मे. १२)

याची अंतःकरणास आठवण व्हावी असेच हे ३६ व ४१ सालचे माझे कविवर्यांच्या भेटीचे दोनी प्रसंग मला वाटतात! १९४१ च्या प्रवासानंतर पुढील वर्षी १९४२ एप्रिलमध्यें मी युद्धनोकरीवर बलुचिस्तानांत क्वेटा या प्रख्यात शहरीं जाण्यास कोल्हापुराहून ५-४-४२ रोजीं निघालों. तेथें जातांना अहमदाबाद, मारवार, लुनी, हैदराबाद (सिंध), सक्कर, जाकोबाबाद, सिबी अशा मार्गें मी द्रुतगतीनें क्वेट्याला ९-४-४२ ला पोचलों. या प्रदेशांतलीं अनेकविध दृश्यें पूर्वींच्या प्रवासांत पाहिलेल्या दृश्यांहून अर्थातच भिन्न होतीं.--सुपीक प्रदेश, मरुभूमींतील निर्जल प्रदेश, प्रख्यात सिंधु नदी--सक्करवरच्या भव्य पुलावरून जातांना सिंधूचे पात्राची दृष्टिपथांत येणारी विशालता इ. व पुढे रूक्ष मदानांसारखे प्रदेश व क्वेट्याच्या परिस-

रांतले खडकाळ काळेभोर वनस्पतिशून्य पर्वत इ. देखावे मनावर एक निराळा संस्कार करीत होते.

" जरी हे असती शैल भाउबंद हिमाद्रिचे,
वनश्री लाटली त्यानें; यांना केवळ फत्तर ! "

याप्रकारें त्यांचें वर्णन मीं माझे एक साक्षेपी आप्त वयोवृद्ध कवि कै. ती. सदाशिव गोपाळ ऊर्फ भाऊसाहेब श्रीखंडे यांस लिहिलेल्या (समग्र पत्र परिशिष्ट मध्यें पहावें.) एका पत्रांत केलें आहे. असें असलें तरी क्वेटा हें शहर समुद्रसपाटीपासून ५६०० फूट उंचीवर असल्याकारणानें तेथील शीतलता व फलसमृद्धि अवर्णनीय होती. उत्कृष्ट द्राक्षें, पीअर्स, पीचीस्, डाळिंबें, जरदाळू यांची तेथील विपुलता व माधुरी, व त्या काळची स्वस्ताई हीं सर्वच आम्हांस आनंददायक झालीं होतीं. प्रवासांत वाचायला उपयोगी पडतील म्हणून मीं माझ्या आवडीच्या ग्रंथांचा संभार १।२ ट्रंका भरून माझ्या सर्व संचारांत प्रायः बरोबरच बाळगिला होता. लहरीप्रमाणें व आवडीप्रमाणें यथाकाल त्यांचा प्रेमानें आस्वाद मी घेत असें. यांत मी विशेष कांहीं करीत होतों असें नव्हे! तथापि, या प्रदेशांत व इतरत्र संचार करीत असतां महाभारताचें एकादें पर्व, वाल्मीकिरामायण, भागवत, शाकुंतल, मेघदूत, आर्याभारत प्रथमभाग, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथांचें वाचन मनमुराद करण्याइतकें स्वास्थ्य मला श्रीकृपेंकरून चहूंकडे लाभलें. प्रवासांची संधि कोठें आली तर पहिल्या वर्गानेंच जायला मिळे. अर्थात् उत्कृष्ट जागा व सोई व त्यांतच आपल्या आवडीचें पुस्तक एकांतांत तन्मयतेनें वाचून विलक्षण समाधानसुख भोगणें–याला मी धन्य कां म्हणूं नये ? त्यावेळच्या एका दिवशींच्या माझ्या प्रवासाचे वर्णनांतला माझ्या दैनंदिनींतला पुढील उल्लेख येथें सांगितल्यास संपूर्ण कल्पना येईल. " रविवार ता. १४–३–४३ रात्रीं १०॥. काल रात्रीं शाकुंतलवाचनांत ३॥ पर्यंत गाडींत जागा होतों. पहिल्या दर्जाचें नितांतरमणीय नाटक, पहिल्या वर्गाचा सर्व सुखसोईचा डबा व वाचनार्थ उशालगत विजेचा दिवा असलेला त्यांतील बिछाना, दुसरें कोणीच नसल्यामुळें लाभलेला एकांत, यांमुळें नाटक समग्र वाचल्यावांचून निजलों नाहीं. सकाळीं

व त्यांचीं पानें कुस्करून सुगंध घेतांना ' भित्वा सद्यः किसलय० ' इ. श्लोकांचें स्वर व शब्द कंठांत व जिव्हेवर विहार करीत विलक्षण आनंद देत ! कालिदासानें हें प्रदेश केव्हां तरी पाहिले असावेत. व तेच मी आज सुदैवानें पाहात आहें व त्याच्याशीं माझें अशाप्रकारें एक समसंस्काराचें नातें जुळतें आहे ही कल्पना येऊन माझ्या मतीस एक मोठें समाधान वाटल्यास नवल नाहीं ! कालिदासाच्या कुमारांत, रघूंत व मेघदूतांत उल्लेखिलेलीं तीं तीं दृश्यें आजहि मी कांहीं कल्पनेनें व कांहीं प्रत्यक्षच पाहूं शकत आहें, याची धन्यता मजसारख्यास कां बरें वाटणार नाहीं ? ह्या प्रवासांतून परत येतांना हरिद्वाराहून मी व कात्रेशास्त्री यांनीं दिल्ली, आग्रा, मथुरा, ग्वाल्हेर हींहि ओझरतीं अवलोकन कलीं. माझी या बहुतेक स्थलांना ही दुसरी भेट होती. ग्वाल्हेर येथें मीं कविवर्य तांबे यांची भावोत्कटतेनें भेट घेऊन त्यांस अत्यादारानें मोगऱ्यांचा एक हार अर्पण केला. त्यांनाहि अत्यंत आनंद झाला. ते आपल्या बद्धमूल शेवटच्या दुखण्याशीं झगडून अतिशय क्षीण झाले होते. तथापि १-२ तास आम्ही सहृदय कथालाप केले व निरोप घेतांना कंठ सद्गदून उभयतांचेहि डोळे अश्रुक्लिन्न झाले !

" काले काले भवति भवतो यस्य संयोगमेत्य
स्नेहव्यक्तिश्चिरविरहजं मुञ्चतो बाष्पमुष्णम् " (मे. १२)

याची अंतःकरणास आठवण व्हावी असेच हे ३६ व ४१ सालचे माझे कविवर्यांच्या भेटीचे दोनी प्रसंग मला वाटतात ! १९४१ च्या प्रवासानंतर पुढील वर्षी १९४२ एप्रिलमध्यें मी युद्धनोकरीवर बलुचिस्तानांत क्वेटा या प्रख्यात शहरीं जाण्यास कोल्हापुराहून ५-४-४२ रोजीं निघालों. तेथें जातांना अहमदाबाद, मारवार, लुनी, हैदराबाद (सिंध), सक्कर, जाकोबाबाद, सिबी अशा मार्गें मी द्रुतगतीनें क्वेट्याला ९-४-४२ ला पोचलों. या प्रदेशांतलीं अनेकविध दृश्यें पूर्वींच्या प्रवासांत पाहिलेल्या दृश्यांहून अर्थात्च भिन्न होतीं.--सुपीक प्रदेश, मरुभूमींतील निर्जल प्रदेश, प्रख्यात सिंधु नदी—सक्करवरच्या भव्य पुलावरून जातांना सिंधूचे पात्राची दृष्टिपथांत येणारी विशालता इ. व पुढे रूक्ष मदानांसारखे प्रदेश व क्वेट्याच्या परिस-

रांतले खडकाळ काळेभोर वनस्पतिशून्य पर्वत इ. देखावे मनावर एक निराळा संस्कार करीत होते.

" जरी हे असती शैल भाउबंद हिमाद्रिचे,
वनश्री लाटली त्यानें; यांना केवळ फत्तर ! "

याप्रकारें त्यांचें वर्णन मीं माझे एक साक्षेपी आप्त वयोवृद्ध कवि कै. ती. सदाशिव गोपाळ ऊर्फ भाऊसाहेब श्रीखंडे यांस लिहिलेल्या (समग्र पत्र परिशिष्ट मध्यें पहावें.) एका पत्रांत केलें आहे. असें असलें तरी क्वेटा हें शहर समुद्रसपाटीपासून ५६०० फूट उंचीवर असल्याकारणानें तेथील शीतलता व फलसमृद्धि अवर्णनीय होती. उत्कृष्ट द्राक्षें, पीअर्स, पीचीस्, डाळिंबें, जरदाळू यांची तेथील विपुलता व माधुरी, व त्या काळची स्वस्ताई हीं सर्वच आम्हांस आनंददायक झालीं होतीं. प्रवासांत वाचायला उपयोगी पडतील म्हणून मीं माझ्या आवडीच्या ग्रंथांचा संभार १।२ ट्रंका भरून माझ्या सर्व संचारांत प्रायः बरोबरच बाळगिला होता. लहरीप्रमाणें व आवडीप्रमाणें यथाकाल त्यांचा प्रेमानें आस्वाद मी घेत असें. यांत मी विशेष कांहीं करीत होतों असें नव्हे ! तथापि, या प्रदेशांत व इतरत्र संचार करीत असतां महाभारताचें एकादें पर्व, वाल्मीकिरामायण, भागवत, शाकुंतल, मेघदूत, आर्याभारत प्रथमभाग, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथांचें वाचन मनमुराद करण्याइतकें स्वास्थ्य मला श्रीकृपेंकरून चहूंकडे लाभलें. प्रवासांची संधि कोठें आली तर पहिल्या वर्गानेंच जायला मिळे. अर्थात् उत्कृष्ट जागा व सोई व त्यांतच आपल्या आवडीचें पुस्तक एकांतांत तन्मयतेनें वाचून विलक्षण समाधानसुख भोगणें–याला मी धन्य कां म्हणूं नये ? त्यावेळच्या एका दिवशींच्या माझ्या प्रवासाचे वर्णनांतला माझ्या दैनंदिनींतला पुढील उल्लेख येथें सांगितल्यास संपूर्ण कल्पना येईल. " रविवार ता. १४–३–४३ रात्रीं १०॥. काल रात्रीं शाकुंतलवाचनांत ३॥ पर्यंत गाडींत जागा होतों. पहिल्या दर्जाचें नितांतरमणीय नाटक, पहिल्या वर्गाचा सर्व सुखसोईचा डबा व वाचनार्थ उशालगत विजेचा दिवा असलेला त्यांतील बिछाना, दुसरें कोणीच नसल्यामुळें लाभलेला एकांत, यांमुळें नाटक समग्र वाचल्यावांचून निजलों नाहीं. सकाळीं

क्वेट्टयाजवळ गाडी येतांच जागा झालों. ९ वाजले होते. " अशाच एका दीर्घ पण जलद प्रवासांत एक सैन्यतुकडी दक्षिणेंत पोचविण्यासाठीं तिच्याबरोबर लष्करी स्पेशलट्रेननें बलुचिस्तानांतील लॉरेलायहून दिल्ली, नागपूरमार्गें मला सालेम नजिक अत्तूर गांवीं यावें लागलें व माझें काम आटोपतांच मी मुद्दाम थोडी रजा घेऊन त्रिचनापल्ली, श्रीरंगम् व श्रीक्षेत्र रामेश्वर हीं सुंदरस्थळें पाहिलीं व परत येतांना म्हैसूर व कृष्णराजसागरचा रम्य देखावा अवलोकन केला. (ता. २७–३–४३ ते ११–४–१९४३)

अशा प्रकारच्या अनेकविध मनोहर तशाच क्वचित् युद्धचिंतामय परिस्थितींत मणिपूर, कोमिल्ला, चितागांग, इत्यादि स्थळीं १९४४ चा पूर्वार्ध घालविल्यानंतर चितागांगला मला विषमज्वराचा ताप येऊन कांहीं दिवसांनीं तापाचा मान कमी होऊं लागल्यावर एका हॉस्पिटलशिपनें मला समुद्रमार्गें चितागांगहून कलकत्त्यास आणण्यांत आलें. तेथून अँम्ब्युलन्स ट्रेननें विजगापट्टण, बेझवाडा मार्गें, मी सिकंदराबाद नजिक 'त्रिमुलगिरीं'त ब्रिटिश मिलिटरी हॉस्पिटलच्या ऑफिसर्स वॉर्डांत आणिला गेलों. या प्रवासखंडांत मणिपूरहून कोमिल्ल्यास येतांना (ता. १३-४-४४) विमानोड्डाणाचाहि १॥–२ तास अनुभव नव्यानेंच घडला ! खरोखरच त्यावेळीं अंतराळांतून संचार करतांना आमचें विमान मेघांतूनच चाललें होतें व " स्तन इव भुवः " असें दिसणारे कित्येक डोंगर मेघदूतांतील त्या श्लोकाची स्मृति करून देत होते; तर ढगांचें वातावरण रघुवंशांतल्या १३ व्या सर्गांतल्या पुष्पक विमानांतून श्रीरामसीता यांना दिसणाऱ्या दृश्यांचें वर्णन असलेल्या कित्येक मनोरम श्लोकांचें मार्मिक सौंदर्य पटवीत होतें. [करेण वातायनलम्बितेन स्पृष्टस्त्वया चण्डि कुतूहलिन्या । आमुञ्चतीवाभरणं द्वितीयमुद्भिन्नविद्युद्वलयो घनस्ते ॥ —किंवा, ' क्वचित्पथा संचरते सुराणां क्वचिद्घनानां पततां क्वचिच्च ' इ. इ.]

सिकंदराबादजवळ 'त्रिमुलगिरी' च्या रुग्णालयांत सुमारें १। महिना मला घालवावा लागला. ' रामगिरी' च्या आश्रमांतील यक्षाप्रमाणेंच जवळ जवळ मी काळ कंठीत होतों ! प्रकृति बरी होऊं लागल्यामुळें एक प्रकारचें स्वास्थ्य व हॉस्पिट्लमधील भरपूर विश्रांति यांमुळें फार दिवस मनांत

वागविलेल्या, मेघदूतानुवाद करण्याच्या संकल्पास मूर्तस्वरूप देण्यास मीं तेथेंच आरंभ केला व ' मंदं मंदं ' मार्ग क्रमीत पुणें, फलटण, नाशिक व मुंबई याप्रमाणें रजेंत व नोकरींत स्थलांतरें अनुभवीत सुमारें ११ महिन्यांनीं ' सुश्लोकमेघ ' माझ्या संकल्पाप्रमाणें श्रीकृपें तडीस गेला. तथापि त्यानंतरहि आत्तांपर्यंत त्यांत सौष्ठवदृष्ट्या अनेकदां पर्यालोचन करून प्रसन्नतेंत व अर्थवाहकतेंत भर घालण्याचा परिपाठ चालूंच ठेवला. अनेक टीका अवलोकन केल्या. अनेक विद्वज्जनांशीं संधि मिळेल तेव्हां चर्चा केली. श्रीमद्वाल्मीकि व कालिदास यांच्या कल्पनासादृश्यांचे धागेदोरे शोधण्याचाहि यथामति प्रयत्न अत्यंत आवडीनें केला. दोन्हींतहि अप्रतिम रसाळपणा. अर्थात्च त्या त्या ग्रंथांचें वाचन हृदयास अपरिमित आनंद देणारें असेंच झालें असल्यास नवल कसलें!

मेघदूतावर सुमारें ५० टीका संस्कृत वाङ्मयांत उपलब्ध वा उल्लेखिलेल्या आहेत. मला अत्यंत हृदयंगम वाटलेली टीका म्हणजे ' पूर्णसरस्वती 'कृत ' विद्युल्लता ' टीका होय. या टीकेचा अभ्यास व प्रसार विश्वविद्यालयांतून अधिक व्हायला हवा. या टीकाकाराचें कालिदासाच्या कृतीवर इतकें अलोट प्रेम दिसतें कीं कालिदासाचें वर्णन करण्यास त्यास पुरेशी शब्दसंपत्तीहि दुर्मिळ झाल्यासारखी दिसते आणि हें योग्यच होय! कालिदासाचें वर्णन करतांना विद्युल्लताकारानें जी गुणगौरवाची शब्दरचना योजिलेली आहे, ती वाचून एका अद्वितीय श्रेष्ठ कवीचें दुसऱ्या श्रेष्ठ सहृदयानें केलेलें काव्यपूर्ण परीक्षण पाहण्याचा मनोज्ञ लाभ वाचकास घडतो. उदाहरणार्थः—

आपल्या तेजस्वी विद्युल्लतेंत पूर्णसरस्वतीनें कालिदासाचें वर्णन खालीलप्रमाणें केलें आहे—(मेघसंदेश, श्रीवाणीविलास प्रकाशित)

" सकलविबुधमहितयशाः कविकुलपरमेश्वरः " इ. (पृ. २)

" कविकुलचकोरचंद्रेण युक्तं " इ. (पृ. १७)

" रससुधार्णवकर्णधारेण कवींद्रेण स्वातंत्र्येण प्रकाशनात्" इ. (पृ. ९९)

" रसिकजनचातकालिकालमेघः कालिदासः " इ. (पृ. १७२)

" रामायणरसायनपरायणेन च कवींद्रेण तदर्थचमत्कारतत्परतया तदर्थ-

च्छायायोनिरथाऽस्मिन्पद्ये निवेशितः–स यथा ‘ हिमहतनलिनीव नष्टशोभा व्यसनपरंपरया निपीडयमाना । सहचररहितव चक्रवाकी जनकसुता कृपणां दशां प्रपन्ना ॥ ’ इति ” (पृ. १२५–१२६)

पूर्णसरस्वतीनें पाठचिकित्सापूर्वक विशिष्ट पाठ स्वीकारलेले आहेत. तसेंच निरनिराळ्या श्लोकांतील सूचक अर्थाचें त्यानें केलेलें विवरण रसिकास आश्चर्यकारक वाटल्यावांचून राहणार नाहीं. कालिदासीय शब्दांचें, वर्णनांचें औचित्य विद्युल्लतेंत वारंवार मार्मिकतेनें विशद करण्यांत आलें आहे. पूर्वमेघ, उत्तरमेघ यांची संगति व इतरहि अनेक शब्दार्थांचें त्यानें केलेलें विवेचन सहृदयानंददायक झालें आहे. इतर कोणत्याहि टीकाकारांत इतकी उत्कट व उच्च रसिकता निदर्शनास येऊं शकत नाहीं. या टीकेसंबंधीं पूना ओरिएंटॅलिस्टमध्यें कांहीं मार्मिक लेख प्रो. गोरे यांनीं लिहिले आहेत. मला प्रथमतः या टीकेची माहिती माझे विद्वान् मित्र श्री. ग. व्यं. जोशी, आचार्य, भारतीय विद्याभवन यांचेकडून झाली. व पुस्तक मिळवून वाचतांच विलक्षण आनंद वाटला.

पूर्णसरस्वतीची ‘ विद्युल्लता ’ टीका किती चमकदार व सरस आहे हें दाखविण्यासाठीं येथें त्याच्या टीकेंतील कांहीं वेंचक उतारे देणें अप्रस्तुत होणार नाहीं. उदाहरणार्थ—

‘ तां कस्यांचिद्भवनवलभौ० ’ इ. श्लो. ३८ वरील टीकेंतला पुढील उतारा पहा. ‘ सूर्ये दृष्टे० ’ पुनः सूर्य उगवल्यावर याचा अर्थ नुसतें उजेडल्यावर नव्हे–तर ‘ अनेन तरुणकिरणकवलिततमसि गगनसरणिमशिशिरमहसि समुपसरति सति दिवसमुखावितललिलतविविधचरितमधिकरुचिरमवनिपनगरं तदतिकुतुकमनुभूयैव गन्तव्यमिति द्योत्यते ’ अशाप्रकारच्या ललितमधुरलघुपद वचनसुमनयुत शब्दांनीं त्यानें आपला आशय गमतीनें व्यक्तविला आहे ! आशय हा कीं, सकाळीं ‘ सूर्यकिरणांनीं राजधानीचे विविध व्यवहार व व्यापार सुंदरतेनें तुला अवलोकन करतां येतील इ. इ. ’ (पृ. ५८)

तसेंच ‘ इत्याख्याते पवनतनयं मैथिलीवोन्मुखी सा ’ इ. श्लोकांतला भाव पूर्णसरस्वतीनें पुढीलप्रमाणें प्रकट केला आहेः—“ मैथिलीव वीक्ष्ये-

त्यनेन यथा देवी सीता वातात्मजं हर्षविस्मयस्नेहबहुमानविश्वासोत्कण्ठाशबलितहृदयमवलोकितवती, तथा त्वां मद्गेहिनीति व्यज्यते। उपमानेन दुष्करकार्यशक्तत्वं, मित्रकार्येष्वनिर्वेदः, बन्धुजनानुरागः, विशुद्धशास्त्रोद्भासितप्रतिभाप्रसरत्वम्, विजितेन्द्रियत्वं च मेघस्य, निजचरित्रनिष्कलङ्कत्वम्, महाभिजनत्वं, स्त्रीरत्नत्वं च नायिकायाः प्रकाश्यतें।" मैथिली हनुमंताला जशी आनंद, विस्मय, प्रीति, बहुमान, विश्वास, औत्सुक्य इ. वृत्तींनीं भरलेल्या मनानें पाहती झाली, त्याप्रमाणें हे मेघा! तुला माझी पत्नीहि पाहील. या उपमेनें अनेक गुण दाखविले गेले—अवघड कार्य करण्याची शक्तिमत्ता, मित्रकार्यें करण्याचा उत्साह, मित्रबान्धवांवर प्रीति, उत्कृष्ट विमल विद्यासंपादनानें उज्ज्वल प्रतिभायुक्तत्व, आणि जितेन्द्रियत्व हे मेघाचे गुण, त्याचप्रमाणें स्वतःचें निष्कलङ्क चारित्र्य व मोठें अभिजात सद्गुणशालित्व, व नायिकेचें स्त्रीरत्नत्व—अशाप्रकारचे अनेक अर्थध्वनि लोलकांच्या प्रकाशाप्रमाणें या श्लोकांतल्या असामान्य शब्दयोजनेनें व्यक्त केले गेले आहेत असें विद्युल्लताकारांनीं उत्तमपणें व पटण्यासारखें दर्शविलें आहे! (पृ. १४८)

मेघदूताच्या अभ्यासानें कोणता लाभ संपादन करायचा? याविषयीं प्रथम श्लोकाच्या टीकेंत विद्युल्लताकार लिहितात—"उच्यते। अत्र तावन्मृदुलसरलचेतसां व्युत्पाद्यानामक्लेशेनैव विशिष्टशब्दार्थव्युत्पत्तिः, तत्तद्देशविशेषव्यवहारवेदनम्, पुण्यतीर्थदेवतायतनादिसंकीर्तनेन दुरितक्षयः, कीतरलघीयसी, राजादिवल्लभतया द्रविणसंपत्तिः, कामसूत्रादिविद्यासु गीतादिकलासु च कौशलम्, संभोगविप्रलम्भरूपशृङ्गारसागरकर्णधारत्वम्, पतिव्रताधर्मपरिज्ञानम्, सहृदय इति सदसि सत्कृतिः, मन्दीकृतपरब्रह्मानन्दसंदोहश्च रसास्वाद इत्यादीनि परःशतं प्रयोजनानि।" [सारांश, 'सांगतां येईल कीं, सहजपणें शब्दार्थज्ञान, त्या त्या देशाचे विशेष व्यवहार माहीत होणें, पवित्र तीर्थ देवालयें इत्यादींच्या संकीर्तनानें पापक्षय होणें, मोठी कीर्ति लाभणें, राजादिकांच्या प्रियतेमुळें द्रव्यसंपादन घडणें, कामसूत्रें, विद्या, कला, संगीतादिमध्यें नैपुण्य मिळविणें, संभोगविप्रलंभस्वरूप शृंगारसागराचें पूर्ण ज्ञान होणें, पतिव्रताधर्म म्हणजे काय याचा बोध होणें, विद्वत्समूहांत सहृदय रसिक अशी ख्याति व मान प्राप्त होणें, व प्रत्यक्ष ब्रह्मानंदहि ज्यापुढें फिका वाटावा

अशा रसाचा आस्वादलाभ घडणें इ. शकडों प्रकारचे लाभ या काव्यापासून होऊं शकतील ! '] विद्युल्लता कशी प्रतिभासंपन्न आहे तें दाखविण्यास वरील विवेचन पुरेंसें आहे.

विद्युल्लता टीकेप्रमाणेंच प्राचीन व चांगली टीका 'सुमनोरमणी' नांवाची अलीकडे त्रिवेंद्रम येथील त्रावणकोर युनिव्हर्सिटीच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध केली गेली आहे. जुन्या हस्तलिखितांचा अधिकाधिक लाभ व अभ्यास होत जाईल तसतशा मेघदूताच्या आणखीहि कित्येक संस्कृत वा इतर टीका उपलब्ध व्हावयाचा संभव आहे, असें या नवीन उपलब्ध ' सुमनोरमणी ' वरून वाटतें. वे. शा. सं. खुपेरकरशास्त्री यांचेकडूनहि मला एक संस्कृत टीका हस्तलिखितांत नुकतीच पहावयास मिळाली. तीहि अद्यापि अप्रसिद्ध आहे. तिचा काल शके १४८४ आहे. टीकाकाराचें नांव समजूं शकलें नाहीं. या टीकेंत सोपेपणा विशेष दिसतो व अलंकार बहुतेक श्लोकांतले निर्दिष्ट केलेले आहेत. असो.

मेघदूतांत मेघास सांगितलेला मार्ग स्थलदृष्ट्या स्थूलपणें असा आहे.—

' रामगिरि '—हल्लीं ' रामटेक ' नांवानें प्रसिद्ध असलेलें नागपूरच्या, उत्तरेकडचें, नजिकचें एक पर्वत–स्थान.

' माल ' व ' आम्रकूट ' (अमरकंटक पर्वत)

' विंध्य ' पादे विशीर्णा अशी ' रेवा '—' नर्मदा ' नदी

' दशार्ण '— माळव्याचा पूर्व भाग ज्यांत ' वेत्रवती ' नदी आहे.

' विदिशा '—हल्लींचें ' भिलसा ' ठिकाण.

' नीचैः '— नांवाचा डोंगर ' विदिशा ' नगरीजवळ असलेला.

' वननदी '—अरण्यांतल्या नद्या अगर ' विंध्याद्रींतून ' निघणारी एक विशिष्ट नदी.

' उज्जयिनी '—हल्लींचें ' उज्जैन '. प्राचीन अवंतीदेशाची राजधानी. हिलाच ' विशाला ', ' अवंतिका ' ' अवंती ' वा ' पुष्पकरण्डिनी ' हींही नांवें आहेत. कालिदासाचा आश्रयदाता जो विक्रमादित्य राजा, त्याची ही राजधानी फार इतिहासप्रसिद्ध गणली जाते.

‘ निर्विंध्या ’—‘ पार्वती ’ नामक एक लहान नदी.—विंध्यपर्वतांतून निघालेली.

‘ महाकाल ’—‘ उज्जैन ’ मधील प्रख्यात शिवमंदिरस्थान द्वादशज्योतिर्लिंगांपैकीं एक.

‘ शिप्रा ’ नदी (क्षिप्रा) हिच्या कांठावर ‘ उज्जैन ’ शहर आहे.

‘ गंभीरा ’—माळव्यांतील एक लहान नदी.

‘ देवगिरि ’— माळव्यांतला मध्यवर्ती एक डोंगर.

‘ चर्मण्वती ’—‘ चंबळा ’ नदी. दशपूर ’ चा राजा ‘ रंतिदेव ’ यानें अनेक गोयज्ञ करून ही नदी निर्माण केली. पश्चिम माळव्यांतील नदी ‘ शिवना ’ हिच्या कांठीं ‘ दशोर ’ नामक गांव आहे तेंच या देशाची राजधानी असावें.

‘ ब्रह्मावर्त ’—‘ हस्तिनापुर ’ च्या वायव्येस हें एक पवित्र स्थान आहे. ‘ सरस्वती ’ व ‘ दृषद्वती ’ या २ नद्यांच्या दरम्यानचा हा प्रदेश मनुस्मृतींत वर्णिला आहे. हा कुरुक्षेत्रानिकटचा प्रदेश होय.

‘ सरस्वती ’ नदी—कुरुक्षेत्रांतली एक नदी. हिमालयांतून निघते व वालुकामय प्रदेशांत पुढें गुप्त होते.

‘ कनखल ’—हरिद्वारशेजारील क्षेत्र.

‘ जह्नोः कन्या ’—गंगानदी, जाह्नवी.

‘ चरणन्यास ’—श्रीशंकराचे पायाचा ठसा; “ हरकी पायरी ” नांवाचें ठिकाण. हरिद्वारच्या गंगाप्रवाहांतीलच तीराजवळचा हा भाग आहे.

‘ क्रौञ्चरंध्र ’— परशुरामाच्या बाणानें दुभंगलेलें हिमालयाचें चिंचोळें ठिकाण—ज्यांतून पलीकडे कैलासाकडे मार्ग आहे.

‘ कैलास ’—सदैव बर्फाच्छादित असलेला हिमालयांतला सुविख्यात शुभ्र पर्वत.

‘ अलका ’—कुबेराची राजधानी, पुराणप्रसिद्ध यक्षनगरी.

‘ मानस ’ सरोवर— ‘ कैलासा ’नजीकचें सुविख्यात रमणीय सरोवर.

या स्थलांचें निर्देश मेघदूतांत आलेले कांहीं प्रत्यक्ष व कांहीं कल्पनेनें निश्चित करतां येतात. रघुवंशाच्या १३ व्या सर्गांत श्रीरामसीता पुष्पक विमानांतून लंकेहून अयोध्येकडे येतांना भरतवर्षाच्या दक्षिणविभागांतील दृश्यें व स्थळें आमच्या कविराजतिलकानें कांहीं कांहीं वर्णन केलीं. मेघदूतांत भारताच्या मध्यापासून उत्तरेच्या कैलासापर्यंत आढळणाऱ्या दृश्यांचें वर्णन प्रसंगोपात्त जाणून कालिदासानें केलें आहे. रघूच्या दिग्विजयप्रसंगवर्णनाचे निमित्तानें आमच्या महाकवीनें भरतखंडाच्या बहुतेक सर्व भागांचें व मर्यादांचें कमीअधिक सूक्ष्म, मार्मिक, व काव्यात्मक वर्णन केलेलं सुप्रसिद्धच आहे.(रघु. सर्ग ४) एकूण अखिल आर्यभूमीचें नितांत सुंदर दृश्य शक्य तितक्या वैशिष्ट्यपूर्ण काव्यमय वाणीनें आमच्या सर्वश्रेष्ठ महाकवीनें उज्ज्वलतेनें व आवडीनें गाइलें आहे हें पाहून सानंद अभिमान वाटतो. अशाप्रकारें विपुल सौंदर्यदृष्टीनें, व प्रचंड प्रतिभेनें कालिदासानें जणू काय अनेक स्वराष्ट्रगीतेंच गाइलीं असें म्हणणेंच उचित होईल!

मेघदूतकाव्यांतील कांहीं कल्पना व रम्य वर्णनें यांचा उगम वाल्मीकिरामायणांत कसाकसा निदर्शनास येतो हें पाहिलें म्हणजे वाल्मीकिच्या असामान्य कृतीवर कालिदासाचें केवढें अलोट प्रेम असलें पाहिजे, व होतें तें दिसून येईल. इतरहि अनेक स्थलीं (श्रीमद्योगवासिष्ठ—श्रीमद्भागवत इ.) मेघदूतांतील कल्पनासादृश्यें, रचनासादृश्यें इ. कशीं आढळतात तेंहि पाहणें अस्थानीं होणार नाहीं. कालिदासाच्या उज्ज्वल श्रेष्ठ प्रतिभेस अशा निदर्शनांनीं कोणतेच गौणत्व येऊं शकत नाहीं. फक्त समान कल्पना रचना कशा आढळतात त्यांत काय फरक केले गेले आहेत, इत्यादिंचा निर्देश कुतूहलजनक व उद्बोधक होईल म्हणून येथें थोडक्यांत चिकित्सक रसिकांसाठीं करायचा आहे.

मेघदूत व श्रीमद्वाल्मीकिरामायण यांतील कांहीं साम्यस्थळें

[दोनींतील समक्रमांक उतारे तोलणें.]

मेघदूत

(१) मेघास 'स्निग्धभिन्नाञ्जनाभ' असें वर्णिलें आहे. (श्लोक५८)

(२) मार्गांत आढळणाऱ्या शैलांवर विश्रांति घेत घेत मेघानें

मार्गक्रमण करणें. (श्लोक १३, २५, २२, ५२)

(३) मेघावली व बलाका यांचें साहचर्य. (श्लोक ९)

(४) मेघदर्शनानें मयूरांचें हृष्टतेनें नृत्य. (श्लो. ३२, ४४, ८१)

(५) मेघदर्शनानें उत्कंठा वाढणें. * (श्लोक ३)

(६) पिकलेल्या जांभळांनीं झाडांना, वनांना नीलत्व येणें. (मेघदूत श्लोक २३)

(७) मेघदूतांतील नद्या व वापी यांचीं वर्णनें. (श्लोक ४०, ४१, २८, ७८)

(८) पहाटेचा नदीवरून वाहणारा वारा. (श्लोक ३१)

(९) अलका नगरीचें 'मुक्ताजालग्रथितमलकं' अशा प्रकारचें वर्णन (श्लोक ६३)

(१०) यक्ष म्हणतो 'प्रियेस स्पर्श करून आलेले वारे तरी मला आलिंगायला लाभोत !' (श्लोक १०९)

(११) यक्षपत्नीची वर्णिलेली विरहस्थिति. (श्लोक ८५, ८६, ९४, ९०)

(१२) विरहिणीची स्थिति व भाविसंगमद्योतक शुभचिन्हें. (श्लोक ९७, ९८, ६३)

(१३) यक्ष आपली पराधीनता धिक्कारितो. (श्लोक ८)

(१४) प्रथम क्षेम विचारणें हेंच संदेशकार्य. (श्लोक १०३)

(१५) स्वप्नांत किंवा चित्रांत तरी संगम व्हावा अशी इच्छा यक्ष व यक्षपत्नी यांची असतेच. (श्लोक ९३, १०७)

(१६) मेघा, विरहिणीस कसें बोलावेंस ? 'वक्तुं धीरः स्तनितवचनै-र्मानिनीं प्रक्रमेथाः' (श्लो. १००)

(१७) यक्ष स्वतःची स्थिति सांगतो. "संकल्पैस्तैर्विशति विधिना वैरिणा रुद्धमार्गः". (श्लो. १०४)

---

* टीपः—तुल्य कल्पना, भर्तृहरि शृंगारशतक श्लोक ९१ पहा.—
वियदुपचितमेघं भूमयः कन्दलिन्यो नवकुटजकदम्बामोदिनो गन्धवाहाः ।
शिखिकुलकलकेकारावरम्या वनान्ताः सुखिनमसुखिनं वा सर्वमुत्कण्ठयन्ति ॥

(१८) एकवेणी यक्षपत्नीचें वर्णन—(श्लो. ९४)

(१९) "संक्षिप्येत क्षणइव कथं दीर्घयामा त्रियामा" मे. ११०
"नीता रात्रिः क्षण इव मयासार्धमिच्छारतैर्या" मे. ९१

(२०) यक्षवापीवर्णन. 'वापी चास्मिन्.' (श्लोक ७८)

(२१) गिरीवरून स्रवणाऱ्या नदीचें वर्णन (मे. श्लोक ६३)

(२२) यक्षपत्नीचें वर्णन. (श्लो. ८५, ८६, ९१, ९३, ९५)

(२३) तिला पाहून तूंहि दुःखित होशील असें यक्ष मेघास सांगतो. (श्लोक ९५)

(२४) मेघदूतांतील मेघस्वभाववर्णन. 'संतप्तानां त्वमसि शरणं' श्लोक ७, तसेंच श्लोक १०, १६, व १७

(२५) मेघानें घनीभूत होऊन पायऱ्या बनणें. (श्लोक ६०)

(२६) वर्षाकालारंभीं प्रवासी घरीं परतणें. (श्लोक ८)

(२७) यक्षपत्नीचें वर्णन 'तन्वी श्यामा... सृष्टिराद्येव धातुः' (श्लो. ८४)

(२८) 'कान्तोदन्तः सुहृदुपनतः संगमात्किंचिदूनः (मे. १०२)

(२९) प्रियेस शंका येईल कीं वियोगानें नाथांचें प्रेम तर नष्ट झालें नसेल! पण यक्ष त्या शंकेचें निराकरण सामान्य सिद्धान्तानें करतो. "स्नेहानाहुः किमपि विरहे ध्वंसिनस्ते त्वभोगादिष्टे वस्तुन्युपचितरसाः प्रेमराशीभवन्ति" (मे.११४) तुल्य कल्पना–मोरोपंत आदिपर्व अध्याय२१
आर्यक नाग प्रेमें भेटे भीमासि, कीं कळे नातें ।
आर्यांचें दूरत्वें, नसतां सहवासही मळेना तें ॥ २४ ॥

(३०) मे. श्लोक १०८ स्वप्नांत प्रियेस गाढ आलिंगन देण्यासाठीं मी हात पसरतों. इ.

(३१) 'कान्तोदन्तः' इ. (मे. १०२) व अभिज्ञानदान (श्लो. ११३–११४)

(३२) उलट क्षेमसंदेश आणून माझ्या जीवितला तजेला आण 'प्रातःकुन्दप्रसवशिथिलं जीवितं धारयेथाः।' (मे. ११५)

(१३) विश्रान्ति घेऊन मेघा ! पुढें गमन कर. (मे. २६ वा १८)
श्रीमद्वाल्मीकिरामायण–

[उल्लेख क्रमवार वर दिलेल्या मेघदूतांतल्या स्थलांशीं तोलणें.]

(१) गिरिशृङ्गमिदं तात पश्य चोत्तरतः शुभम् ।
भिन्नाञ्जनचयाकारमंभोदरमिवोदितम् (किष्किन्धाकाण्ड २७–१४)

(२) समुद्वहन्तः सलिलातिभारं बलाकिनो वारिधरा नदन्तः !
महत्सु शृङ्गेषु महीधराणां विश्रम्य विश्रम्य पुनः प्रयान्ति ॥ २८।२२

(३) वरील श्लोक; तसेंच—
स तया शुशुभे श्रीमाँल्लतया कण्ठसक्तया ।
मालयेव बलाकानां ससंध्य इव तोयदः । १२–४१
मेघाभिकामा परिसंपतन्ती संमोदिता भाति **बलाकपङ्क्तिः** ।
वातावधूता वरपौण्डरीकी **लम्बेव माला** रुचिराम्बरस्य ॥ २८-२३
निद्रा शनैः केशवमभ्युपैति द्रुतं नदी सागरमभ्युपैति ।
हृष्टा बलाका घनमभ्युपैति कान्ता सकामा प्रियमभ्युपैति ॥ २८-२५

(४) ' जाता वनान्ता शिखिसुप्रनृत्ताः ' इ. २८–२६

(५) वहन्ति **वर्षन्ति** नदन्ति भान्ति ध्यायन्ति **नृत्यन्ति** समाश्वसन्ति
नद्यो **घना** मत्तगजा वनान्ताः **प्रियाविहीनाः शिखिनः प्लवङ्गमाः**
कच्चिद्बाष्पाभिसंरुद्धान्वर्षागमसमुत्सुकान् । २८–२७
कुटजान्पश्य सौमित्रे पुष्पितान्गिरिसानुषु ॥
मम शोकाभिभूतस्य कामसंदीपनान्स्थितान् ॥ २८–१४

(६) अङ्गारचूर्णोत्करसंनिकाशैः फलैः सुपर्याप्तरसैः समृद्धैः ।
जम्बूद्रुमाणां प्रविभान्ति शाखा निपीयमाना इव षट्पदौघैः ॥

(७) तीरजैः शोभिता भाति नानारूपैस्ततस्ततः !
वसनाभरणोपेता प्रमदेवाभ्यलंकृता ॥ २८.१९ ।
दर्शयन्ति शरन्नद्यः पुलिनानि शनैः शनैः ।
नवसंगमसव्रीडा जघनानीव योषितः ॥ ३०–५८
मीनोपसंदर्शितमेखलानां नदीवधूनां गतयोऽद्य मन्दाः

क्रान्तोपभुक्तालसगामिनीनां प्रभातकालेष्विव कामिनीनाम् ।। ३०—५४
प्रकीर्णहंसाकुलमेखलानां प्रबुद्धपद्मोत्पलमालिनीनाम् ।
वाप्युत्तमानामधिकाद्य लक्ष्मीर्वराङ्गनानामिव भूषितानाम् ।। ३०—४९

(८) वेणुस्वरव्यञ्जिततूर्यमिश्रः प्रत्यूषकालेऽनिलसंप्रवृत्तः ।
संमूर्च्छितो गह्वरगोवृषाणामन्योन्यमापूरयतीव शब्दः ।। ३०—५०

(९) शीघ्रं प्रवेगा विपुलाः प्रपाता निर्धौतशृङ्गोपतला गिरीणाम् ।
मुक्ताकलापप्रतिमाः पतन्तो महागुहोत्संगतलैर्ध्रियन्ते ।। २८—५०
सुरतामर्दविच्छिन्नाः स्वर्गस्त्रीहारमौक्तिकाः ।
पतन्ति चातुला दिक्षु तोयधाराः समन्ततः ।। २८—५१ ।।

(१०) वाहि वात यतः कान्ता तां स्पृष्ट्वा मामपि स्पृश ।
त्वयि मे गात्रसंस्पर्शश्चन्द्रे दृष्टिसमागमः ।। युद्धकाण्ड ५—६

(११) मेघरेखापरिवृता चन्द्ररेखेव निष्प्रभा । सुंदरकाण्ड ५९—२२
राक्षसीभिर्विरूपाभिर्दृष्टा हि प्रमदावने ।
एकवेणीधरा दीना भर्तृचिन्तापरायणा ।। ५९—२६
अधःशय्या विवर्णाङ्गी पद्मिनीव हिमोदये ।। ५९—२७
सा प्रकृत्यैव तन्वङ्गी तद्वियोगाच्च कर्षिता ।
प्रतिपत्पाठशीलस्य विद्येव तनुतां गता ।। ५९—३१
अनन्यदेवत्वमियं क्षमा च भूमौ च शय्या नियमश्च धर्मे ।
पतिव्रतात्वं विफलं ममेदं कृतं कृतघ्नेष्विव मानुषाणाम् ।। २८-१२
सुंदरकांडाचा २९ वा सर्वच सर्ग

(१२) तथागतां तां व्यथितामनिन्दितां व्यतीतहर्षां परिदीनमानसाम् ।
शुभां निमित्तानि शुभानि भेजिरे नरं श्रिया जुष्टमिवोपसेविनः २९-१
तस्याः शुभं वाममरालपक्ष्मराज्यावृतं कृष्णविशालशुक्लम् ।
प्रास्पन्दतैकं नयनं सुकेश्या मीनाहतं पद्ममिवाभिताम्रम् ।। २९-२
गजेन्द्रहस्तप्रतिमश्च पीनस्तयोर्द्वयोः संहतयोस्तु जातः ।
प्रस्पन्दमानः पुनरूरुरस्या रामं पुरस्तात्स्थितमाचचक्षे ।। २९-४
शुभं पुनर्हेमसमानवर्णमीषद्रजोध्वस्तमिवातुलाक्ष्याः ।
वासः स्थितायाः शिखराग्रदन्त्याः किंचित्परिस्रंसत चारुगात्र्याः ।। ५

(१३) धिगस्तु खलु मानुष्यं धिगस्तु परवश्यताम् ।
न शक्यं तत्परित्यक्तुमात्मच्छन्देन जीवितम् ॥ सुं. २५–२०

(१४) अहं रामस्य संदेशाद्देवि दूतस्तवागतः ।
स त्वां दाशरथी रामो देवि कौशलमब्रवीत् ॥ सुं. ३४–२
यो ब्राह्ममस्त्रं वेदांश्च वेद वेदविदां वरः ।
स त्वां दाशरथी रामो देवि कौशलमब्रवीत् ॥ ३

(१५) स्वप्नेऽपि यद्यहं वीरं राघवं सहलक्ष्मणम् ।
पश्येयं नावसीदेयं स्वप्नोऽपि मम मत्सरी ॥ सुं. २१

(१६) सीताया निश्चितं बुद्ध्वा हनूमान्मारुतात्मजः ।
श्रोत्रानुकूलैर्वचनैस्तदा तां संप्रहर्षयन् ॥ सुं. २७
सत्यवादी मधुरवाग्देवो वाचस्पतिर्यथा ॥ २९
तेनाहं प्रेषितो दूतस्त्वत्सकाशमिहागतः । ३३
त्वाद्वियोगेन दुःखार्तः स त्वां कौशलमब्रवीत् ॥ ३४
लक्ष्मणश्च महातेजाः सुमित्रानन्दवर्धनः ।
अभिवाद्य महाबाहुः स त्वां कौशलमब्रवीत् ॥ ३५
रामस्य च सखा देवि सुग्रीवो नाम वानरः ।
राजा वानरमुख्यानां स त्वां कौशलमब्रवीत् ॥ ३६
स्वप्नो हि नायं न हि मेऽस्ति निद्रा शोकेन दुःखेन च पीडितायाः
सुखं हि मे नास्ति यतो विहीना तेनेन्दुपूर्णप्रतिमाननेन ३२–१०
इमामसितकेशान्तां शतपत्रनिभेक्षणाम् ।
सुखार्हां दुःखितां ज्ञात्वा ममापि व्यथितं मनः ॥ सुंदरकांड १६-२८
संवृतां मृगशावाक्षीं ददर्श हनुमान् कपिः । १७–२६
तां दृष्ट्वा हनुमान् सीतां मृगशावनिभेक्षणाम्
मृगकन्यामिव त्रस्तां वीक्षमाणां समन्ततः ॥ २८
दहन्तीमिव निःश्वासैर्वृक्षान्पल्लवधारिणः ॥
संघातमिव शोकानां दुःखस्योर्मिमिवोत्थिताम् २९
सीतेची स्थिति (सुंदरकांड

(१७) समीपं राजसिंहस्य रामस्य विदितात्मनः ।
संकल्पहयसंयुक्तैर्यान्तीमिव मनोरथैः ॥ सुं. ७-१९

(१८) एकया दीर्घया वेण्या शोभमानामयत्नतः ।
नीलया नीरदापाये वनराज्या महीमिव ॥ १९-१९
नीलनागाभया वेण्या जघनं गतयैकया ॥ १५-२५

(१९) मन्ये दीर्घा भविष्यन्ति रात्रयो मम जाग्रतः ।

(२०) स तत्र मणिभूमीश्च राजतीश्च मनोरमाः । १४-२१
महार्हैर्मणिसोपानैरुपपन्नास्ततस्ततः ॥ २२
मुक्ताप्रवालसिकतास्फटिकान्तरकुट्टिमाः । २३
बुद्धपद्मोत्पलवनाश्चक्रवाकोपशोभिताः ॥
नत्यूहरुतसंघुष्टा हंससारसनादिताः ॥ २४
कान्चनोत्पलपद्माभिर्वापीभिरुपशोभिताम् १५-४

(२१) ददर्श च नगात्तस्मान्नदीं निपतितां कपिः ।
अङ्कादिव समुत्पत्य प्रियस्य पतितां प्रियाम् ॥ १४-२९

(२२) ततो मलिनसंवीतां राक्षसीभिः समावृताम् । सुं. १५-१८
उपवासकृशां दीनां निःश्वसन्तीं पुनः पुनः ॥
ददर्श शुक्लपक्षादौ चन्द्ररेखामिवामलाम् । १९
पीतेनैकेन संवीतां क्लिष्टेनोत्तमवाससा ॥
सपङ्कामनलङ्कारां विपद्मामिव पद्मिनीम् । २१
अश्रुपूर्णमुखीं दीनां कृशामनशनेन च ॥
शोकध्यानपरां दीनां नित्यं दुःखपरायणाम् । २३
तां नीलकण्ठीं बिम्बोष्ठीं सुमध्यां सुप्रतिष्ठिताम् ॥ २९
सीतां पद्मपलाशाक्षीं मन्मथस्य रतिं यथा ।
इष्टां सर्वस्य जगतः पूर्णचन्द्रप्रभामिव ॥ ३०
अबलां मृगशावाक्षीं वीक्षमाणां ततस्ततः । ३५
बाष्पाम्बुपरिपूर्णेन कृष्णवक्राक्षिपक्ष्मणा ॥ ३६
दुःखेन बुबुधे सीतां हनुमाननलंकृताम् ।
संस्कारेण यथा हीनां वाचमर्थान्तरं गताम् ॥ ३९

इयं सा यत्कृते रामश्चतुर्भिरिह तप्यते ।
कारुण्येनानृशंस्येन शोकेन मदनेन च ॥ सुं. १५-४९

(अशाच प्रकारचें वर्णन महाभारत, वनपर्व अ. ६८ श्लो. ८ ते २६ नलोपाख्यानांत दमयन्तीविषयीं आढळतें. साम्य नवल वाटण्यासारखें आहे.)

(२३) इमामसितकेशान्तां शतपत्रनिभेक्षणाम् ।
सुखार्हां दुःखितां ज्ञात्वा ममापि व्यथितं मनः ॥ सुं. १६-२८

(२४) वृद्धिकामो हि लोकस्य सर्वभूतानुकम्पकः ।
मत्तः प्रियतरो लोके पर्जन्य इव वृष्टिमान् ॥ अयोध्याकाण्ड १-३८
दुन्दुभिस्वरकल्पेन गम्भीरेणानुनादिना ।
स्वरेण महता राजा जीमूत इव नादयन् ॥ २-२
इति ब्रुवन्तं मुदिताः प्रत्यनन्दन्नृपा नृपम् ।
वृष्टिमन्तं महामेघं नर्दन्त इव बर्हिणः ॥ २-१७
दशरथानें श्रीरामास येतांना पाहिलें त्याचें वर्णन—
रूपौदार्यगुणैः पुंसां दृष्टिचित्तापहारिणम् ।
घर्माभितप्ताः पर्जन्यं ह्लादयन्तमिव प्रजाः ॥ ३--२९

(२५) मेघरूपीं पायऱ्यांनीं सूर्यापर्यंत चढणें जणुं शक्य आहे ! —
शक्यमम्बरमारुह्य मेघसोपानपङ्क्तिभिः ।
कुटजार्जुनमालाभिरलंकर्तुं दिवाकरम् ॥ किष्किंधाकाण्ड २८-४

(२६) रजः प्रशान्तं सहिमोऽद्य वायुर्निदाघदोषप्रसराः प्रशान्ताः
स्थिता हि यात्रा वसुधाधिपानां प्रवासिनो यान्ति नराः स्वदेशान् कि. २८-१५

(२७) त्वां कृत्वोपरतो मन्ये रूपकर्ता स विश्वकृत् ।
न हि रूपोपमा ह्यन्या तवास्ति शुभदर्शने। सुं. २०-१३

(२८) वानरोऽहं महाभागे दूतो रामस्य धीमतः ।
रामनामाङ्कितं चेदं पश्य देव्यङ्गुलीयकम् ॥ सुं. ३६-२
प्रत्ययार्थमिवानीतं तेन दत्तं महात्मना ।
समाश्वसिहि भद्रं ते क्षीणदुःखफला ह्यसि ३६-३
गृहीत्वा प्रेक्षमाणा सा भर्तुः करविभूषितम् ।
भर्तारमिव संप्राप्तं जानकी मुदिताभवत् ॥ ३६-४

(२९) कच्चिन्न विगतस्नेहो विवासान्मयि राघवः ॥ सुं. ३६–२०
सुखानामुचितो नित्यमसुखानामनूचितः ॥ सुं. ३६–२१
राम लक्ष्मणास म्हणतो:—
शोकश्च किल कालेन गच्छता ह्यपगच्छति ।
मम चापश्यतः कान्तामहन्यहनि वर्धते ॥ युद्धकाण्ड ५–४
(३०) अनिद्रः सततं रामः सुप्तोऽपि च नरोत्तमः ।
सीतेति मधुरां वाणीं व्याहरन्प्रतिबुध्यते ॥ सुंदरकांड ३६–४४
(३१) अयं हि शोभते तस्याः प्रियाया मूर्ध्नि मे मणिः ।
अद्यास्य दर्शनेनाहं प्राप्तां तामिव चिन्तये ॥ सुं. ६६–७
अभिज्ञानं च रामस्य दद्यां हरिगुणोत्तम ।
क्षिप्तामिषीकां काकस्य कोपादेकाक्षिशातनीम् ॥ सुं. ४०–४
मनःशिलायास्तिलको गण्डपार्श्वे निवेशितः ।
त्वया प्रणष्टे तिलके तं किल स्मर्तुमर्हसि ॥ सुं. ४०–५
अभिज्ञानं च मे दत्तं यथावृत्तं तवान्तिकम् । सुं. ६५–२०
इ. इ....
(३२) किमाह सीता वैदेही ब्रूहि सौम्य पुनः पुनः ।
परासुमिव तोयेन सिञ्चन्ती वाक्यवारिणा ॥ सुं. ६६–८
किमाह सीता हनुमंस्तत्त्वतः कथयस्व मे ।
एतेन खलु जीविष्ये भेषजेनातुरो यथा ॥ सुं. ६६–१४
सीता हनूमंतास म्हणते—
(३३) यदि वा मन्यसे वीर वसैकाहमरिंदम
कस्मिंश्चित्संवृते देशे विश्रान्तः श्वो गमिष्यसि ॥ सुं. ६८–३
मम चाप्यल्पभाग्यायाः सान्निध्यात्तव वानर ।
अस्य शोकविपाकस्य मुहूर्तं स्याद्विमोक्षणम् ॥ सुं. ६८–४

असो. हे प्रदीर्घतेलाहि न जुमानून दिलेले श्लोकांचे उतारे स्पष्टच दाखवितात कीं, कालिदास अनेक वेळां वाल्मीकिकृतींतीलच वर्णनांचा, कल्पनांचा, भावच्छटांचा औचित्यपूर्वक मार्मिक आदर करीत आहे.

यक्षवर्णनावर स्वतः रामचंद्राच्या विरहावस्थेंतील वर्णनांची, यक्षपत्नी-वर्णनावर जानकीच्या विरहस्थितिवर्णनांची, व रामचंद्राचा दूत जो ' बुद्धिमतां वरिष्ठ ' असा हनुमान् त्याच्या स्वभाववर्णनाची छटा यक्षाचा निवडलेला दूत जो मेघराज त्याचेवर पडलेली आहे. स्वतः कालिदास विरहावस्थेंत अगर कोणा राजाच्या अवकृपेंत वा स्वदयितेच्या वियोगांत असतां हें काव्य त्यानें रचिलें असावें, असा जो तर्क कांहीं पंडित पुढें करितात तो अनवश्यक होय; हें वरील साम्यवर्णनें वाचून कोणाचीही खात्री पटायला हरकत दिसत नाहीं.

रामचंद्रानें हनुमान् यास दूतत्व दिलें, यक्षानें कामार्ततेनें (किंवा कालिदासानें प्रतिभाबलानें) मेघाकरवीं स्वदूतत्व करण्याची आश्चर्यकारक कल्पना योजिली हें वाल्मीकीहून कालिदासाचें वैशिष्ट्य होय ! हनुमान् हा ब्रह्मचारी महाबलाढ्य मतिमान् पुरुष होय. मेघ हा काव्यदृष्ट्या नदी-रूपीं अनेक प्रणयिनी असलेला तसेंच विद्युल्लतेचा नाथ असून, उदारचरित, सर्व विश्वास आनंद देणारा, करुणार्द्रतेनें भरलेला, असा कामरूपी महा-पुरुष आहे. मारुतीच्या स्वभावांत जसें ' कापेय ' ' चेष्टेखोरपणा ' आहे, तसेंच मेघाच्या स्वभावांत खेळाडूपणा आहे. सुरांगनांनीं हीरकवलयाग्रांनीं टोंचून मेघांचीं तुषारमय तापहारक अशीं स्नानगृहें करून मेघाचा वेळ फारच व्यायला सुरवात केली,– तर मेघानें त्या अबलांना केवळ कडकडून गर्जना करून भिववावें, अशी सूचना यक्षानें मेघास केली आहे– यावरून मेघाचें क्रीडालोलत्व व औचित्य दिसून येतें. उलट, शरभ अकारण त्याचेवर उत्पतन करूं लागले, तर त्यांचेवर गारांचा वर्षाव करूव त्यांची पांगापांग करावी असेंहि यक्षानें मेघास सुचविलेलें आहे. यावरून कोठें काय शस्त्र वापरून संकटांचें निराकरण करणें त्याचें दिग्दर्शन यक्षानें मेघस्वभाव जाणून केलें आहे. मारुतिराय जसे महाभगवद्भक्त तसेंच हे मेघरायहि दिसतात ! म्हणून महाकालेश्वराचे पूजेचे वेळीं ' संगीतार्थ ' पूर्णतेनें मेघानें आपल्या आमंद्र गर्जितांनीं साधावा व कृतार्थ व्हावें अशी यक्षानें त्यास सूचना केलेली आहे व भक्तिनम्रपणानें परमेश्वरपादुकांस प्रदक्षिणा घालून पुढें जाण्यास यक्ष त्यास सांगत आहे किंवा श्रीशंभुनृत्याचे वेळीं त्याचेवर आर्द्र आच्छादन मेघानें करावें अशी योजना यक्षानें

समर्पकतेनें सुचविली आहे. तसेंच, स्कंदाचें पूजन पुष्पवर्षावानें करण्यास सांगितलें आहे. सरस्वती नदीचें जलपान करून तूंहि बलरामाप्रमाणें शुद्ध होशील मग बाहेरूनच फक्त कृष्णत्व असेना का ? असेंहि यक्ष मेघास जें सांगतो त्यावरून मेघ व बलराम यांची तुलना मनोरमतेनें यक्षानें केलेली आहे– बलराम हा गौरवर्ण तर मेघ हा श्रीकृष्णाप्रमाणें श्यामवर्ण; * बलराम मदिराप्रेमी–मेघाचा तसा दोष कोणताहि नाहीं. मेघास आपण गौर व्हावें असें वाटणें असंभवनीय नाहीं. यक्ष म्हणतो, निदान सरस्वती–जलपानानें हे मेघा, तूं अंतःकरणांत तरी खात्रीनें बलरामाप्रमाणेंच शुद्धात्म होशील ! या वचनामध्यें असाहि एक मनोहर अर्थध्वनि निघू शकतो कीं, 'सारस्वत'पानानें म्हणजे उत्कृष्ट वाङ्मयाच्या सेवनानें अंतःकरण कोणाचेंहि शुद्ध होऊं शकेल ! शिवाय बलराम व कृष्ण या दोघांही अलौकिक बंधूंचें गुणरूप तुझ्यांत आहेच असा भाव मनोरमतेनें प्रकट केला गेला आहे.

मेघदूतांतील कांहीं कल्पना श्रीमद्भागवतांत पुढीलप्रमाणें आढळते. तींत वृत्त, श्रीकृष्णाविषयीं त्याच्या स्त्रियांची विरहभावना व मेघास उद्देशून काढलेले उद्गार कालिदासकृतीशीं फारच आश्चर्यकारक सादृश्य प्रकट करतात—

" मेघ श्रीमंस्त्वमसि दयितो यादवेन्द्रस्य नूनं
श्रीवत्साङ्कं वयमिव भवान्ध्यायति प्रेमबद्धः ।
अत्युत्कण्ठः शबलहृदयोऽस्मद्विधो बाष्पधाराः ×१ (अर्थ टीपेंत पहावा)

---

* माझ्या श्रीकृष्णगीतां'त (वाङ्मय-श्री-खण्ड पद्यविभाग) एके ठिकाणीं असा श्लोक आहे. यशोदा श्रीकृष्णास सांगते––

आधींच काळा अससी हरीबा ! । वणावणा हिंडसि तूं तरी बा ! ।।
होईल माझा बळराम काळा ! । त्याला नको नेउंस; जा निराळा ! ॥८॥

– वाङ्मय श्री–खण्ड 'श्रीकृष्णगुंफा' ' श्रीकृष्णगीत '

× १ **सारांश**– हे श्रीमन्मेघराजा ! यादवेन्द्राचा तूं खरोखर लाडका आहेस. आमच्याप्रमाणेंच प्रेमबद्ध होऊन तूं श्रीकृष्णाचेंच ध्यान करीत आहेस. आमच्यासारखाच तूंही विरहौत्सुक्यानें हृदय भरून येऊन त्याची वारंवार आठवण होऊन सारख्या बाष्पधारा (अश्रुधारा पक्षीं तुषारधारा) सोडीत आहेस ! श्रीकृष्णाशीं संगत म्हणजे दुःखालाच कारण !! (संगतींत जितकें उत्कट सौख्य तितकेंच तीव्र दुःख वियोगानें होतें हा नियमच आहे.)

स्मृत्वा स्मृत्वा विसृजसि मुहुर्दुःखदस्तत्प्रसङ्गः ॥ [श्रीमद्भागवत स्कंध
तसाच पुढील श्लोक— १० अध्याय ९० श्लोक २०]

" हंस स्वागतमास्यतां पिब पयो ब्रूह्यङ्ग शौरेः कथां
दूतं त्वां नु विदाम कच्चिदजितः स्वस्त्यास्त उक्तं पुरा ।
किं वा नश्चलसौहृदः स्मरति तं कस्माद्भजामो वयं * २ श्लोक २४
क्षौद्रालापय कामदं श्रियमृते सैवैकनिष्ठा स्त्रियाम् " (अर्थ टीपेंत पहा.)

यांत हंसास कृष्णाचा दूत कल्पून विरहिणीचे उद्गार आहेत. शिवाय मेघाचा स्वभाव व वर्षर्तूचें फारच काव्यात्मक वर्णन दशमस्कंध अध्याय २० यामध्यें आलें आहे. तें अविस्मरणीय असें आहे. कवीचा जसा स्वभाव तसें वर्णन वर्ण्यविषयाचें व्हायचें हा काव्यसृष्टींतला निरपवाद नियमच होय.

योगवासिष्ठ या प्रचंड काव्यमय ग्रंथांत क्वचित्स्थळीं मेघदूतांतील श्लोकांचें विलक्षण साम्य मला आढळून आलें आहे.

उदाहरणार्थ मेघदूतांतल्या 'अद्रेः शृङ्गं हरति पवनः' इ. १४ व्या श्लोकाशीं योगवासिष्ठांतील पुढील श्लोक तोलून पहावा–

एतच्छृंङ्गं हरति पवनः किं स्विदित्युन्मुखीभि–
र्दृष्टोत्साहश्चकितचकितं मुग्धसिद्धाङ्गनाभिः ।
प्रालेयाद्रेः प्रतितटवनं प्रोत्पतत्यभ्रमूर्ध्वं
वज्रस्तम्भो गगनसुतलोत्तोलनायेव भूमेः ॥ (योगवासिष्ठ निर्वाणप्रकरण,
उत्तरार्ध, सर्ग १५ श्लो. १९)

---

* २ " हंसा ! बरा आलास ! तुझें स्वागत असो ! बस, पाणी पी. मित्रा ! कृष्णाविषयीं कांहीं सांग. तूं त्याचा दूतच आम्ही समजतों श्रीकृष्ण सुखरूप आहे असेंच म्हणालास ना ? तो चंचल मैत्रीचा गडी आमची आठवण तरी काढतो का ? काय म्हणून आम्हीच तेवढी त्याची अपुर्बाई करावी ! लक्ष्मीला सोडून तो इकडे येऊन आम्हांशीं बोलेल असें कर ! कां, तीच तेवढी त्याचेवर प्रेम करणारी ? आम्ही कोणी त्याच्या नव्हंतच का ? "

पूर्वार्धांत 'एतत्' ऐवजीं 'अद्रेः' हा शब्द ठेवला तर हा श्लोकार्ध मेघदूतांतल्या श्लोकाच्या पूर्वार्धाप्रमाणें जशाचा तसाच आहे! उत्तरार्धांत 'उत्पत्' हा धातूहि सारखाच आहे. 'धूमज्योतिस्सलिलमरुतां'नीं मेघ बनतो या घटकांचाच उल्लेख श्रीतुलसीदासजींनीं आपल्या 'रामचरितमानस' या अलौकिक ग्रंथांत कुसंग व सत्संग यांचें वर्णन करतांना मार्मिकतेनें केला आहे:—

(प्रथम सोपान)

"धूम कुसंगति कारिख होइ। लिखिय पुरान मंजु मसि सोइ॥
सोइ जल अनल अनिल संघाता। होइ जलद जगजीवनदाता॥ *

या ग्रंथांतील साम्यदर्शनानंतर श्रीज्ञानेश्वरींतील १–२ ओव्या पाहूं.

तोय, तेज, धूम। ययां वायूसि संगम।
जालिया होय अभ्रागम। व्योम तें नेणें॥ ज्ञानेश्वरी अ. १८ ओ. ३०८

या ओवींत मेघनिर्मितीची प्रक्रिया जी सांगितली आहे ती 'धूमज्योतिस्सलिलमरुतां सन्निपातः क्व मेघः' या कालिदासोक्तीचेंच प्रतिबिंब असावें. तसेंच—

अर्धोन्मीलित डोळे। वर्षताति आनंदजळें।
आंतुलिया सुखोर्मीचे नि बळें। बाहेरीं कांपे॥ अ. ९ ओवी ५२८

यांतील रम्य कल्पना— 'त्वय्यासन्ने नयनमुपरिस्पंदि शंके मृगाक्ष्या
मीनक्षोभाच्चलकुवलयश्रीतुलामेष्यतीति॥ (मेघ. ९७)

या श्लोकांतील मनोहर कल्पनेशीं जुळण्यासारखी आहे. रसिक वाचकांस अशीं अनेक स्थळें हुडकून आनंद लुटतां येईल व या ओवींतली स्थितिच सहृदयतेनें अनुभवतां येईल! येथें केवळ अल्प दिग्दर्शन लें आहे.

---

* प्रस्तुत लेखकानें हल्लीं तुलसीरामायणाला मराठी काव्यवेष देण्याचें कार्य आरंभिलें असून बालकांड (२१४० श्लोकांत) पूर्ण झालें आहे. त्यांतील वरील पंक्तींचा अनुवाद पुढीलप्रमाणें:—

हो धूर कज्जल कुसंगतिनेंच लोकीं। तें शाइ होउनि पुराणकथाहि लेखी
हो तोच वन्हि-जल वायुसमूहयोगें। अंभोद, विश्वसुखदायक त्या सुसंगें!

मेघावर कालिदासानें आपल्या महान् प्रतिभेनें केलेल्या अनेक कल्पना फारच उत्तुंग व रमणीय आहेत. मेघाचें रूप, वर्ण, कामवर्षित्व जलसिंचन करीत मार्गक्रमण, मंद्र गंभीर गर्जना, पुनः पुन्हां रससिंचन व रसादान, गिरिशिखरांवर विश्रांति, विद्युत्साहचर्य, विद्युत् ही जणूं त्यांची दृष्टीच (' प्रायेण गृहिणीनेत्राः ' असें ' कुमार ' मध्येंहि आहे) तिच्याशीं त्याचा विलास, कोठें इंद्रधनुष्यकांतीमुळें जणुं मोरपीस लावलेला, गोपवेषी सुनील विष्णूच असा तो भासणारा, कोठें उत्तुंग आम्रकूट गिरिशिखरावर तो असतांना सभोंवतीं पिकलेल्या अंब्यांमुळें पिवळेपणा व शिखरांचे ठायीं घनाचा श्यामवर्ण यामुळें पृथ्वीचा स्तनच कीं काय असें आकाशसंचारी सुरमिथुनांना ज्याच्यामुळें तो पर्वत भासतो असा; कोठें नदीच्या त्यानें केलेल्या रसग्रहणामुळें, शृंगारी नायकत्वाची भूमिका घेणारा; गौरवर्ण कैलासावर मेघ गेला म्हणजे गौरांग बलरामाच्या खांद्यावरील नीलवस्त्रांची शोभा धारण करणारा, हरिद्वाराशेजारीं गंगाप्रवाहावर वांकून जलपान करतांना त्याची छाया गंगाप्रवाहांत शिरतांच, जणुं काय तेथें गंगायमुना–संगमाची अनुत्तम शोभा अस्थानींच प्राप्त करून देणारा, क्रौंचरंध्रांतून (हिमालयांतील कैलासाकडे जाणाऱ्या चिंचोळया वाटेंतून) उंच झेंप घेतांना आकाशव्यापी असा त्रिविक्रमाचा जणुं पायच भासणारा, चर्मण्वती नदीचें जलपान करूं लागतांना सुंदर मुक्ताहारांतील इंद्रनीलाप्रमाणेंच गगन-विहारी प्रेक्षकांस भासणारा, तुषारवर्षित्वामुळें, अलकेच्या भालस्थानीं मुक्ता-कलापाप्रमाणें दिसणारा, घनत्वरूप धारण करणाच्या प्रभावामुळें गौरीशंकरांच्या हिमालयावरील हीरकतटांवर संचाराचे वेळीं त्यांना जणुं जिन्यासारखा हो, असें यक्षानें खुबीनें सांगितलेला, हिमालयाच्या अनेक प्रकारच्या सौंदर्यांचा आस्वाद रसिकतेनें घ्यावा असें सुचविलेला, कधीं मौजेनें, कधीं विनोदानें, कधीं शौर्यानें संकटप्रतिकार औचित्यपूर्णतेनें तूं करावास असें उपदेशिलेला, कधीं औदार्यानें दुसऱ्यांच्या आर्ति तांतडीनें शमवाव्यास असें स्वभावानुरूप आदेशिलेला अशा अनेक सुरम्य नितान्तमनोहर चमत्कारपूर्ण कल्पना मेघाच्या त्या त्या विशेषावर केलेल्या पाहिल्या म्हणजे मेघांत केवढा जिवंतपणा कालिदासानें ओतला आहे व हृदयस्पर्शी असा त्याचा किती

उत्कृष्ट व औचित्यपूर्ण स्वभावपरिपोष केला आहे तें प्रतीत होऊन अत्यंत आनंद होतो. मेघदूतांतील कोणताहि भाग जितके जितके वेळां वाचावा तितके तितके वेळां कांहीं विलक्षण अधिकच आनंद देण्याचा असामान्य गुण कालिदासप्रतिभेनें त्यांत निर्मिलेला आहे असें निदर्शनास येतें. उत्कृष्ट सौन्दर्यपूर्ण कलाकृतींत हा सद्गुण वसतच असतो. त्याच्याच परिसीमेचा प्रत्यय आपणांस मेघदूतासारख्या कृतींत येतो, असें रसिक स्वानुभवावरून उद्गारील यांत शंका नाहीं.

असें असलें तरी मेघदूतावरहि हल्लींचे एक दोन महाभाग तरी पुढीलप्रमाणें दोष लादीत असलेले आढळतात. मेघदूताहूनहि श्रेष्ठतम काव्य आधुनिक मराठींत त्यांना सांपडल्याचा त्यांचा दावा आहे! त्याविषयीं आम्हांस येथें चर्चा करावीशीहि वाटत नाहीं. तथापि मेघदूतावर त्यांचे आक्षेप आहेत ते कसे फोल आहेत तेवढेंच येथें दाखवायचें आहे. एकाचे आक्षेप असे:—

(१)– "मेघदूतांत सृष्टिवर्णन हाच मुख्य विषय ठरून विरहामध्यें नायकनायिकांच्या मनाचें विश्लेषण पहावयास मिळेल अशी वाचकांची असलेली अपेक्षा पुरती पूर्ण होत नाहीं."

(२)– "मेघदूताची रचना विशेष गुंतागुंतीची नसतांही प्रमाणशीर नाहीं."

(३)-- "मेघदूतांतील नायकाची भूमिका उपभोगातुर वाटते."

(४)- "मेघदूतांत कांहीं ठिकाणीं तरी शृंगाराची उत्तान सूचना आली आहे." मात्र या आक्षेपकांनीं मान्य केलें आहे कीं, "कालिदासाची सुवृत्त रचना व त्या दर्जाचें कल्पनासामर्थ्य 'विरहतरंगां'त दिसून येत नाहीं एवढेंच." (अर्वाचीन मराठी काव्य, प्रा. रा. श्री. जोग, पृ. १८३)

दुसऱ्या महाभागानें पुढील आक्षेप मेघदूतासंबंधीं प्रकट केला आहे–

(५)– "मेघसंदेश या एकाच कल्पनेभोंवतीं घोंटाळत राहिल्यामुळें कालिदासाला यक्षाच्या विरहवर्णनापेक्षां मेघाचें प्रयाण व त्याचा मार्गनिर्देश यांच्या वर्णनांतच अनेक श्लोक खर्ची घालावे लागले आहेत. आणि स्फुट श्लोक कितीहि चांगले वाटले तरी एकंदर काव्य याच कारणामुळें कांहींसें

अस्वाभाविक व कंटाळवाणें झालें आहे." ("डॉ. रा. ग. हर्षे यांचा 'विरह-तरंगा' वरील लेख, 'लोकशिक्षण' वर्ष १०, अंक ८–९)

या आक्षेपांचा समाचार मेघदूतासंबंधींच्या या प्रस्तावनेंत आवश्यकच होय ! यापूर्वी आम्हीं केलेल्या विवेचनांत मेघदूताचे अनेक गुण वाखाणतांना या आक्षेपांचें कमीअधिक मानानें पण अहेतुकपणें खंडन झाल्यासारखेंच आहे. (पहा पृष्ठ २६) सृष्टिवर्णन इतकें करीन व विरहवर्णन इतकें करीन किंवा प्रेमाचें तत्वज्ञानच 'हन्त ते कथयिष्यामि' आतां मी रचतों असें, आणि तें तुम्ही ऐका, अशा प्रतिज्ञा करून कांहीं आमचा महाकवि लिहावयाला बसलेला नाहीं कीं म्हणून तशा तत्वज्ञानाची कोणी अपेक्षा करावी! त्यानें जें जें रचिलें आहे तें तें अगदीं औचित्यास धरून व आवश्यक तेंच व तेवढेंच केलेलें आहे. मार्ग प्रदीर्घ असला तरी संयमानें त्यांतील वेंचक सौंदर्यस्थळेंच यक्षानें मेघास सांगितलीं आहेत. मार्ग सांगण्याची आवश्यकताहि औचित्यपूर्णच आहे. हा मेघ कांहीं यक्ष व त्याची पत्नी यांच्या पूर्वपरिचयाचा आहेच असें नाहीं. त्यास नवीनच दौत्यकर्म करावयाचें आहे. अर्थात् मार्ग सांगितल्यानें व त्यासाठीं अत्यंत सुंदर कल्पनांनीं मंडित अशी रचना पूर्वमेघांत केल्याबद्दल कालिदासास नितान्त धन्यवादच द्यावेत, तें सोडून कालिदासाच्या कृतीस या आक्षेपकांनीं नाक मुरडावें हें कसें समर्थनीय व्हावें ?

यक्ष व यक्षपत्नी यांच्या मनोऽवस्थेचें वर्णन करणारे अनेक उतारे येथें देतां येतील त्यांवरून वाचकानें वाटल्यास त्यांच्या अंतःकरणाचें विश्लेषण करावें. हें कांहीं 'शास्त्रकाव्य' नव्हे कीं त्यामध्यें प्रेमी अंतःकरणांचे सर्व धागेदोरे उकलून निरनिराळे भाव शास्त्रदृष्ट्या कवीनें प्रकट करावेत. नितान्तप्रेमी विवाहित नवदंपतीच्या परस्परवियोगानें झालेल्या आकुल भावनांचें याहून उत्कृष्ट प्रकटन दुसऱ्या कोणाच्या लेखणीनें इतक्या थोड्या श्लोकांत, इतक्या समर्पकतेनें व इतक्या रम्यतेनें आजपर्यंत केलें आहे? प्रवासवर्णनाच्या निमित्तानें केलेल्या, नद्या, पर्वत, नगरी, देव, देवता इत्यादींच्या वर्णनांतहि सूक्ष्मतेनें पाहिल्यास सौंदर्याबरोबरच दांपत्यप्रेमभावनांच्याच छटा अनेक श्लोकांत आढळून येतील. नवदांपत्यप्रेम हें

भोगलोलप असलें व तसें वर्णिलें, वा रम्य ध्वन्यर्थानें व सुकुमार भावनांनीं या काव्यांत कालिदासप्रतिभेनें तें गाइलें, तर त्याचा आनंद मानायचा व रसिकतेनें स्वात्मानुभवाचा त्यांत पडताळा पाहून तन्मय व्हायचें, कीं तसें यथार्थ पण काव्यमय आदर्शवर्णन केल्याबद्दल कालिदासावर अरसिकाप्रमाणें वा अ'ज्ञातास्वादा'प्रमाणें आघात करण्यास उठावयाचें ? या अधिक्षेपकांचा स्वात्मानुभव कांहीं तरी निराळाच असला पाहिजे ! कालिदासाच्या वर्णनांचे आशय नीट समजून घ्यावयाचे तर मल्लीनाथानें देखिल " अथ तत्रापि संदेहे स्वकलत्राणि पृच्छतु ! " अशा शब्दांतच सर्व सुचविलें आहे ! ' Platonic love ' या शब्दांच्या ढोंगी बुरख्याखालीं वावरणाऱ्या कित्येक कवींच्या अविवाहित नायकनायिकांचें शेवटीं जें व्हायचें तेंच घडत असलेलें आढळून येतें ! त्यांच्या कृति, सहली त्यांचीं तिर्यक्, प्रातिबोधिक इ. चुंबनें, त्यांचे नेत्रकटाक्ष, एकांतक्रीडा, सहवाचन, सहवादन, सहगायन इ. इ. ' काव्यात्मकता ' भोगांतच पर्यवसान पावते. कालिदासानें वर्णन केलेले ते ते सर्व प्रसंग व नायकनायिकांचे स्वभावपरिपोष हे अत्यंत स्वाभाविक व सुसंस्कृत मानवतेस अगदीं धरून आहेत.

शृंगाराच्या उत्तानतेचा आक्षेपहि असाच खंडनीय आहे. संस्कृत वाङ्मयांत वाल्मीकिरामायणांत, जानकीहरणानंतरच्या श्रीरामचंद्राच्या मनःस्थितीचें वर्णन वाचून पहाणारा बहुश्रुत वाचक असा आक्षेप खास काढणार नाहीं. संभोगशृंगाराचें काल्पनिक वा काव्यात्मकतेनें सूचित केलेलं वर्णन हें मेघदूतांतील नायकनायिकांच्या स्वाभाविक अवस्थेस अगदीं उचित असेंच आहे. हीं काव्यें समजण्याची व वाचण्याची ज्यांना पात्रता आहे त्यांचे मनावर कोणत्याही तऱ्हेनें वाईट आघात करील असें हें वर्णन मुळींच नाहीं ! शिवाय कालिदासानें ' तुम्हीं माझें काव्य कॉलेजांत शिकवित चला ! ' असा आदेश देऊन कांहीं काव्यरचना केलेली नाहीं ! प्रौढदंपतींनीं जें वाचतांना बिचकावें असें मेघदूतांत कांहींच नाहीं ! इतकेंच काय सहृयतेनें मेघदूताचीं पारायणांवर पारायणें शतवार केलीं, तरी विपरीत वा अयोग्य परिणाम कोणताही या काव्याच्या वाचनानें कोणावरहि होऊं शकेल असें जरासुद्धां वाटत नाहीं. व हाच अनुभव लक्षावधि रसिकांचा आजवर आहे !

[प्रस्तुत ‘ अवतरणिका ’ लेख लिहून होतांच अनेक मार्मिक रसिकांनीं तो काळजीपूर्वक वाचून मला हार्दिक सहमतता दर्शविली. प्रकृत आक्षेपखंडनाविषयीं एक तज्ज्ञ सहृदय ता. ४.३.४९ च्या पत्रानें मला कळवितात “... आतां मी तिसऱ्या व शेवटच्या भागाकडे वळतों. पहिले दोन वाचल्यानंतर या भागाकडे वळल्यावर, श्रीखंड खाऊन झाल्यावर मेतकुटाकडे बोट जावें, तसें वाटलें! हर्षे व जोग यांनीं सुद्धां विरहतरंगाचा रसास्वाद त्या काव्याची मेघदूताशीं तुलना केल्याविना अपूर्ण राहील अशी जणुं भीतिच घेतलेली दिसते. हर्षे व जोग यांचे यासंबंधींचे लेख मीं मुळांतून यापूर्वींच पाहिले आहेत; हर्षे यांचें यावरील व्याख्यानहि मीं ऐकलें आहे. विरहतरंग काव्य मीं दोन तिनदां वाचलें आहे. मला तें बरेंच आवडलेंहि आहे. पण त्या काव्याची व मेघदूताची ज्या पद्धतीनें वरील विद्वद्द्वयांनीं तुलना करण्याचा अट्टाहास केला आहे तो निखालसपणें सदभिरुचीला सोडून आहे. १९३० ते १९३५ या कालांत मेघदूत हें काव्य अगदीं वरचेवर मी वाचीत होतों. मला दरखेपेला त्यामध्यें नवीन नवीन आनंद घेतां आला. निदान २५।३० वेळां तें काव्य समग्र मीं वाचलें असेन; त्यांतील शब्दसौष्ठव, नादमाधुर्य, रसपरिपोष व अत्यंत कोमल भावनाविष्कार यांचा आस्वाद घेत असतां मला अनेक वेळां अवर्णनीय आनंद वाटला आहे. तितका आनंद विरहतरंगांतून मला मिळाला नाहीं.” (श्री. मो. स. श्रीखंडे, बी. ए. (ऑ.) बी. टी. यांचें पत्र.)]

निदान कालिदासाची सुवृत्तरचना व त्याचें कल्पनासामर्थ्य हें तरी या आक्षेपकांनीं मानलें हें कालिदासाचें भाग्यच म्हणावें!

तथापि कालिदासाच्या या आक्षेपकांच्या मतें उत्तुंग कल्पनासामर्थ्य व सुश्लिष्ट मधुर रचना हे विशेष श्रेष्ठ असे काव्यगुण नव्हेत असें त्यांच्या ‘ एवढेंच ’ या शब्दावरून दिसतें. पण हें कोणास तरी पटेल काय?

पंत म्हणतात— ‘ बहु कल्पना सुकविसा, विजयहि बहु शरपरंपरा व्याला ’ मेघदूतांत जो मनोहर कल्पनाविलास आढळतो तो कांहींच नव्हे का? भावना, कल्पना, रीति, सुवृत्तशैली, ध्वन्यर्थयुक्तता, अलंकारसौभाग्य व नायक, नायिका व दूत यांच्या स्वभावांतील सहज पण अवर्णनीय लावण्य

इत्यादि ज्या ज्या समुचित दृष्टींनीं मेघदूताकडे पहावें त्या त्या सर्व दृष्टींनीं रसिकान्तरंगास अलौकिक समाधान देणारी अशी मेघदूत ही कृति कालिदास-प्रतिभेची दिव्य लीला आहे. तीस नसते दोष चिकटवणाऱ्यांची कींवच केली पाहिजे !

ज्या काव्यांतील 'स्फुट' श्लोक उत्तम आहेत तें काव्य अस्वाभाविक व कंटाळवाणें या अधिक्षेपांस कसें पात्र होऊं शकतें हें समजणें कठिण आहे ! शिवाय हे सर्व स्फुट श्लोक अगदीं सुसंगत असे आहेत. कलाकृतीचे घटक जर उत्तम आहेत—तर सर्व कलाकृतिच उत्तम म्हणायला टीकाकारास खेद कां वाटावा ? 'मेघदूत' कंटाळवाणें वाटतें हें म्हणणें बुद्धिमांद्याचेंच वा भाषेच्या अज्ञानाचेंच द्योतक होय अगर एक उघड ढोंग तरी होय असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं ! भाषेचा अभ्यास करा व बुद्धीची तीक्ष्णता वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करा एवढेंच आम्ही या आक्षेपकांस विनवूं. जगद्वंद्य निसर्गसुंदर कलाकृति, चंद्र, ताजमहाल, कौस्तुभ, हिमालय, भागीरथी, इ.सारखी जेव्हां एकाद्यास सदोष दिसते तेव्हां तो त्या वस्तूंचा दोष कीं पहाणाऱ्याचा ?

उलटपक्षीं, सद्रसिकांच्या हातांत 'मेघदूत' पडलें म्हणजे कोणत्या यथार्थ शब्दांत त्याचें गुणगौरव अत्यंत सहृदयतेनें केलेलें आढळतें हें आणखी पहावयाचें असल्यास काव्यविनोद साहित्यरत्नाकर, एम्. कृष्णमाचारियर एम्. ए., एम्. एल्., पीएच्. डी. यांच्या History of Classical Sanskrit Literature या ग्रंथांत पहावें. ते मेघदूताविषयीं लिहितात (पृ. ३६२)—

" For lofty conception, artistic design, aesthetic sentiment, divine idealism, delicate embellishment, and graceful expression, the poem stands supreme, and it is a monument of poetic art, in the architecture of letters. "

(सारांश:— उत्तुंग कल्पनाविलास, कलापूर्ण रचनाचातुरी, उचित भावसंपदा, दिव्य ध्येयचित्रण, सुकुमार अलंकारसौभाग्य, विलासपूर्ण सौंदर्याविष्कार यांचा विचार केल्यास मेघदूत हें काव्य सर्वोच्च आहे आणि

वाङ्मयाच्या शिल्पसृष्टींतल्या काव्यकलेचें तें एक संस्मरणीय कीर्तिमंदिरच शोभत आहे.)

एतावता अंतरंग व बहिरंग या सर्व बाजूंनीं विचार करतां, मेघदूतानें रसिकान्तःकरणांत नितांतप्रियता संपादन केली आहे यांत संदेह नाहीं; व आश्चर्यहि नाहीं, कारण त्याची गुणवत्ताच तशी अलौकिक आहे! कालिदासाची मंदाक्रांता वृत्तांतलीं रचना त्याच्या मालविकाग्निमित्र नाटकांत जे थोडे श्लोक त्या वृत्तांत आहेत, त्यांपेक्षां फारच सफाइदार पद्धतीची शाकुंतल, विक्रमोर्वशीय, कुमारसंभव व रघुवंश यांतल्या मंदाक्रांतांची झालेली असली तरी मेघदूतांतील मंदाक्रान्तारचना सर्वोत्कृष्ट अशी आहे. पादान्तींचें अक्षर लघु असलें तरी जरूर तर गुरु गणलें जातें हा छंदःशास्त्रांतील सवलतीचा नियम आहे; तथापि प्रथम व तृतीय या पादान्तींचें अक्षर कालिदास मेघदूतांत दीर्घच ठेवतो, व तें लघुस्वरयुक्तच असल्यास द्वितीय वा चतुर्थ पादाच्या आरंभीं जोडाक्षराची योजना करून त्यास आघातानें गुरुत्व आणतो. ह्यामुळें त्या त्या स्थलीं म्हणतांना एक प्रकारचा ठसठशीतपणा अनुभवास येतो, व आनंद होतो. हाच प्रकार कालिदासाच्या अर्धसम वृत्तांतहि (वियोगिनी, माल्यभारा, पुष्पिताग्रा इ. त) निदर्शनास येतो. साक्षेपी रचनाप्रभुत्वाचेंच हें निदर्शक होय.

कवितेचें वृत्तवस्त्र शिथिलतेपासून मुक्तच्छंदापर्यंत प्रयोग करून स्रस्त करूं पहाणाऱ्या ' कवियशःप्रार्थी ' आधुनिकांना कालिदासापासून रचना-साक्षेप तरी शिकणें अगदींच अशक्य आहे काय ?

अमेरिकन् प्रो. रायडर (Ryder) हा विद्वान् पंडितवर्य कालिदासाविषयीं वर्णन करतांना म्हणतो, " कालिदासाचें सृष्टिज्ञान जितकें सूक्ष्म तितकेंच सहानुभूतीनें भरलेलें आहे. हिमालयाचें बर्फ आणि वारे, गंगेचा पावन व प्रचंड प्रवाह इ. जसें तो तादात्म्यानें वर्णितो, तसेंच तितक्याच आवडीनें तो लहानलहान नद्या, वृक्ष आणि विविध बारिक-सारिक फुलें हींहि गातो. डार्विन् व कालिदास यांची जर भेट होऊं शकती तर काय बहार झाली असती, याची कल्पना करणेंच मोठें मौजेचें वाटतें. त्यांना एकमेकांचीं हृदयें अगदीं पूर्णांशानें समजलीं असतीं ! कारण या

दोघांतही एकच प्रकारची प्रतिभा, सूक्ष्म निरीक्षणानें संपादलेल्या ज्ञानसंपदेचा उपयोग करतांना दृष्टीस पडते. कालिदासाच्या स्वभावांतील समतोलपणा किती आश्चर्यकारक आहे हें मीं पूर्वी सूचित केलेंच आहे. या समतोल प्रतिभेमुळेंच, तो जसा राजवाड्यांत समरस होई, तसाच अरण्यांत. या अतुलनीय गुणांत त्याची बरोबरी कोणी करील असें वाटत नाहीं. शेक्सपीयर देखील, सृष्टिसौंदर्य जाणण्याच्या किमयेचा मोठा जादुगार असला, तरी तो मुख्यतः मानवी मनाचें अवगाहन करणाराच कवि होय. असें मर्यादित विधान कालिदासाविषयीं क्वचितच करतां येईल. तसेंच कालिदास नुसता सृष्टिवर्णन करणाराच कवि आहे असेंही म्हणणें शक्य नाहीं. हे दोन्हीही प्रतिभागुण त्याचेमध्यें जणुं काय रासायनिक प्राक्रियेनें संयोग पावले आहेत, असेंच जवळजवळ म्हणतां येईल. मी जी गोष्ट स्पष्ट मांडण्याची कष्टानें धडपड करतों आहे त्या गोष्टीचें सार आपणांस 'मेघदूत' (Cloud-messenger) काव्यांत सुंदरतेनें आढळेल. या काव्याचा पूर्वार्ध म्हणजे बाह्यसृष्टीचें वर्णन तर आहेच, पण त्यांत मानवी भावनांचे धागे सर्वत्र अनुस्यूत आहेत; तर उत्तरार्ध हें मानवी हृदयाचें आलेखन-चित्र आहेच, तथापि त्या चित्राभोंवतीं सृष्टिसौंदर्याची शोभिवंत पार्श्वभूमि वा चौकट आहे ! इतक्या उत्कटतेनें हें सर्व साधलें आहे कीं, पूर्वार्धाहून उत्तरार्ध अधिक उत्कृष्ट म्हणावा, कीं उत्तरार्धाहून पूर्वार्ध, हें निश्चयानें सांगणें कोणासही शक्य नाहीं ! जे रसिक वाचक मूळांतूनच या उत्युत्कृष्ट आदर्श काव्याचा रस घेतात त्यापैकीं कांहींना पूर्वार्ध अत्यंत हृदयस्पर्शी वाटतो, तर कांहींना, उत्तरमेघही तितकाच रम्यतम वाटतो. युरोपला १९ व्या शतकापर्यंत जें समजूं शकलें नाहीं व त्यानंतरही साधारणच समजलें व जें ५ व्या शतकांत कालिदासास समजलें, तें म्हणजे हें कीं जग हें मानवाकरितांच निर्मिलें आहे असें नाहीं. आणि मानवही, जेव्हां इतर प्राणिमात्रांचें मूल्य व महत्त्व जाणतो, तेव्हांच तो उच्चकोटींत प्रवेश करतो. आणि हें तत्त्व कालिदासास कळलें हाच त्याच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा अत्युच्च गुणगौरव होय-व या गुणसंपदेवांचून उत्कृष्ट प्रकारची सर्वांगसुंदर काव्यकृति निर्मिता येणें शक्य नाहीं. प्रतिभेचा ओघ तितका दुर्मिळ

नाहीं. बुद्धीची विशाल प्रचंडता हीहि तितकी असामान्य नाहीं– पण या दोन्हीही सद्गुणांचा संयोग मात्र जगाच्या आरंभापासून आतांपर्यंत, फार तर, १०–१२ व्यक्तींतच साधलेला आढळून येतो. याच गुणांचा मधुर मिलाफ कालिदासाचे ठिकाणीं झाल्यामुळें तो ॲनॅक्रिऑन, होरेस किंवा शेले यांच्या श्रेणींत गणला जात नसून त्याची श्रेणि सॉफोक्लीस्, व्हर्जिल् आणि मिल्टन् या महाकवींची आहे."

हें प्रो. रायडरसाहेबांचें मत किती मार्मिक व यथार्थ आहे याची प्रचीति मेघदूत–वाचकांस प्रत्येक श्लोकागणिक येईल व मेघदूताचे टीकाकारही इतःपर निर्मलदृष्टि होतील अशी मी आशा करतों.

पुढील एकदोन काव्यविषयक विचार येथें विषयानुरोधानें पोषकच वाटतील: – 'रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम्'

"Words which express some beautiful idea and produce a pleasant sensation thereby in the mind, which can be felt but never expressed, constitutes what is called poetry."

Coleridge says, " A poem is a species of composition, opposed to science, as having intellectual pleasure for its object or end, that its perfection is to communicate the greatest immediate pleasure from the parts, compatible with the largest sum of pleasure on the whole."

(जे शब्द एकादी सौन्दर्यपूर्ण कल्पना अभिव्यक्त करून तिच्यायोगें अंतःकरणास सुखकर संवेदना देतात, अशी कीं जी अनुभवास तर येते, पण यथार्थतेनें वर्णन करणें शक्य नाहीं–ते शब्द म्हणजेच काव्य होय.)

कोलरिज् म्हणतो, "काव्य म्हणजे शास्त्रभिन्न असा एक वाङ्मय-प्रबंधाचाच प्रकार कीं, ज्याचा हेतु बौद्धिक आनंद देणें असा असून, त्याच्या प्रत्येक विभागापासूनहि जसा तत्काल अत्यंत आनंद होतोच, तसाच सर्व प्रबंधही त्याच प्रकारचें अत्युच्च सुख देण्यास समर्थ असतो."

या व अशाच प्रकारच्या निरनिराळ्या प्रकारांनीं काव्याचें वर्णन थोडक्यांत करणाऱ्या व्याख्या मेघदूत या प्रतिभोज्ज्वल कृतीस उत्कृष्टपणें लागू पडतात व अशाच निकषांवर घासल्यानें मेघदूताशीं स्पर्धा करूं

पाहणाऱ्या इतर कृतींची अधरोत्तरव्यक्ति होऊन शुद्धपणा वा हिणकसपणा यांची कसोटी लागून ज्यांचें त्यांचें योग्य स्थान चिकित्सकतेनें ठरवितां येतें. असो.

मेघदूताचा इतरहि अनेक दृष्टींनीं रसिकतेनें विचार करतां येईल. त्यांत आलेले चित्रकला, संगीतादि कलांचे उल्लेख, उद्यानें, वृक्ष, वेली, फुलें, फळें यांचे निर्देश, पशु, पक्षी इ. चे काव्यौघांत सहज आलेले उल्लेख व स्वभावदर्शन, उज्जयिनी, अलका, इ. च्या वर्णनांवरून त्याच्या कालची समाजस्थिति व या सर्वांतून चिरंतन असें रम्य व मार्मिक स्वभाववर्णन इ. इ. कितीतरी दृष्टींनीं विचार करणें उद्बोधक होऊं शकेल.

विरही यक्ष कल्पनेनें आपल्या प्रेमकलहान्तरित प्रियतमेचें चित्र डोंगरांतील रंगीत खड्यांनीं शिलेवर काढतो,व त्यांत तो पुढें असेंही काढूं पहातो कीं, आपण तिला प्रसन्न करण्यासाठीं तिच्या पायांशीं लागून तिला नम्र वंदन करीत आहें– परंतु प्रियेच्या स्मृतींनीं त्याचें हृदय भरून येऊन अश्रुबिंदूही डोळ्यांत इतके सांठतात कीं, पुढें चित्र पुरें करण्याइतकी दृष्टीहि अशक्य होते ! यांतील कल्पना किती हृदयस्पर्शी आहे ! शाकुंतलांतला कालिदासाचा दुष्यंत हाहि आपल्या प्रियेचें चित्र काढून वियोगांत कांहीं समाधानप्राप्ति करून घेण्याच्या प्रयत्नांत असतो, परंतु तेथेंही असेच अश्रु अनावर होऊन शकुंतलेचें दर्शन त्यास चित्रांतहि अशक्य होतें. [प्रजागरात्खिलीभूतस्तस्याः स्वप्ने समागमः । बाष्पस्तु न ददात्येनां द्रष्टुं चित्रगतामपि ॥ अभिज्ञानशाकुंतलम् अं. ६ श्लो. २२] विरही दुष्यंत सर्व साधनसाहित्यसंपन्न अशा आपल्या राजवाड्यांत वनवासी शकुंतलेचें चित्र काढीत आहे, तर वनवासी यक्ष आपल्या अलकेंतील वाड्यांत असलेल्या वियोगिनी प्रियेचें चित्र रानांत रेखाटूं पहात आहे ! दुष्यंतानें आपल्या चित्रास पार्श्वभूमि किती काव्यात्मक घेतली आहे पहा—

कार्या सैकतलीनहंसमिथुना स्रोतोवहा मालिनी
पादास्तामभितो निषण्णहरिणा गौरीगुरोः पावनाः ।
शाखालम्बितवल्कलस्य च तरोर्निर्मातुमिच्छाम्यधः
शृङ्गे कृष्णमृगस्य वामनयनं कण्डूयमानां मृगीम् ॥

(अभिज्ञानशाकुंतल अं. ६ श्लो. १५)

अर्थात् अशाच प्रकारची पग अलकेंतल्या स्वप्रासादासन्निधची सुरम्य पार्श्वभूमि आपल्या दयितेचें चित्र रेखाटण्यास हा यक्षही संकल्पित नसेलच असें नाहीं. व ध्वन्यर्थानें आपण तसें गृहीत धरायला कांहींच प्रत्यवाय नाहीं. कारण दुष्यंत व यक्ष या दोनीहि विलासी, कलाभिज्ञ, सुसंस्कृत पग दुर्दैवाच्या तडाक्यांत सांपडलेल्या उदात्त नायकांचा निर्माता एकच आहे आणि तो म्हणजे दिव्यप्रतिभासंपन्न कालिदास होय.

कालिदासानें आपल्या प्रभातरल दिव्य प्रतिभेनें जी हृदयंगम सृष्टि निर्माण केली तींत मनसुराद रमावें असें रसिकांना वाटत असल्यास नवल नाहीं. कालिदासाच्या वाङ्मयावर वा त्यांतील कांहीं वेंचक भागांवर आधुनिक प्रतिभावान् पंडितांनीं उत्कृष्ट काव्यमय विवेचन केलेलें आहे. कै. शिवरामपंत परांजपे यांचा "मेघदूतावरून कालिदासाविषयीं" हा लेख, या दृष्टीनें वाचनीय आहे. त्याचप्रमाणें कुमारसंभव, शाकुंतल व मेघदूत यांतील रसमय प्रसंगांवर कविसम्राट् रवीन्द्रनाथांनीं आपले विचार तादात्म्यानें कांहीं निबंधांत प्रकट केलेले आहेत. त्यांचीं मराठी रूपांतरें इतर्कीशीं हृद्य झालेलीं अद्याप माझ्या वाचनांत आलेलीं नाहींत. वंगकवि मायकेल मधुसूदन दत्त यांनीं कालिदासावर अनेक स्फुटकाव्यसुमनें वाहिलीं आहेत तशींच इतरहि अनेकांनीं वाहिलेलीं असतील. रवीन्द्रनाथांची एक सुंदर बंगाली कविता 'से काल' म्हणजे 'तो काल' या अभिधानाची त्यांच्या 'चयनिका' या काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालेली आहे, ती माझे रसिक कविमित्र 'विरागी' (प्रो. ग. श्री. हुपरीकर) यांनीं माझ्या निदर्शनास आणली. सदर कविता कालिदासनिर्मित सुरम्य सृष्टीवर रवीन्द्रांनीं आधारलेली आहे व त्या कालिदासीय कालांत आपग जन्मलों असतों तर काय काय बहार झाली असती, अशा प्रकारच्या सुंदर कल्पना त्यांत कवीन्द्रांनीं घातलेल्या आहेत. या कवितेचें सर्व ११ कडव्यांचें ललित मधुर भाषांतर माझे आग्रहाचे विनंतीवरून कवि विरागींनीं मुद्दाम 'सुश्लोकमेघा'साठीं करून दिलें. त्यांपैकीं कांहीं भाग येथें उद्धृत करून रवीन्द्रांना कालिदासकालाविषयीं ज्या कोणत्या उदात्त भावना हृदयांत चाळगाव्याशा वाटतात, त्यांत रमण्याची आमच्या वाचकांसहि संधि उपलब्ध करून देत आहें:—

" तो काल "

(१)

" जन्म पावतों दैवें जर मी कालिदासकविकालीं
नवरत्नांमधिं दशम अशी मम असती ख्याती झाली १
राजाची स्तुति एका श्लोकें गाउनि, विजनप्रांतीं
उज्जयिनीमधिं वसतों काननवेष्टित गृहिं एकांतीं २
रेवातीरीं चंपकतरुतलिं भरतां सायंकालीं —
सभा, दंग मनिं मुक्तकंठ मी गातों क्रीडाशैलीं ३
तरंगती मम जीवननौका मंदाक्रांतातालीं
जन्म पावतों दैवें जर मी कालिदासकविकालीं ! ४

(२)

जलांजली देउनि चिंतेला त्वरा दूर सारोनी
जातों मृदुपदिं जरामृत्यु कीं नसती असें गणोनी १
सहा ऋतूंचें थराथरानें मीलन घडतां पूर्ण
सहा सर्गि तद्वार्ता काव्यीं ग्रथिली असती तूर्ण २
सुदीर्घ होउनि विरह, अश्रुजल नदीसमान वहातां
रचिली असती दीर्घ मंदगति कारुण्याची गाथा ! ३
आषाढांतील कृष्ण घनासम मीं मंथर होवोनी
केली असती जीवनयात्रा त्वरा दूर सारोनी ! ४

(३)

अशोककुंज प्रफुल्ल होतां दयिताचरणाघातें
कुसुमें येती प्रियामुखांतिल मदिरेनें बकुलातें १
सखीस दिधलीं असतीं नामें मनिंचे पुरवुनि कोड
जी रेवातटकलहंसाच्या कलध्वनीसम गोड २
केव्हां ' मंदालिका ' नाम हें नाम ' चित्रलेखा ' वा
' मंजलिका ' ' मंजरिणी ' ऐशीं झंकारिति मम भावा ३
येत्या सकलहि चैत्रज्योत्स्नारात्रीं कुंजवनातें
अशोकशाखा प्रफुल्ल होती दयिताचरणाघातें ! ४

(४)

कुरबकमाला धारण करिती प्रिया कृष्णकेशांत
धरती लीलाकमल करामधिं कां हें कोणा ज्ञात ? १
अलक शोभते कुंदफुलांनीं कर्ण शिरीषसुमांनीं
नवनीपाची माळ हालती डुलत मेखलास्थानीं २
धारायंत्रीं स्नान करुनि कच सुवासधूपें सुकवी
लोध्रसुमाच्या शुभ्ररेणुंनीं स्वकीय मुख बहु सजवी ३
कालागरुच्या सुगंधि लेपें तनु भूषवुनि नितान्त
कुरबकमाला धारण करिती प्रिया कृष्णकेशांत ! ४

(५)

कुंकुमलिखिता प्रणयपत्रिका झांकित तद्वक्षाला
मरालमिथुनें तद्वसनांचल अंकित असता झाला १
विरहीं आषाढीं दयिताशा लावी वाट पहाया
पूजापुष्पें एक एक दिन गणीत बसती वायां २
वीणा घेउनि अंकीं गातां गान अडखळे वाणी
रूक्ष केशही गळते नयनीं गळतें झरझर पाणी ! ३
मीलनरात्रीं पायीं पैंजण कुटिल, करिति नादाला
कुंकुमलिखिता प्रणयपत्रिका झांकित तद्वक्षाला ४

(६)

आवडत्या सारिके शिकविलें असतें प्रियकरनाम
कंकणझंकारीं नाचविती मयूरास अविराम १
कपोत धरुनी उरीं मुखीं मुख लावुनि करिती प्रेम
द्यावा चारा कमळकळीचा हंसीला हा नेम २
अलक हालती वेणी डोले वदे शौरसेनींत
पडुनि सखीच्या गळां 'हला पिय सहि!' हें संबोधीत ३
तरुण आम्रतरु सिंचावा कीं जलें गोड किति काम
आवडत्या सारिके शिकविलें असतें प्रियकरनाम ! ४ ''

ही समग्र कविता 'युगवाणीं' त आलेली आहे (जाने. १९४९) असो.

मेघदूतांतील आणखीहि कांहीं बाबींचा येथें उल्लेख उचितच होईल. या खंडकाव्याचा आरंभ आपल्या आर्यसंकेतानुसार ईशस्मरण किंवा ईशनामनिर्देश करून करण्यांत आलेला दिसतो. 'राम'गिरि किंवा ' जनकतनया ' या निर्देशांत हें मंगल साधण्यांत आलेलें आहे. राम व सीता हीं नामें ' मङ्गलं मङ्गलानाम् ' अशींच जगद्वंद्य आहेत.

तसेंच, ' रामगिरी 'चा निरोप घेऊन हे मेघा ! तूं आपल्या प्रवासास निघावें अशी प्रार्थना जेव्हां मेघास यक्ष करतो (श्लो–१२) तेव्हां मित्रास सहज आलिंगन देतांना त्याच्या कटिभागावर उमटलेल्या श्रीरामचंद्राच्या वंद्य पाउलांचेंही स्पर्शपूर्वक वंदन ध्वनित आहे ! त्या योगानें प्रवास निश्चितपणें होईलच अशी शुभकामना प्रकट झाली आहे.

पूर्वमेघाचे शेवटीं जो सुरम्य श्लोक आहे त्यांतील अर्थच्छटांच्या योगानें नायकाचा नायिकेशीं प्रीतिसंगम सुचविण्यांत आला आहे, असा ' पूर्णसरस्वती ' या प्रतिभावान् टीकाकाराचा तर्क आहेच हें मागें निर्दिष्ट केलें आहे.

मेघदूताचा शेवटचा श्लोक, जो मेघास आशीर्वादात्मक आहे तो-हि अनेक ध्वन्यर्थांनीं भरलेला आहे असें विद्वान् टीकाकारांनीं वर्णिलें आहे. त्याचप्रमाणें ' इष्टान्देशान् विचर जलद प्रावृषा संभृतश्रीः ! ' या चरणांत ' श्रीः ' हा शुभ शब्द कालिदासानें घातला आहे. बहुधा याच 'श्री'च्या अनुरोधानें भारवि, माघ, श्रीहर्ष याहि कवींनीं आपापल्या महाकाव्यांतील प्रत्येक सर्ग ' श्र्यङ्क ' ' लक्ष्मीलाञ्छित ' असे केलेले असावेत. कालिदासाच्या खंडकाव्याचें हें अनुकरणीय गमक आपल्या महाकाव्यांत अनुसरतांना या कवींनीं कालिदासास अत्यंत बहुमान दिला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि तसें पाहिलें तर ' खण्डकाव्य ' हें महाकाव्याचा खण्ड जो सर्ग त्याप्रमाणेंच होय. महाकाव्याचे जे जे सर्ग असतात तितकीं तीं खंडकाव्येंच होत असें म्हणणें फारसें चूक होईल असें वाटत नाहीं. एकादा काव्यमय प्रसंग तुटक वर्णन करणें हें खंडकाव्याचें कार्य, तर तसे अनेक प्रसंग संगतवार वर्णन करणें हें महाकाव्याचें कार्य म्हणतां येईल;म्हणूनच खंडकाव्य व काव्यखंड हें एक समीकरणच आहे

असें म्हणावेंसें वाटलें तर तें खास अयोग्य म्हणतां येणार नाहीं.

अशा सर्व खंडकाव्यांत 'मेघदूत' हेंच सर्वोच्च असें आहे. जसें काय, 'दिवः कान्तिमत् खंडमेकम्!' मेघदूताचे पूर्वमेघ व उत्तरमेघ हे दोन भाग जणुं कालिदासीय महाकाव्याच्या दोन सर्गांसारखे होत. फरक रचनादृष्ट्या एवढाच कीं, सर्गान्तीं पुष्कळदां उपसंहार भिन्न वृत्तांनीं केलेला असतो तसा मेघदूतांत केलेला नाहीं–पण खंडकाव्यांतहि तसा भिन्नवृत्त-समारोप असावयास प्रत्यवाय नाहीं–किंबहुना विविधवृत्तात्मक सर्ग असू शकतो–तशीं खंडकाव्येंही आहेत. एकवृत्तखंडकाव्यास 'संघात' म्हणतात. पहा– "यत्र कविरेकमर्थं वृत्तेनैकेन वर्णयति काव्ये ।
संघातः स निगदितो वृन्दावन–मेघदूतादिः ॥"

(काव्यादर्शटीका, कै. पं. रङ्गीशास्त्रीकृत.)

सुश्लोकमेघाच्या रचनेस, समग्र मूळ अर्थ उत्तम तऱ्हेनें यावा या हेतुसिद्ध्यर्थ वृत्त उपजाति हेंच स्वीकारावें असें विचारान्तींच मीं निश्चित केलें. एका कालिदासीय मंदाक्रान्तेचा एकाच मराठी मंदाक्रान्तेंत सामग्र्यानें प्रसादगुणयुक्त अर्थ आणणें जवळ जवळ अशक्यच आहे, असें इतर सर्व तशा अनुवादकांचे स्तुत्य प्रयत्न आदरानें लक्षांत घेऊनहि माझें प्रांजल मत झालेलें आहे. मंदाक्रान्ता वृत्ताचेंच अस्तित्व अनुवादाच्या यशस्वितेस आवश्यक आहे असेंहि मुळींच नव्हे. मंदाक्रान्तेहून प्रचारांतलीं दीर्घतर वृत्तें म्हणजे शार्दूलविक्रीडित व स्रग्धरा हींच होत. पण मला तीं येथें रोचक वाटलीं नाहींत. अर्धान्तीं यमक योजून उपजाति वृत्तच या कार्यासाठीं योग्य अर्थवाहक होऊं शकेल, व दोन उपजातींत एका मूळ मंदाक्रान्तेचा अर्थ शक्य तेथें सौष्ठवानें बसवावा, व जरूर तर कांहीं स्थलीं त्यासाठीं तीन पूर्ण उपजाति योजाव्यात असें धोरण ठेऊन हा 'सुश्लोकमेघ' मीं पूर्ण केला आहे. एका मंदाक्रान्तेंत ६८ अक्षरें व दोन उपजातींत ८८ अक्षरें म्हणजे अर्थसमावेशाचे दृष्टीनें ही योजना मूळच्या ११७ पैकीं १०७ श्लोकांस तरी अनुरूपच वाटली, व बाकीच्या १० मूळच्या श्लोकांचा अर्थ तीन ती उपजातींत बसवावा लागला. अनुवादाचें प्रमाण १ उपजाति हें असल्यामुळें २ अगर, ३ उपजाति म्हणजे श्लोकदृष्ट्या रचना पूर्ण झाल्यानें त्यांत

अनुचितता कोणतीच घडूं शकली नाहीं. उपजाति हें वृत्त कालिदासानें जसें सृष्टिवर्णनांत तसेंच विरहशोकादि प्रसंगांसहि आपल्या 'रघु-कुमारांत अनेकठिकाणीं उत्कृष्टतेनें योजलेलें आहे. (रघुवंश, सर्ग २, १४, कुमारसंभव सर्ग १, ३) आतां 'उपजाति' स्वीकारामुळें मूळ मंदाक्रान्तेंत जो 'देवगिरि' 'देवपूर्व गिरि' असा कालिदासास बसवावा लागला होता—तो सुश्लोकमेघांत छान बसला. [मेघदूत श्लोक ४२, सु. मे. श्लो. ८९] परंतु उपजातींत म-गण बसूं शकत नसल्यामुळें 'निर्विंध्या' 'गम्भीरा' या नद्यांचे बाबतींत [निर्विंध्य नदी, गम्भीर नदी अगर गभीरा नदी अशी] वृत्तोचित रचना करावीच लागली !! मुक्तच्छंदवाद्यांना असे कोणतेच पेंचप्रसंग उद्भवले नसते हें खरें! असो. अनुवादकाच्या अडचणी लक्षांत घेण्यासाठींच हें येथें थोडें लिहावें लागलें आहे. प्रसादमाधुर्यादि गुणांत मुळींच ढळ पोंचूं नये असेंच धोरण ठेवलें आहे. यशस्विता रसिकांनींच अजमावावी.

'सारङ्गास्ते जललवमुचः सूचयिष्यन्ति मार्गम्' (मे. श्लो. २१) यांतील 'सारङ्ग' शब्दाचे अनेक अर्थ घ्यावेत कीं न घ्यावेत याबद्दल टीकाकारांत ऐकमत्य नाहीं. तथापि मल्लिनाथसूरीनें तीन अर्थ घेऊन ते तीनहि क्रियापदांशीं यथासंख्य अलंकारानें योजून कल्पकता प्रकट केली आहे. मला ती बरी वाटल्यानें 'सारङ्ग' शब्दाचे तीनही अर्थ स्पष्ट करून मीं अनुवाद केला आहे. 'सारङ्ग' शब्दाचा एकच अर्थ स्वीकारल्यास अर्थातूच तीन अर्थ करणें चुकीचें ठरणार. पण अनुवादकास कांहींतरी एक निश्चित करूनच मार्गक्रमण करावें लागणार हें विसरून चालवयाचें नाहीं. नाहींतर अमुक अर्थ केल्यास अमुक अनुवाद, तमुक केल्यास तमुक अनुवादपंक्ति घ्यावी. इ. सूचना करणें जरूर पडेल—पण मला तें योग्य वाटत नाहीं.

तसेंच—('दिङ्नागानां'.. मे. श्लो. १५ मध्यें) निचुल व दिङ्नाग हे शब्द श्लिष्ट आहेत असा भाव मल्लिनाथानें प्रकट केला आहे त्याची योग्यायोग्यता ठरविणें कठिण वाटण्याचा संभव आहे. म्हणून ते शब्द अनुवादांतहि तसेच ठेविले आहेत. वाचकानें श्लिष्टार्थ पटत असल्यास घ्यावा वा सरलार्थ घ्यावा असा अनुवादकाचा अभिप्राय आहे.

पण अशीं संदिग्ध स्थळें अत्यल्पच आहेत.

अनुवादाची भाषा कितीही सोपी करण्याचें ध्येय ठेवलेलें असलें तरीही अनुवादकर्त्यांच्या स्वभावांतील रीति वैदर्भी, पांचाली, गौडी इ. त्यांत प्रकटल्यावांचून राहणारच नाहींत. कांहीं कांहीं मूळ कल्पना संस्कृतज्ञांनाच कळणाऱ्या असल्यानें त्यांचें कितीही सोपें सोपें म्हणून भाषांतर केलें तरी तें कांहींसें अवघड होणें अपरिहार्यच आहे. तथापि मराठी वाचकांस सर्वार्थ समजावा असेच सर्व प्रयत्न केले आहेत. शिवाय आवश्यक तेथें टीपा देऊनही विशदतेस साहाय्य केलें आहे.

असो, आतां प्रस्तुत लेखाच्या समारोपास लागूं. वास्तविक ' अवतरणिका ' म्हणजे लहानशी प्रस्तावना. कितीहि लिहिलें तरी थोडेंच वाटावें असा हा विषय असल्यानें 'अवतरणिका' हें नांव या येवढ्या लेखासहि सार्थच होईल ! कालिदासाच्या कालनिर्णयाकडे अनेक अधिकारी, विद्वानांनीं लक्ष्य दिलेलें असल्यानें मीं ती चर्चा या लेखांत केली नाहीं. इ. स. पूर्वी प्रथम शतक हाच कालिदासाचा काल असावा असें मानण्याकडे माझा कल आहे. [मागें पृ. (८०) मध्यें प्रो. रायडरच्या लेखाचा उतारा दिला आहे त्यांत कालिदासाचा काल इ. स. चें ५ वें शतक असावा असें त्याचें मत दिसतें. पण मीं कालनिर्णयासाठीं तो उतारा उद्धृत केलेला नसून, कालिदासाचें असामान्यत्व प्रतिपादन करण्यासाठींच त्याच्या लेखाचें तेथें भाषांतर करून अवतरण घेतलें आहे.]

अनुवादप्रयत्नांचें जें विवेचन मीं केलें आहे त्यांत **कन्नड भाषेंतहि** ३–४ अनुवाद झाले आहेत अशी माहिती कवि प्रा. बेंद्रे यांजकडून कळली ती पुरवणीदाखल येथें उल्लेखीत आहे. स्वतः कवि बेंद्रे यांनींच त्यांपैकीं एक कन्नड मेघदूतानुवाद केल्याचें व त्याच्या आतांपर्यंत २ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्याचें सांगितलें. ती भाषा कळत नसल्यानें अनुवादांचें गुणावगुणपरीक्षण येथें करणें अशक्य आहे.

एक नवीन मराठी मेघदूतानुवाद नुकताच ' मौज ' दिवाळी अंक १९४९ यामध्यें प्रसिद्ध झाला आहे. तो कवि 'कुसुमाग्रज' (श्री. वि. वा. शिरवाडकर) कृत आहे. भाषेचा सोपेपणा या रचनेंत आहे. पिंजर-

लडच्या उमरच्या रुबायाप्रमाणें तींत १ल्या २ऱ्या व ४ थ्या पादान्तीं एक यमक असून तिसरा चरण अयमकित आहे. चाल ' समुदितमदने रमणीवदने चुंबनवलिताधरे ' या पद्धतीची आहे. मूळ १ श्लोकास ४ ओळी याप्रमाणें अनुवाद आहे. ' कुसुमाग्रजा 'नीं मूळ कालिदासाचा अर्थ उत्तमपणें समजून घेतलेला दिसत नाहीं. त्यामुळें अनुवादांत काटेकोरपणा तर नाहींच उलट कित्येक स्थलीं अर्थांचे अनर्थ किंवा अनभिप्रेत असेच अर्थ केले आहेत ! फक्त एक उदाहरण घेऊं– (' स्थित्वा तस्मिन् ' इ. मेघदूत १९ व्या श्लोकाचा अनुवाद पहा–)

" लतागृहांतुन विहार करिती जिथें भिल्लिणी सदा
गिरिवरती त्या जरा विसावुनि जा पुढतीं नीरदा,
विंध्याचा खडकाळ पायथा त्यांतुनिया वाहती
चित्रांकित हत्तिणीप्रमाणें दिसेल तुज नर्मदा "

मुळांत " विंध्यपादे विशीर्णा " अशी नर्मदा हत्तीच्या अंगावर रंगविलेल्या चित्रपंक्तीप्रमाणें दिसेल असा आशय असतां ' नर्मदा 'च हत्तिणीप्रमाणें दिसेल असा चुकीचा अर्थ अनुवादकानें केला आहे. असेच चुकीचे प्रकार व रचनेचें शैथिल्य, संस्कृत जोडाक्षराचा आघात न पाळणें, व्याकरणाच्या ऱ्हस्वदीर्घांच्या चुका, ' हीन ' बद्दल ' हिन ' लिहिणें इ. प्रकारांमुळें रसहानि फार झाली आहे. ' मुलायम ' ' अकेली ' ' मुशाफरी ' ' नजीक ' ' वृक्षावळ ' ' पर्णावळ ' ' पत्रावळ ' इ. अरूढ शब्दयोजना दोषांत भर घालून अधिकच वैरस्यास कारण झाली आहे. 'अर्थापाये न खलु कविता पुष्यति स्वामभिख्याम् ।' असेंच म्हणावेंसें वाटतें ! मात्र या अनुवादाला चित्रांची सजावट आकर्षक लाभली आहे. हा अनुवाद उत्तमप्रकारें सुधारूनच कवींनीं प्रसिद्ध करावा.

" काव्याच्या भाषांतरांतील कलादृष्टि ! " या नांवाचा माझा एक लेख ' यशवंत ' डिसेंबर १९४१ च्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे तो वाचकांस उपयुक्त वाटेल म्हणून थोडा सुधारून या ' अवतरणिके ' नंतर देण्यांत येत आहे. तो या प्रस्तावनेची पुरवणी म्हणायला हरकत नाहीं !

अनुवाद तयार होतांच अनेकांनीं वाचून पाहिला व आपले विचार मला अगत्यपूर्वक कळवून मोठें सहाय्य केलें. अशा मंडळींत पुढील नामनिर्देश मी साभार व सानंद करीत आहें:–पंडित श्री. महादेवशास्त्री जोशी, कै. रा. ब. का. ना. दीक्षित, श्री. ग. रा. हवलदार B. A., LL. B. वे.कवि श्री. विश्वनाथशास्त्री कात्रे, सहृदयकवि सर चिंतामणराव देशमुख, कवि विष्णु नारायण मुंगळे, कविवर्य 'विरागी' उर्फ प्रो. गणपतराव हुपरीकर M. A., B. T., रा.गो. श्री. हुपरीकर B. A. B. T. व पंडित गणेश व्यंकटेश जोशी, आचार्य (B. H. U.) अध्यापक भारतीय विद्याभवन, प्रा. श्री. शं. खानविलकर M. A.,कै. प्रो.चिंतामण नीलकंठ जोशी M. A. हैद्राबाद, 'संजीविनीहरण'कर्ते कवि श्री. विनायकराव साठये, 'आराधना'कर्ते मर्मज्ञ, कवि श्री. वामन नारायण देशपांडे, महामहोपाध्याय प्रि. मिराशी, रसिकवर्य डॉ. ग. वि.देसाई, वे.पं.ना. द. जोशी, इ.इ. सर्वांनींच अतिशय रसिकतेचें प्रोत्साहन दिलें, त्याचप्रमाणें घरच्या मंडळींपैकीं भगिनी ती. सौ. पार्वतीबाई सरदेसाई, पुतणी चि. सौ. सुमतिदेवी नारळीकर M. A., पुतणे चि. गोविन्दराव शं.हुजूरबाजार B. E. (Elec.) व त्यांचे बंधु चि. मोरया, चि. श्रीकृष्ण शंकर श्रीखंडे, तसेच भाचे चिं.राम केशव पंडित,बी.एस्सी.बी.टी. मार्मिक कवि चि. गिरिधर केशव पंडित, भाची चि. कु. सुमति केशव पंडित एम्. ए. व भाचा, चि. प्रभाकर विद्याधर कशाळकर, बी. एस्सी (ऑ) यांच्याहि रसिकतेचा मी कौतुकानें उल्लेख करतों.विशेषत: चि.गिरिधर के. पंडित यांनीं ' सुश्लोकमेघ ' व अवतरणिकादि मार्मिकपणें वाचून स्वयंस्फूर्तीनें पुढील सुंदर अभिप्रायात्मक ' आर्याद्वय सुश्लोकमेघा ' स दिलें. तें सहृदयांस कल्पकतेचें व भावपूर्ण रसिकतेचें रमणीय द्योतक वाटल्यावांचून राहणार नाहीं म्हणूनच येथें मी तें उद्धृत करीत आहें:–

" ' सुश्लोकमेघ ' वाचुनि जेव्हां मी पाहिं कैकदा साचा ।
मधुर ग्रंथ प्राकृतिं वाटे प्रत्यक्ष कालिदासाचा ! ॥१॥
वाग्देवीनें दिधला ' कविकुलगुरु ' मान कालिदासास;
' हो कवि कुलगुरुभूषण, ' इच्छी ती या सुकालि दासास ॥२॥
–गिरिधर पंडित "

या काव्यमय हृदयोद्गारांनीं मला अत्यंत आनंद झाला असला तरी, हा 'सुश्लोकमेघ' रसिकांचे स्वाधीन करतांना मीं त्यांस कविवर्यमयूर-वाणीनें पुढील नम्र प्रार्थना करीत आहें–

"वर्णगुणांतर न गणुनि एकीं ठेवूनि दृष्टि मधु–पानीं,
सेवावेंचि भलतसें कुसुम प्रेमें रसज्ञ मधुपांनीं" – मोरोपंत

आमचे विद्वान् मित्र डॉ. खानोलकर, डॉ. खत्री, डॉ. राशिंगकर यांनीं दिलेल्या रसिक उत्तेजनाबद्दलहि फार आभार वाटतात. तसेंच सुबक छपाईबद्दल श्रीसिद्धेश्वर प्रेसचे मालक श्री. बळवंतराव टकार यांचा ऋणी आहें.

ग्रंथांत योग्य चित्रें घालून 'सुश्लोक–गोविंद' व 'सुश्लोककुमार' या त्याच्या अग्रजांप्रमाणेंच शोभा आणावी असा विचार होता. पण समर्पक उत्कृष्ट चित्रें न लाभल्यानें नाइलाज झाला. यक्षाचें चित्र जसें पुरें होऊं शकलें नाहीं तसेंच माझें, चित्रें घालून पुस्तक शृंगारूं हें मनश्चित्रहि या खेपेस तरी अपूर्णच राहिलें असें म्हणावयास पाहिजे. तथापि श्रीकृपेंकरून अनुवादग्रंथ मनाप्रमाणें पूर्ण होऊन आज अशा स्वरूपांत मला रसिकांचे हातीं देतां येत आहे याचा अत्यंत आनंद होत आहे. 'सुश्लोकगोविंद', 'सुश्लोककुमार' व 'सुश्लोकमेघ' ही 'सुश्लोक'त्रयी ज्या लोकत्रयाधिपतीचे कृपेनें मजसारख्याकडून पूर्ण केली गेली, त्यास अत्यंत नम्रपणें वंदून कालिदासाचाच आशीर्वाद—

"इष्टान्देशान्विचर जलद ! प्रावृषा संभृतश्रीः ।"

हा 'सुश्लोकमेघास'सहि तसाच निरन्तर लाभावा अशी मी भक्तचातकमेघ श्रीसीतारामचंद्र यांस प्रार्थना करितों. त्याचप्रमाणें मीं भक्तिभावानें आरंभिलेला व बालकांड अखेर आतांपर्यंत पूर्ण केलेला श्रीतुळसीदासांच्या रामायणाचा (रामचरितमानसाचा) मराठी सुरस श्लोकानुवाद 'सुश्लोक–मानस' मजकडून ते श्रीसीतारामचंद्र परिपूर्ण करून घेवोत व सज्जनांनीं तोच आशीर्वाद मला द्यावा अशी त्यांस नम्र प्रार्थना करून मी तूर्त हा अवतरणिकालेख संपवितों.

इति शम् ।

कोल्हापूर मकरसंक्रमण शके १८७१
ता. १४ जानेवारी १९५०

रामचंद्र चिंतामण श्रीखंडे

'काव्याच्या भाषांतरांतील कलादृष्टि !'

सुंदर काव्याचें भाषांतर खरोखरच सुंदर वठलें असें आपण केव्हां म्हणतों ? तर जेव्हां तें भाषांतर हें जणुं भाषांतर नसून एखादें स्वतंत्र काव्यच आहे असें वाटतें तेव्हां. उदाहरणार्थ: मेघदूताचें भाषांतर तेव्हांच उत्कृष्ट म्हटलें जाईल कीं जेव्हां वाचकांस असें क्षणभर तरी वाटेल कीं कालिदासानें संस्कृतमध्यें जसें मेघदूत रचलें तसें तें या अन्य भाषेंतहि जणुं काय कालिदासानेंच रचिलें आहे ! आतां हें खरें कीं स्वत:चेंच एका भाषेंत उत्कृष्ट ठरलेलें काव्य त्याच कवीनें अन्य भाषेंत भाषांतरित केलें तर तेंहि तितकेंच उत्कृष्ट, हमखास होईल असें नाहीं. दोनी भाषांवर जरी त्या कवीचें प्रभुत्व विशेष आहे असें गृहीत धरलें तरी एका भाषेंत जें स्फूर्तिजन्य काव्य त्यानें रचिलें तितकें सुंदर त्याचें भाषांतरहि त्याचे हातून वठेलच, असा नियम मुळींच बांधतां येणार नाहीं. उत्तम भाषांतरांत एक अभिनवच सौंदर्य निर्माण होत असतें व त्यासाठीं भाषांतरकार हाहि एक उत्तम प्रतिभावान् कवीच असणें जरूर असतें.

काव्य हें भाषांतरित करतांच येत नाहीं असें म्हणणाराहि पक्ष आहे. एका दृष्टीनें हें म्हणणें कांहीं अंशीं बरोबरच आहे.कारण भाषांतर उत्तम झालें असल्यास त्यांत एक नवीनच सौंदर्य उत्पन्न होत असतें. म्हणजे मुळांतील सौंदर्य जसेच्या तसें भाषांतरांत न अवतरतां भाषांतरकाराच्या कौशल्ययुक्त करामतीनें भाषांतरांत सौंदर्याची अभिनवता दृष्टीस पडावयास हवी. कित्येकदां मुळाहूनहि भाषांतर अधिक सुरस, प्रसादयुक्त व गुणवान् होऊं शकेल. परंतु पुष्कळ वेळां खरोखर घडतें तें असें कीं, भाषांतरकाराचे ठायीं मूळ कवीच्या इतका व त्या प्रकारचा गुणसमुच्चय बहुधा मुळींच नसतो व त्यामुळें भाषांतरांत कोणतेंच सौंदर्य प्रतीतीस येऊं शकत नाहीं. व यामुळें काव्याचें भाषांतरच अशक्यप्राय आहे असें म्हटलें तर तेंहि अयोग्य म्हणतां येणार नाहीं. कारण उत्कृष्ट भाषांतरें हीं अपवादात्मक व फारच तुरळक आढळून येतात. विशेषत: काव्याचे बाबतींत तरी असें प्रामुख्यानें दृष्टोत्पत्तीस येतें.

काव्याच्या भाषांतरासंबंधीं कांहीं ठोकळ मार्गदर्शक नियम सांगतां आल्यास केव्हांहि उपकारक होईल. या बाबतींत अभ्यासू विद्यार्थ्यानें

'Essay on the Principles of Translation' हा Everyman's Library series पैकीं Tytler या ग्रंथकाराचा एतद्विषयक ग्रंथ अवश्य पहावा. लॅटिन्, ग्रीक वगैरे भाषांतील प्राचीन काव्यांचीं इंग्रजींत कोणतीं यशस्वीं भाषांतरें झालीं किंवा इतर युरोपियन् भाषांतील उत्तम ग्रंथांचीं इंग्रजींत कोणतीं उत्तम भाषांतरें झालीं यांचीं कांहीं उदाहरणें या ग्रंथांत आढळतील. लॅटिन्, ग्रीक या भाषा थोडक्यांत जास्त अर्थ सामावूं शकणाऱ्या आहेत व त्या दृष्टीनें त्यांचें इंग्रजींत भाषांतर जरा विस्तृत होत असतें. आपल्याकडे संस्कृत व मराठी यांच्या अन्योन्यसंबंधाविषयींहि असेंच म्हणतां येईल. संस्कृतमध्यें जो अर्थ उत्तम कवि थोडक्यांत बसवितात तो मराठींत जशाचा तसा आणावयास किंचित् अधिक विस्तार प्रायः आवश्यक असतो.

सर्व भाषा जर सारख्याच असत्या तर भाषांतर करणें फारच सोपें झालें असतें. परंतु, जितक्या व्यक्ति तितक्या प्रकृति म्हणतात त्याप्रमाणें, भाषाभाषांमध्येंहि प्रकृतिभेद किंवा आपापलें विशिष्ट असें वैशिष्ट्य असतें. यासाठींच मूळ ग्रंथांतील स्वारस्य व अर्थ (Spirit & sense) यांकडे उत्तम दृष्टि ठेवून भाषांतरकारानें मुळांतील कल्पना आत्मसात् करून घ्याव्यात व आपणास उत्तम वाटतील अशा शब्दांनीं व पद्धतीनें अन्य भाषेंत निवेदन कराव्यात, म्हणजे त्याचें भाषांतरकार्य उत्तम झालें असें म्हणतां येईल. मूळ ग्रंथांतील दोषहि—पाल्हाळ, नीरसता इत्यादि देखील—भाषांतरकारानें जसेच्या तसेच दाखविले पाहिजेत असें म्हणणाराहि एक पक्ष आहे. या पक्षाचें म्हणणें असें कीं मुळांतील दोष व गुण यांचें तंतोतंत प्रतिबिंब भाषांतरांत उमटलें पाहिजे. मूळच्या गुणास उजाळा देऊन व दोष लपवून भाषांतर करणें या पक्षीयांस मान्य होणार नाहीं. परंतु असें जसेंच्या तसें copy to copy भाषांतर हें क्लिष्ट होऊन पुनः नीरस होण्याची फार भीति असते.

उत्तम भाषांतरांत मुळांतील सर्व कल्पना उत्तमपणें उतरलेल्या असल्या पाहिजेत. मूळचेच ओज, प्रसाद, माधुर्य वगैरे गुण भाषांतरांत उतरले पाहिजेत, आणि इतकें होऊन भाषांतर हें एक स्वतंत्रच रचनेचें

लेखन असल्याप्रमाणें भासलें गेलें पाहिजे. अर्थात् ही गोष्ट वाटते तितकी मुळींच सोपी नाहीं. पुष्कळ वेळां स्वतंत्र ग्रंथापेक्षांहि उत्तम भाषांतर करणें अधिक चातुर्याचें आहे असें पटल्यावांचून राहणार नाहीं. कारण उत्तम भाषांतरांत मूळ ग्रंथाचें बंधन व अवधान ठेवून पुनः स्वप्रतिभेचें कौशल्य व स्वातंत्र्य सौंदर्ययुक्त परिणामकारकतेनें त्यांत मिश्रित केलें पाहिजे. तरच तें भाषांतर ही एक उत्तम कलाकृति गणली जाईल.

शब्दशः भाषांतर कितीहि करतां म्हटलें तरी काव्याचीं बंधनें अशीं आड येतात कीं तें अशक्यप्राय होऊन बसतें. यासाठींच काव्याचें काव्यांतच भाषांतर करतांना थोड्याबहुत सवलती घेणें आवश्यक ठरतें. मात्र औचित्याच्या मर्यादा सांभाळूनच या सवलती घेतल्या गेल्या पाहिजेत. एका भाषेंतील काव्याचें हृद्गत अन्य भाषेंत आणतांना, अत्तर उडून जाईल त्याप्रमाणें, काव्यत्वशून्य भाषांतर होण्याचा फार संभव असतो. व त्याची भरपाई त्यांत अभिनव काव्यत्व निर्माण केल्यावांचून कधींहि होऊं शकत नाहीं. म्हणूनच निष्प्राण भाषांतर टाळावयाचें असल्यास भाषांतरकारानें स्वतःच्या कवित्वगुणाचा उपयोग उत्तम तऱ्हेनें केला पाहिजे. अर्थात्च भाषांतरकर्ता हाहि चांगला कवि असल्यावांचून त्यानें केलेलें काव्यभाषांतर काव्यमय होणें संभवनीय नाहीं. वामनपंडित, मोरोपंत यांनीं केलेलीं भाषांतरें हृदयंगम उतरण्याचें कारण पंडित व पंत हे स्वतः उत्तम कवि होते हेंच होय.

भाषांतर करावयास घेतलेल्या काव्यांत जरी कांहीं भाग खरोखरच नीरस असला, तरी त्याचें भाषांतर शक्य तितकें सुरस करण्याचा यत्न भाषांतरकारानें केला पाहिजे. व जो भाग मूळचाच सुरस असेल तो मुळाहूनहि अधिक सुरस करण्याची हांव भाषांतरकारानें धरली पाहिजे. असें रसमय काव्यरचनेचें ध्येय समोर ठेवल्यावांचून भाषांतर हें खरें आल्हादकारक काव्य होणार नाहीं.

भाषांतराचे प्रकार अनेक होऊं शकतील. उदाहरणार्थ —

१ शब्दशः भाषांतर

२ संक्षिप्त भाषांतर

३ विस्तृत अनुवादात्मक भाषांतर

४ कांहीं शब्दशः, कांहीं संक्षिप्त व कांहीं विस्तृत अनुवादयुक्त भाषांतरांच्या कमी अधिक मिश्रणानें होणारें भाषांतर.

याच प्रकारांत मूळ काव्याच्या रीतीचें, पद्धतीचें, गुणांचें वगैरे प्रत्येक वैशिष्टयाचें भाषांतरांत अनुकरण करण्याचें धोरण ठेवणें, न ठेवणें यांमुळेंहि भाषांतरांत अनेकविध प्रकार होऊं शकतील. शिवाय हा प्रत्येक प्रकार ज्या मानानें साधेल त्या मानानें उत्तम, मध्यम, कनिष्ठ होऊं शकेल. मराठींतील कांहीं उदाहरणें घेऊन हें वर्गीकरण अधिक विशद करण्याचा प्रयत्न करतां येईल.

गीतेच्या समश्लोकी भाषांतराच्या यशस्वितेबद्दल मोरोपंतांनीं वामनपंडितांना—

'रीति समश्लोकीची ऐशी साधेल काय अन्यास ?'

असें प्रशंसापत्र दिल्याचें सुप्रसिद्ध आहे. वामनपंडितांना श्लोकांची आवड म्हणून त्यांनीं समश्लोकी गीताटीका केली. पंतांना आर्यांची आवड म्हणून त्यांनीं गीतेवर समार्या टीका केली. मुक्तेश्वरांनीं सम ओवीबद्ध टीका केली. प्रत्येकानें आपापल्या आवडीप्रमाणें व शक्तीप्रमाणें हीं भाषांतरें केलेलीं आहेत.

समश्लोकी इचें नांव, जितुके श्लोक मूळिंचे
टीकेचे तितुके श्लोक सज्जनानंदकारक ३
श्लोकाचसारिखे श्लोक, श्लोकीं श्लोकार्थसंग्रह
करितो उत्तमश्लोक 'समश्लोकी' अशी हरी ४
कोठें पदपदाचाहि अर्थ भावार्थयुक्तहि
कोठें कोठें भावमात्र बोलेल भगवान् स्वयें ६
भाषा कैसी तरी हो कां अर्थीं तात्पर्य सज्जना
तथापि भगवद्वाणी हे प्राकृत म्हणों नये ७

—वामनपंडित समश्लोकी गीतेचा उपोद्घात

समश्लोकी व अशा प्रकारच्या टीकेंत महत्त्वाचें काय गणिलें जावें याविषयीं पंडितांचें मत पुढीलप्रमाणें दिसतें: —

अर्थ, भावार्थ किंवा तात्पर्य यांवरच सजनांची दृष्टि असते किंवा असावी असाच पंडितांचा ' भावार्थ ' दिसतो व यांत गैरवाजवी .कांहीं नाहीं हें उघडच आहे. तथापि भावार्थाबरोबरच मुळांतील बहिरंग-सौंदर्यहि--वृत्त, रचनापद्धति, शब्दालंकार, अनुप्रास, यमक यांचेंहि प्रतिबिंब भाषांतरांत उमटलें तर दुधांत साखरच म्हणतां येईल. श्रीमद्भागवतान्तर्गत दशमस्कंध पूर्वार्धापैकीं अध्याय ३१ मध्यें 'गोपीगीत' नामक एक अत्यंत भावमधुर व रसमय गीत आहे. तें पुष्कळांच्या पाठांतहि असतें. माझ्या परमपूज्य कै. मातुःश्री ती. सौ. आक्का यांचेकडून मीं अनेकदां तें मोठ्या आवडीनें ऐकलें आहे. गोपीगीताचा अनुवाद वामनपंडितांनीं समवृत्तांत केला आहे. पण शुद्धकामदा वृत्तांतले मुळचे श्लोक १८ च असतां अनुवादांत ४५ श्लोक झालेले आहेत. म्हणजे ही समश्लोकी संख्यादृष्ट्या खरी नसून वृत्तदृष्ट्या खरी आहे. गीतेची त्यांची समश्लोकी मात्र उभयहि दृष्ट्या यथार्थ आहे.

गोपीगीताच्या समश्लोकींत एका श्लोकाचा अनुवाद, क्रमांक ४, ८, ११, १८ यांचा फक्त एकेका श्लोकांतच करण्यांत आला आहे, तर १, २, ६, १०, १२, १४, १६ व १७ या आठांचा दोन दोन श्लोकांत, ५, १३ व १५ यांचा तीन तीन श्लोकांत, ३, ७, यांचा प्रत्येकीं चार चार श्लोकांत, ९ व्या श्लोकाचा अनुवाद तर ८ श्लोकांत विस्तृतपणें आणण्यांत आला आहे. हा नववा श्लोक मुळांत असा आहे--

तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ।
श्रवणमङ्गलं श्रीमदाततं भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः ॥

— श्रीमद्भागवत १०–३१–९

गोपीगीताच्या मूळ संस्कृत शुद्धकामदा वृत्तांतील पद्यांची शब्दालंकारांच्या दृष्टीनें पाहाणी केली तर यमक व अनुप्रास यांची योजना मोठ्या खुबीनें सहज साधण्यांत आली आहे. प्रस्तुत श्लोकाच्या चारी चरणांत आद्ययमक तव--कव–श्रव–भुव हें स्पष्ट निदर्शनास येईल. तसेंच प्रत्येक चरणाचे यतीमुळें जे दोन भाग पडतात त्यांमध्यें आद्याक्षर सारखें आलें असल्यामुळें प्रत्येक पादांत अनुप्रासहि दिसून येतो. या

प्रमाणें खुबीदार रचना गोपीगीताच्या १८ हि शुद्ध कामदांत कमी अधिक प्रमाणांत यशस्वीपणें साधलेली आहे. वामनपंडितांनीं हें आद्ययमकाचें व अनुप्रासाचें अनुकरण मुळींच केलेलें नाहीं. तसें केलें असतें तर कदाचित् सहज प्रासादिक रचना जी साधली गेली आहे ती साधली नसती. म्हणून अनुवाद करतांना मुळांतील कोणतीं वैशिष्ट्यें अनुवादांतहि आणावयाचीं अगर आणावयाचीं नाहींत याचें स्वातंत्र्य अनुवादक कवि घेत असतो. बाकी, संस्कृतमधील आद्ययमकाची भरपाई मराठींतील नेहमींच्या अंत्ययमकानें झालेली आहे, असें वाटल्यास म्हणावें. वरील श्लोकाच्या अनुवादाचे श्लोक येथें उतरून घेऊं; म्हणजे वामन-पंडितांच्या टीकेचें धोरण स्पष्ट होईल:—

तुझि कथासुधा तापल्या जना निववि अंतरीं, विश्वजीवना !
अमृत निंदिती स्वर्गिंचें मुनी, तव कथामृता वंदिती जनीं. २०
अमृत मातवी स्वर्गिंचें हरी! तुझि कथासुधा बंध संहरी,
अमृत जे पिती त्यांचिया शिरीं चरण देउनी ने कथा वरी. २१
अमृत गोड हें जों जिभेवरी, तुझि कथासुधा गोड हे, हरी !
श्रवणिं आननीं बाह्य अंतरीं मधुर सर्वथा जे परोपरी. २२
कनक आणि ते गुंज जोखणें, तुझि कथा सुधातुल्य लेखणें,
सुलभ जे सदा सर्वही स्थळीं अमृत तुल्य तें देवताकुळीं. २३
त्रिभुवनेश ! तूं त्या तुला जशी करिति तुल्यता ऊर्णनाभिशीं,
अमृतसाम्यही श्रीकथामृता, वदति तेथ हा भाव तत्त्वतां. २४
सतत लक्षुमी ती तुझ्या उरीं तसिच मुक्ति ते श्रीकथेवरी,
बहु उदार जे जे अशी कथा श्रवण याचकां देति सर्वथा. २५
सुजन याचकां अर्पिती धनें, परि मदासि तीं होति साधनें,
हरि ! कथा तुझी विश्वपावनी बहु उदार जे वार्णिती जनीं. २६
विरहें जरी प्राण टाकिती तरि कथामृतें गोपिका जिती,
परि हरी ! तुझे संगतीविणें मरण तें बरें, काय हें जिणें ! २७

वामनपंडितांची सर्वच रचना मुळाप्रमाणें अमृतमधुर झालेली आहे. व याचें कारण पंडित या गीतांत मूळ वृत्ताचें अनुकरण करतांना व मूळ भावमधुर अर्थाची मराटींत आपल्या प्रतिभाभक्ति–गुणवैशिष्ट्यांनीं टीका करतांना अगदीं रंगून गेले आहेत हें असावें काय? पण एखादें काव्य मधुर कां झालें आहे ह्याची कारणमीमांसा करणें फारच अवघड आहे. मोरोपंतांनीं 'कृष्णविजयां'त पूर्वार्धासाटीं सर्वत्र आर्यागीति वृत्तासारखें क्लिष्ट व थोडें गैरसोईचें वृत्त योजिलें असल्यानें हें गोपीगीतहि आर्यागीति वृत्तांत एकेका श्लोकास एकेक आर्यागीति याप्रमाणें अनुवादिलें आहे. 'तव कथामृतं०' या श्लोकाचा अनुवाद पंतांनीं केला आहे तोहि तुलने-साटीं येथें देत आहें—

'तप्तांतें वांचविते तव सुकथामृत,' कवींद्र वर्णिति चविते।
'अघमद हरि; सुख करितें श्रवणें;' ते बहुद कथिति जे बहु हरि! तें ॥९॥

कृष्णविजय अ. ३१

यांत मूळची मधुर रसमय रचना किती क्लिष्ट रूपांतरांत पंतांसारख्यांच्या हातूनहि मराटींत अवतरली याचें नवल वाटतें! त्यांचें भाषांतर बहुधा शब्दशः आहे. पदरची भर पंतांनीं फारच थोडी घातलेली आहे. यमकें वैशिष्ट्यपूर्ण आहेत. पण आर्यागीति हें वृत्त पंतांच्या गीतीप्रमाणें सौंदर्य-पूर्ण वाटत नाहीं. प्रत्येक अर्धाच्या लहान व मोठ्या पादान्तीं यमक ठेविलें गेल्यानें ही क्लिष्टता आली आहे कीं काय समजत नाहीं. ही कारणमीमांसा कशीहि असली तरी भाषांतर वा अनुवाद हा रसमय व्हावा अशीच कोणीहि अपेक्षा करील. (मोरोपंतांच्या आर्याभारतांत मूळ भारताचा संक्षेप वा विस्तार करून काव्याला अत्यंत गोडवा आणल्याचींहि असंख्य उदाहरणें आहेत.)

भाषांतर किंवा अनुवाद समवृत्त किंवा विषमवृत्त कसाहि असला तरी तो रसमय उतरणें हें अनुवादक कवीच्या गुणवैशिष्ट्यावरच सर्वस्वीं अवलंबून आहे ही गोष्ट अनेकदां टीकाकार विसरतात. प्रस्तुत लेखकानें गीतगोविंदाचें सुश्लोकगोविंदांत जें रूपांतर केलें आहे, त्याविषयीं मत प्रकट करतांना गीतांचें गीतांतच भाषांतर करावें असें म्हणणारे एकदोन


टीकाकार भेटले, तर मूळ गीतांचें श्लोकांत भाषांतर केलें हेंच उत्तम झालें असें म्हणणारेहि कांहीं तज्ज्ञ आढळले. एका टीकाकाराचें मत असें— ' कित्येक भाषांतरकाराप्रमाणें शब्दाला शब्द ठेवण्याच्या पद्धतीचा अवलंब न करतां किंवा त्या प्रकारचें निर्जीव रटाळ शब्दांतर करण्यांत धन्यता न मानतां केवळ अर्थ व रस यांच्या अनुरोधानें अनुवाद करावा.' दुसरे एक टीकाकार सांगतात 'कोणत्याहि कवीनें परकीय भाषेंतील काव्य स्वभाषेंत जशाचें तसेंच उतरविणें हें कार्य अत्यंत दुर्घट आहे. किंबहुना असा प्रयत्न केल्यास तो बोजड किंवा रूक्ष असाच ठरत असल्याचा प्रायः प्रत्यय येतो.' प्रस्तुत लेखकानें या बाबतींत आपले विचार सुश्लोकगोविंद व सुश्लोककुमार या अनुवादकाव्यांच्या प्रस्तावनेंत प्रकट केले आहेत. त्यांत म्हटलें आहे– ' शब्दशः भाषांतर करण्यांतहि कसब आहेच. पण मूळचा गोडवा राखून शब्दशः भाषांतर आणि तेंहि पद्यांत करणें अत्यंत दुर्घट आहे. कोणत्याहि दीर्घ काव्याचें भाषांतर सुरस वठलें असेल तर तेथें भाषांतरकार कवीनें शब्दशः भाषांतर करण्याचा अट्टाहास धरलेला नाहीं, असेंच आढळून येईल.' 'प्रतिभा व बुद्धि या गुणांप्रमाणेंच मूळ कवीवर नितांत भक्ति असल्यावांचून अनुवादांत रसमय नवीनच सौष्ठव उत्तमपणें उतरणें अशक्य-प्राय आहे.' वृत्ताची निवड, शब्दांची रचना, अनुवादांत विशदीकरणाचे दृष्टीनें घालावयाची अनुरूप भर, मुळांतील कांहीं वैशिष्ट्यें सुटलीं असतील तर त्यांची अन्यत्र करण्यांत आलेली भरपाई, हीं सर्व औचित्यपूर्ण व सुरस होण्यास अनुवादकांत प्रतिभा व बुद्धि यांची अत्यंत आवश्यकता आहे हें कोण अमान्य करील ? थोरल्या शास्त्रीबोवांनीं पद्यरत्नावलीच्या प्रस्तावनेंत याच आशयाचें विवेचन मांडलें आहे–' मूळ ग्रंथांतील मुख्य अर्थ घेऊन तो प्राकृत भाषेच्या सरणीनें जितका सुरस रीतीनें व्यक्त करतां आला तसा व्यक्त केला आहे. तसें करतांना प्रसंगविशेषीं मुळांतल्यापेक्षां कोठें जास्त कोठें कमी अर्थ झाला आहे; तरी मूळ ग्रंथांतील मार्मिक अर्थ प्रायः जाऊं दिला नाहीं. व जो जास्त घातला आहे तो मुळांतल्या अर्थास शोभेल असा घातला आहे. सारांश, संस्कृत कवींच्या ग्रंथांतील अर्थ घेऊन

मोरोपंत, वामनपंडित, मुकुंदराज, रघुनाथकवि यांच्या ग्रंथांप्रमाणें हें स्वतंत्र प्राकृत काव्य केलें आहे, असें वाचणाऱ्यांनीं समजावें.' कृष्णशास्त्र्यांचा मेघदूतानुवाद किती सुरस वठला आहे हें नव्यानें सांगावयास नको. अर्थात् भाषांतराच्या कलादृष्टीचें काय ध्येय असावें व भाषांतरकारांतहि कोणते गुण असावेत याविषयीं अधिक सोदाहरण पुष्कळ लिहितां येण्यासारखें असलें तरी तूर्त उत्तमोत्तम सुरस काव्यभाषांतरें मराठींत अधिकाधिक व्हावींत असें इच्छून वाचकांची रजा घेऊं.

— रा. चिं. श्री. (यशवंत, डिसेंबर, १९४१)

———

मेघदूतांत निर्देशिलेला मेघमार्ग दर्शविणारा नकाशा



मेघमार्ग तुटक ठळक रेषेनें दाखविला आहे.

रामगिरि–आम्रकूट–विंध्य–विदिशा–उज्जयिनी–दशपुर–कुरुक्षेत्र–हरिद्वार–हिमालय–कैलास–अलका.

[विशेष स्थलनिर्देशार्थ 'अवतरणिका,' पृ. (५८) व (५९) पहा.]

सुश्लोकमेघ

পরিশিষ্ট

ॐ नमो भगवते भक्तचातकमेघाय कृष्णाय ।

मेघदूतानुवाद

सुश्लोकमेघ

[वृत्त—इंद्रवज्रा किंवा उपजाति]

१ *

होता कुणी यक्ष, तया कुबेर शापी स्वकार्यीं चुकला म्हणोनी
कीं, ‘ कंठ पत्नीविरहांत वर्ष, गेहा त्यजोनी बहु दूर रानीं ! ’ १
वसे जरी रामगिरीवरी तो सुच्छाय ज्याच्यावरि वृक्षराजि
तरी न साहे दयिताप्रिया त्या प्रियावियोगें मनिं यातना जी; २
पुण्योदकें तेथिल आश्रमींचीं – पूर्वीं तिथें नाहलि जानकी, कीं–
शापें परी यन्महिमा निमाला यक्षासि त्या शांति कुठोनि लोकीं ? ३

२

त्या पर्वतीं घालवि मास कांहीं कांतावियोगाकुल यक्ष कामी;
ये क्षीणता कीं इतकी, गळालीं हातांमधोनी वलयेंहि हेमीं. ४
आषाढिंच्या आद्य दिनीं विलोकी एका घना तो गिरिसानुलग्ना
जो शोभला कुंजरसाच भव्य लीलेंत जो दे ढुसण्या गिरींना ! ५

३

त्या कौतुकाच्या विषया घनातें पाहूनि उत्कंठित यक्ष होई
कष्टेंचि तो आवरि आंत अश्रू, चिंतीत कांहीं बहुकाल राही ६
सुखी जनाचेंहि बघोनि मेघा होतें मन व्याकुळ भावपूरीं;
व्हावें किती तें मग कीं जयाची प्रिया दृढालिंगनलोभि दूरीं ! ७

---

* श्लोकांचे शीर्षकांक मूळ संस्कृत मेघदूताचा श्लोकक्रम दर्शवितात.

४

स्वक्षेम त्या जीवन-दाकडूनी कांतेचिया जीवनरक्षणार्थ
पाहे तियेसी कळवावयातें तो यक्ष संस्थापुनि आत्मचित्त; ८
प्रसन्नभावें स्मितपूर्वभाषी करी घना स्वागत आदरानें
पुष्पें प्रफुल्लें नव आश्रमींचीं अर्पोनि तो त्या करि अर्घ्यदानें. ९

५

तो धूम्र, अग्नी, जल, वायु यांचा निर्जीव मेळा जलवाह कोठें ?
जे पाठवावे पटु इंद्रियांच्या प्राण्यांसवें तेहि निरोप कोठें ? १०
यक्षा न राहे परि हा विवेक औत्सुक्ययोगें विनवी घनातें;
स्मरार्त जात्याच न पाहती कीं सजीवनिर्जीवविभेद चित्तें ! ११

६

" तूं ' पुष्करावर्तक ' नाम वंशीं विख्यातिं जन्माप्रति येसि मेघा !
सहस्रनेत्रें प्रमुखाधिकार हो कामरूपा दिधला तुला गा ! १२
जाणोनि हें मी दयितावियोगी असें तुझा याचक होत दैवें;
बरी भल्या मागणि निष्फळाही, नको खळा ती जरि सिद्धि पावे ! १३

७

संतप्त जे, त्यां निववीशि, मेघा ! मी भर्तृरोषें विरहाग्नितप्त,
म्हणोनि माझा झणिं मत्प्रियेला संदेश ने बा ! मज तूंचि आप्त. १४
यक्षेश्वराच्या अलकापुरीला मित्रा पयोदा ! तुज जावयाचें,
उद्यानिं बाह्यीं हर राहि, त्याची शीर्षेंदुभा द्योतवि हर्म्य जीचे. १५

८

आरोहसी तूं नभिं मेघराया ! तैं सारुनी केस करें कडेला
विश्वास चित्तीं धरुनी सहर्ष तूतें पहातीलचि पांथबाला. १६
तूं येशि तेव्हां विरही प्रियेची कोणा उपेक्षा करवेल काय !
नसेल माझ्यासम अस्वतंत्र कोणी दुजा या जगतीं असाह्य ! १७

९

जसा तुला अत्यनुकूल वारा प्रेरीत आहे नभिं मंद मंद
जलार्थि हा चातक वामभागीं निनादतो सुंदर मंजु नाद १८
मार्गीं तुला देखुनि नेत्ररम्या नभीं बलाका तुज सेवितील!
लोभूनि गर्भाप्तिसुखक्षणाला तुला स्वतांची रचितील माळ! १९

१०

भूमींत उत्पादुनि कंदजातां तिला करीती सफला असे ते
सुश्राव्य तूझे ध्वनि राजहंस जैं ऐकती – उत्सुक मानसातें २०
नभीं तुझे होउनि सोबती ते कैलासपर्यंतहि पावतील,
पाथेय ज्यांचें शकलें बिसांचीं तीं कोवळालीं कमळांमधील. २१

११

निर्विघ्न तूं पोंचुनि बंधुपत्नी पतिव्रता ती बघशील खास,
मन्मीलनाची करि जी प्रतीक्षा पुनः पुन्हां मोजुनियां दिनांस; २२
पुष्पापरी कोमल, दीर्ण व्हावें जें अंगनांचें हृदय क्षणांत,
त्या प्रेमपूर्णा बहुधा वियोगीं, आशाच हें बंधन सांवरीत! २३

१२

निरोप घ्यावासि घना! निघाया आलिंगुनी या प्रियमित्र शैला
त्रैलोक्यवंद्या रघुनंदनाची मध्यीं सजे ज्या पदचिह्नमाला; २४
कीं भेटशी तूं प्रतिवर्षि त्यातें तेव्हां खरें प्रेम दिसोनि येतें
निघून बाष्पोद्गम उष्ण त्याचे दीर्घावधीच्या विरहाग्निनें ते! २५

१३

मागाहुनी श्रोत्रमनोभिराम संदेश माझा तुजला कथीन;
तुझ्या प्रयाणा अनुरूप मार्ग आधीं निवेदीन तयासि जाण; २६
ज्या मार्गिं नाना गिरिभागिं मेघा! विश्रांति तूं जाशिल घेत घेत,
तैसें नद्यांचें लघु पथ्यकारी कृशत्वहारी पय पीत पीत. २७

१४

वाहोनि वारा गिरिशृंग नेई कीं काय ? हें वाटुनि ज्या पहाती
सिद्धांगना उन्मुख होउनीयां साश्चर्यनेत्रा मधु मुग्धवृत्ती; २८
उत्साह ऐसा प्रकटोनि मोठा तूं उत्तरेतें झणिं ऊड मेघा !
स्थानाहुनी या निचुलाख्य वेत रसाळ जी शोभवितात जागा. २९
वेगांत तूं रे ! निघशी तरीही संभाळ मार्गीं, चुकवीं प्रहार.
दिङ्नाग मोठ्या हलवीति हस्तां त्यांपासुनी वांचविं कीं शरीर ! ३०

१५

हें वारुळाच्या वरुनी पुढेंचि आलें वरी इंद्रधनुष्यखंड
संमिश्र तेजांसम जें हिऱ्यांच्या विभूषवी त्वत्तनुतें उदंड; ३१
त्या गोपवेषी हरिच्या तनूला मयूरपिच्छें जशि कान्ति यावी
तूंही तसा श्यामलवर्ण मेघा ! या इंद्रचापें सजशील तेवीं ! ३२

१६

ग्रामस्त्रिया भ्रूकुटिच्या विलासां न जाणत्या जैं बघती तुला त्या
तुझ्यामुळें हो सफला कृषी कीं सुस्निग्धनेत्रीं पिति अन्नदात्या ! ३३
क्षेत्रांमधें नूतन नांगरील्या सुगंधि माळांवरतीं चढून,
जाऊनि मागें लव, तूं त्वरेनें करीं पुन्हां उत्तरादिक्प्रयाण. ३४

१७

मार्गश्रमांनीं दमतां तुला तो वाहील माथां गिरि ' आम्रकूट '
कीं तूं दवाग्नीप्रति काननान्तीं स्ववारिवर्षें शमवीसि नीट; ३५
न नीचही कोणि कृतोपकारां स्मरोनि हो विन्मुख मित्र येतां
निजाश्रयातें, मग गोष्ट त्याची कशास ? ज्या उन्नत तेविं माथा ! ३६

१८

बाजूवरीं आम्रतरू वनींचे फलीं सुपक्कीं दिसतात पीत
तूं स्निग्धकेशांसम कृष्णकांति त्या अद्रिसानूवरि रूढ होत. ३७
होईल तेणें गिरि दर्शनीय सुरांचिया प्रेक्षक जोडप्यांतें,
मध्यांगिं काळा स्तन कीं क्षितीचा सभोंवतीं पांडुर रंग ज्यातें ! ३८

१९

वनौकसांच्या ललना जयाचे कुंजांतरां सेवित त्या गिरींत
मुहूर्त राहूनि निघें पुढें तूं वर्षोनि तोयें अधिक त्वरेंत ३९
विंध्याद्रिच्या त्या खडकाळ पादीं रेवा समंतात् प्रसृता दिसे ती
कीं कुंजरांगावरि रंगवीली जी भासते सुंदर चित्रपंक्ति ! ४०

२०

तीं, तेथल्या वन्य मतंगजांच्या मदांमुळें उत्कट गंध ज्यां ये,
हो रुद्ध जीची गति जंब्रुकुंजीं तिचीं पुढें घेउनि जाइं तोयें; ४१
तूं रिक्तवारी, भरशी पुन्हां जैं, शकेल तूंतें उडवूं न वारा;
निःसारता दे लघुताचि सर्वां, येतेंचि कीं गौरव पूर्णसारा ! ४२

२१

पुष्पें कदंबां हरिताभ पीत पाहोनि, ज्यां केसरही न पूर्ण,
सरित्तटीं ओलिंत कंदलींना आल्या कळ्या त्या पहिल्या गिळून, ४३
वनांतरींच्या क्षितिच्या सुगंधां आस्वादुनी त्वत्पथ ये कळोनी—
भृंगां, कुरंगां, वनिंच्या मतंगां परोक्ष गेलासि जरी गळोनी ! ४४

२२

मित्रा ! जरी पाहसि मत्प्रियार्थ त्वरेंचि जाया, तरि वाटतें कीं,
विलंब तूंतें कुटजें सुगंधी होईल शैलीं बहुधा अनेकीं ! ४५
सवारिनेत्रीं मुदितीं मयूरीं केकास्वरें स्वागत जें दिलें तें
स्वीकारुनी तूं त्वरित प्रयाणा उद्युक्त कैसा तरि होइं चित्तें ! ४६

२३

येतांचि तूं सन्निध, केवड्यांनीं, अग्रें जयांचीं उमलोनि ठेलीं—
बागांचिया भोंवतिं कुंपणांना आपांडुता लोचनरम्य आली; ४७
काकादि पक्षी घरटीं करोनी ग्रामांतले व्यापिति वृक्ष नाना,
जंबूतरूंच्या पिकल्या फलांनीं ये नीलिमा सुंदर काननांना; ४८
दशार्ण देशीं अशिं सर्व दृश्यें मेघा ! तुझ्या आगमिं लाभतील;
तैसेंचि कांहीं दिन हंस तेथें रहावयालाहि विलोभतील ! ४९

२४

त्या देशिंची ती मग राजधानी विख्यात लोकीं विदिशाभिधानें
पोंचोनियां तत्क्षणिं मेळवीं तूं विलासितेचें फळ पूर्णतेनें; ५०
पीशील तूं वेत्रवती नदीचें स्वादिष्ट जेव्हां जल वीचिलोल
वक्रभ्रु कांतामुखसेंचि तें हो ! तीरीं तुझें गर्जित रम्य बोल ! ५१

२५

विश्रांतिसाठीं वस तेथ मित्रा ! ‘ नीचैः ’ प्रथा ज्या गिरिलागिं होत
त्वन्मीलनें फुल्लकदंबरूपें तो प्रेमरोमांचितसाचि मूर्त ! ५२
वारांगनांच्या रतिगंधयोगें ज्याच्या गुहा उत्कट दर्शवीती
कीं यौवनें तेथिल नागरांचीं उद्दामता केवढि ती धरीती ! ५३

२६

विश्रांति घेऊनि पुढें निघें तूं सिंचीत बागांत जुईकळ्यांना
सरित्तटींच्या, बघशील तेथें तूं अंगना ज्या खुडिती फुलांना; ५४
कपोलघर्मा पुसतां जयांचीं कर्णोत्पलें कोमजती चुरोनी
देऊनि त्यां सावलि, तन्मुखांची थोडी तरी ओळख घे करोनी ! ५५

२७

जो उत्तरेतें निघणार तूं त्या लागेल तूंतें जरि वक्र जावें,
तरीहि तूं उज्जयिनीपुरीच्या न सौधशाला बघणें त्यजावें; ५६
विद्युल्लतांच्या चमका बघोनी तेथें स्त्रिया ज्या चकिता सहास
न तत्कटाक्षीं रमसी जरी तूं मानीन तूं रे ! फसलास खास ! ५७

२८

लाटा खळाळोनि निनादणारी हंसादिकांची जणु पंक्ति कांची
जातां मनोज्ञस्खलिता गतीनें आवर्त ती नाभिच दावि साची ! ५८
मार्गांत निर्विन्ध्य नदी अशी ये, घे तूं रसास्वाद तिला मिळोनी !
प्रेम स्वतांचें वदतात आधीं, स्त्रिया प्रियांतें निज विभ्रमांनीं ! ५९

२९

जाशी पुढें तैं तुज सिंधु लागे भासे जिचा तो तनु ओघ वेणी
जी पांडुवर्णा, तटिंच्या तरूंचीं दिसेल पानें पिकलीं पडोनी; ६०
तिची अवस्था विरहस्थितीची सौभाग्य दावी तव, भाग्यवंता !
तो आचरावा विधि तूंच जेणें जावी तिची ती कृशता समस्ता ! ६१

३०

अवन्तिदेशीं नृप वत्सराज याच्या कथा चालति वृद्धलोकीं;
तूं पोंचतां तेथ पुरी धनाढ्या पूर्वोक्त ती उज्जयिनी विलोकीं; ६२
पुण्यें उणीं होउनि संचितें, जे स्वर्गस्थ भूमीवर राहुं आले
त्यांनींच तें उज्ज्वल दिव्य खंड स्वपुण्यशेषें जणुं आणिलेलें ! ६३

३१

जो वाढवी कूजन सारसांचें अव्यक्त माधुर्य मदें जयांत,
प्रफुल्ल जीं जाहलिं पद्मवृंदें त्यांच्यामुळें ज्यासि सुगंध येत; ६४
असा जिथें ये पवन प्रभातीं शिप्रानदीचा, सुखवीत काया
स्पर्शें रतिक्लांति हरी स्त्रियांची, कीं प्रार्थिता कांतचि तो रमाया ! ६५

३२

जैं धूप देती ललना स्वकेशां, तेथें गवाक्षें वरि धूर येती,
हो पुष्ट त्यांनीं; गृहबर्हि मित्रा ते प्रेमभेटी तुज नृत्य देती ! ६६
जे पुष्पगंधाढ्य, सुशोभतीही जे अंगनांच्या पदरंजितांनीं
ऐसे तिथें सौध; बघोनि तच्छ्री मार्गश्रमां ने तव तूं हरोनी ! ६७

३३

कीं स्वामिकंठासम नील जो तूं त्या आदरानें गण पाहतात,
तैसेच ते गंधवती नदीचे वहात अंभोजसुगंधि वात; ६८
रता जलक्रीडनिं कामिनी ज्या, स्नानेंहि त्यांच्या अतिगंध ज्यांतें
त्या वायुनीं डोलति वृक्षवल्ली उद्यानिंच्या जेथिल, जाइं तेथें. ६९
तें धाम चंडीश्वर लोकभर्ता जो श्रीमहाकाल महेश त्याचें;
पावित्र्यही जेथ विमुक्तिकारी, विलासही लाभति तूज साचे ! ७०

३४

तूं अन्यवेळीं जरि पोंचलास त्या शंभुधामीं जलदा ! तरीही
अस्ताचलीं लोपुनि अंशुमाली संध्या घडे तोंवरि तेथ राहीं; ७१
प्रदोषिं ईशार्चनिं शंसनीय गंभीर तूं गर्ज जणों नगारे,
साफल्य तेणें मधु गर्जनांचें लाभेल संपूर्णपणें तुला रे ! ७२

३५

झळाळ रत्नद्युति दंडिं ज्यांच्या तीं चामरें ढाळुनि खिन्नहस्ता,
कांच्याहि ज्यांच्या मधु रुंझणाऱ्या नृत्यीं पदन्यास सलील होतां, ७३
देतील वर्षाग्रतुषार सौख्यें त्या तेथ वेश्यांसि नखक्षतांतीं,
तुझ्याकडे त्या तयिं सोडितील कटाक्ष, दीर्घा जणुं भृंगपंक्ति ! ७४

३६

पूजाविधीनंतर आत्मनृत्य श्रीशंभु आरंभिल जेधवां कीं,
त्याची तदा तुंगभुजावलींची वृक्षाटवी वर्तुळरूपिं झांकीं ! ७५
त्वत्तेज संध्यारुण शोभणारें जास्वंदिच्या रक्तसुमांसमान;—
रक्तार्द्र ऐसें गजचर्म त्यावें ही शंभुकांक्षा हर तूंचि पूर्ण ! ७६
श्रीशंभुठायीं तव भक्तिची ही ऐशापरी उत्कटता बघोनी,
भीति त्यजोनि स्थिर लोचनांनीं पाहील तूंतें कुतुकें भवानी ! ७७

३७

रात्रौ तिथें तैं घनदाट ऐशा तमें दिसे राजपथीं न कांहीं,
कामार्त जाती अभिसारिका ज्या रमावयाला प्रियकांतगेहीं; ७८
सुवर्णरेखा निकषीं अशा त्या सौदामिनीनें पथ त्यांसि दावीं,
न भीववीं वर्षुनि गर्जुनी वा; तद्भीरुता सांग, किती वदावी ?! ७९

३८

हर्म्याग्रि कोठें तरि, जेथ शांत स्थलांत पारावत झोपलेले,
तूं रात्र राहीं; विलसोनि तूझ्या विद्युत्स्त्रियेला श्रम फार झाले ! ८०
पुनश्च सूर्योदयिं लाग, मेघा ! तूं राहिलेला पथ आक्रमाया;
जे मित्रकार्या सजले कराया, न त्यां खपावाचि विलंब वायां ! ८१

३९

रे ! तेधवां खंडित कामिनींच्या न्याव्या लयातें नयनांबुधारा
प्रेमी प्रियांनीं, म्हणुनी त्वरेनें तूं भानुचा सोडचि मार्ग सारा ! ८२
पुसावया पुष्करिणी–प्रियेच्या अब्जाननींचे हिम अश्रु तोही
येई पुन्हां; तत्कर रोधितां तूं, येईल त्या फारचि राग, पाहीं ! ८३

४०

छायास्वरूपें तरि पावशील प्रवेश गंभीर नदीजलांत;
प्रसन्नचित्तीं, जणु ती गभीरा स्वभावकांता तुज सांठवीत; ८४
म्हणोनि ज्या तच्छफरी उडोनी चकाकती जेविं कटाक्ष लोल,
श्वेताब्जसे निर्मल ते तियेचे, करीं उदासीनपणें न फोल ! ८५

४१

जें वेतसाग्रांप्रति लागलेलें, भासे जणों सांवरिलें करांनीं
तें वारिरूपी जणुं नील वस्त्र हो स्रस्त जें तीरकटीवरूनी ! ८६
ऐशा गभीरेवरि पावतां तूं जाणें पुढें होय तुझें कुठून ?
अनावृतांगी रमणी त्यजून जाऊं शके काय रसज्ञ कोण ? ! ८७

४२

वृष्टी तुझी उच्छ्वसवी क्षितीतें त्या रम्य गन्धें भरुनी वहात,
शुंडाग्ररंध्रांतुनि ज्या पितांना मतंगजांचे ध्वनि गोड होत; ८८
वारा असा शीतल, जो वनींच्या औदुंबरांना परिपक्वता दे,
जाशील तूं देवगिरीस तेव्हां खालूनि वाहील तुला प्रमोदें ! ८९

४३

राहे सदा स्कंद तिथें, तदर्थ तूं कामरूपी बन पुष्पपूर्ण
आकाशगंगाजलिं आर्द्र ऐशा तूं पुष्पवृष्टींमधिं त्यासि न्हाण. ९०
रक्षावया इंद्रचमू, स्वतेज सूर्याहुनीहि द्युतिमन्त ऐसें
जें अर्पिलें वह्निमुखांत हो तें बालेन्दुधर्त्या भगवान् महेशें ! ९१

४४

तेजस्वि रेखावलयें सुशोभी तें पिच्छ ज्याचें गळलें भवानी
प्रेमें तनूज्यावरल्या स्वतां ती इंदीवरासन्निध घालि कर्णी ! ९२
ज्याच्या अपांगा धवळी हरेंदु, स्कंदाचिया त्या मग तूं मयूरा
नाचीव मेघा ! निज गर्जनांनीं, गिरींतुनी ज्या घुमती गभीरा ! ९३

४५

आराधुनी त्या भगवान् कुमारा उल्लंघ तूं नंतर पंथ कांहीं
त्वन्मार्ग वीणाधर सिद्धयुग्में, तुषारभीत त्यजितील, पाहीं; ९४
असंख्य गोयज्ञ करोनि, केली निर्माण जी भूवरि रन्तिदेवें
सरित्स्वरूपें जणुं आत्मकीर्ति, त्वां आदराया तिज आश्रयावें. ९५

४६

प्रवाह तीचा जरि होय मोठा, तरी दुरूनी तनु भासणार,
घ्याया जला त्यावरि वांकलेला तूं श्यामल श्रीहरिरंगचौर; ९६
ऐशा तुला लोचन लावुनीयां, नभोविहारी सुर पाहतील
कीं तो क्षितीचा सर मोतियांचा, मोठा असे ज्यामधिं इंद्रनील ! ९७

४७

ओलांडुनी ती सरिता गड्या ! तूं जाशी पुढें तैं दशपूरवासी
विलासिनींच्या मधुरां कटाक्षां सकौतुकां पात्र कर स्वतांसी ! ९८
ठाव्या तयांतें भृकुटीलतांच्या लीला; तशा शोभति कृष्णकांति
ज्या पापण्यांना उडवीत रामा विसर्जिती उर्ध्व कटाक्षपंक्ति ! ९९
भासेल तैं चंचल लोचनांची शोभा मनोहारि अशीच खास,
कीं हालतां कुंद, सवेंचि येते मिलिंद ते मागुनि लुब्ध त्यांस ! १००

४८

सरस्वती आणि दृषद्वती या नद्यांचिया जाशिल मध्यदेशीं
छायास्वरूपेंचि तिथें पहा तूं तें क्षेत्र जें कौरवयुद्धदर्शी; १०१

४९

प्रिया सुरा टाकुनि, रेवतीचीं नेत्रांबुजें जीमधिं बिंबलेलीं
सेवीत जीं श्रीबळराम, बंधुप्रीतीमुळें टाकुनि युद्धकेली; १०३
तीं तूं करीं सेवन, भाग्यवंता ! मेघा ! जलें शुद्ध सरस्वतीचीं;
होशील शुद्धांतर तूंहि त्यांनीं, हो कृष्णता केवळ बाह्यतांचि ! १०४

५०

तूं जा हरिद्वारिं तिथूनि गंगे, जी पातली शैलगुरूवरूनी
स्वर्गीं चढे सागरसंतती ती सोपानपंक्तीच जिला करूनी; १०५
उमेचिया भ्रूकुटि मोडण्यांला जी हांसुनी फेनमिषेंचि जैसें
स्ववीचिहस्तें शशिशोभिकेशां श्रीशंभुच्या कर्षितसेचि भासे ! १०६

५१

स्वच्छांबु तीचें स्फटिकाभ प्याया स्वपूर्वभागें जर पाहुं जाशी
तूं लोंबुनीयां तिरकें नभांत तियेवरी दिग्गजमूर्ति जैशी ! १०७
छाया तुझी तैं तिचिया प्रवाहीं जातांच होईल मनोभिराम
तिचा जणों कीं यमुनेशिं हो तो अन्यस्थलीं संगम पुण्यधाम ! १०८

५२

तिचाच तो उद्गम अद्रिराज जैं पावशी तूं हिमशुभ्रकांति,
शिला जयाच्या मृग बैसुनीयां कस्तूरिनें गंधित शोभताति; १०९
प्रवासखेदां निज घालवाया तूं बैसतां त्या गिरिराजशृंगीं
होशी हराच्या सितनंदिशृंगीं उत्खात कीं पंकचि कृष्णरंगीं ! ११०

५३

वाऱ्यामुळें तेथिल देवदारुस्कंधां जरी घर्षुनि अग्नि लागे
पीडी गिरीतें, चमरीमृगांच्या जाळीत केशां उडत्या स्फुलिंगें; १११
असंख्य धारा जल वर्षुनी त्वां दवाग्निबाधा गिरिची हरावी;

५४

न मार्गि त्यांच्या जरि तूं तरीही तूंतें पहातील जरि क्रमाया
क्रोधांत वेगें उडि मारुनी जे, मोडून घ्याया शरभ स्वकाया ! ११३
वर्षोनि त्यांच्यावरि तेथ गारा हाणोनि त्यांना करिं तूं विकीर्ण;
जे निष्फलार्थी झटती उगाच, जगीं न हास्यास्पद होति कोण ? ! ११४

५५

शिलेवरी तेथ पदाब्जचिह्न श्रीशंकराचें ठसलें दिसेल,
ज्या अर्चिती संतत योगि भावें प्रदाक्षिणा त्या प्रति तूंहि घाल; ११५
ज्या देखतां होउनि पापनाश, देहावसानोत्तर शक्त होत
श्रीशंभुच्या पार्षदिं मेळवाया श्रद्धान्वित स्थान, जया न अन्त. ११६

५६

वंशांतरीं मारुत संचरोनी निनादती मंजुल निःस्वनांत,
पुरत्रयाच्या विजयासि तेथें ते किन्नरींचे गण गोड गात; ११७
जरी मृदंगध्वनितुल्य तूझ्या होतील कीं कंदरिं गर्जनाही
हो गायनाचा परिपूर्ण साचा श्रीशंभुचा थाट समग्र पाहीं ! ११८

५७

हिमालयाच्या तटिंच्या बघोनी शोभाविशेषां मग पावशील
क्रौंचाद्रिचें तें बिल, हंसमार्ग जें जामदग्न्या करि कीर्तिशील, ११९
तूं त्याच मार्गें सर उत्तरेला तनू करोनी तिरकी सुदीर्घा,
आश्याम तैं भासशि विष्णुपाद जो उंच केला बलिबंधना गा ! १२०

५८

केलीं जयाचीं शिखरें ढिलींशीं दशाननें हाल्वुनी भुजांनीं,
सुरांगनांचा जणुं आरसा तो कैलास तूं सेविं वरि क्रमूनी; १२१
जो निर्मलत्वें कुमुदांसमान, उत्तुंगतेनें भरि जो नभास
हो भास कीं प्रत्यहिं सांठला तो श्रीशंभुचा मूर्तचि अट्टहास ! ! १२२

५९

तूं स्निग्ध संमर्दित अंजनाच्या कांतीपरी श्यामल शोभणारा,
तो कुंजरांच्या नव कापलेल्या हो दंतखंडांसम शुभ्र गोरा; १२३
तूं बैसतां तत्तटिं नील ऐसा होईल वाटे गिरि दर्शनीय,
स्कंधावरी श्यामल वस्त्रधारी शोभे जसा श्रीबळरामराय! १२४

६०

कैलासिं त्या शंभुविहारशैलीं पायीं जरी चालत जाय गौरी,
त्यजोनियां तो अहिकंकणाला दे वल्लभेतें स्वकर स्मरारी; १२५
जाऊनि तैं त्यांपुढतीं स्वतांचे अंतर्गतां स्तंभुनियां जलांशां,
चढावया रत्नतटीं गिरीच्या सोपानसा होइं उमामहेशां! १२६

६१

देवांगना तेथ तुझीं अवश्य धारागृहें कृत्रिम निर्मिणार,
तत्कंकणांच्या जर रत्नकोटी लागोनि धारा उडतील गार! १२७
उष्म्यामधें जो प्रियसा मिळाला त्यातें तुला त्या जर सोडती न
क्रीडापरां कर्कश गर्जनांनीं सोडीं गड्या! केवळ भीववून! १२८

६२

सुवर्णपद्मांप्रति जन्म दे जें, तें मानसाचें जल पीत तेथ,
ऐरावताचें मुख झांकणारें जें वस्त्र त्या हर्षद तेंहि होत, १२९
कल्पद्रुमांच्या नव पल्लवांना तूं अंशुकांचे परि हालवीत,—
नानाप्रकारीं जलदा! यथेष्ट लीलेंत तो भोग नगाधिनाथ! १३०

६३

अंकीं तयाच्या, जणुं कीं प्रियाच्या, ती बैसलेली दयिता जसी कीं,
गंगाविशुभ्रांशुक तें ढळोनी गेलें जिचें भासतसे, विलोकीं! १३१
ऐसी पुरी ती अलका न ठावी तूंतें असें नाहिंच मेघराया!
विमानभूषा कशि ना कळावी? यथेष्ट संचार तुझा जगीं या! १३२
धरीतसे ती तुम्हि येतसां तैं अभ्रावली निर्मल वारिवर्षी,
योषा जणों मौक्तिकजालयुक्तां धरीत नीलां अलकांसि शीर्षीं! १३३

पूर्वमेघ समाप्त

सुश्लोकमेघ

[उत्तरमेघ]

६४

तुझ्यामधें शोभति चंचला या, प्रासादिं तीच्या किति सुंदरांगी !
तूं इंद्रचापें सजसी, तसे ते मनोज्ञ चित्रीं सजती सुरंगीं; १३४
गंभीर तूझे श्रुतिरम्य घोष, संगीत त्यांच्यांत मृदंगयुक्त;
तुझ्यामधें निर्मल तोय, तैसें त्यांच्यांत भूमीतल रत्नकान्त; १३५
उत्तुंग तूं हा, शिखरें तयांचीं घना ! नभा स्पर्श करीति उंच;
प्रासाद ऐसे अलकापुरीचे त्या त्या विशेषीं तुजसेच साच ! १३६

६५

लीलांबुजें, जेथ, करीं स्त्रियांच्या, केशांत कुंदें नव माळलेलीं,
पराग लोध्रांतरिंचे पडोनी त्यांची मुखश्री धवलत्व ल्याली. १३७
कोरंटिही भूषवि केशपाशां, कर्णावरी शोभतसे शिरीष
तैशीं तुझ्या आगमिचीं कदंबें भांगांत त्यांच्या सजती विशेष ! १३८

६६

जेथें तरू संतत पुष्पधारी ज्यांचेवरी गुंजति मत्तभृंग
नित्यांबुजा पुष्करिणी सुशोभा कांचीच ज्यांची कलहंससंघ; १३९
तेजस्वि ज्यां नित्य असे पिसारा उत्कंठ आरावति मोर गेहीं,
हो चंद्रिका नित्य तमोविनाशी, म्हणोनि रम्या अति, शर्वरीहि ! १४०

६७

हर्षेंचि जेथें नयनांसि पाणी, न अन्य हेतूस्तव ये कधीं तें,
न कामातापाविण अन्य ताप जो इष्टसंगें निरसेचि जेथें, १४१
नसेचि तैसा विरहासि थारा त्यां प्रेमकोपाविण एवढाहि;
यक्षांप्रती केवळ यौवनाच्या वयाविना ठाउक अन्य नाहीं !! १४२

६८

जेथील हर्म्यांवरि रत्नभूमी, ज्यांमाजिं तारागण बिंबलेले —
पुष्पें जणों वाटत, तेथ यक्ष स्वकामिनीसंगतिं दंग झाले ! १४३
ते कल्पवृक्षांतुनि लाभलेल्या पिऊनि मद्या रतिमग्न होती,
गंभीरनादें तुजसे नगारे आमंद जेथें बहु गर्जताती. १४४

६९

मंदाकिनीच्या सलिलावरूनी जे वाहती शीतल तेथ वारे
मंदारही जे तटिं वाढलेले छायेंत त्यांच्या नच ताप थारे; १४५
ज्या प्रार्थनीया अमरांहि व्हाव्या ऐशा तिथें क्रीडति यक्षबाला,
सुवर्णवाळूमधिं गूढ मोती सख्यांसि ज्या लावित शोधण्याला ! १४६

७०

निरी सुटूनी श्लथ जाहलेलें जें रेशमी वस्त्र वरांगनांचें
जेथें प्रियांनीं करलाघवानें निःसारिलें जैं रतिलोभिं साचें, १४७
तुंगद्युतींच्या मणिदीपतेजां त्या लागती लाजुनि मालवाया
फेकोनियां कुंकुममुष्टि दीपां पोचोनिही ज्या परि जाति वायां !! १४८

७१

नेई जयां वायु सदागतीचा जींतील वाड्यांतिल उंच भागीं,
चित्रांप्रती नूतन बिन्दुपातें जे तेथल्या दूषवितात वेगीं, १४८
ते जाळिवाटें तुजसेच मेघ भिऊनि जाणों निघती विकीर्ण
धूमांपरी भासवुनी स्वतांला, कौशल्ययोगें करिती प्रयाण ! १५०

७२

जेथें प्रियांच्या भुजवल्लरींचीं आलिंगनें होउनि सैल कांहीं
वधूजनांच्या सुरतश्रमांला निवारिलें हो सलिलप्रवाहीं, १५१
जे, स्थूलबिंदु स्रवुनी निघाले छतांतल्या चंद्रमण्यांमधूनी,
तूं दूर होतां, विमलेंदुच्या ते जैं अर्धरात्रीं शिवले करांनीं ! १५२

७३

अक्षय्य ज्यांच्या गृहसंपदा, ते कामी जन प्रत्यहिं रंगतात
वेश्याप्सरांच्या प्रियसंगतींत उद्यानिं त्या चैत्ररथीं जियेंत; १५३
तैसें जिथें किन्नर गोड कंठें उंच स्वरें गाति धनेशकीर्ति,
तेथें विलासी रमुनी प्रियांशीं प्रीतींत संलापसुखा वरीती ! १५४

७४

मंदारपुष्पें, पडलीं त्वरेनें जातां जयांच्या शिरिं माळलेलीं,
तैसेंच ते पल्लवखंड, पद्में सुवर्णि, कानांवरुनी गळालीं, १५५
ते मौक्तिकांचे सर, हार तैसे संछिन्न झाले, स्तनिं विस्कळोनी—
सूर्योदयीं यापरि कामिनींचा ये यामिनीमार्ग जिथें कळोनी ! १५६

७५

कुबेरमित्र प्रभु तो त्रिनेत्र साक्षात् वसे तेथ म्हणोनि काम
भिऊनि वाहे बहुधा न तेथें स्वचाप, ज्यातें अलिपंक्ति दाम; १५७
जे कामिलोकांवरि सोडलेले रामाजनीं भ्रूकुटि वांकवून
कटाक्ष लीलायुत ते अमोघ, त्यांनींच होती स्मरहेतु पूर्ण ! १५८

७६

वस्त्रें सुरंगीं, मधु, लोचनां जें कटाक्षलीला शिकवी विलोला,
तैसींच तीं पल्लवयुक्त पुष्पें, अलंकृतीही विविधा अमोला, १५९
पदांबुजांलागिं विभूषवाया आरक्तवर्णी अळिताहि जेथ—
हीं एकटा पूरवि कल्पवृक्ष स्त्रीभूषणें इच्छियलीं समस्त ! १६०

७७

धनेशगेहाहुनि उत्तरेला तें आमुचें गेह दिसे दुरोनी,
कीं त्यावरी तोरण शोभणारें, जें इंद्रचापासम रम्यवर्णी; १६१
असे तयासान्निध मत्प्रियेनें संवर्धियेला सुतसाच एक,
हातास यावे नत गुच्छ ज्याचे, लहान मंदार असा सुरेख ! १६२

७८

पांचू शिला जीमधिं पायऱ्यांना, वापी अशी तेथ भरोनि ठेली
प्रफुल्ल हैमी सरसीरुहांनीं वैदूर्यशा शोभति जीं सुनालीं; १६३
जलीं जियेच्या वसले मराळ न चिंतिती मानसिं मानसाला–
अदूरच्याही, जरि पातलासी, न कष्टती देखुनि पावसाला! १६४

७९

तीरीं तिच्या सुंदर इंद्रनील, निर्मीयला, योजुनि सानुभागीं
क्रीडागिरी, शोभति कांचनाच्या ज्यांभोंवतालीं कदली सुरंगी १६५
तो आवडीचा मम कीं प्रियेच्या यासाठिं मी व्याकुलही स्मरेंचि
विद्युत् तुझ्याभोंवतिं पाहतांना येते स्मृती त्याच मला गिरीची! १६६

८०

ज्या कोवळे पल्लव हालणारे अशोक ऐसा बहु रक्तवर्णी,
सुरम्य तो केसरवृक्ष तैसा;—हे शोभती पादप तेथ दोनी; १६७
कोरंटिचें कुंपण वेष्टिणारें ज्या मंडपा माधविच्या विराजे
त्याच्याच हे सन्निध वृक्ष दोघे विराजती सुंदर सर्वदा जे; १६८
एकास माझ्यासह आस–घ्यावी लत्ता प्रियेच्या चरणांबुजाची,
दुज्यास घ्यावी मिषिं दोहदाच्या-तिच्या मुखींची मदिराच साची! १६९

८१

त्यांच्यामधें बांधियली मुळांत बैसावयालागिं सुवर्णयष्टि,—
फळी जियेची स्फटिकाढ्य साची, रत्नांमधें रोपित येत दृष्टीं; १७०
जी, कोवळ्या वेळुंसमान तेजीं, ऐशा मण्यांहीं खचिली समस्त–
तिच्यावरी बैसत सांजवेळीं मयूर, जो मित्र तुम्हांसि होत; १७१
प्रिया मदीया मुदिं नाचवी त्या, टाळ्या स्वहस्तें जयिं वाजवूनी
निनाद तैं मंजुळ कंकणांचे 'छन् छन्' असे सुंदर येति कानीं. १७२

८२

ऐशा खुणा वागवुनी मनांत द्वारीं तसे बाजुस शंख, पद्म
चितारलेले चतुरा ! बघोनी तूं शोधुनी काढ मदीय सद्म; १७३
माझ्या वियोगें जणुं कांति त्याची आतां निमालीच असेल खास;
सूर्यास्त होतां, कमल स्वशोभा खरोखरी पोषित ना विशेष ! १७४

८३

खालीं रिघाया झणिं शीघ्रतेनें लहान तूं हो करिशावसाच;
क्रीडागिरी मी वदलों, तयाच्या तूं रम्य सानूवरि बैस उंच; १७५
तेथूनि तूं दृष्टि तुझी विजेची करूनियां सौम्य अतीव ऐशी
खद्योतपंक्तिद्युतिशीच, तीतें मन्मंदिरा अंतरिं रे ! निवेशीं १७६

८४

श्यामा, सुतन्वी, शिखराभदन्ता बिंबाधरा, सुंदरमध्य नारी
गंभीरनाभी, मृगशावनेत्रा, नितंबभारें हळु चालणारी, १७७
किंचिन्नता जी कुचकोरकांनीं—असेल जी तेथ, जिला बघोनी
गमे विधात्याकरिंची जणों ती अनन्य सृष्टी रमणीविधानीं.! १७८

८५

तूं जाण ती रे ! मित बोलणारी, माझें जणों जीवित दुसरें कीं
मी दूर होतां सहकारि राही एकाकिनी जी जणु चक्रवाकी ! १७९
उत्कंठ जी होउनि कंठिताहे वियोगदीर्घा दिवसां अशा या,
हिमार्दिता ती जणुं पद्मिनीच प्रणष्टशोभा मम होय जाया ! १८०

८६

अती रडोनी सुजले असावे डोळे प्रियेचे मज खास भासे,
असेल गेली अधरोष्ठकांती टाकोनियां उष्ण असे उसासे; १८१
हातावरी टेकियल्या मुखाची भा लोंबत्या केशिं कशी दिसावी ?—
तूं लागतां पाठिशिं, इंदुची जी व्हावी दशा, तन्मुख तीच दावी ! १८२

८७

पडेल ती दृष्टिं तुझ्या झणींच पूजेंत जी गुंगलि भक्तिभावें;
किंवा, चितारी निजकल्पनेनें मी जो वियोगें कृशतेसि पावें, १८३
किंवा, असे पंजरिं सारिका जी, विचारिते त्या मधुभाषिणीसी —
'येत्ये स्मृती का रसिके! धन्याची? कीं, त्यासि तूं आवडतीच होसी!

८८

त्याल्या सुवस्त्रा मलिनत्व आलें, ऐशी निजांकावरि घेइ वीणा,
माझ्यावरूनी रचिल्या पदाच्या जों लागत्ये ती करुं गोड गाना, १८५
तों अश्रुपातें भिजतात तारा, कशी तरी त्यांसि पुसोनि, घेती
आलाप, ताना, रचिल्या स्वतांही, पुनःपुन्हां त्यां विसरे तरी ती! १८६

८९

कीं, उंबऱ्याच्या वरि पुष्पपुंज स्थापूनि जी मोजुनि पाहणारी
शापावधीचे किति मास शेष अजूनि नेणें विरहार्तिपूरीं; १८७
कीं कल्पनेनेंच हृदीं मदीय समागमाचें सुख चाखणारी;—
घना! अशां चित्तविनोदनांनीं प्रायां वियोग क्रमतात नारी! १८८

९०

कार्यांत ती मग्न दिसां असे तैं व्यथा न तेवीं तिज मद्वियोगें,
गमे सखी ती तव तीव्र दुःखी रात्रौ रिकामेपणिं होउं लागे; १८९
तूं राहुनी सौधगवाक्षि मेघा! विनिद्र त्या भूतलशायिनीसी
संदेश माझे कथुनी सतीसी, पहा कराया तिज मग्न हर्षीं. १९०

९१

चिंताकृशा टेकुनि एक बाजू वियोगशय्येवरि राहिलेली,
कला शशीची जणु एक शेषा पूर्वाद्रिभागावरि होय ठेली; १९१
जी रात्र नेली क्षणशीच तीनें मत्संगतीं रंगुनि इष्टभोगीं
ती तीच आतां विरहातिदीर्घा, उष्णाश्रुनीं कंठित कोमलांगी! १९२

९२

गवाक्षमार्गें शशिपाद येती जे शीतलस्पर्श सुधेसमान,
पूर्वींचिया आवडिनेंचि त्यांतें गेलें परी जें परतेंचि तूर्ण; १९३
दुःखाश्रुयोगें जड जाहलेल्या जी पांपण्यांनीं नयनांसि झांकी
भूपाझिनी ती जणुं दुर्दिनींची विकासली ना, मिटली न वा कीं! १९४

९३

ओष्ठांचिया कोमल पल्लवांसी निःश्वास जे पीडिति, हालवीती
स्नानें अतैलें अतिरूक्ष केशां, जे कीं कपोलांवरी लोंबताती, १९५
स्वप्नीं तरी केविं मिळेल माझा संयोग यासाठिंच इच्छिणारी
निद्रेसि– जी व्यापुनि टाकणाऱ्या निरोधियेली नयनाश्रुपूरीं ! १९६

९४

वियोग होतां पहिल्या दिनींच माळेविना गुंफिलि होय वेणी,
शापावसानीं सुटतांचि शोक, सोडायचें मीच जिला फिरोनी; १९७
गांठाळली, गुंतलि, एकपेडी, जी स्पर्शणेंही बहु दुःख होणें,
कपोलभागांवरुनी कितीदां जी सारि अच्छिन्ननखें करानें ! १९८

९५

विभूषणां ना अबला धरीते, दुःखाकुला जाहलिसे कृशांगी,
शय्येवरी लोटि पुनः पुन्हां जी तनू निजा पोळियली वियोगीं; १९९
पाहूनि ती निश्चित ढाळशील तूं अश्रुधारा नव वारिरूपीं—
प्रायां जयां अंतरिं आर्द्र आत्मा कारुण्य त्यांचें न लपे कदापि!

९६

जाणें सखीचें तव चित्त माझ्या ठायीं किती प्रेम धरूनि राहे,
म्हणोनि माझ्या पहिल्या वियोगीं अशी असे हा मम तर्क वाहे; २०१
दैवी खरा मी, अभिमान ऐसा माझ्या मुखीं ना करवी बढाई;
जें वर्णिलें मी तुज, पाहशील प्रत्यक्ष बंधो ! न विलंब कांहीं ! २०२

९७

केशांमुळें वाव न यत्कटाक्षां, न स्निग्धसें काजळ ज्यांत त्यालें,
त्यागें तसें जें मधुसेवनाच्या भ्रूभंगलीला विसरूनि गेलें ! २०३
तूं पावतां, त्या मृगलोचनेचें स्फुरोनि तें नेत्र वरीं धरील
शोभा जशी क्षोभुनि मीन, तेणें विकंपणारें धरि अब्ज नील ! २०४

९८

डावा तसा ऊरु तिचा, मदीय नखक्षतें ज्यावरि नैव होतीं,
मुक्तावली संतत सेव्य ज्याची दैवें परी टाकविली असे ती; २०५
हस्तेंहि व्हावा रगडावयातें जो योग्य मातें सुरतश्रमान्तीं,
रसार्द्र गाभा जणुं केळिचा जो, पावेल तो कंपन गौरकांति ! २०६

९९

त्या कालिं मेघा ! जर आढळेल निद्रासुखीं मग्न सखी त्वदीया,
तुवां करावी प्रहर प्रतीक्षा, न गर्जतां बाजुसि बैसुनीयां; २०७
कसा तरी स्वप्निं तिला मिळालों प्रेमी तिचा मी असतां रमाया,
न हो अकस्मात् भुजवल्लरींची कंठीं मिठी गाढ, सुटोनि वायां ! २०८

१००

जागी करीं तूं तिजला स्वतांच्या तुषारयोगें सुखशीत वातें,
प्रफुल्लता द्याविस मालतींच्या नव्या कळ्यांचे सह तूं तियेतें; २०९
बघेल विद्युत्सह बैसलेल्या तुला गवाक्षीं चकिताक्ष जी कीं,
स्वगर्जितांच्या वचनीं सुधीरा ! त्या मानिनीसी वदण्यास ठाकीं ! २१०

१०१

" मी मेघ जीवत्पतिके ! असें हा, त्वद्वल्लभाचा प्रियमित्र जाण,
आलों तुझ्या सन्निध, हृत्पुटांत संदेश त्यानें दिधले, धरून; २११
प्रवासिवृंदां पथिं थांबणाऱ्यां गंभीरनादें त्वरवीत जो कीं
सोडावया वेणि निजांगनांच्या करीं समुत्कंठित मी, विलोकीं !" २१२

१०२

हें सांगतां तूं तिजलागिं तीही औत्सुक्ययोगें हृदयीं फुलून,
अत्यादरें वायुसुतासि सीता बघेल तैसी उचलोनि मान २१३
ऐकेल ती लावुनि लक्ष्य साधो ! पुढेंहि जें तूं वदशील तीतें;
सुवृत्त मित्राकरवीं पतीचें सतींप्रती संगमकल्प होतें ! २१४

१०३

मी प्रार्थितों यास्तव, तेविं व्हाया परोपकारें कृतकृत्य तूंही,
आयुष्यवन्ता ! तिज सांग, " कांत तो आश्रमीं रामगिरींत राही.
न नष्ट तो हो अबले ! वियोगीं विचारित क्षेम असे तुला कीं !
प्राण्यां जयां हो सुलभा विपत्ति, विचारणें आधिं असेंचि लोकीं. २१६

१०४

अंगीं कृशीं तो कृश, तप्तिं तप्त, शोकापूर्णांमधिं अश्रुपूर्ण,
औत्सुक्ययुक्तांगिं समुत्सुकांग, उच्छ्वासितीं श्वास तदीय उष्ण, २१७
दूरस्थ तो ज्याप्रति बद्धवैर रोधी विधी मार्ग म्हणोनि तींत
संकल्पनांनींच अशा प्रकारीं प्रवेशितो संतत आत्मचित्त ! २१८

१०५

जें मैत्रिणींच्याहि समक्ष त्यातें सांगावया भीड नसावि कांहीं
प्रियामुखस्पर्श मिळो म्हणोनी कानीं वदायासचि लुब्ध होई; २१९
ऐकावया शक्य न दूरतेनें, डोळां बघायासहि शक्य जो न—
माझ्या मुखानें वदला तुला गे ! तो हें समुत्कंठितभावपूर्ण २२०

१०६

प्रियंगुवल्लींमधिं अंग देखें, कटाक्षलीला चकिता मृगींत,
शोभा मुखाची शशिबिंबिं, केशां मोरांचिया पिच्छभरांत मूर्त, २२१
तरंगिणींच्या लघुवीचिंमाजीं मी भ्रूविलासां तव कल्पुं पाहीं
तथापि हा ! एकहि ठायिं नाहीं त्वत्साम्य तें भामिनि गे ! कुठेंही !

१०७

शिलेवरी रेखुनि गैरिकांनीं कान्ते ! तुला मी रुसलीस ऐशी
प्रीतीमधें; आणखि काढुं पाहें जों मी तुझ्या हो नत की पदांसी;
पुनः पुन्हां तों मम अश्रु डोळां सांठून हो कांहिंच ना दिसेसें,
चित्रांतही संगम आमुचा हा ! दुष्टा कृतान्ताप्रति तो न सोसे !! २२४

१०८

महाप्रयत्नें मजलागिं जेव्हां तूं स्वप्नदृश्यांमधिं लाभतीस
आलिंगुनी गाढ तुला धराया मी अंतराळीं पसरीं करांस २२५
हें पाहतांना वनदेवतांचीं मोठालिं मोत्यांपरि आंसवें तीं
वृक्षांचिया पल्लविं कोंवळाल्या प्रायां गळाल्याविण ना रहाती ! २२६

१०९

जे देवदारुद्रुमपल्लवांच्या कोंवळ्या झणीं भेदुनियां पुटांसी
ये शुभ्रदुग्धापरि, चीक त्यानें गंधाढ्यता लाभलि ज्यां विशेषीं; २२७
हिमाद्रिचे दक्षिणवाहि वायू आलिंगिं मी ते गुणरत्नमाले !
अंगें तुझीं स्पर्शुनि कीं कदाचित् येथें प्रिये ! ते असतील आले !

११०

दीर्घा निशा जाय कशी लयातें संक्षिप्त होऊनि पळासमान ?
साऱ्या अवस्थांमधिं केविं पाठे सुशीतलत्वा दिन फार उष्ण ? २२९
ऐशापरी दुर्लभ याचिणारें मच्चित्त हें सुंदरि ! चंचलाक्षि !
वियोगदु:खानलिं तीव्र तप्त न रक्षिणाऱ्या कवणांहि लक्षी ! २३०

१११

मनोरथांनींच असें स्वतांला आधार मी यापरि देत राहें
म्हणूनि तूंही सुभगे ! न भीती मनामधें फारशि भीरु ! वाहें २३१
अखंड सौख्यें वरिलें कुणांला ? अनंत दु:खें तरि वा कुणांसी ?
खालीं रिघे, ये वरतीं फिरूनी दशाहि चक्रासह धांव जैसी ! २३२

११२

जैं शेषशय्येवरुनी उठेल श्रीविष्णु मच्छापहि संपणार;
डोळे मिटूनि उगीं घालवीं तूं जे राहिले सुंदरि ! मास चार २३३
आम्ही पुढें पूरवुं सर्व त्या त्या वियोगतीव्रा हृदयाभिलाषा;
शरन्निशीं उज्ज्वल चंद्रिकेंत यथेच्छ सेवूं दयिते ! विलासां !" २३४

११३

आणी वदे, " कंठिं मिठी मदीय घालूनि शय्येवरि एकदां गे !
होतीस तूं झोंपलि, तों कशानें झालीस आक्रंदत जागि वेगें; २३५
पुनः पुन्हां मी पुसुं लागतां तैं मंदस्मितें हें मज बोललीस
कीं, ' स्वप्निं मातें दिसलास धूर्ता ! तूं रंजवीतां कवण्या दुजीस !'

११४

ही खूण तूंतें दिधली तियेनें मत्क्षेम तूं जाण; जनप्रवादें —
विश्वास माझ्यावरला तुझा गे ! कुरंगनेत्रे ! लव ना ढळों दे ! २३७
' प्रीती घटे, भेट न होत जेव्हां, ' ही उक्ति वाटे मजलागिं खोटी;
हो प्रीतिची आवडिच्या ठिकाणीं वियोगिंही वाढुनि रास मोठी !"

११५

सुतीव्रशोका पहिल्या वियोगें त्या त्वत्सखीला समजावुनी हें,
जो शंकराच्या वृषभें स्वशृंगीं उखाडिल्या शृंगततींस वाहे २३९
त्या अद्रिहूनी परतोनि वेगें खुणेसवें क्षेमवचें तियेचीं
आणोनि, मज्जीवित सांवरीं तूं, प्रभातकुंदांसम जें ढिलेंचि ! २४०

११६

साधो ! तुझा निश्चय जाहला कीं ? करावया या मम बंधुकार्या,
खरेंचि, ना मौन तुझें गणीं मी, कीं तूं दिला साच नकार, आर्या ! २४१
जें चातकांनीं जल याचिलें तें देशीच त्यां, शब्दहि बोलतां ना;
कीं, प्रार्थनापूरण, सज्जनांचें, हो हें खरें उत्तर याचकांना ! २४२

११७

न योग्य तूंतें जरि मागणी ही, तरी करोनी प्रिय हें मदीय,
मैत्री म्हणोनी, अथवा गणोनी कीं हा वियोगें अनुकंपनीय; २४३
वर्षर्तुनें वाढुनि पूर्ण लक्ष्मी तूं वारिदा ! संचर इष्ट देशीं
ऐशापरीं रे ! क्षणही न व्हावा वियोग तूंतें स्वतडिल्लतेशीं ! ” २४४

उत्तरमेघ समाप्त

सुश्लोकमेघ समाप्त

रचितं श्रीशकृपया सीतादेव्यै समर्पितम् ।
इदं काव्यं मुदे भूयाद्विदुषां पुण्यचेतसाम् ॥

॥ श्रीः ॥

अथ महाकविश्रीकालिदासविरचितं

मेघदूतम् ।

कश्चित्कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात्प्रमत्तः
शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येण भर्तुः ॥
यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपुण्योदकेषु
स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु ॥ १ ॥

तस्मिन्नद्रौ कतिचिदबलाविप्रयुक्तः स कामी
नीत्वा मासान्कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ॥
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ॥ २ ॥

तस्य स्थित्वा कथमपि पुरः कौतुकाधानहेतो-
रन्तर्बाष्पश्चिरमनुचरो राजराजस्य दध्यौ ॥
मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः
कण्ठाश्लेषप्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ॥ ३ ॥

प्रत्यासन्ने मनसि दयिताजीवितालंबनार्थी
जीमूतेन स्वकुशलमयीं हारयिष्यन्प्रवृत्तिम् ॥
स प्रत्यग्रैरुटजकुसुमैः कल्पितार्घाय तस्मै
प्रीतः प्रीतिप्रमुखवचनं स्वागतं व्याजहार ॥ ४ ॥

धूमज्योतिस्सलिलमरुतां संनिपातः क्व मेघः
संदेशार्थाः क्व पटुकरणैः प्राणिभिः प्रापणीयाः ॥
इत्यौत्सुक्यादपरिगणयन्गुह्यकस्तं ययाचे
कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु ॥ ५ ॥

जातं वंशे भुवनविदिते पुष्करावर्तकानां
जानामि त्वां प्रकृतिपुरुषं कामरूपं मघोनः ॥
तेनार्थित्वं त्वयि विधिवशाद्दूरबन्धुर्गतोऽहं
याच्ञा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ॥ ६ ॥

संतप्तानां त्वमसि शरणं तत्पयोद प्रियायाः
संदेशं मे हर धनपतिक्रोधविश्लेषितस्य ॥
गन्तव्या ते वसतिरलका नाम यक्षेश्वराणां
बाह्योद्यानस्थितहरशिरश्चन्द्रिकाधौतहर्म्या ॥ ७ ॥

त्वामारूढं पवनपदवीमुद्गृहीतालकान्ताः
प्रेक्षिष्यन्ते पथिकवनिताः प्रत्ययादाश्वसन्त्यः ॥
कः सन्नद्धे विरहविधुरां त्वय्युपेक्षेत जायां
न स्यादन्योऽप्यहमिव जनो यः पराधीनवृत्तिः ॥ ८ ॥

मन्दं मन्दं नुदति पवनश्चानुकूलो यथा त्वां
वामश्चायं नदति मधुरं चातकस्ते सगन्धः ॥
गर्भाधानक्षणपरिचयान्नूनमाबद्धमालाः
सेविष्यन्ते नयनसुभगं खे भवन्तं बलाकाः ॥ ९ ॥

कर्तुं यच्च प्रभवति महीमुच्छिलीन्ध्रामवन्ध्यां
तच्छ्रुत्वा ते श्रवणसुभगं गर्जितं मानसोत्काः ॥
आकैलासाद्बिसकिसलयच्छेदपाथेयवन्तः
संपत्स्यन्ते नभसि भवतो राजहंसाः सहायाः ॥ १० ॥

तां चावश्यं दिवसगणनातत्परामेकपत्नी-
मव्यापन्नामविहतगतिर्द्रक्ष्यसि भ्रातृजायाम्॥
आशाबन्धः कुसुमसदृशं प्रायशो ह्यङ्गनानां
सद्यःपाति प्रणयि हृदयं विप्रयोगे रुणद्धि॥ ११॥

आपृच्छस्व प्रियसखममुं तुङ्गमालिङ्ग्य शैलं
वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु॥
काले काले भवति भवतो यस्य संयोगमेत्य
स्नेहव्यक्तिश्चिरविरहजं मुञ्चतो बाष्पमुष्णम्॥ १२॥

मार्गं तावच्छृणु कथयतस्त्वत्प्रयाणानुकूलं
संदेशं मे तदनु जलद श्रोष्यसि श्रोत्रपेयम्॥
खिन्नः खिन्नः शिखरिषु पदं न्यस्य गन्तासि यत्र
क्षीणः क्षीणः परिलघु पयः स्रोतसां चोपभुज्य॥ १३॥

अद्रेः शृङ्गं हरति पवनः किं स्विदित्युन्मुखीभि-
र्दृष्टोत्साहश्चकितचकितं मुग्धसिद्धाङ्गनाभिः॥
स्थानादस्मात्सरसनिचुलादुत्पतोदङ्मुखः खं
दिङ्नागानां पथि परिहरन्स्थूलहस्तावलेपान्॥ १४॥

रत्नच्छायाव्यतिकर इव प्रेक्ष्यमेतत्पुरस्ता-
द्वल्मीकाग्रात्प्रभवति धनुःखण्डमाखण्डलस्य॥
येन श्यामं वपुरतितरां कान्तिमापत्स्यते ते
बर्हेणेव स्फुरितरुचिना गोपवेषस्य विष्णोः॥ १५॥

त्वय्यायत्तं कृषिफलमिति भ्रूविलासानभिज्ञैः
प्रीतिस्निग्धैर्जनपदवधूलोचनैः पीयमानः॥
सद्यःसीरोत्कषणसुरभि क्षेत्रमारुह्य मालं
किञ्चित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण॥ १६॥

त्वामासारप्रशमितवनोपप्लवं साधु मूर्ध्ना
वक्ष्यत्यध्वश्रमपरिगतं सानुमानाम्रकूटः ॥
न क्षुद्रोऽपि प्रथमसुकृतापेक्षया संश्रयाय
प्राप्ते मित्रे भवति विमुखः किं पुनर्यस्तथोच्चैः ॥ १७ ॥

छन्नोपान्तः परिणतफलद्योतिभिः काननाम्रै-
स्त्वय्यारूढे शिखरमचलः स्निग्धवेणीसवर्णे ॥
नूनं यास्यत्यमरमिथुनप्रेक्षणीयामवस्थां
मध्ये श्यामः स्तन इव भुवः शेषविस्तारपाण्डुः ॥ १८ ॥

स्थित्वा तस्मिन्वनचरवधूभुक्तकुञ्जे मुहूर्तं
तोयोत्सर्गद्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्णः ॥
रेवां द्रक्ष्यस्युपलविषमे विन्ध्यपादे विशीर्णां
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्गे गजस्य ॥ १९ ॥

तस्यास्तिक्तैर्वनगजमदैर्वासितं वान्तवृष्टि—
र्जम्बूकुञ्जप्रतिहतरयं तोयमादाय गच्छेः ॥
अन्तःसारं घन तुलयितुं नानिलः शक्ष्यति त्वां
रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय ॥ २० ॥

नीपं दृष्ट्वा हरितकपिशं केसरैरर्धरूढै—
राविर्भूतप्रथममुकुलाः कन्दलीश्चानुकच्छम् ॥
जग्ध्वारण्येष्वधिकसुरभिं गन्धमाघ्राय चोर्व्याः
सारङ्गास्त्वां जललवमुचः सूचयिष्यन्ति मार्गम् ॥ २१ ॥

उत्पश्यामि द्रुतमपि सखे मत्प्रियार्थं यियासोः
कालक्षेपं ककुभसुरभौ पर्वते पर्वते ते ॥
शुक्लापाङ्गैः सजलनयनैः स्वागतीकृत्य केकाः
प्रत्युद्यातः कथमपि भवान्गन्तुमाशु व्यवस्येत् ॥ २२ ॥

पाण्डुच्छायोपवनवृतयः केतकैः सूचिभिन्नै-
र्नीडारम्भैर्गृहबलिभुजामाकुलग्रामचैत्याः ॥
त्वय्यासन्ने परिगतफलश्यामजम्बूवनान्ताः
संपत्स्यन्ते कतिपयदिनस्थायिहंसा दशार्णाः ॥ २३ ॥

तेषां दिक्षु प्रथितविदिशालक्षणां राजधानीं
गत्वा सद्यः फलमविकलं कामुकत्वस्य लब्धा ॥
तीरोपान्तस्तनितसुभगं पास्यसि स्वादु यस्मा —
त्सभ्रूभङ्गं मुखमिव पयो वेत्रवत्याश्चलोर्मि ॥ २४ ॥

नीचैराख्यं गिरिमधिवसेस्तत्र विश्रामहेतो-
स्त्वत्संपर्कात्पुलकितामिव प्रौढपुष्पैः कदम्बैः ॥
यः पण्यस्त्रीरतिपरिमलोद्गारिभिर्नागराणा-
मुद्दामानि प्रथयति शिलावेश्मभिर्यौवनानि ॥ २५ ॥

विश्रान्तः सन् व्रज वननदीतीरजातानि सिञ्च
न्नुद्यानानां नवजलकणैर्यूथिकाजालकानि ॥
गण्डस्वेदापनयनरुजाक्लान्तकर्णोत्पलानां
छायादानात्क्षणपरिचितः पुष्पलावीमुखानाम् ॥ २६ ॥

वक्रः पन्था यदपि भवतः प्रस्थितस्योत्तराशां
सौधोत्सङ्गप्रणयविमुखो मा स्म भूरुज्जयिन्याः ॥
विद्युद्दामस्फुरितचकितैस्तत्र पौराङ्गनानां
लोलापाङ्गैर्यदि न रमसे लोचनैर्वञ्चितोऽसि ॥ २७ ॥

वीचिक्षोभस्तनितविहगश्रेणिकाञ्चीगुणायाः
संसर्पन्त्याः स्खलितसुभगं दर्शितावर्तनाभेः ॥
निर्विन्ध्यायाः पथि भव रसाभ्यन्तरः सन्निपत्य
स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमो हि प्रियेषु ॥ २८ ॥

वेणीभूतप्रतनुसलिला तामतीतस्य सिन्धुः
पाण्डुच्छाया तटरुहतरुभ्रंशिभिर्जीर्णपर्णैः
सौभाग्यं ते सुभग विरहावस्थया व्यञ्जयन्ती
कार्श्यं येन त्यजति विधिना स त्वयैवोपपाद्यः ॥ २९॥

प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान्
पूर्वोद्दिष्टामनुसर पुरीं श्रीविशालां विशालाम् ॥
स्वल्पीभूते सुचरितफले स्वर्गिणां गां गतानां
शेषैः पुण्यैर्हृतमिव दिवः कान्तिमत्खण्डमेकम् ॥ ३० ॥

दीर्घीकुर्वन्पटु मदकलं कूजितं सारसानां
प्रत्यूषेषु स्फुटितकमलामोदमैत्रीकषायः ॥
यत्र स्त्रीणां हरति सुरतग्लानिमङ्गानुकूलः
शिप्रावातः प्रियतम इव प्रार्थनाचाटुकारः ॥ ३१ ॥

जालोद्गीर्णैरुपचितवपुः केशसंस्कारधूपै—
र्बन्धुप्रीत्या भवनशिखिभिर्दत्तनृत्योपहारः ॥
हर्म्येष्वस्याः कुसुमसुरभिष्वध्वखेदं नयेथा
लक्ष्मीं पश्यँल्ललितवनितापादरागाङ्कितेषु ॥ ३२ ॥

भर्तुः कण्ठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः
पुण्यं यायास्त्रिभुवनगुरोर्धाम चण्डीश्वरस्य ॥
धूतोद्यानं कुवलयरजोगन्धिभिर्गन्धवत्या-
स्तोयक्रीडानिरतयुवतिस्नानतिक्तैर्मरुद्भिः ॥ ३३ ॥

अप्यन्यस्मिञ्जलधर महाकालमासाद्य काले
स्थातव्यं ते नयनविषयं यावदत्येति भानुः ॥
कुर्वन्संध्याबलिपटहतां शूलिनः श्लाघनीया-
मामन्द्राणां फलमविकलं लप्स्यसे गर्जितानाम् ॥ ३४ ॥

पादन्यासैः क्वणितरशनास्तत्र लीलावधूतै
रत्नच्छायाखचितवलिभिश्चामरैः क्लान्तहस्ताः ॥
वेश्यास्त्वत्तो नखपदसुखान्प्राप्य वर्षाग्रबिन्दू-
नामोक्ष्यन्ते त्वयि मधुकरश्रेणिदीर्घान्कटाक्षान् ॥ ३५ ॥

पश्चादुच्चैर्भुजतरुवनं मण्डलेनाभिलीनः
सान्ध्यं तेजः प्रतिनवजपापुष्परक्तं दधानः ॥
नृत्यारम्भे हर पशुपतेरार्द्रनागाजिनेच्छां
शान्तोद्वेगस्तिमितनयनं दृष्टभक्तिर्भवान्या ॥ ३६ ॥

गच्छन्तीनां रमणवसतिं योषितां तत्र नक्तं
रुद्धालोके नरपतिपथे सूचिभेद्यैस्तमोभिः ॥
सौदामन्या कनकनिकषस्निग्धया दर्शयोर्वीं
तोयोत्सर्गस्तनितमुखरो मा स्म भूर्विक्लवास्ताः ॥ ३७ ॥

तां कस्यां चिद्भवनवलभौ सुप्तपारावतायां
नीत्वा रात्रिं चिरविलसनात्खिन्नविद्युत्कलत्रः ॥
दृष्टे सूर्ये पुनरपि भवान् वाहयेदध्वशेषं
मन्दायन्ते न खलु सुहृदामभ्युपेतार्थकृत्याः ॥ ३८ ॥

तस्मिन्काले नयनसलिलं योषितां खण्डितानां
शान्तिं नेयं प्रणयिभिरतो वर्त्म भानोस्त्यजाशु ॥
प्रालेयास्रं कमलवदनात्सोऽपि हर्तुं नलिन्याः
प्रत्यावृत्तस्त्वयि कररुधि स्यादनल्पाभ्यसूयः ॥ ३९ ॥

गंभीरायाः पयसि सरितश्चेतसीव प्रसन्ने
छायात्मापि प्रकृतिसुभगो लप्स्यते ते प्रवेशम् ॥
तस्मादस्याः कुमुदविशदान्यर्हसि त्वं न धैर्या-
न्मोघीकर्तुं चटुलशफरोद्वर्तनप्रेक्षितानि ॥ ४० ॥

तस्याः किञ्चित्करधृतमिव प्राप्तवानीरशाखं
हृत्वा नीलं सलिलवसनं मुक्तरोधोनितम्बम्॥
प्रस्थानं ते कथमपि सखे लम्बमानस्य भावि
ज्ञातास्वादो विवृतजघनां को विहातुं समर्थः ॥ ४१ ॥

त्वन्निष्यन्दोच्छ्वसितवसुधागन्धसंपर्करम्यः
स्रोतोरन्ध्रध्वनितसुभगं दन्तिभिः पीयमानः ॥
नीचैर्वास्यत्युपजिगमिषोर्देवपूर्वं गिरिं ते
शीतो वायुः परिणमयिता काननोदुम्बराणाम्॥ ४२ ॥

तत्र स्कन्दं नियतवसतिं पुष्पमेघीकृतात्मा
पुष्पासारैः स्नपयतु भवान् व्योमगङ्गाजलार्द्रैः ॥
रक्षाहेतोर्नवशशिभृता वासवीनां चमूना—
मत्यादित्यं हुतवहमुखे संभृतं तद्धि तेजः ॥ ४३ ॥

ज्योतिर्लेखावलयि गलितं यस्य बर्हं भवानी
पुत्रप्रेम्णा कुवलयदलप्रापि कर्णे करोति ॥
धौतापाङ्गं हरशशिरुचा पावकेस्तं मयूरं
पश्चादद्रिग्रहणगुरुभिर्गर्जितैर्नर्तयेथाः ॥ ४४ ॥

आराध्यैनं शरवणभवं देवमुल्लङ्घिताध्वा
सिद्धद्वन्द्वैर्जलकणभयाद्वीणिभिर्मुक्तमार्गः ॥
व्यालम्बेथाः सुरभितनयालम्भजां मानयिष्यन्
स्रोतोमूर्त्या भुवि परिणतां रन्तिदेवस्य कीर्तिम्॥ ४५ ॥

त्वय्यादातुं जलमवनते शार्ङ्गिणो वर्णचौरे
तस्याः सिन्धोः पृथुमपि तनुं दूरभावात्प्रवाहम्॥
प्रेक्षिष्यन्ते गगनगतयो नूनमावर्ज्य दृष्टी-
रेकं मुक्तागुणमिव भुवः स्थूलमध्येन्द्रनीलम्॥ ४६ ॥

तामुत्तीर्य व्रज परिचितभ्रूलताविभ्रमाणां
पक्ष्मोत्क्षेपादुपरि विलसत्कृष्णशारप्रभाणाम् ॥
कुन्दक्षेपानुगमधुकरश्रीमुषामात्मबिम्बम्
पात्रीकुर्वन्दशपुरवधूनेत्रकौतूहलानाम् ॥ ४७ ॥

ब्रह्मावर्तं जनपदमथ च्छायया गाहमानः
क्षेत्रं क्षत्रप्रधनपिशुनं कौरवं तद्भजेथाः ॥
राजन्यानां सितशरशतैर्यत्र गाण्डीवधन्वा
धारापातैस्त्वमिव कमलान्यभ्यवर्षन्मुखानि ॥ ४८ ॥

हित्वा हालामभिमतरसां रेवतीलोचनाङ्कां
बन्धुप्रीत्या समरविमुखो लाङ्गली याः सिषेवे ॥
कृत्वा तासामभिगममपां सौम्य सारस्वतीना–
मन्तःशुद्धस्त्वमपि भविता वर्णमात्रेण कृष्णः ॥ ४९ ॥

तस्माद्गच्छेरनुकनखलं शैलराजावतीर्णां
जह्नोः कन्यां सगरतनयस्वर्गसोपानपङ्क्तिम् ॥
गौरीवक्त्रभ्रुकुटिरचनां या विहस्येव फेनैः
शंभोः केशग्रहणमकरोदिन्दुलग्नोर्मिहस्ता ॥ ५० ॥

तस्याः पातुं सुरगज इव व्योम्नि पश्चार्धलम्बी
त्वं चेदच्छस्फटिकविशदं तर्कयेस्तिर्यगम्भः ॥
संसर्पन्त्या सपदि भवतः स्रोतसि च्छाययासौ
स्यादस्थानोपगतयमुनासङ्गमेवाभिरामा ॥ ५१ ॥

आसीनानां सुरभितशिलं नाभिगन्धैर्मृगाणां
तस्या एव प्रभवमचलं प्राप्य गौरं तुषारैः ॥
वक्ष्यस्यध्वश्रमविनयने तस्य शृङ्गे निषण्णः
शोभां शुभ्रत्रिनयनवृषोत्खातपङ्कोपमेयाम् ॥ ५२ ॥

तं चेद्वायौ सरति सरलस्कन्धसंघट्टजन्मा
बाधेतोल्काक्षपितचमरीबालभारो दवाग्निः ॥
अर्हस्येनं शमयितुमलं वारिधारासहस्रै-
रापन्नार्तिप्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम् ॥ ५३ ॥

ये संरंभोत्पतनरभसाः स्वाङ्गभङ्गाय तस्मि-
न्मुक्ताध्वानं सपदि शरभा लङ्घयेयुर्भवन्तम् ॥
तान्कुर्वीथास्तुमुलकरकावृष्टिपातावकीर्णा-
न्के वा न स्युः परिभवपदं निष्फलारम्भयत्नाः ॥ ५४ ॥

तत्र व्यक्तं दृषदि चरणन्यासमर्धेन्दुमौलेः
शश्वत्सिद्धैरुपचितबलिं भक्तिनम्रः परीयाः ॥
यस्मिन्दृष्टे करणविगमादूर्ध्वमुद्धूतपापाः
संकल्पन्ते स्थिरगणपदप्राप्तये श्रद्दधानाः ॥ ५५ ॥

शब्दायन्ते मधुरमनिलैः कीचकाः पूर्यमाणाः
संसक्ताभिस्त्रिपुरविजयो गीयते किन्नरीभिः ॥
निर्ह्रादस्ते मुरज इव चेत्कन्दरेषु ध्वनिः स्या-
त्सङ्गीतार्थो ननु पशुपतेस्तत्र भावी समग्रः ॥ ५६ ॥

प्रालेयाद्रेरुपतटमतिक्रम्य तांस्तान्विशेषा-
न्हंसद्वारं भृगुपतियशो वर्त्म यत्क्रौञ्चरन्ध्रम् ॥
तेनोदीचीं दिशमनुसरेस्तिर्यगायामशोभी
श्यामः पादो बलिनियमनाभ्युद्यतस्येव विष्णोः ॥ ५७॥

गत्वा चोर्ध्वं दशमुखभुजोच्छ्वासितप्रस्थसंधेः
कैलासस्य त्रिदशवनितादर्पणस्यातिथिः स्याः ॥
शृङ्गोच्छ्रायैः कुमुदविशदैर्यो वितत्य स्थितः खं
राशीभूतः प्रतिदिनमिव त्र्यम्बकस्याट्टहासः ॥ ५८ ॥

उत्पश्यामि त्वयि तटगते स्निग्धभिन्नाञ्जनाभे
सद्यःकृत्तद्विरददशनच्छेदगौरस्य तस्य ॥
शोभामद्रेः स्तिमितनयनप्रेक्षणीयां भवित्री-
मंसन्यस्ते सति हलभृतो मेचके वाससीव ॥ ५९ ॥

हित्वा तस्मिन्भुजगवलयं शंभुना दत्तहस्ता
क्रीडाशैले यदि च विचरेत्पादचारेण गौरी ॥
भङ्गीभक्त्या विरचितवपुः स्तम्भितान्तर्जलौघः
सोपानत्वं कुरु मणितटारोहणायाग्रयायी ॥ ६० ॥

तत्रावश्यं वलयकुलिशोद्घट्टनोद्गीर्णतोयं
नेष्यन्ति त्वां सुरयुवतयो यन्त्रधारागृहत्वम् ॥
ताभ्यो मोक्षस्तव यदि सखे घर्मलब्धस्य न स्या-
त्क्रीडालोलाः श्रवणपरुषैर्गर्जितैर्भाययेस्ताः ॥ ६१ ॥

हेमाम्भोजप्रसवि सलिलं मानसस्याददानः
कुर्वन्कामं क्षणमुखपटप्रीतिमैरावतस्य ॥
धुन्वन्कल्पद्रुमकिसलयान्यंशुकानीव वातै-
र्नानाचेष्टैर्जलद ललितैर्निर्विशेस्तं नगेन्द्रम् ॥ ६२ ॥

तस्योत्सङ्गे प्रणयिन इव स्रस्तगङ्गादुकूलां
न त्वं दृष्ट्वा न पुनरलकां ज्ञास्यसे कामचारिन् ॥
या वः काले वहति सलिलोद्गारमुच्चैर्विमाना
मुक्ताजालग्रथितमलकं कामिनीवाभ्रवृन्दम् ॥ ६३ ॥

॥ इति पूर्वमेघः समाप्तः ॥

॥ उत्तरमेघः ॥

विद्युत्वन्तं ललितवनिताः सेन्द्रचापं सचित्राः
सङ्गीताय प्रहतमुरजाः स्निग्धगंभीरघोषम् ॥
अन्तस्तोयं मणिमयभुवस्तुङ्गमभ्रंलिहाग्राः
प्रासादास्त्वां तुलयितुमलं यत्र तैस्तैर्विशेषैः ॥ ६४ ॥

हस्ते लिलाकमलमलके बालकुन्दानुविद्धं
नीता लोध्रप्रसवरजसा पाण्डुतामानने श्रीः ॥
चूडापाशे नवकुरबकं चारु कर्णे शिरीषं
सीमन्ते च त्वदुपगमजं यत्र नीपं वधूनाम् ॥ ६५ ॥

यत्रोन्मत्तभ्रमरमुखराः पादपा नित्यपुष्पा
हंसश्रेणीरचितरशना नित्यपद्मा नलिन्यः ॥
केकोत्कण्ठा भवनशिखिनो नित्यभास्वत्कलापा
नित्यज्योत्स्नाः प्रतिहततमोवृत्तिरम्याः प्रदोषाः ॥ ६६ ॥

आनन्दोत्थं नयनसलिलं यत्र नान्यैर्निमित्तै-
र्नान्यस्तापः कुसुमशरजादिष्टसंयोगसाध्यात् ॥
नाप्यन्यस्मात्प्रणयकलहाद्विप्रयोगोपपत्ति-
र्वित्तेशानां न च खलु वयो यौवनादन्यदस्ति ॥ ६७ ॥

यस्यां यक्षाः सितमणिमयान्येत्य हर्म्यस्थलानि
ज्योतिश्छायाकुसुमरचितान्युत्तमस्त्रीसहायाः ॥
आसेवन्ते मधु रतिफलं कल्पवृक्षप्रसूतं
त्वद्गम्भीरध्वनिषु शनकैः पुष्करेष्वाहतेषु ॥ ६८ ॥

मन्दाकिन्याः सलिलशिशिरैः सेव्यमाना मरुद्भि-
र्मन्दाराणामनुतटरुहां छायया वारितोष्णाः ॥
अन्वेष्टव्यैः कनकसिकतामुष्टिनिक्षेपगूढैः
संक्रीडन्ते मणिभिरमरप्रार्थिता यत्र कन्याः ॥ ६९ ॥

नीवीबन्धोच्छ्वसितशिथिलं यत्र बिम्बाधराणां
क्षौमं रागादनिभृतकरेष्वाक्षिपत्सु प्रियेषु ॥
अर्चिस्तुङ्गानभिमुखमपि प्राप्य रत्नप्रदीपान्
न्ह्रीमूढानां भवति विफलप्रेरणा चूर्णमुष्टिः ॥ ७० ॥

नेत्रा नीताः सततगतिना यद्विमानाग्रभूमी-
रालेख्यानां नवजलकणैर्दोषमुत्पाद्य सद्यः ॥
शङ्कास्पृष्टा इव जलमुचस्त्वादृशा जालमार्गै-
र्धूमोद्गारानुकृतिनिपुणा जर्जरा निष्पतन्ति ॥ ७१ ॥

यत्र स्त्रीणां प्रियतमभुजालिङ्गनोच्छ्वासितानां-
मङ्गग्लानिं सुरतजनितां तन्तुजालावलम्बाः ॥
त्वत्संरोधापगमविशदैश्चन्द्रपादैर्निशीथे
व्यालुम्पन्ति स्फुटजललवस्यन्दिनश्चन्द्रकान्ताः ॥ ७२ ॥

अक्षय्यान्तर्भवननिधयः प्रत्यहं रक्तकण्ठै-
रुद्गायद्भिर्धनपतियशः किंनरैर्यत्र सार्धम् ॥
वैभ्राजाख्यं विबुधवनिता वारमुख्या सहाया
बद्धालापा बहिरुपवनं कामिनो निर्विशन्ति ॥ ७३ ॥

गत्युत्कम्पादलकपतितैर्यत्र मन्दारपुष्पैः
पत्रच्छेदैः कनककमलैः कर्णविभ्रंशिभिश्च ॥
मुक्ताजालैः स्तनपरिसरच्छिन्नसूत्रैश्च हारै-
र्नैशो मार्गः सवितुरुदये सूच्यते कामिनीनाम् ॥ ७४ ॥

मत्वा देवं धनपतिसखं यत्र साक्षाद्वसन्तं
प्रायश्चापं न वहति भयान्मन्मथः षट्पदज्यम् ॥
सभ्रूभङ्गप्रहितनयनैः कामिलक्ष्येष्वमोघै-
स्तस्यारम्भश्चतुरवनिताविभ्रमैरेव सिद्धः॥ ७५ ॥

वासश्चित्रं मधु नयनयोर्विभ्रमादेशदक्षं
पुष्पोद्भेदं सह किसलयैर्भूषणानां विकल्पान् ॥
लाक्षारागं चरणकमलन्यासयोग्यं च यस्या-
मेकः सूते सकलमबलामण्डनं कल्पवृक्षः ॥ ७६ ॥

तत्रागारं धनपतिगृहानुत्तरेणास्मदीयं
दूराल्लक्ष्यं सुरपतिधनुश्चारुणा तोरणेन ॥
यस्योपान्ते कृतकतनयः कान्तया वर्धितो मे
हस्तप्राप्यस्तबकनमितो बालमन्दारवृक्षः ॥ ७७ ॥

वापी चास्मिन्मरकतशिलाबद्धसोपानमार्गा
हैमैश्छन्ना विकचकमलैः स्निग्धवैदूर्यनालैः ॥
यस्यास्तोये कृतवसतयो मानसं संनिकृष्टं
नाध्यास्यन्ते व्यपगतशुचस्त्वामपि प्रेक्ष्य हंसाः ॥ ७८ ॥

तस्यास्तीरे रचितशिखरः पेशलैरिन्द्रनीलैः
क्रीडाशैलः कनककदलीवेष्टनप्रेक्षणीयः ॥
मद्गेहिन्याः प्रिय इति सखे चेतसा कातरेण
प्रेक्ष्योपान्तस्फुरिततडितं त्वां तमेव स्मरामि ॥ ७९ ॥

रक्ताशोकश्चलसकिसलयः केसरश्चात्र कान्तः
प्रत्यासन्नौ कुरबकवृतेर्माधवीमण्डपस्य ॥
एकः सख्यास्तव सह मया वामपादाभिलाषी
काङ्क्षत्यन्यो वदनमदिरां दोहदच्छद्मनास्याः ॥ ८० ॥

तन्मध्ये च स्फटिकफलका काञ्चनी वासयष्टि-
र्मूले बद्धा मणिभिरनतिप्रौढवंशप्रकाशैः ॥
तालैः शिञ्जावलयसुभगैर्नर्तितः कान्तया मे
यामध्यास्ते दिवसविगमे नीलकण्ठः सुहृद्वः ॥ ८१ ॥

एभिः साधो हृदयनिहितैर्लक्षणैर्लक्षयेथा
द्वारोपान्ते लिखितवपुषौ शङ्खपद्मौ च दृष्ट्वा ॥
क्षामच्छायं भवनमधुना मद्वियोगेन नूनं
सूर्यापाये न खलु कमलं पुष्यति स्वामभिख्याम् ॥ ८२ ॥

गत्वा सद्यः कलभतनुतां शीघ्रसंपातहेतोः
क्रीडाशैले प्रथमकथिते रम्यसानौ निषण्णः ॥
अर्हस्यन्तर्भवनपतितां कर्तुमल्पाल्पभासं
खद्योतालीविलसितनिभां विद्युदुन्मेषदृष्टिम् ॥ ८३ ॥

तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिम्बाधरोष्ठी
मध्ये क्षामा चकितहरिणीप्रेक्षणा निम्ननाभिः ॥
श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्यां
या तत्र स्याद्युवतिविषये सृष्टिराद्येव धातुः ॥ ८४ ॥

तां जानीथाः परिमितकथां जीवितं मे द्वितीयं
दूरीभूते मयि सहचरे चक्रवाकीमिवैकाम् ॥
गाढोत्कण्ठां गुरुषु दिवसेष्वेषु गच्छत्सु बाला
जातां मन्ये शिशिरमथितां पद्मिनीं वान्यरूपाम् ॥ ८५ ॥

नूनं तस्याः प्रबलरुदितोच्छूननेत्रं प्रियाया
निःश्वासानामशिशिरतया भिन्नवर्णाधरोष्ठम् ॥
हस्तन्यस्तं मुखमसकलव्यक्ति लम्बालकत्वा-
दिन्दोर्दैन्यं त्वदनुसरणक्लिष्टकान्तेर्बिभर्ति ॥ ८६ ॥

आलोके ते निपतति पुरा सा बलिव्याकुला वा
मत्सादृश्यं विरहतनु वा भावगम्यं लिखन्ती ॥
पृच्छन्ती वा मधुरवचनां सारिकां पञ्जरस्थां
कच्चिद्भर्तुः स्मरसि रसिके त्वं हि तस्य प्रियेति ॥ ८७ ॥

उत्सङ्गे वा मलिनवसने सौम्य निक्षिप्य वीणां
मद्गोत्राङ्कं विरचितपदं गेयमुद्गातुकामा ॥
तन्त्रीमार्द्रां नयनसलिलैः सारयित्वा कथंचि-
द्भूयो भूयः स्वयमपि कृतां मूर्च्छनां विस्मरन्ती ॥ ८८ ॥

शेषान्मासान्विरहदिवसस्थापितस्यावधेर्वा
विन्यस्यन्ती भुवि गणनया देहलीदत्तपुष्पैः ॥
मत्सङ्गं वा हृदयनिहितारम्भमास्वादयन्ती
प्रायेणैते रमणविरहेष्वङ्गनानां विनोदाः ॥ ८९ ॥

सव्यापारामहनि न तथा पीडयेन्मद्वियोगः
शङ्के रात्रौ गुरुतरशुचं निर्विनोदां सखीं ते ॥
मत्संदेशैः सुखयितुमलं पश्य साध्वीं निशीथे
तामुन्निद्रामवनिशयनां सौधवातायनस्थः ॥ ९० ॥

आधिक्षामां विरहशयने सन्निषण्णैकपार्श्वां
प्राचीमूले तनुमिव कलामात्रशेषां हिमांशोः ॥
नीता रात्रिः क्षण इव मया सार्धमिच्छारतैर्या
तामेवोष्णैर्विरहमहतीमश्रुभिर्यापयन्तीम् ॥ ९१ ॥

पादानिन्दोरमृतशिशिराञ्जालमार्गप्रविष्टान्
पूर्वप्रीत्या गतमभिमुखं संनिवृत्तं तथैव ॥
चक्षुः खेदात्सलिलगुरुभिः पक्ष्मभिश्छादयन्तीं
साभ्रेऽह्नीव स्थलकमलिनीं नप्रबुद्धां नसुप्ताम् ॥ ९२ ॥

निःश्वासेनाधरकिसलयक्लेशिना विक्षिपन्तीं
शुद्धस्नानात्परुषमलकं नूनमागण्डलम्बम् ॥
मत्संभोगः कथमुपनयेत्स्वप्नजोऽपीति निद्रा-
माकाङ्क्षन्तीं नयनसलिलोत्पीडरुद्धावकाशाम् ॥ ९३ ॥

आद्ये बद्धा प्रथमदिवसे या शिखा दाम हित्वा
शापस्यान्ते विगलितशुचा तां मयोद्वेष्टनीयाम् ॥
स्पर्शक्लिष्टामयमितनखेनासकृत्सारयन्तीं
गण्डाभोगात्कठिनविषमामेकवेणीं करेण ॥ ९४ ॥

सा संन्यस्ताभरणमबला पेशलं धारयन्ती
शय्योत्सङ्गे निहितमसकृद्दुःखदुःखेन गात्रम् ॥
त्वामप्यस्रं नवजलमयं मोचयिष्यत्यवश्यं
प्रायः सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा ॥ ९५ ॥

जाने सख्यास्तव मयि मनःसंभृतस्नेहमस्मा-
दित्थंभूतां प्रथमविरहे तामहं तर्कयामि ॥
वाचालं मां न खलु सुभगंमन्यभावः करोति
प्रत्यक्षं ते निखिलमचिराद्भ्रातरुक्तं मया यत् ॥ ९६ ॥

रुद्धापाङ्गप्रसरमलकैरञ्जनस्नेहशून्यं
प्रत्यादेशादपि च मधुनो विस्मृतभ्रूविलासम् ॥
त्वय्यासन्ने नयनमुपरिस्पन्दि शङ्के मृगाक्ष्या
मीनक्षोभाच्चलकुवलयश्रीतुलामेष्यतीति ॥ ९७ ॥

वामश्चास्याः कररुहपदैर्मुच्यमानो मदीयै-
र्मुक्ताजालं चिरपरिचितं त्याजितो दैवगत्या ॥
संभोगान्ते मम समुचितो हस्तसंवाहनानां
यास्यत्यूरुः सरसकदलीस्तम्भगौरश्चलत्वम् ॥ ९८ ॥

तस्मिन्काले जलद यदि सा लब्धनिद्रासुखा स्या-
दन्वास्यैनां स्तनितविमुखो याममात्रं सहस्व ॥
मा भूदस्याः प्रणयिनि मयि स्वप्नलब्धे कथंचि-
त्सद्यः कण्ठच्युतभुजलताग्रन्थि गाढोपगूढम् ॥ ९९ ॥

तामुत्थाप्य स्वजलकणिकाशीतलेनानिलेन
प्रत्याश्वस्तां सममभिनवैर्जालकैर्मालतीनाम् ॥
विद्युद्गर्भः स्तिमितनयनां त्वत्सनाथे गवाक्षे
वक्तुं धीरः स्तनितवचनैर्मानिनीं प्रक्रमेथाः ॥ १०० ॥

भर्तुर्मित्रं प्रियमविधवे विद्धि मामम्बुवाहं
तत्संदेशैर्हृदयनिहितैरागतं त्वत्समीपम् ॥
यो वृन्दानि त्वरयति पथि श्राम्यतां प्रोषितानां
मन्द्रस्निग्धैर्ध्वनिभिरबलावेणिमोक्षोत्सुकानि ॥ १०१ ॥

इत्याख्याते पवनतनयं मैथिलीवोन्मुखी सा
त्वामुत्कण्ठोच्छ्वसितहृदया वीक्ष्य संभाव्य चैवम् ॥
श्रोष्यत्यस्मात्परमवहिता सौम्य सीमन्तिनीनां
कान्तोदन्तः सुहृदुपनतः संगमात्किंचिदूनः ॥ १०२ ॥

तामायुष्मन्मम च वचनादात्मनश्चोपकर्तुं
ब्रूयादेवं तव सहचरो रामगिर्याश्रमस्थः ॥
अव्यापन्नः कुशलमबले पृच्छति त्वां वियुक्तः
पूर्वाभाष्यं सुलभविपदां प्राणिनामेतदेव ॥ १०३ ॥

अङ्गेनाङ्गं प्रतनु तनुना गाढतप्तेन तप्तं
सास्रेणाश्रुद्रुतमविरतोत्कण्ठमुत्कण्ठितेन ॥
उष्णोच्छ्वासं समधिकतरोच्छ्वासिना दूरवर्ती
संकल्पैस्तैर्विशति विधिना वैरिणा रुद्धमार्गः ॥ १०४ ॥

शब्दाख्येयं यदपि किल ते यः सखीनां पुरस्ता-
त्कर्णे लोलः कथयितुमभूदाननस्पर्शलोभात् ॥
सोऽतिक्रान्तः श्रवणविषयं लोचनाभ्यामदृष्ट-
स्त्वामुत्कण्ठाविरचितपदं मन्मुखेनेदमाह ॥ १०५ ॥

श्यामास्वङ्गं चकितहरिणीप्रेक्षणे दृष्टिपातं
वक्त्रच्छायां शशिनि शिखिनां बर्हभारेषु केशान् ॥
उत्पश्यामि प्रतनुषु नदीवीचिषु भ्रूविलासा-
न्हन्तैकस्मिन्क्वचिदपि न ते चण्डि सादृश्यमस्ति ॥ १०६ ॥

त्वामालिख्य प्रणयकुपितां धातुरागैः शिलाया-
मात्मानं ते चरणपतितं यावदिच्छामि कर्तुम् ॥
अस्रैस्तावन्मुहुरुपचितैर्दृष्टिरालुप्यते मे
क्रूरस्तस्मिन्नपि न सहते संगमं नौ कृतान्तः ॥ १०७ ॥

मामाकाशप्रणिहितभुजं निर्दयाश्लेषहेतो-
र्लब्धायास्ते कथमपि मया स्वप्नसंदर्शनेषु ॥
पश्यन्तीनां न खलु बहुशो न स्थलीदेवतानां
मुक्तास्थूलास्तरुकिसलयेष्वश्रुलेशाः पतन्ति ॥ १०८ ॥

भित्त्वा सद्यः किसलयपुटान्देवदारुद्रुमाणां
ये तत्क्षीरस्रुतिसुरभयो दक्षिणेन प्रवृत्ताः ॥
आलिङ्ग्यन्ते गुणवति मया ते तुषाराद्रिवाताः
पूर्वं स्पृष्टं यदि किल भवेदङ्गमेभिस्तवेति ॥ १०९ ॥

संक्षिप्येत क्षण इव कथं दीर्घयामा त्रियामा
सर्वावस्थास्वहरपि कथं मन्दमन्दातपं स्यात् ॥
इत्थं चेतश्चटुलनयने दुर्लभप्रार्थनं मे
गाढोष्माभिः कृतमशरणं त्वद्वियोगव्यथाभिः ॥ ११० ॥

नन्वात्मानं बहु विगणयन्नात्मनैवावलम्बे
तत्कल्याणि त्वमपि नितरां मा गमः कातरत्वम् ॥
कस्यैकान्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥ १११ ॥

शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शार्ङ्गपाणौ
शेषान्मासान्गमय चतुरो लोचने मीलयित्वा ॥
पश्चादावां विरहगुणितं तं तमात्माभिलाषं
निर्वेक्ष्यावः परिणतशरच्चन्द्रिकासु क्षपासु ॥ ११२ ॥

भूयश्चाह त्वमपि शयने कण्ठलग्ना पुरा मे
निद्रां गत्वा किमपि रुदती सस्वनं विप्रबुद्धा ॥
सान्तर्हासं कथितमसकृत्पृच्छतश्च त्वया मे
दृष्टः स्वप्ने कितव रमयन्कामपि त्वं मयेति ॥ ११३ ॥

एतस्मान्मां कुशलिनमभिज्ञानदानाद्विदित्वा
मा कौलीनाच्चकितनयने मय्यविश्वासिनी भूः ॥
स्नेहानाहुः किमपि विरहे ध्वंसिनस्ते त्वभोगा-
दिष्टे वस्तुन्युपचितरसाः प्रेमराशीभवन्ति ॥ ११४ ॥

आश्वास्यैवं प्रथमविरहोदग्रशोकां सखीं ते
शैलादाशु त्रिनयनवृषोत्खातकूटान्निवृत्तः ॥
साभिज्ञानप्रहितकुशलैस्तद्वचोभिर्ममापि
प्रातःकुन्दप्रसवशिथिलं जीवितं धारयेथाः ॥ ११५ ॥

कच्चित्सौम्य व्यवसितमिदं बन्धुकृत्यं त्वया मे
प्रत्यादेशान्न खलु भवतो धीरतां कल्पयामि ॥
निःशब्दोऽपि प्रदिशसि जलं याचितं चातकेभ्यः
प्रत्युक्तं हि प्रणयिषु सतामीप्सितार्थक्रियैव ॥ ११६ ॥

एतत्कृत्वा प्रियमनुचितप्रार्थनावर्तिनो मे
सौहार्दाद्वा विधुर इति वा मय्यनुक्रोशबुद्ध्या
इष्टान्देशान्विचर जलद प्रावृषा संभृतश्री–
र्मा भूदेवं क्षणमपि च ते विद्युता विप्रयोगः ॥ ११७ ॥

॥ इत्युत्तरमेघः समाप्त : ॥

॥ इति महाकविश्रीकालिदासविरचितं मेघदूतकाव्यं समाप्तम् ॥

टीपा व परिशिष्टें

परिशिष्टें

१ [उल्लेख 'अवतरणिका' पृ. (४८)]

अनुवेदगङ्गम् ।

(हें पत्र माझे स्वर्गवासी स्नेही वे. शा. सं. महादेवशास्त्री नीलकंठ कात्रे हे वाई प्राज्ञपाठशालेंत शिकत असतां त्यांस शेळोली (शैलाली)हून मीं लिहिलें. यापैकीं श्लोक २ ते १९ हा भाग 'अनुवेदगङ्गम्' या नांवान 'राजारामियन्' या नियतकालिकाच्या सप्टेंबर १९१७ च्या अंकांत आला आहे. तसेंच 'वाङ्मय–श्री–खण्ड' ग्रंथांत सर्वच कविता आहे.)

स्वस्त्यस्तु ते शैशवमित्र साधो पवित्रकार्याहितबुद्धितेजः ।
सुस्थोऽहमेतत्प्रहिणोमि पत्रं शैलालितः क्षेमनिवेदनाय ॥१॥

*　　*　　*

नित्यं प्रभाते लघुमुक्तशय्यः कूजद्विहङ्गाहितचित्तमोदः ।
सूर्यांशुभिः प्राप्तहिमव्यपायः सिस्नासुरेतां सरितं सरामि ॥२॥
पश्याम्यहं तत्र च वेदगङ्गां मन्दप्रवाहां बत हेमवर्णाम् ।
स्वल्पोर्मिसुव्यञ्जितहासशोभां श्यामप्रभाश्मावलिवेणिभूषाम् ॥३॥
यस्यां क्वचिन्मीनवरा नितान्तस्फुरद्वपूंषि क्षणमात्रमेव ।
प्रकाशयन्तो दधते स्वरूपं सौदामिनीनां जलदस्थितानाम् ॥४॥
आम्राश्च यस्यास्तटभूमिवृद्धा वासन्तिकं पल्लवमादधानाः ।
भृङ्गाकुलानां नवमञ्जरीणां सुवासदानेन भवन्ति धन्याः ॥५॥
दूरश्रुतः पश्चिमतो निनादो जलौघजातो मधुरश्च यस्याः ।
मनोहरो राव इव स्फुटोऽयं विभाति नूनं कटिमेखलानाम् ॥६॥
रोधोगता पल्लविता च यस्या जम्बूतरोः पङ्क्तिरियं सुवर्णा ।
गुञ्जन्मिलिन्दश्रवणीयशब्दा प्रोच्चै रुता सत्कवितेव भाति ॥७॥
श्वेता इमे यत्तटवासिनश्च बकाः स्वभक्ष्याप्तिविचारमग्नाः ।
बद्धालयः स्नातविभूतिलिप्तं सन्ध्यापरं मां नु विडम्बयन्ति ॥८॥
छाया सुनीला पतिता च यस्यां दूरस्थितानां लघुपर्वतानाम् ।
हैमाय सा कामपि भां ददाति जलाय भोगासननीलविष्णोः ॥९॥

तां वेदगङ्गां विमलां विशुद्धां भागीरथीं मूर्तिमतीं विगाहे ।
अङ्गेषु यद्गाहनमेत्र दिव्यमतीव तेजो मम संदधाति ॥१०॥
सायं समाताह्निककर्मजातो ग्रामाददूरस्थगिरिं प्रहृष्टः ।
गच्छाम्यहं स्वच्छजलोत्सकच्छं सद्वल्लरीरूढरसालवृक्षम् ॥ ११ ॥
तथोन्नतस्थानशिलैकदेशं सव्येतराङ्काहितवामजानुः ।
अस्ताचलप्रस्थितभानुकान्तिं दिदृक्षुरासे विकचाक्षियुग्मः ॥१२॥
तत्र स्थितोऽहं च विलोकयामि ग्रामं मदीयं गिरिवर्तुलान्तम् ।
यो वेदगङ्गाजलसन्निकर्षादाधारचूताङ्कुरवद्विभाति ॥१३॥
क्वचित्क्वचिद्वृक्षचयानुमेयान्दूरस्थितानप्युपकण्ठमेतान् ।
ग्रामान्विलोक्यालियुतं जलस्थं नीलारविन्दस्तबकं स्मरामि ॥१४॥
सन्ध्यारुणायां भुवि विस्तृतास्ते स्तोकप्रदेशा हरितेक्षुयुक्ताः ।
ननु स्थितैः पुष्पितकिंशुकेषु शुकैस्तुलामाशु समाप्नुवन्ति ॥१५॥
स्नेहस्नुतस्तन्य इमाश्च गावो वत्सप्रिया उद्धृतपुच्छमूलाः ।
धावन्ति गेहं द्रुतमालपद्भिर्गीतानि गोपैर्निकटानुयाताः ॥१६॥
प्राज्यं कुराज्यं सहसा विहाय गच्छामि किं विश्रमहेतुरस्तम् ।
अत्रैव किं वा सततं वसेयमितीव भास्वान्सुतरां विरक्तः ॥१७॥
निम्नप्रदेशा विगतांशुभावास्तथाप्यसौ भूधरदुर्गसानुः ।
प्रकाशवानेव चिरं स्थितोऽस्ति यथोच्चता स्यादधिका तथा श्रीः॥१८॥
तत्स्थानवासे सह काङ्क्षया मे सहस्ररश्मिर्जलधौ निमग्नः ।
स्वं स्वं गृहं गच्छति सर्वसत्त्वे नत्वेश्वरं ग्रामवरं निवर्ते ॥१९॥

* * *

तव मे पूर्वदृष्टस्य याताः काश्चित्समाः सुहृद् ।
पत्रव्याजेन पश्यामि त्वामहं दूरसंस्थितः ॥२०॥
अतस्त्वां प्रार्थये मित्र त्वन्निरामयवाचकम् ।
वदद्भ्यासवृद्धिं च पत्रं मां प्रेषयास्विति ॥२१॥
सर्वत्र प्रसृता कीर्तिर्यस्य चन्द्रिकया समा ।
वन्दनीयगुरुं तं ते दण्डवत्प्रणमाम्यहम् ॥२२॥
श्रीखण्डेकुलजन्मानं श्रीचिन्तामणिनन्दनम् ।
रामचन्द्रं सखायं ते मां विद्धि प्रियदर्शन ॥२३॥

इति शम् ।

२ [उल्लेख, 'अवतरणिका' पृ. (४५) टीप]

श्री. देशमुख हे रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय प्रमुख अधिकारी —गव्हर्नर—झाले. त्या प्रसंगींच्या त्यांच्या अभिनंदनाच्या मुंबईंतील एका खासगी समारंभांत मीं पुढील पद्यांनीं त्यांचें अभिनंदन केलें.(ता. २९-३-४३)

अभिनंदन

" देशाचें भूषण तूं प्रकटविशी थोर हिंदवी प्रतिभा ।
तुज 'धन्य धन्य!' बोले भारतमाता तथैव आङ्ग्लसभा ! ॥१॥
देशाचे उजळविशी मुख तूं यास्तव विशेष 'देशमुख' ।
तव अभिनंदन करितां कां नच पावेल सर्व देश सुख ? ॥२॥
केला त्वां जो रसमय असा मेघदूतानुवाद,
ती कौबेरी वसति अलका ज्यामधें दे प्रमोद, ।
तेणें वाटे तुजवरि जणों तोषला यक्षराज,
भांडाराच्या निज तुजसि तो दे किल्या खास आज! ॥३॥
होवो उत्कर्ष ऐसाच तुमचा सदनुष्ठित ।
लक्ष्मीसरस्वती दोघी सौख्य देवोत संतत ॥४॥ "

तेव्हां उत्तरादाखल 'भाषण' म्हणून तत्कालस्फूर्त पुढील मार्मिक आर्या श्री. देशमुख यांनीं रचून म्हटली:—

"वाङ्मय–श्री–खण्डाच्या सुग्रासानें पुनश्च बोळविलें ।
तेणें उपकृत बहु मी, कविबल्लव तुम्हि सलील लोळविले! ॥१॥"

व हीच आर्या लिहून स्वतःचा मेघदूतानुवाद त्यांनीं मला सप्रेम भेट दिला.

* * *

पुढें लवकरच त्यांस सर ही बहुमानाची पदवी १९४४ या वर्षारंभीं लाभली तेव्हां अभिनन्दनार्थ मीं त्यांस पुढील संस्कृत पद्य-पत्र लाहोरहून लिहिलें— (आमचा लष्करी हॉस्पिटल कँप त्यावेळीं लाहोर येथें होता.)

श्री ता. ८-१-४४ लाहोर कटोनमेंट

स्वस्त्यस्तु ते मतिमतां वर मित्रवर्य दिष्ट्या भवान् सुपदवीसमलङ्कृतोऽसि
को नाम ते न हृदये रचयेत्सपर्यां कुर्यान्न ते सदभिनन्दनमद्य को नु ॥१॥

दिशि दिशि तव कीर्तिर्वर्धतां सौख्यमूर्ति-
भवतु तव गुणौघो राष्ट्रसंवर्धनार्थः ।
दिशतु विपुलमायुस्सौख्ययुक्तं प्रभुस्ते
व्रजतु सफलतां ते काङ्क्षितं स्याद्धि यद्यद् ॥२॥
त्वं राजसेऽधुना विद्वन् पद्व्या परिभूषितः ।
यथैव सूनुर्नन्दस्य भूषितो वनमालया ॥ ३ ॥
यामाश्रित्य प्रभवति बुधो हर्तुमार्तिं जनानां
सा प्राप्ता ते ननु विधिवशादुत्तमा राजलक्ष्मीः ।
एषा सम्यग्विलसतुतरां त्वामधिश्रित्य कान्तं
मन्दाक्रान्ता भवतु पदवी सर्वदा ते सुखाय $ ॥ ४ ॥

इति शम् । भवदीयो
रा. चिं. श्रीखण्डे

* * *

३ [अवतरणिका पृ. (५३) मध्यें उल्लेखिलेला श्लोक ' जरी हे असती शैल०' इ.पुढील (१)पत्रांत आहे. कै.ती. सदाशिव गोपाळ उर्फ भाऊसाहेब श्रीखंडे यांस फलटणला हें पत्र मीं लिहिलें. त्यांचें काव्यात्मक उत्तर आलेंच. तथापि त्यांचे चि. मोरेश्वरराव यांचेंहि पत्र मला जें आलें तें विशेषतः येथें (२) देण्यांत येत आहे. तसेंच त्यांस मीं लिहिलेलें उत्तरहि शेवटीं (३) देत आहें.श्री.मोरेश्वररावांच्या प्रतिभेची चमक कशी मार्मिक व चित्तवेधक आहे तें रसिकांस कळायला उशीर लागणार नाहीं —रा. चिं. श्रीखंडे]

(१)

श्री केटा ता. २५–१०–४२

ती. भाऊसाहेब यांस सा. न. वि. वि.

पोंचलें तुमचें पत्र कवितामय सुंदर;
वाटलें ओतिल्या धारा सुधेच्या श्रवणीं कुणीं ! १

$ हळूं हळूं आक्रमण केलेली पदवी म्हणजे मार्ग तुला सर्वदा सुखकर होवो ! तसेंच हळूं हळूं प्राप्त झालेली पदवी म्हणजे उच्च स्थिति तुला सुखकर होवो ! प्रस्तुत पद्यांत ' मंदाक्रान्ता ' हें वृत्तनाम मुद्रालंकारानें तसेंच श्लेषानें आलें आहे, हें तज्ज्ञ जाणतीलच.

वाचतां हर्षलों भारी आशीर्वाद शुभप्रद;
न बहू मानितों चित्तीं हिरे मोतींहि त्यापरी ! २
सदाशिवमुखें दे कीं, आशीर्वाद सदाशिव;
बोलतो संकटा जाणों, 'मद्भक्तां न कदा शिव !' ३
सदाशिवकृपाभाग्यें सदा शिव असो अम्हां !
रमापतिसवें अस्मद्गेहीं नित्य रमो रमा ! ४
स्मरतों तुमच्या आम्ही नित्य सद्गुणमंदिरा,
जरी हों पातलों दैवें दूरच्या गिरिकंदरां ! ५
वाखाणी आमुची राणी तुम्हांसी बहु आदरें;
तैशींच स्मरती तुम्हां यशवंतादि लेंकरें ! ६
परमेश तुम्हां ठेवो अनन्तानन्दसागरीं;
शरच्छत तुम्हां लाभो जीवनानन्दमाधुरी ! ७
वाटतें येथलें कांहीं करावें शैलवर्णन—
पहा या पर्वतश्रेणी उघड्या, तरुपर्ण न !! ८
जरी हे असती शैल भाउबंद हिमाद्रिचे,
वनश्री लाटली त्यानें यांना केवळ फत्तर ! ९
तरीही भव्यता यांच्या सानूंची नाहिं सानुली;
जणों उंचावुनी माथा देखे शैल हिमालया ! १०

[टीप—६ व्या श्लोकांत सौ. व चि. यशवंत यांचे उल्लेख आल्यानें पुढील श्लोकांत चि. अनंत व चि. शरत् यांचीं नांवेंहि त्यांनीं रुसूं नये म्हणून घातलीं आहेत. हें आपणांस लिहिणें नकोच !]

—रा. चिं. श्रीखंडे

(२)

(वरील पत्रास श्री. मो. स. श्रीखंडे —कै. ती. भाऊसाहेबांचे चिरंजीव— यांचें त्याच अनुष्टुप् छंदांत मला उत्तर आलें तें असें.—)

श्री फलटण ता. १६-११-४२

मोरया नमितों तुम्हां अति आदरपूर्वक,
कविता रचण्या त्याला स्फूर्ति दे रघुनायक ! १

वाटते मजला भीति टाकीं शाईच दाटते !
थरथरे अंग हें सारें थपथपे घाम त्यावरी ! २
हार्ट लब्–लाब्लुब् वाजे पल्स नाचे थुईथुई !
काव्यताप जसा वाढे काव्याची हुडहुडी भरे !! ३
काव्यस्फूर्ति मनीं आली विषया परि थांग न;
मंडपीं वाजतो ताशा बोहलें परि तें रितें ! ४
कडाडे वीज आकाशीं मेघांनीं व्यापलें नभ;
परंतु थेंब ना खालीं तैशीच कविता मम ! ५
कमिट्या नेमिल्या मोठ्या, रिपोर्टहि प्रसिद्धिले
परंतु कार्यनिष्पत्ति कांहीं नाहीं ! तसेंच हें !! ६
कविता हीं करूनी मी, तुम्हांपाशीं निवेदणें
म्हणजे मूर्खता माझ्या पदरीं मींच बांधणें ! ७
कालिदासासि उपमा किंवा गांधींसि साधुता
किंवा तात्यांसि साहित्य समजाऊनि सांगणें ! ८
साहित्यमंडपीं शोभे त्वत्काव्यकामिनी सदा
तेथें माझी कृती आहे पायपोसासमान ही ! ९
असो, परि मला त्याचा विषाद न मनीं कदा
त्वत्काव्य वाचुनी वाटे संतोषानंद सर्वदा १०
काव्यश्री लाभली तुम्हां काव्यानंद मिळे मला !
नैवेद्य लाभतो देवा परि मोदक मूषका ! ११
सदाशिवकृपाभाग्यें मोरया सुख सेवितो
भवानीकमलेशाच्या कृपें तुम्ही सुखी असा !! १२

— मो. स. श्रीखंडे

(३)

[श्री. मोरेश्वररावांच्या वरील पत्रास माझें उत्तर गेलें तें असें.]

नमस्कार वि. वि. श्री

केटा ता. १५-६-४३

वाचोनि तुमच्या काव्या हर्षली बहु मन्मति
प्रसादसुलभा ऐशी दुर्लभा श्रीसरस्वती ! १

विनयादरयुक्तत्वें माधुर्यें गुणशालिनी
कविता वनिता मातें भासली मंजुभाषिणी ! २
आपुल्या कवितेलागीं 'पायपोसासमान ही'
असें कां म्हणतां विद्वन् ! पायपोसासमा न ही ! ३
किंवा सद्भक्तसंतांच्या पायपोसास मानही !
हें खरें तेविं तेंही हो 'पायपोसासमान ही'! ४
ऐशा कोटिक्रमें लावूं अर्थ सुंदर त्याप्रति
म्हणोनि म्हणती मोठे 'वाचमर्थोऽनुधावति'! ५

* * *

'मोरोपंत कवी मोठे' असें जें म्हणती जनीं
आजही म्हणतां तैसें नसे किमपिही उणें ! ६

* * *

सृष्टिशोभाविशेषांच्या येथल्या वर्णनास्तव
जोडूंया प्रतिभेलागीं करूनी नम्र वाक्स्तव ! ७
स्मरते मजला झाली हिमाची वृष्टि जी इथें
न तसें देखिलें पूर्वीं दृश्य म्यां कधिं रम्य तें ! ८
भासलें वरुनी कोणी सृष्टिदेवीस घातली
कांबळी शुभ्र ऊर्णेची उबदार अशी भली ! ९
हळू हळू शुभ्र तंतु कसले तरी वर्षुनी
हिमार्दिता सृष्टिदेवी वाटलें झांकिली कुणीं ! १०
क्षणैक गमलें कोणीं वर्षिलीं धवलें सुमें
सृष्टिदेवीस, कीं तीच्या उद्यानीं पुष्पशून्यता ! ११
किंवा वाटे नसे येथें शर्कराकण संप्रति
म्हणोनि ओतिलीं कोणीं भांडारें शर्करामय ! १२
किंवा क्षीराब्धि हा सारा पसरे सर्वतोदिश !
कीं कोणी पूरवी दुग्ध उपमेंतील शर्करे ! १३
किंवा हा पसरे सांठा दिगन्तीं शुभ्र सैंधव
कल्पनेलागिं जें येई म्हणावें तें हवें तसें ! १४

कीं करी शंभु कैलासीं, अट्टहास्य यदा कदा
तयाच्या लहरी येथें मूर्त होवोनि पातल्या !! १५
कीं जगीं पुण्यवंतांनीं जीं यशें थोर अर्जिलीं
स्वर्गीं जागा न त्यां माया म्हणोनी खालिं ओतिलीं !! १६

इति शम्। —रा. चिं. श्रीखंडे

टीपा

—पूर्वमेघ—

[सु. मे. = सुश्लोकमेघ. मे. अगर मेघ. = मेघदूत]

सु. मे. ५, गिरिसानुलग्ना– पर्वतशिखरास लागलेल्या. कुंजर–हत्ती. तटाला ढुसण्या देण्याची (वप्रक्रीडेची) हौस बैल, हत्ती इ.ना असते.

सु. मे. ८, जीवन-द – जीवन म्ह. जल देणारा मेघ; श्लिष्टार्थानें प्राण रक्षण करणारा.

सु. मे. ९, 'कुटजकुसुमैः' किंवा 'उटजकुसुमैः' या दोनी पाठांतील अर्थ लागू पडतील. कुटज म्हणजे कुडा; याचीं फुलें वर्षाकालारंभीं उद्भवतात; उटज म्ह. आश्रम; तेथील पुष्पें; यांत विविध पुष्पांचा समावेश होईल. म्हणून अनुवादांत तो अर्थ स्वीकारला आहे.

सु. मे. ११, स्मरार्त–स्मर म्ह. मदन, त्यानें पीडिलेले.

सु. मे. १२, सहस्रनेत्र–इंद्र. कामरूप–वाटेल तो आकार घेऊं शकणारा

सु. मे. १५, शीर्षेंदुभा– मस्तकींच्या चंद्राची प्रभा. हर्म्य–प्रासाद, वाडे, मंदिरें.

सु. मे. १६, पांथबाला— प्रवासी जनांच्या विरहिणी गृहिणी.

सु, मे. १७—'तूं येशि तेव्हां 'या ऐवजीं 'तूं ठाकशी तैं 'असा पाठ घेतल्यास 'सन्नद्धे त्वयि ' या मूळ पदांचा अधिक अर्थ येऊं शकेल.

सु. मे. १८, अत्युनुकूल– गमनास अतिशय योग्य; 'गत्यनुकूल ' असेंहि पाठांतर सुचवितां येईल.

सु. मे. १९, बलाका —बगळ्या, गर्भासिक्षण – गर्भधारणा करून

घेण्याच्या सुखाचा क्षण म्ह. वेळ, क्षण म्ह. महोत्सव असाही अर्थ आहे. येथें दोनी अर्थ घेतां येतील. मुळांतील 'आबद्धमालाः' याचा अर्थ रांगेनें जाणाऱ्या असा आहे. त्यांतच 'आपल्या पंक्तींनीं हे मेघा, बलाका जणुं तुला माळ गुंफतील' असा अर्थ अनुवादांत घातला आहे.

सु. मे. २४, पदचिह्नमाला—उमटलेल्या पावलांची पंक्ति. श्रीरामाचीं पदचिन्हें रामगिरींत राम वनवासांत संचार करितांना उमटलेलीं असणार. त्यांस अलिंगून, वंदून प्रवासास प्रारंभ कर असें यक्ष मेघास सांगतो. आधींच्या श्लोकांत प्रवास निर्विघ्न होईल असें म्हटलें आहे व त्यासच अधिक अनुकूलता या श्लोकांतील रामपदवंदनानें साधण्यांत आली आहे.

सु. मे. २७, डोंगरांतील हलकें व पथ्यकर असें पाणी कृशत्वहारी म्ह. पुष्टिप्रद होईल. मेघ तें जल शोषून पुष्ट होईल हें योग्यच आहे.

सु. मे. २९, निचुल— एक प्रकारचे वेत.

सु. मे. ३०, दिङ्नाग— दिशांचे हत्ती. 'निचुल' व 'दिङ्नाग' हे कालिदासाचे अनुक्रमें चाहते व प्रतिस्पर्धी पंडित होते अशा अर्थाचें आविष्करण येथें सूचित केलें गेलें आहे असा मल्लिनाथाचा आशय आहे. परंतु हा श्लिष्टार्थाचा ध्वन्यर्थ योग्य वाटत नाहीं. यास ऐतिहासिक आधार अन्यत्र आढळत नाहीं हें एक; दुसरें, कालिदास प्रतिपक्षीयावर हल्ला करण्यासाठीं इतरत्र कोठेंच प्रयत्न करीत असलेला दिसत नाहीं. मग यांतच ओढून ताणून तसा श्लेष काढून तसें ध्वनित करणें अनवश्यक होय. 'मल्लीनाथी' म्हणतात ती अशाच अनभिप्रेत श्लेष काढण्याला!

सु. मे. ३२, सुंदर मोरपिस व इंद्रधनुष्य यांतील वर्णसाम्य कालिदासानें उत्कृष्टतेनें दाखविलें आहे व मेघास श्रीकृष्णाची भव्योदात्त उपमा देऊन अतिशय मनोवेधकता निर्मिली आहे. 'उपमा कालिदासस्य'

सु. मे. ३३, येथें ग्रामीण कृषीवल स्त्रियांचे मुग्धतेचे नेत्रविलास उपकर्त्या मेघाचें स्वागत करतांना आढळतात. याच्या उलट, उज्जयिनीच्या नागर स्त्रियांचे विदग्ध कटाक्ष (मे. २७), महाकालेश्वरापुढील नृत्यांगनांचे कृतज्ञ कटाक्ष (मे. ३५), किंवा दशपूरच्या विलासिनींचे मधुर कटाक्ष (मे. ४७) कालिदासानें तितक्याच रम्यतेनें व सूक्ष्मतेनें वर्णिले आहेत.

त्याचप्रमाणें पुढें (मे. ७५) अलकेंतील रामाजनांचे उन्मादक भ्रूविलास व कटाक्ष कवीनें मार्मिकतेनें गाइले आहेत.

सु. मे. ३७,३८; डोंगरास पृथ्वीस्तनाची दिलेली ही उपमा अत्यंत समर्पक आहे. विशेषत: विलासी सुरमिथुनांस तो 'आम्रकूट' तसा दिसेल असें या विरही यक्षांस वाटत आहे व तसें तो मेघास सांगत आहे. यक्षाचा मेघहि विलासी व शृंगारतज्ज्ञच आहे. सर्वांचाच स्वभावपरितोष उत्कृष्ट साधला गेला आहे.

पर्वतांना पृथ्वीस्तनाची उपमा कालिदास तसे इतर कविहि देतात. रघु. ३ ऱ्या सर्गांत 'सुदक्षिणा दौर्हृदलक्षणं दधौ' इ. वर्णन करतांना प्रथमच गर्भिणी झालेल्या अंगनांच्या स्तनाग्रवर्णांत नीलिमा येतो त्याचें फार सूक्ष्म वर्णन कालिदासानें केलेलें आहे. पृथ्वी ही 'रत्नगर्भा' असल्यानें तिचा स्तनाग्र मेघामुळें नीलिमा धारण करणाराच असणार!

सु. मे. ४१, मतंगज–हत्ती.

सु. मे. ४३,४४, मतंग–हत्ती; कुरंग–हरिण. कदंब फुललेले पाहून भृंगांना, नदीकांठच्या कंदलींना आलेल्या नव्या कळ्या खायला मिळाल्यानें हरिणांना व प्रथम पर्जन्याच्या शितोड्यांनीं सुटलेल्या पृथ्वीच्या सुगंधाचा आस्वाद मिळाल्यानें हत्तींना, असें सर्वांना कळेल कीं हे मेघा! तुझें इकडे आगमन झालें! वेत्रवती, निर्विन्ध्या, सिंधु इ. नद्या मेघप्रणयिनी होत

'विदिशेच्या 'वेत्रवती' चा स्वादिष्ट रसास्वाद घे. पुढें अवंतीच्या मार्गांत विभ्रमांनीं अंतरंगप्रीति दर्शविणाऱ्या 'निर्विंध्या' नदीचें रसग्रहण कर. विरहिणीप्रमाणें उत्कंठतेनें तुझी मार्गप्रतिक्षा करणाऱ्या कृश 'सिंधु' नदींत जलवर्षणहि कर. पुढें चाललास कीं 'शिप्रा' नदीवरला सुखद व श्रमपरिहारक वारा, 'गंधवती' नदीचे पद्मगंधयुक्त वारे इ.हि लाभतील.' हें सार!

मे. ३४, आपल्या सर्व कृतींनीं परमेश्वरसेवा करावी असा भाव या श्लोकांत उत्तमप्रकारें प्रकटलेला आहे. [माझ्या 'मुकुंदपूजें'त गोपी कृष्णास म्हणते—

अनेक पुष्पें तुज वाहियेलीं ते धन्य बा! पादप, धन्य वेली।
तरीच हें सार्थक जन्म होईं दिलें तुला तें जरि शेषशायि॥ १३

—वाङ्मय-श्री-खंड 'कृष्णगुंफा']

मे. ३५, महाकालेश्वराच्या सेविका नर्तकी स्वाभाविकपणें कृतज्ञतेनें मेघाकडे पहाणार.कारण त्यांच्या नखक्षतांवर त्याचे आद्य शीतल तुषार सुखदस्पर्शदायी होतील. वर्णन अत्यंत सूक्ष्म व स्वभावसुंदर आहे.

मे. ३६, श्रीशंकराचें पांघरण्याचें रक्तार्द्र गजचर्म पार्वतीच्या ललित दृष्टीला पसंत कसें पडावें ? अर्थात् मेघाची संध्यारुणता व तशा स्थितींत छत्रासारखें आच्छादन शंकरासहि गजचर्मांची उणीव भासूं देणार नाहीं व पार्वतीहि कृतज्ञतेनें मेघाकडे पाहील !

मे. ३७, अभिसारिकांचें हें वर्णन अतिशय मनोरम आहे. तसेंच, " काश्मीरगौरतनु लेवुनि रत्नकांची, रेघेसमान दिसते अभिसारिकांची; अंधार हाच निकषोपल भासला गे ! त्यांचें जणों प्रणयहेम कसास लागे !" हें ' सुश्लोक–गोविंद ' सर्ग ११-१४ मधील वर्णन रसिकांस वाचनीय वाटेल.

अभिसारिका– कान्ताच्या भेटीस स्वेच्छया उत्कंठेनें जाणारी रमणी.

मेघदूतांतील कांहीं कांहीं श्लोकांतील वर्णनें इतरहि कांहीं नायिकांच्या वर्णनांस लागू पडणारीं आहेत. उदाहरणार्थ श्लो. ३९ मध्यें ' खण्डिता ' नायिका वर्णिली आहे.

मे. ३९, येथें ' खंडिता ' नायिकाप्रकार सुंदरतेनें वर्णिला आहे. विद्युल्लतेसह विलासांत रात्र शांत स्थलीं घालविल्यानंतर उजाडतांच मेघ मित्रकार्य पुरें करण्यासाठीं तांतडीनें निघणार; तथापि तसें निघतांना त्यानें कमलिनी व सूर्य यांच्या मीलनाच्या– कमलिनीचे हिमरूपी अश्रु पुसावयास सूर्य स्वकरांनीं प्रयत्न करीत असतां त्याच्या आड येऊं नये. ' विसरून कदाचित् आलास तर सूर्याला ' राग ' (अधिकच लाली) येईल बरें !!' अशी यक्ष मेघास विशेष सूचना देत आहे. सूर्योदयाचे वेळीं सूर्यासन्निध येणारे ढग संध्यारंजित असतातच !

मे. ४०, येथें ' गंभीरा ' नदी म्हणजे गंभीर स्वभावाची एक प्रणयिनीच कल्पिली आहे. व मेघानें तिच्या शफरींच्या उद्वर्तनांचे प्रेमकटाक्ष विफल करूं नयेत, असें मेघास यक्षाचें सांगणें आहे !

मे. ४१, गंभीरेच्या सलिलप्रवाहाचें वस्त्राशीं 'साम्य, वेतसांचें तिच्या हातांशीं साम्य– तूं तिचे विवृत पुलिन पाहशील तेव्हां तिचा

रसास्वाद घेण्याचा मोह तुझ्यासारख्या 'ज्ञातास्वाद' रसिकास कसा बरें टाळतां येईल ? अरसिक टीकाकार यांतील समुचित शब्दयोजनेवरहि केव्हां केव्हां अकारण रण माजवितात ! यक्षाची भूमिका, मेघाचें नद्यांशीं प्रणयाचें नातें व त्या 'गंभीर' प्रणयिनीचा प्रकट झालेला भाव यांचा विचार करतां या श्लोकांतील कल्पनेबद्दल कालिदासास धन्यवादच द्यावेसे वाटतात.

'को विहातुं समर्थः' अशा शब्दरचनेचे श्लोक संस्कृत वाङ्मयांत अन्यत्रहि आहेत. उदा.— भर्तृहरि शृंगारशतक

'वचसि भवति सङ्गत्यागमुद्दिश्य वार्ता श्रुतिमुखरमुखानां केवलं पण्डितानाम् ।
जघनमरुणरत्नग्रन्थकाञ्चीकलापं कुवलयनयनानां को विहातुं समर्थः ॥७१॥

मे. ४३, मेघाचें कामरूपत्व गृहीत धरलें आहे. त्यामुळें पुष्पवर्षाव करणेंहि मेघास अशक्य नाहीं. तसेंच पहा—

मन्दरः कन्दरोद्गीर्णैः प्रसरैर्मातरिश्वनः ।
कम्पाकुलवनाभोगः पुष्पमेघांस्तनोति खे ॥२६॥

—योगवासिष्ठ, निर्वाणप्रकरण उत्तरार्ध सर्ग ११४

सेनानी, कार्तिकेय, षडानन, कुमार हीं समानार्थक नामें होत.

मे. ४४, आपल्या 'कुमारा'च्या मोराचें सहज गळलेलें रम्य पीस आधींच इंदीवर असलेल्या आपल्या कानांत पार्वती घालते. यांत वात्सल्यभाव प्रगट झाला आहेच. त्याचप्रमाणें कुवलयशोभेहूनहि बर्हशोभा आगळी वाटण्यासारखी आहे. शिवाय अलंकरणांवर अलंकरणें सहजासहजीं लाभलीं तर घालण्याचा ललनांचा स्वभावहि प्रकट झाला आहे !

मे. ५०, या श्लोकांत 'स्वाधीनपतिका'नायिका गंगेच्या रूपानें वर्णन केली आहे. ती स्ववीचिरूपी हातांनीं शंकराचे चंद्रकोरीला हात घालून केशाकर्षणच करते ! शंकर या प्रणयिनीच्या अगदीं अंकितच आहे ! शिवाय आपल्या फेनांनीं ती जणुं काय सवत जी पार्वती तिला हंसते आहे !! स्त्रीस्वभावाचें फार उत्तम प्रकटन या श्लोकांत कालिदासप्रतिभेनें केलेलें आहे.

मे. ५३. कालिदासाच्या 'अर्थान्तरन्यास'रचनाकौशलाचें हें एक नितान्तरम्य उदाहरण होय. 'आपन्नार्तिप्रशमनफलाः संपदो

ह्युत्तमानाम् !' मेघाची उत्तमता कालिदासाचा यक्ष वारंवार प्रशंसितो. कालिदासानें अशा सुरम्य वर्णनांनीं अत्युत्कृष्ट असे अनेक आदर्श आपल्या काव्यसृष्टींत प्रतिभाबलानें निर्माण केले आहेत.

मे. ५४. उत्तम गुणांवर उगाच निन्देचा हल्ला करूं पहाणारे दुर्जन आपलें हंसें मात्र करून घेतात हें कालिदासानें येथें ध्वन्यर्थानें किंवा सुंदर अर्थान्तरन्यासानें दाखविलें आहे !

मे. ५६. संगीताचा समग्र संच पूर्ण होण्यास मृदंगध्वनितुल्य अशा आमंद्र मेघगर्जनांची योजना रम्यतम कल्पनेची आहे. वाल्मीकि-रामायणांतील पुढील श्लोक पहाः— (किष्किंधाकांड सर्ग २८)

षट्पादतन्त्रीमधुराभिधानं प्लवङ्गमोदीरितकण्ठतालम् ।

आविष्कृतं मेघमृदङ्गनादैर्वनेषु सङ्गीतमिव प्रवृत्तम् ॥३६॥

मे. ६०. कैलासपर्वतावरील आपल्या सहलींत सहजपणेंच शंकर पार्वतीसह चालतांना तिला सांवरण्यासाठीं आपला हात देतात. पण तसें प्रियेस सहाय्य करतांना तिला भीति न वाटावी म्हणून आपलें अहिकंकण काढून घेतात ! गजचर्मांचा जसा एक उद्वेग मागें कालिदासानें निर्देशिला (३६ मे.) तसाच येथें सापाच्या भीतीचा उल्लेख स्त्रियांची स्वभाव-भीरुता उत्कृष्टपणें दाखवितो ! शिवाय सापाला कोणीहि भिईलच.

कालिदास आपल्या 'कुमारसंभवा'मध्यें बटुवेषधारी शंकराच्या मुखीं, नाग व गजचर्म यांचा मुद्दाम उल्लेख करून पार्वतीच्या मनःप्रीतीची परीक्षा करीत आहे. या कुमारसंभव सर्ग ५–६६,६७ व्या श्लोकांचा माझ्या सुश्लोककुमारमधील अनुवाद असाः—

"हे तुच्छकाग्रहपरे ! न कळे विवाहीं त्वद्धस्त कौतुक धरोनिच केविं साही—
त्या नागकंकणकरें पहिलेंचि तैसें केलें करग्रहण सुंदरि ! सांग खासें ! ६६
याचा विचार तरि तूंचि उमे ! करावा संयोग केविं उभयांप्रति योग्य व्हावा—
हंसांकिता नववधूधृत त्या दुकूला त्या तेविं रक्तमय कांतगजाजिनाला ! ६७"

— सुश्लोककुमार सर्ग ५

तसेंच पुढें पार्वतीचें प्रत्युत्तर पहा—

"तें विश्वमूर्ति वपु ना कळतें कुणाही, हो भूषणाढ्य अथवा विलसो धृताहि;
हो हस्तिचर्मधर,पांघरुं वा दुकूल,कीं हो कपालि,शिरिं वा धरुं इंदु बाल!७८"

मे. ६३. कालिदासानें 'अलका' नामाची एकप्रकारें सार्थताच आपल्या 'मुक्ताजालग्रथितमलकं' इ. कल्पनेनें सिद्ध केली आहे! [पहा वाल्मीकिरामायण— महान्ति कूटानि महीधराणां धाराविधौतान्यधिकं विभान्ति । महाप्रमाणैर्विपुलैः प्रपातैर्मुक्ताकलापैरिव लम्बमानैः ।।]

कालिदासाची उपमा फारच मनोहर आहे. अलकेंतले उंच प्रासाद हे तिच्या शीर्षस्थानीं, नील मेघ हे नील अलक, व त्यांतून स्रवणाऱ्या निर्मल धारा या जणुं मुक्ताकलापाप्रमाणेंच भासणाऱ्या! यांमुळें ती अलका म्हणजे एक सुंदर कामिनीच! अलकेशेजारील गंगाप्रवाह हा जणूं तिचें किंचित् शिथिल झालेलें वस्त्रच! अशी कामिनी हिमालयाचे—कैलासाचे अंकावर विराजत आहे.

आधीं मार्ग सांगून मग संदेश सांगीन म्हणून १३ व्या श्लोकांत यक्षानें मेघास आश्वासिलेलें मार्गकथन या श्लोकांत समाप्त झालें.

"प्रणयिन उत्सङ्गे स्वलंकृतां कामिनीमिवेति यक्षवचनद्वारेण भविष्यत्तदीयप्रियासमागमसूचकं मङ्गलं कविकुलचकोरचन्द्रेण प्रयुक्तं वेदितव्यमिति मङ्गलम्।"

प्रथमाश्वासाच्या या अंतिम श्लोकांत प्रणयी युग्माचें मधुर शृंगारिक मीलनचित्र रंगविल्यानें भावी संगमसूचकता कालिदासानें व्यक्तविली आहे हें पूर्णसरस्वतीचें विवरण अत्यंत मार्मिक सहृयतेचें आहे असें वाटल्यावांचून रहात नाहीं.

—उत्तरमेघ—

पूर्वमेघास प्रथम आश्वास व उत्तर मेघास द्वितीय आश्वास असेंहि कांहीं प्रतींत नांव दिसतें. सर्ग किंवा अध्याय अशीं जशीं विभागदर्शक नांवें असतात तसाच हा प्रकार आहे. दूतकाव्यांना संदेशकाव्यें असें दक्षिण भारतांत विशेषतः नाम दिसतें.

आरंभीं सांगितल्याप्रमाणें प्रथम मार्गकथन, नंतर ओघानेंच अलकापुरीवर्णन, तेथें आपल्या मंदिराच्या खाणाखुणा, नंतर दयितावर्णन

आणि तिची स्थिति व तिच्याकडे कसें जावें, इत्यादि सांगून झाल्यावर क्रमानेंच संदेश आहे. कालिदासाची सर्व रचना सुसूत्र व तर्कशुद्ध अशीच आहे. तिला नांवें ठेवायला यत्किंचित्हि जागा नाहीं.

मे. ६५. येथें यक्षनगरींतील संतत सर्व समृद्धि दर्शविण्यासाठीं क्रमानें शरदृतु, हेमन्तर्तु, शिशिरर्तु, वसन्त ऋतु, ग्रीष्म ऋतु व शेवटीं प्रावृट् अगर वर्षर्तु अशा सहाहि ऋतुंचीं प्रतीकें अलकेंतल्या विलासिनींचीं भूषणें एकदमच होत असतात हें यक्ष मोठ्या खुबीनें मेघास सांगतो. कमल हें शरदूचें चिन्ह, कुन्द हें हेमन्तलक्षण, लोध्रपुष्प हें शिशिरकाल-लक्षण, कुरबक (अगर कोरंटी) हें वसन्तचिन्ह, शिरीष हें ग्रीष्मलक्षण तसेंच नीप किंवा कदम्बपुष्प हें घनागमचिन्ह होय. यांत हातांत कमल, केशांत कुंद, मुखावर लोध्ररज, केशपाशांत कुरबक, कर्णावर शिरीष व शेवटीं भांगांत प्रावृट्कालचें कदंब अशीं हीं सर्व रम्य योजना आहे. मेघास सांगतांना 'तूं येतोस त्याकालचें कदंब' स्त्रिया भांगांत धारण करतात. म्हणजे सर्वांत अत्युच्च स्थान वर्षर्तुकालीन नीपाला !

अलकेचें हें व पुढें येणारें वर्णन कल्पनासाम्याचे दृष्टीनें कुमार-संभवांतील ६व्या सर्गांतल्या ओषधिप्रस्थ ह्या हिमवत्पुरीच्या वर्णनांशीं बरेंच तोलून बघण्यासारखें आहे. (श्लो. ३७-४७ पहा.) यांचा सुश्लोककुमारांतील माझा अनुवाद येथें अर्थविशदीकरणार्थ देत आहें.

संपन्मयी जी अलकाचि तेथें गर्मे निविष्टा उचलोनि कीं ते
स्वर्गा भरोनी उरल्या सुरांनीं कीं वासिली जी नगराजधानी ! ३७
गंगाप्रवाहें परिखा समोंतीं, प्राकारिं दीप्त्यौषधि नित्यकांति,
तटीं महारत्नशिला जियेला, शोभे वृताही नगरी विशाला. ३८
सिंहासही भीति न हत्ति जेथें जेथील वाजी बिलयोनि जे, ते
यत्पौर ते किन्नरयक्ष साच पौरांगना त्या वनदेवताच ! ३९
जेथील हर्म्याग्रि पयोधरांची जी गर्जना चालतसे सदाचि,
तिच्यांत संमिश्र मृदंगनाद टाळ्यांमुळें ओळखुं येत भेद ४०
शाखांवरी सुंदरवस्त्रगर्भा हो कल्पवृक्षांवरि जेथ शोभा;
घरोवरीं चारु अशा पताका अयत्नसिद्धा सजल्या अनेका ४१

जेथील त्या स्फाटिकपूर्णधामीं गच्चीवरी शोभति पानभूमी,
तारांगणांची प्रतिबिंबपंक्ति भासे तिथें कीं सुमहारशी ती. ४२
रात्रौ जिथें औषधिसुप्रकाशें अंधार तो दुर्दिनिंही न भासे,
येई दिसोनी अभिसारिकांना स्वमार्ग, ठावेंहि तमिस्र त्यां ना ! ४३
जेथील आयुर्मिति यौवनाची तो जेथ पुष्पायुध मात्र जाची,
ये ग्लानि जी जेथ रतिश्रमानें, ती तेवढी चेतनलुप्ति होणें ! ४४
रामा जिथें भ्रूकुटिभंगचिन्हें ओष्ठांचिया त्या परिकंपनानें
सुरम्यशा अंगुलितर्जनांनीं प्रियांसि कोपें वळवीति मानी ४५
उद्यान बाहेरि सुगंधि सर्व आख्या जया 'मादन' 'गंध'पूर्व,
यत्कल्पवृक्षांतलिं झोंप घेती प्रवासि विद्याधर शांत चित्तीं ४६
हिमाद्रिच्या त्या बघुनी पुरीतें दिव्यर्षि चिंता करिती मनीं ते,
वाटे तया स्वर्ग मिळो म्हणोनी केलीं तपें तीं सगळीं फसोनी ४७

— सुश्लोककुमार सर्ग ६

सु. मे. १४१. 'न कामतापाविण अन्यताप' इ. कल्पना वर उद्धृत केलेल्या सुश्लोककुमार ६-४४ मध्यें आहेत.

मे. ६८. 'मधु रतिफलं' प्रमाणांत योग्य वेळीं मधुसेवन विलासी यक्षांचें नित्यक्रमांतलेंच अनंगोत्तेजक अंग होय. उन्मत्तता न येतां केवळ क्रीडोत्तेजक होईल इतकेंच सेवन 'रतिफलं' या शब्दयोजनेनें द्योतित केलें आहे.

मे. ६९. यक्षबालिकांची एक क्रीडा, 'गूढमणि' नांवाची येथें उल्लेखिलेली आहे. चिंचोके, गजगे, यांनीं जशा इतर मुली खेळतात त्याचप्रकारचा वैभवसंपन्न यक्षकन्यांचा सुवर्णवाळू व त्यांत लपवून ठेवलेलें मोतीं हुडकून काढण्याच्या खेळांचा कांहीं प्रकार येथें निर्देशिलेला आहे.

मे. ७१. घनांतील तुषारांनीं वाड्यांतल्या उंच माड्यांतील रंगीत चित्रें दूषित होण्याच्या या प्रकारावरून मल्लिनाथानें जो ध्वन्यर्थ काढला आहे तो तितकासा स्वभावसुंदर नाहीं. कारण यक्ष मेघाचे बहुधा उत्तोत्तम गुणच वाखाणीत आला आहे. त्यांत अशा प्रकारचा अर्थ काढणें सयुक्तिक वाटत नाहीं. पूर्णसरस्वतीची 'विद्युल्लता' अगर परमेश्वरकृत

'सुमनोरमणी' इ. टीकांपैकीं कोणींच अशा ध्वन्यर्थाला थारा दिलेला दिसत नाहीं !

मे. ८०. अशोक, तरुण अंगनांच्या लत्तेनें व केसर (बकुलवृक्ष), त्यांच्या मद्यचुळेनें कुसुमित होतो असा संस्कृत वाङ्मयांत कविसंकेत रूढ आहे. यक्ष म्हणतो माझ्या मंदिराशेजारच्या उद्यानांतील अशोक व बकुल यांना माझ्या प्रियेच्या लत्ताप्रहाराचे व तिच्या मुखांतील मद्याच्या चुळीच्या सेवनाचे डोहाळेच लागलेले असतात व या बाबतींत ते वृक्ष माझ्याशीं जणुं स्पर्धाच करतात !, सुश्लोकमेघ श्लो. १६९ मध्यें 'प्रियेच्या चरणांबुजाची' ऐवजीं 'प्रियावामपदांबुजाची' म्हणणें अधिक बरोबर होय.

स्त्रीणां स्पर्शात्प्रियङ्गुर्विकसति बकुलः सीधुगण्डूषसेका—
त्पादाघातादशोकस्तिलककुरबकौ वीक्षणालिङ्गनाभ्याम् ।
मन्दारो नर्मवाक्यात्पटुमृदुहसनाच्चम्पको वक्त्रवाता—
च्चूतो गीतान्नमेरुर्विकसति च पुरो नर्तनात्कर्णिकारः ॥

तसेंच, पहा—

पादाहतः प्रमदया विकसत्यशोकः शोकं जहाति बकुलो मधुसीधुसिक्तः !
आलोकनात्कुरबकः कुरुते विकासमालोडितस्तिलक उत्कलिको विभाति ॥

मल्लिनाथाची कुमारसंभव ३–२६ वरील टीका

मे. ८१. 'तुझ्या मित्राला माझी प्रिया टाळ्यांनीं नाचवितें व मी तुला सर्व मार्गभर नाचवूं पहात आहें !' असा भावहि एका टीकाकारानें व्यक्त केला आहे तो मनोज्ञ आहे यांत शंका नाहीं.

सु.मे. १७७. शिखराभदन्ता– पिकलेल्या डाळिंबांतील दाण्यांप्रमाणें वा माणिकाप्रमाणें लाल हिरड्यांचे सुंदर दांत असलेली.

मे. ८७. ललनांनीं पिंजऱ्यांत पाळलेल्या शुकसारिकांसंबंधीं श्रीतुलसीरामायणांत एक हृदयस्पर्शी उल्लेख आहे. सीतेनें पाळलेल्या सारिका व शुक, सीता जेव्हां सासरीं जायला निघाली तेव्हां अतिशय शोकाकुल झाले त्याचें वर्णन गोस्वामी श्रीतुलसीदासजी करतात तें मीं केलेल्या अनुवादावरून येथें देत आहे—

" पाळोनियां कनकपंजरिं जानकीनें ज्या सारिका पढविल्या शुकही मुखानें

त्या विव्हला म्हणति,‘जानकि ! तूं कुठें गे !’ऐकोनि तें हृदयधैर्य कसें न भंगे?!”

‘ सुश्लोक–मानस ’ बालकांड, तरंग ५३

मे. ८९. ‘ मत्सङ्गं वा हृदयनिहितारम्भमास्वादयन्ती ’ यांतील कल्पना वाल्मीकिरामायणांतील पुढील वर्णनाशीं तोलून पहावी—

‘ नैषा पश्यति राक्षस्यो नेमान्पुष्पफलद्रुमान् ।

एकस्थहृदया नूनं राममेवानुपश्यति ’ तसेंच श्रीरामाची स्थिति ‘ नैव दंशान्न मशकान्न कीटान्न सरीसृपान् । राघवो ऽपनयेद्गात्रा-त्त्वद्गतेनान्तरात्मना ’ [पहा ‘ विद्युल्लता ’]

मे. ९४. ‘ आद्ये बद्धा विरहदिवसे या शिखा दाम हित्वा

शापस्यान्ते विगलितशुचा तां मयोद्वेष्टनीयाम् । ’

(शापावसानीं सुटतांचि शोक सोडायचें मींच जिला फिरोनी सु. मे.१९७) यांतील कल्पनेशीं वाल्मीकिरामायणांतील पुढील श्लोक तुलनेनें पहावाः—

अचिरान्मोक्ष्यते सीते देवि ते जघनं गताम् ।

धृतामेकां बहून्मासान्वेणीं रामो महाबलः ॥ ३१ ॥

युद्धकाण्ड, सर्ग ३३

मे. १०४. ‘ अङ्गेनाङ्गं ’ इ. श्लोकांतील कल्पना अत्यंत करुणरम्य अशी आहे. “ तुझ्याशीं हे प्रिये ! तो कांत संकल्पांनींच तुला तशा तशा प्रकारें कल्पून तुझ्यांत गाढ प्रवेश करीत आहे.” “ अंगीं कृशीं तो कृश, तप्तिं तप्त, शोकाश्रुपूर्णांमधिं अश्रुपूर्ण । औत्सुक्ययुक्तांगिं समुत्सुकांग’ उच्छ्-वासितीं श्वास तदीय उष्ण ” सु मे. २१७ इत्यादींत, एकमेकांविषयींचा गाढ अनुरागच व्यक्त झालेला आहे. विशेषणांत कमी अधिक जो फरक दिसतो त्यांत दोघांचीहि कमी अधिक प्रमाणानें तितकीच गाढ शोकाकुल उत्कंठायुक्तता आहे हेंच कालिदासास सुचवायचें आहे. क्रमभंगाचा दोष असेल असें वाटण्यास अवसरहि नाहीं असें पूर्णसरस्वतीचें प्रतिपादन सहृदयतेनें अत्यंत मनोरम झालें आहे.

मे. १०६. ‘ चण्डि ’ या संबोधनाचा भाव असाः— ‘ प्रिये, तुझें सादृश्य असेल अशा कल्पनेनें मी पाहूं जातों, परंतु तुझें समग्र सादृश्य मला एकत्र कोठेंच दिसूं नये अशा प्रकारें जणू तूंच तें विभागून टाकलेलें

दिसतें !' किंवा, ' तुझ्या व्यतिरिक्त अन्यत्र मी अशा सादृश्यदर्शनांत क्षणभरहि रमावें हें हे चण्डि ! तुला कसें सहन व्हावें ?' या श्लोकांत स्मरण अलंकार आहे. — चण्डी म्हणजे कोपनशील स्त्री.

मे. १०८. " स्वप्नांत ध्यासानें तूं दिसतेस व मी तुला कडकडून भेटूं पहातों ! परंतु माझी स्थिति पाहून वनदेवतांचे अश्रू ओघळतात." तुल्य कल्पना पार्वतीच्या प्रेमाची. कुमार. ५–५६, ५७. अर्थ सुश्लोककुमार पहा: —

लागे जशी शिवकथानक गावया ती बाष्पें गळा भरुनि ये, नुमटे तदुक्ति
ती तत्स्थिती बघुनि किंनरराजकन्या संगीतिं मैत्रिणि तिच्या रडल्याहि वन्या
यामीं तृतीयिं सहसाचि विनिद्र, रात्रीं होऊनि; लोचन मिटी क्षण चारुगात्री
शून्यस्थलींच करुनी कर कंठपाशीं, बोले 'कुठें असितकंठ ! निघोनि जाशी ?।'

सुश्लोक कुमार सर्ग ५–५६, ५७

मे. १११. चक्रनेमिक्रमानें सुखदुःखें या संसारांत नेहमींच भ्रमत असतात ! पहा महाभारत, शान्तिपर्व, अ. २५– 'शोकस्थानसहस्राणि हर्षस्थानशतानि च । दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् ॥ एवमेतानि कालेन प्रियद्वेष्याणि भागशः । जीवेषु परिवर्तन्ते दुःखानि च सुखानि च ॥ सुखस्यानन्तरं दुःखं दुःखस्यानन्तरं सुखम् । न नित्यं लभते दुःखं न नित्यं लभते सुखम् ॥ सुखमेव हि दुःखान्तं कदाचिद्दुःखतः सुखम् । तस्मादेतद्द्वयं जह्याद्य इच्छेच्छाश्वतं सुखम् ॥ सुखान्तप्रभवं दुःखं दुःखान्तप्रभवं सुखम् । यन्निमित्तो भवेच्छोकस्तापो वा दुःखमूर्च्छितः । आयासो वापि यन्मूलस्तदेकाङ्गमपि त्यजेत् ॥ सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाप्रियम् । प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः ॥ ये च मूढतमा लोके ये च बुद्धेः परं गताः । त एव सुखमेधन्ते मध्यमः क्लिश्यते जनः ॥ सुखं च दुःखं च भवाभवौ च लाभालाभौ मरणं जीवितं च । पर्यायतः सर्वमवाप्नुवन्ति तस्माद्धीरो नैव हृष्येन्न शोचेत् ॥

सुखं दुःखान्तमालस्यं दाक्ष्यं दुःखं सुखोदयम् ।
भूतिः श्रीर्ह्रीर्धृतिः कीर्तिर्दक्षे वसति नालसे ॥

नालं सुखाय सुहृदो नालं दुःखाय शत्रवः ।
न च प्रज्ञालमर्थेभ्यो न सुखेभ्योऽप्यलं धनम् ॥
यथा सृष्टोऽसि कौन्तेय धात्रा कर्मसु तत्कुरु ।
अत एव हि सिद्धिस्ते नेशस्त्वं कर्मणां नृप !! शान्तिपर्व अ.२७

रामायणाची फलश्रुति थोडक्यांत अशी— पहा– युद्धकाण्ड समाप्तिसर्ग

" समागम्य प्रवासान्ते रमन्ते सह बान्धवैः ॥
शृण्वन्ति य इदं काव्यं पुरा वाल्मीकिना कृतम् ॥"

आमच्या सहृदय वाचकांसहि श्रीरामकृपेनें हाच आशीर्वाद फलद्रूप व्हावा !

अवतरणिकेंत उद्धृत केलेल्या श्लोकांव्यतिरिक्त, मेघदूतांतील प्रमुख दूतकल्पनेशीं उत्कृष्टपणें तुलतां येतील असे कांहीं श्लोक योगवासिष्ठ निर्वाणप्रकरण, उत्तरार्ध, सर्ग ११८ श्लोक ३०।३१, तसेंच सर्ग ११९ श्लोक १ ते ६ येथें दिले आहेत ते पाहून रसिकांस आश्चर्यच वाटेलः—

अथ रागरक्तहृदयाः स्तनभरवितता विलासललिताङ्ग्यः ।
पथिकानां स्मरणपथं भूयोऽप्यनयन्प्रियाः स्वगेहस्थाः ॥ ३०
सा नूनं मम कान्ता दृष्ट्वा सुस्निग्धघनतमःश्यामम् ।
गगनं च शून्यगहनं प्रलपति भुवि पतति विस्खलति ॥ ३१

* * *

कथयत्येष पथिकः पश्य मन्दरगुल्मके ।
प्रियायाश्चिरलब्धाया वृत्तां विरहसंकथाम् ॥ १
एकत्र शृणु किं वृत्तमाश्चर्यमिदमुत्तमम्
दातुं त्वन्निकटे दूतमहं चिन्तान्वितोऽवदम् ॥ २
अस्मिन्महाप्रलयकालसमे वियोगे यो मां तथेह मम याति गृहं स कः स्यात् ।
नैवास्त्यसौ जगति यः परदुःखशान्त्यै प्रीत्या निरन्तरतरं सरलं यतेत ॥ ३
आ एष शिखरे मेघः स्मराश्व इव संयुतः ।
विद्युल्लता–विलासिन्या वलितो रसिकः स्थितः ॥ ४
भ्रातर्मेघ महेन्द्रचापमुचितं व्यालम्ब्य कण्ठे गुणं
नीचैर्गर्ज मुहूर्तकं कुरु दयां सा बाष्पपूर्णेक्षणा ।

बाला बालमृणालकोमलतनुस्तन्वी न सोढुं क्षमा
तां गत्वा सुगते गलज्जललवैराश्वासयात्मानिलैः ॥ ५
चित्ततूलिकया व्योम्नि लिखित्वालिङ्गिता सती ।
न जाने क्वाधुनैवेतः पयोद दयिता गता ॥ ६

कांहीं दूतकाव्यांतून निवडलेला सुभाषितयुक्त

अर्थान्तरन्यासगुच्छ

इन्दुदूत

स्वादीयः स्यात्कदशनमपि स्नेहधारोपसिक्तम् । १२
न श्रान्तानां सुखयति कथा स्निग्धवर्गोदितापि
स्वस्थे चित्ते प्रणयमधुरा बुद्धयो ह्युद्भवन्ति ॥ १७
मूर्खं प्राज्ञीयति च कुतनुं कामरूपीयति द्रा-
ग्दीनं शूरीयति च कुटिलं प्राञ्जलीयत्यवश्यम् ।
क्रूरं शान्तीयति गतकलं सत्कलीयत्यजस्रं
लोकं सोऽयं जयति निखिलस्त्वद्भगिन्यः प्रभावः ॥ २३
विश्वे दोषान्गणयति जनः को हि राज्ञो भगिन्याः ३०
ऽभीष्टं स्थानं व्रजति हि जनः प्राञ्जलेनाध्वना द्राक् ॥ ३२
प्रोत्तुङ्गानां भवति महतैवापनेयो विरोधः ॥ ३५
पश्चात्तापस्तुदति हृदयं दर्शनीये ह्यदृष्टे ॥ ३९
नान्तःशल्यं स भवति सतां सार्थको यो विलम्बः ॥ ४०
कण्ठप्राणा न हि विरहिणः कृच्छ्रमीषत्सहन्ते ॥ ६८
संसारे यज्जनितजनकप्रेमबन्धो गरीयान् ॥८४॥

पवनदूत

भीतः सर्वो भवति भुजगात् किं पुनस्त्वादृशो यः ॥३४॥
पौरस्त्रीणां द्रविणसुलभा प्रक्रिया भूषणस्य ॥५२॥
कार्योत्तप्ते मनसि लभते नावकाशं विलासः ॥६०॥
गाढोद्भूतः क्व खलु गणयत्यन्वयं त्वार्तिभावः ॥६८॥

किं वा नार्यो रमणविरहे साहसं नाचरन्ति ॥८९॥
यत् सत्यं न त्रिभुवनमपि प्रीतये दुःखितानाम् ॥९२॥
जायन्ते हि प्रणयिनि सुधावीचयो वाचिकानि ॥९६॥
कन्यां लोके न खलु सुधियो दूषयित्वा त्यजन्ति ॥९८॥
पारार्थ्यैकप्रवणमनसस्त्वद्विधा बाष्पमिश्रा–
नापन्नानां न खलु बहुशः काकुवादान्सहन्ते ॥१००॥

उद्धवदूत

न कस्मिन्विश्रम्भं दिशति हरिभक्तिप्रणयिता ॥८॥
न भिक्षा सत्पक्षे व्रजति हि कदाचिद्विफलताम् ॥९॥

हंससंदेश

सन्तः प्राणैरपि विदधते सम्मदं संश्रितानां
कामान्कुर्युः कथमिव न ते कर्मणा केवलेन ॥८॥
ज्ञातज्ञानं न खलु सुधियां तुष्टये पिष्टपेषः ॥९॥
मा गा भ्रान्तिं पदमवनतेनैव मौढ्यं गुणाय ॥१९॥
तन्द्रालुत्वं न खलु घटते धर्मकार्योद्यतानाम् ॥२९॥
कालक्षेपं न खलु सहते कामबाणः कठोरः ॥३०॥
सत्पक्षाणां द्रवति हि मनः सङ्गमे बान्धवानाम् ॥३७॥
चन्द्रः कान्त्या स्फुटमपि जितः कोकिलो मञ्जुजल्पै–
र्हंसा गत्या बकुलसुरभिर्मारुतः श्वासवातैः ।
एते सर्वे युगपदधुना हन्त निघ्नन्ति मुग्धां
प्राप्ते काले क इव सहते प्राक्प्रयुक्तापराधम् ॥९०॥
प्राहुः सन्तः प्रबलरजसां शासनं धर्म्यमेव ॥९२॥
मन्ये साधो! भवति भविता प्रीतिमान् वासुदेव–
स्तस्मिन्प्रीते सकलवरदे को हि न स्यात्कृतार्थः ॥१०१॥

मयूरसन्देश

—महदवमतिः कस्य नार्तिं प्रसूते । ५
भ्रातृप्रीत्यै व्यवसितधियां को विलम्बप्रसङ्गः ॥६२॥ पूर्वभाग

यस्यां मान्द्यं गतिहसितयोरेव मालिन्यमुद्रा
केशेष्वेव स्फुरति कुटिलत्वं च कार्श्यप्रसङ्गः
मध्येष्वेव स्तनकलशयोरेव सङ्घर्षयोगो
नेत्रेष्वेव श्रुतिपथसमुल्लङ्घिता मञ्जुवाचाम् ॥११॥ उत्तरभाग
आस्ते शेते भ्रमति भजते मूकतां बद्धवद्धं
ब्रूते रोदित्युदितकरुणं धैर्यमालम्बते च
मूर्च्छां प्राप्नोत्यपि च लभते चेतनामित्यशक्तो
वक्तुं वेधा अपि विरहजान्यङ्गनाचेष्टितानि ॥६५॥ उत्तरभाग

मेघदूतांतील अर्थान्तरन्यास व सुभाषितें

कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु ॥५॥
याच्ञा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ॥६॥
न क्षुद्रोऽपि प्रथमसुकृतापेक्षया संश्रयाय
प्राप्ते मित्रे भवति विमुखः किं पुनर्यस्तथोच्चैः ॥ १७॥
रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय ॥२०॥
स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमो हि प्रियेषु ॥२८॥
मन्दायन्ते न खलु सुहृदामभ्युपेतार्थकृत्याः ॥३८॥
ज्ञातास्वादो विवृतजघनां को विहातुं समर्थः ॥४१॥
आपन्नार्तिप्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम् ॥५२॥
के वा न स्युः परिभवपदं निष्फलारम्भयत्नाः ॥५४॥
वित्तेशानां न च खलु वयो यौवनादन्यदस्ति ॥६७॥
सूर्यापाये न खलु कमलं पुष्यति स्वामभिख्याम् ॥८२॥
प्रायः सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा ॥९५॥
... सीमन्तिनीनां
कान्तोदन्तः सुहृदुपनतः संगमात्किञ्चिदूनः ॥१०२॥
पूर्वाभाष्यं सुलभविपदां प्राणिनामेतदेव ॥१०३॥
कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ॥१११॥
प्रत्युक्तं हि प्रणयिषु सतामीप्सितार्थक्रियैव ॥११६॥

मेघावर आधारलेल्या कांहीं काव्यकल्पना

चूतनीपकदम्बाढ्यगन्धमादनकन्दरान् ।
विशन्ति मेघहरिणास्तडित्तरललोचनाः ॥
योगवासिष्ठ, निर्वाणप्रकरण उत्तरार्ध, ११४-२७

स्फटिकविमलं पीत्वा तोयं घनोदरनिर्मितं
पिबति न पुनर्मार्गे क्षुभ्यंस्तृषापि शिखी जलम् ।
स्फुरति च घनं स्मृत्वा स्मृत्वा न चापि विपद्यते
गुणवति जने बद्धाशानां श्रमोऽपि सुखावहः ॥२६॥

अहो नु मेघेन जलं विमुक्तमहो नु तोयेन विपूरिता भूः ।
अहो नु भूमौ परितोषितश्च जलैर्धनाढ्यैः प्रणयीव दीनः ॥५२॥
योगवासिष्ठ, निर्वाणप्र. उत्तरार्ध ११९

पूर्वजन्मधनुषा समागतः सोऽतिमात्रलघुदर्शनोऽभवत् ।
केवलोऽपि सुभगो नवाम्बुदः किं पुनस्त्रिदशचापलाञ्छितः ॥
रघुवंश, ११-८०

प्रावृट्कालीं भ्रमत गगनीं नादगंभीर मेघ
प्रेमें आर्द्रा करुनि अवनी प्रीतिचे निर्मि ओघ ।
त्याच्या अंगीं रुचिर धनुची रंगवल्ली निघाली;
विद्युद्देवी चपळ तरुणी त्या जणों माळ घाली ! ॥८॥
मेघश्यामा सुभग तनु ती जानकीनायकाची
विद्युल्लेखसमचि दिसली मैथिली जेथ साची ।
हर्षें वर्षी जल निजकृपा, पूरवी भक्तकाम
संतोषो तो तुजवरि सदा राम कारुण्यधाम ! ॥१२॥
वाङ्मय-श्री-खण्ड, 'विवाहमंगल' रा. चिं. श्रीखण्डे

हा केवडा माधव ! अर्पितांना हो केवढा हर्ष मना विलीना ! ।
तूं सांवळा, हा अतिगौरकांति; विद्युल्लता शोभवि मेघपंक्ति !॥ १२॥
वाङ्मय--श्री--खण्ड, 'मुकुंदपूजा' रा. चिं. श्रीखण्डे